# Journal of Research and Development

*A Multidisciplinary International Level*

*Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access Journal*

*ISSN: 2230-9578 August - 2025 Volume-17 Issue-8(II)*



**Mob: +91-9552416001 Website: https://jrdrvb.org Chief Editor: Prof. Ramesh V. Bhole**

# MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL JOURNAL

Website: https://jrdrvb.org



JOURNAL OF RESEARCH AND DEVELOPMENT

ISSN: 2230-9578
August-2025
Volume-17 Issue-8(II)

Please Get in Touch
Email: jrdrvb.org@gmail.com
Mob: +91-9552416001,+91- 8888454089

# Journal of Research and Development

*A Multidisciplinary International Double Blind Peer Reviewed Refereed International Research Journal*

**Volume No-17, Issue-8(II), August-2025**
Publication Language – English, Hindi, Marathi and other Indian Languages
Periodicity of Publication- Monthly
Email: jrdrvb.org@gmail.com
Journal Website: https://jrdrvb.org

**CHIEF EDITOR**
**Dr. Ramesh V. Bhole**
Professor
Sardar Vallabhbhai Patel Arts and Science College Ainpur,
Tal Raver, Dist Jalgaon
Email: jrdrvb.org@gmail.com

***Disclaimer***

*The Editors shall not be held responsible for the originality or the views and opinions expressed in the papers. The author(s) alone shall bear full responsibility for the originality of their work and the ideas expressed therein.*

***© All rights reserved with the Editors.***

Journal of Research and Development

Peer Reviewed International, Open Access Journal.

ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org

# JOURNAL PARTICULARS

| Name of Journal | JOURNAL OF RESEARCH AND DEVELOPMENT |
|---|---|
| **Frequency** | Monthly : Jan to Dec (12 issues per year) |
| **ISSN** | 2230-9578 |
| **Publisher** | Dr. Ramesh V. Bhole |
| **Chief Editor** | Dr. Ramesh V. Bhole |
| **Copy right** | Journal of Research and Development |
| **Starting Year** | January 2010 |
| **Subject** | Multi-Disciplinary |
| **Review Process** | Double Blind Peer |
| **Language** | English, Hindi, Marathi, and other Indian Constitutional Languages. |
| **Publication Format** | Print |
| **Access** | OPEN ACCESS |
| **License** | BY NC SA Creative Commons (CC BY-NC-SA 4.0) |
| **Phone No.** | +91 93256 65856, +91-8888454089 |
| **Email** | jrdrvb.org@gmail.com |
| **Journal Website** | https://jrdrvb.org |
| **Registered office Address** | 'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23, Mundada Nagar, Jalgaon, Maharashtra, India |
| **Admin. Office Address** | 'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23, Mundada Nagar, Jalgaon , Maharashtra, India |
| **Printing** | **Amitsons Digital Copiers** 106 and 110, Paras Chambers 1st Floor, Near Laxmi Narayan Theatre, Above Bank Of India, Swargate-411042 |

*Journal of Research and Development*
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org

# JOURNAL OF RESEARCH AND DEVELOPMENT

*A Multidisciplinary International Double Blind Peer Reviewed Refereed International Research Journal*

Publication Language – English, Hindi, Marathi and other Indian Languages
Periodicity of Publication- Monthly
Email: jrdrvb.org@gmail.com
Journal Website: https://jrdrvb.org

## CHIEF EDITOR

**Dr. Ramesh V. Bhole**
Professor
Sardar Vallabhbhai Patel Arts and Science College Ainpur,
Tal Raver, Dist Jalgaon
Email: jrdrvb.org@gmail.com

## ASSOCIATE EDITORS

**Prof. (Dr.) Madan Mohan Goel**
Vice-Chancellor (Former)
Rajiv Gandhi National Institute of Youth Development, Govt. of India
Starex University, Gurugram, Haryana, India

**Dr. Praveen G. Saptarshi**
Visiting Faculty
Salisbury University, United States

## MANAGING EDITOR

**Dr. Santosh P. Mane**
Assistant Professor,
Head Department of Geography,
Sameer Gandhi Kala Mahavidyalaya

# Journal of Research and Development

Peer Reviewed International, Open Access Journal.

ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org



## EDITORIAL BOARD

| | | |
|---|---|---|
| **BABALOLA, Ayodele Samuel**<br>Department of Pure and Applied Zoology, Federal University of Agriculture, PMB 2240, Abeokuta, Ogun State, Nigerian | **Dr. Lal Mervin Dharmasiri**<br>Senior Professor and Chair Head of Geography<br>University of Kelaniya, Sri Lanka. | **Vijayanand Selvaraj**<br>Data Strategist and Artificial Intelligence Lead<br>Information Technology (IT), Houston,Texas, USA |
| **Dr. Munther Moh'd Ibrahim Zyoud**<br>Assistant Professor of English Language Teaching Methods-Al-Quds Open University, Palestine. | **Prof. A.G. Amarasinghe**<br>Senior Lecturer Grade<br>University of Kelaniya, Sri Lanka. | **Dr. Gyanaranjan Sahoo**<br>Extension Scientist<br>Orissa University of Agriculture & Technology, Orissa India |
| **Dr. RVS Praveen**<br>Director<br>Digital Engineering and Assurance, USA | **Dr. Ranjan Kalita**<br>Principal<br>Rangapara College, Amaribari, Rangapara, (Autonomous) Assam | **Dr. S. C. Advitot**<br>Principal<br>CBK's B. Sci, R.V. Com. & R. J. Arts College, Akkalkot |
| **Dr. Kulkarni Swanand Gajanan**<br>Associate Professor,<br>Mechanical Engineering Department, S.K.N. Sinhgad College of Engineering,Korti, Pandharpur- | **Dr. Anurag Shrivastava**<br>Professor & Post Doctoral,<br>Lincoln University College (LUC)<br>Petaling Jaya, Malaysia, Malyasia | **Prof. (Dr.) F. M. Nadaf**<br>Principal,<br>Government College Borda Margao Goa (Autonomous), India |
| **Dr. Tushti Sharma**<br>Royal School of Languages,<br>The Assam Royal Global University, Guwahati, Assam | **Dr. Sandeep Rout**<br>Faculty of Agriculture,<br>Sri Sri University, Cuttack, Odisha | **Dr. Daneshwar. R. Pandey**<br>Assistant Professor,<br>Head Of Department<br>S.S Agrawal College Of Commerce And Management Navsari Gujarat |



## PUBLISHER

**Dr. Ramesh V. Bhole**

'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23, Mundada Nagar, Jalgaon

Email: jrdrvb.org@gmail.com Journal Website: https://jrdrvb.org

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025


| Sr. No. | CONTENTS | Page No. |
|---|---|---|
| 1 | हवामान बदलाचे कृषी क्षेत्रावरील परिणाम<br>**डॉ. बी. डी. इंगवले** | 1-5 |
| 2 | सांस्कृतिक विज्ञानवाद<br>**डॉ.प्रा. पुरुषोत्तम गुणवंतराव पखाले** | 6-8 |
| 3 | कृत्रिम बुद्धिमत्तेचा (AI) शैक्षणिक प्रकाशन प्रक्रियेवर होणारा परिणाम<br>**प्रा. संजना कुणाल पाटील** | 9-12 |
| 4 | संयुक्त राष्ट्र संघ व शाश्वत विकास<br>**प्रा. डॉ. घोलप कमलाकर गोरख** | 13-16 |
| 5 | नैसर्गिक संसाधनांच्या देखरेखी मध्ये रिमोट सेंसिंगची भूमीका<br>**नितिन नागनाथ करळे, सौ. सांजना कुणाल पाटील** | 17-19 |
| 6 | सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांवर मुद्रा योजनेतील आव्हाने आणि मर्यादा<br>**आशिष विठ्ठलराव आखरे, डॉ. रेकचंद गणपत गोंगले** | 20-25 |
| 7 | भोजपुर जिला में जल जीवन हरियाली योजना की स्थिति एवं विकास: एक भौगोलिक अध्ययन<br>**डॉ. आरूण कुमार** | 26-31 |
| 8 | आधुनिकतावाद आणि १९९० नंतरच्या कथांमधील सामाजिक विचार<br>**किरण यशवंत सोनार, डॉ शोभा डहाळे** | 32-37 |
| 9 | सद्य:स्थितीत चार्वाक तत्त्वविचारातून शाश्वत विकासातील नितीमत्ता साधताना येणारी आव्हाने<br>**डॉ. गोरोबा तुकाराम खुरपे** | 38-41 |
| 10 | पर्यावरण संरक्षण आणि शाश्वत विकासा समोरील आव्हाणे.<br>**डॉ.कविता आर.किर्दक** | 42-44 |
| 11 | महिला अत्याचार, अपराध एवं उत्पीड़न और मानवाधिकार संरक्षण व संवर्धन में मानवाधिकार आयोग की भूमिका .<br>**डॉ भूपेन्द्र कुमार जाँगिड** | 45-50 |
| 12 | महाराष्ट्रातील दुष्काळ निवारण व व्यवस्थापन-<br>**डॉ.अशोक नामदेव ससाणे, वसुंधरा दत्ताराम साळुंखे** | 51-59 |
| 13 | आयुर्वेदिक वैद्यकीय महाविद्यालयीन ग्रंथालयात आयसीटी (ICT) आधारित सेवा-<br>**डॉ. राहुल तुकाराम थोरात** | 60-65 |
| 14 | महेश एलकुंचवार यांच्या एकांकिकांतील जीवनाशय(संदर्भ : यातनाघर एकांकिका संग्रह)<br>**जगदीश पवार , एकनाथ फुटाणे** | 66-70 |
| 15 | शाश्वत विकास लक्ष्य आणि भारतीय आरोग्य स्थिती : एक अभ्यास<br>**डॉ. रमेश सदाशिव वाघमारे** | 71-76 |
| 16 | एमआयडीसीतील लघु व मध्यम उद्योगांच्या व्यवस्थापन पद्धतीवरील अभ्यास: अहिल्यानगर व नाशिक जिल्हा<br>**डॉ. एस. के. पुलाटे , स.बी.घोलप** | 77-80 |
| 17 | आदिवासी सणोत्सव आणि पर्यावरण<br>**डॉ प्रा. माहेश्वरी वीरसिंग गावित** | 81-87 |
| 18 | उत्तर महाराष्ट्रातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे (APMC) विपणन कामकाज: एक समीक्षात्मक अभ्यास<br>**प्रा.जी.डी.बोर्डे, गोरडे मनिषा** | 88-92 |

| | | |
|---|---|---|
| 19 | महाराष्ट्र विधानसभेतील महिला प्रतिनिधित्वाचा समीक्षात्मक आढावा कालखंड (१९६२ ते २०२४)<br>**अपर्णा जगताप, प्रो. डॉ.अनिल बनकर** | 93-96 |
| 20 | सूक्ष्म, लघु मध्यम उपक्रम क्षेत्र - राज्यनिहाय गुंतवणुकीचे विश्लेषण<br>**सकटे निलम मोहन** | 97-101 |
| 21 | स्मार्ट प्रकल्पांतर्गत राबविण्यात आलेल्या उपप्रकल्पांचे वर्णनात्मक अध्ययन. विशेष संदर्भ - उत्तर महाराष्ट्र<br>**राठोड अंकिता एकनाथ, प्रो. डॉ. सौ. सनानसे कांचन** | 102-109 |
| 22 | सुशासन व भ्रष्टाचार मुक्त प्रशासन, शाश्वत विकासाचा मार्ग<br>**प्रा. डॉ. वृषाली लक्ष्मीकांत फुके** | 110-115 |
| 23 | आधुनिक कवितेतील स्त्री जाणीव एक समकालीन अभ्यास<br>**प्रा.डॉ. शोभा ज्ञानेश्वर डहाळे , जयश्री अनिल वाघ** | 116-120 |
| 24 | पीक विमा दाव्यांच्या प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी आणि शेतकऱ्यांचे अनुभव: काटोल आणि नरखेड तालुक्याचा अभ्यास<br>**प्रशांत शामराव डाखोळे, फाल्गुनी विलासराव काठोळे, डॉ. रेकचंद गोंगल** | 121-124 |
| 25 | शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांचा शैक्षणिक दृष्टिकोनातून अभ्यास<br>**डॉ. अंकुश रामचंद्र बनसोडे** | 125-128 |
| 26 | शाश्वत विकास आणि भारताची ध्येय - धोरणे: एक चिकित्सक अभ्यास.<br>**प्रा.डॉ.देविदास ग्यानुजी नरवाडे** | 129-132 |
| 27 | मासेमारी क्षेत्रातील मानव निर्मित व निसर्गिक समस्यांचे अध्ययन<br>**डॉ.आर.एस शिंदे , श्री.पंकज एकनाथ भोईर** | 133-134 |
| 28 | असुरसंस्कृतीतील पर्यावरण<br>**प्रा. भक्ती हुबळीकर** | 135 -137 |
| 29 | महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, नागपूर शहरातील शासकीय वाहकाचे आर्थिक स्थितीचे षणात्मक अध्ययन<br>**प्रा. नीलम या. बारमासे, डॉ. रेकचंद गणपत गोंगले** | 138-141 |
| 30 | जागतिक उपासमारीला कारणीभूत असणारे घटक आणि उपाय योजना<br>**डॉ. अशोक सटवाजी हनवते** | 142-145 |
| 31 | ई-कॉमर्स, पर्यावरण आणि शाश्वत विकास: एक अभ्यास<br>**डॉ. मनोहर नारायण मोरे** | 146-147 |
| 32 | तंजावरचे सरफोजी राजे भोसले (द्वितीय) यांचे वैद्यकीय क्षेत्रातील योगदान: एक ऐतिहासिक अध्ययन<br>**अमितकुमार गणेश शिंगणे** | 148-153 |
| 33 | प्रदुषण नियंत्रण व शाश्वत जीवनशैली<br>**सहा. प्रा. कोटकर कविता अशोक** | 154-156 |

# Journal of Research and Development

Peer Reviewed International, Open Access Journal.

ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

Original Article

# हवामान बदलाचे कृषी क्षेत्रावरील परिणाम

**डॉ. बी. डी. इंगवले**

अर्थशास्त्र विभाग प्रमुख

आनंदीबाई रावराणे कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय वैभववाडी.

**Email:** bdingawale59@gmail

**Manuscript ID**:

JRD -2025-170801

ISSN: 2230-9578

Volume 17

Issue 8(II)

Pp. 1-5

August 2025

**Submitted:** 10 July. 2025

**Revised:** 25 July. 2025

**Accepted:** 10 Aug 2025

**Published:** 30 Aug. 2025

***घोषवारा***

*"Global Warming " हा शब्द अगदी ताजा वाटत असला तरी त्याचा इतिहास मात्र शंभर वर्षापेक्षा अधिक जुना आहे. 1950 च्या दरम्यान जगातील अनेक शास्त्रज्ञांनी आणि इतर वैज्ञानिकांनी वातावरणातील कार्बनच्या थराचे व्यवस्थित मोजमाप केले आणि तापमान वाढीच्या धोक्याची घंटा वाजवली. भारतात आजही जवळपास 55% लोकांची उपजीविका कृषीवर अवलंबून आहे. म्हणून हवामान साक्षरता हवामान बदलाची जाणीव या गोष्टी आजच्या संदर्भात अत्यंत महत्त्वाच्या झालेले आहेत. वाढणाऱ्या तापमानाचा परिणाम शेती उत्पादन, पशुधन, मत्स्य उत्पादन व इतर संबंधित अनेक घटकावर मोठ्या प्रमाणावर जाणवतो. 1971 ते 2007 च्या काळामध्ये तापमान वाढ दिसून आली. जी 1998 ते 2007 या काळात सर्वात अधिक होती. हिवाळ्यात व पावसाळ्यानंतरच्या कालावधीत ही तापमान वाढ अधिक असते. सध्याच्या वाढत्या लोकसंख्येच्या दरानुसार शेतीचे उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढणे गरजेचे आहे. 2 बिलियन ते 4 बिलियन टन एवढे वाढायला हवे, परंतु यावर जगातील विविध देशात भारतासहित वातावरणातील बदलामुळे कृषी उत्पादन मोठ्या प्रमाणावर प्रभावित होत आहे. बदलत्या हवामानाच्या परिमाणामुळे व वनस्पती व प्राणी जीवन विस्कळीत होते. तापमान वाढीमुळे पर्जन्यवृष्टीत वाढ अथवा घट होणे अपेक्षित आहे. वातावरणातील कार्बनच्या वाढत्या प्रमाणाचा पिकांच्या विकासावर परिणाम होतो. दुष्काळ, अतिवृष्टी, पूर,चक्रीवादळ यासारख्या नैसर्गिक घटनांची वारंवारिता हवामान बदलामुळे वाढणार असून त्यामुळे मुख्यतः जमिनीचा कस कमी होतो पिकांची नासाडी होते. हवामान बदलाचे सकल, उंचीवरील प्रदेश, कोरडवाहू प्रदेशात भिन्न भिन्न परिणाम होत असतात. जागतिक बँकेच्या एका अभ्यासात अहवाल बदलाचे दोन दृष्टिक्षेप वापरून भात भुईमूग मका ज्वारी व सूर्यफूल या पिकावरील परिणाम अभ्यासले आहेत. भुईमन ज्वारी व मका पिकांच्या दर हेक्टरी उत्पादनात बदल होत नाही. भारताच्या दर हेक्टर उत्पादनात जवळपास आठ टक्के घट होते आणि सूर्यफुलाच्या दर हेक्टर उत्पादनात सुद्धा तेवढीच वाढ होते असे आढळून आले आहे बदललेल्या वातावरणात वनस्पतींचे प्रकाश संश्लेषण वाढवून उत्पादन वाढू शकले असते. पण हे तेव्हाच शक्य आहे जेव्हा वाढलेल्या कार्बन डाय-ऑक्साइडच्या प्रमाणाबरोबरच योग्य तापमान व योग्य प्रजन्यमानाची ही साथ मिळाली असती. परंतु दुर्दैवाने तापमान व पर्जन्यमानाचे प्रमाण पुढील काळात अधिकच अयोग्य दिशेने जात राहणार आहे. या बदलत्या वातावरणाच्या युगात जागतिक शेती क्षेत्र व भारतीय क्षेत्र कसे तग धरू शकेल हे पाहणे गरजेचे आहे. यासाठी काही मान्यताप्राप्त निवडक अभ्यासकांच्या निष्कर्षावरून हवामान बदलाचे कृषीवर परिणाम समजून घेता येतील.*

***बीज संज्ञा*** *---- हवामान बदल, हवामान बदलाचा कृषी क्षेत्रावरील परिणाम.*

## प्रस्तावना

सूर्यप्रकाश व इतर अदृश्य सौर किरणे पृथ्वीच्या सभोवताल असलेल्या वातावरणातून पृथ्वीच्या पृष्ठभागापर्यंत पोहोचतात. या सौर किरणापैकी काही मोठ्या प्रमाणात पुन्हा वातावरणात परावर्तित होतात. उरलेली सौर किरणे पृथ्वीच्या पृष्ठभागाकडून शोषली जातात व त्यामुळे पृथ्वीचा पृष्ठभाग तापतो. यानंतर पृथ्वीच्या पृष्ठभागाकडून वातावरणाच्या माध्यमातून अतिरिक्त प्रारणाच्या रूपाने उष्णतेचे विसर्जन होते. वातावरणातील काही विशिष्ट वायूंच्या अस्तित्वामुळे अवरक्त प्रारणांचे उत्सर्जन पृथ्वीच्या पृष्ठभागावरून आकाशात होण्यास प्रतिबंध होतो. या प्रक्रियेस हरितगृह परिणाम असे म्हणतात. यामुळे पृथ्वी सभोवताली असलेल्या वातावरणाच्या हवामानात वाढ घडून येते, जे वायू आवर्त प्राधान्य शोषण घेतात त्यांना हरितगृह वायू असे म्हणतात. काही हरितगृह वायूचे निसर्गात अस्तित्वात असतात ते म्हणजे कार्बन डाय-ऑक्साइड व कमी प्रमाणात असणारे मिथेन होय.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***

*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**

*डॉ. बी. डी. इंगवले, अर्थशास्त्र विभाग प्रमुख, आनंदीबाई रावराणे कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय वैभववाडी.*

**How to cite this article:**

*इंगवले, . बी . डी . (2025). हवामान बदलाचे कृषी क्षेत्रावरील परिणाम. Journal of Research & Development, 17(8(II)), 1–5. https://doi.org/10.5281/zenodo.17231227*

Quick Response Code:

Website: https://jrdrvb.org/

DOI:10.5281/zenodo.17231227

OPEN ACCESS

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

याचाच अर्थ असा की हरितगृह परिणाम जर अस्तित्वात नसता तर पृथ्वीचे सरासरी तापमान आजच्यापेक्षा 30°Cने कमी राहिले असते. म्हणजेच पृथ्वीवर जीवन जवळपास अशक्य झाले असते. पृथ्वीच्या पृष्ठभागाच्या सरासरी तापमानात हळूहळू पण सततची होणारी वाढ जी काही प्रमाणात वातावरणातील हरितगृह वायूंच्या एकूण प्रमाणात होणाऱ्या वाढीमुळे होते. यालाच वैश्विक तापमान वाढ म्हणजेच हवामान बदल असे म्हणतात.

**संशोधनाची उद्दिष्टे ----**

सदर शोध निबंधासाठी खालील उद्दिष्टे निश्चित करण्यात आलेली आहेत.

1) हवामान बदल या संकल्पनेचे अध्ययन करणे.
2) हवामान बदलाचा कृषी क्षेत्रावर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.
3) हवामानातील बदलामुळे भारतीय शेतीवर पीक निहाय झालेले परिणाम अभ्यासणे.

**संशोधनाचे गृहीतक**

हवामान बदलामुळे भारतीय कृषी क्षेत्राचा झालेला विकास हा हा शाश्वत स्वरूपाचा नाही."

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत संशोधनाचा प्रकार वर्णनात्मक व विश्लेषणात्मक आहे. प्रस्तुत शोधन यंदाच्या लेखनासाठी दुय्यम साधनसामग्रीचा अवलंब करण्यात आलेला आहे. हवामान बदल संदर्भात आधारित पुस्तके मासिके प्रात्यक्षिके व वर्तमानपत्रे यांच्या माहितीचा अभ्यास करून शोध निबंधात सदर सामग्रीचा वापर करण्यात आलेला आहे. तसेच अद्यावत माहितीसाठी संगणकीय तंत्राचा वापर करण्यात आलेला आहे.

**संशोधनाचे महत्त्व -----**

पर्यावरण ही सर्वांची सामूहिक मालमत्ता व नैसर्गिक वारसा असल्याने पर्यावरण रक्षणाची जबाबदारी सर्वांची आहे. भारताचे कृषी क्षेत्र अनेक पातळयावर झगडताना दिसत आहे. कृषी क्षेत्राचे आर्थिक विकासात योगदान फार मोठे आहे. कृषी क्षेत्रात इतर क्षेत्रांसारखीच आर्थिक वाढीची क्षमता आहे पण त्यासाठी शेतीचे प्रश्न हे आर्थिक निकषाच्या पलीकडे जाऊन त्याचा अधिक सकल पणे अभ्यास करणे गरजेचे आहे. शेती व अन्नधान्य उत्पादनावर होणारा वातावरण बदलाचा परिणाम संदर्भात अनेक गोष्टींच्या वरती संशोधन करणे आवश्यक आहे. पर्जन्यवृष्टीच्या बदललेल्या स्वरूपाचा परिणाम भारतीय शेती क्षेत्रावर पहावयास मिळतो. वातावरणातील बदलामुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी प्रभावी यंत्रणा निर्माण करण्याची गरज आज भासत आहे. बदलत्या हवामानाच्या परिणामामुळे वनस्पती व प्राणी जीवन विस्कळीत होते. आजच्या बदलत्या वातावरणाच्या युगात जागतिक शेती क्षेत्र व भारतीय क्षेत्र कशाप्रकारे तग धरू शकेल हे पाहणे सदर संशोधनाच्या अभ्यासाचे महत्त्व आहे.

**हवामान बदलाचे कृषी क्षेत्रावरील परिणाम**

हवामान बदल आणि कृषी क्षेत्र यामध्ये जवळचा संबंध असतो. तापमान व त्यामुळे निर्माण होणाऱ्या ऋतुमानाचा शेतीतील उत्पादनावर मोठा परिणाम दिसून येतो. वाटणाऱ्या तापमानाचा परिणाम शेती उत्पादन, पशुधन,मत्स्य उत्पादन व इतर संबंधित अनेक घटकावर मोठ्या प्रमाणावर जाणवतो. प्रत्येक 20 सेंटीग्रेड तापमानाची वाढ शेतीचे स्थूल उत्पादन 5% ने कमी करण्यास कारणीभूत ठरते हे सिद्ध झाले आहे. हे बदललेले वातावरण भारतीय शेतीवर दुहेरी हल्ला चढवते. भारतातील एकूण शेती पैकी 60% शेती क्षेत्र पावसावर अवलंबून आहे. त्यामुळे ते धोक्यात येते. भारतातील एकूण शेती पैकी 80% शेतकरी हे लघु भूधारक अथवा सीमांत भूधारक असल्यामुळे वातावरणातील बदलाचा परिणाम सहन करण्याची क्षमता खूपच कमी आहे. वातावरण बदलाचा परिणाम मुख्यता गहू व तांदूळ या पिकावर जास्त जाणवतो. विशेषता रब्बी हंगामावरती जास्त परिणाम जाणवतो. भारतीय शेतीवर वातावरणातील बदलाचा परिणाम होण्यास कारणीभूत ठरणारी भारतीय शेतीची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे ---

1) भारतीय शेतीतील लघुउदणारक शेतकऱ्यांचे मोठे प्रमाण
2) वारंवार येणारी नैसर्गिक संकटे जसे दुष्काळ व वादळ
3) मान्सून पावसावर आधारित शेतीचे मोठे प्रमाण.
4) देशातील विविध भागात शेती उत्पादनातील मोठ्या प्रमाणावरील विविधता.

वातावरण बदलाचा परिणाम शेतीवर होतो व त्यामुळे अन्नधान्य उत्पादनावर त्याचा परिणाम जाणवतो. वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणानुसार दरवर्षी दोन बिलियन ते चार बिलियन टन एवढे अन्नधान्य वाढायला हवे, परंतु वातावरण बदलामुळे विविध देश आणि भारतासहित काय करावं देशात कृषी उत्पन्न मोठ्या प्रमाणावर प्रभावित होत आहे. शेतीशी संबंधित इतर उद्योग जसे पशुपालन यावरही परिणाम होत आहे. प्रजन्यवृष्टीत सुद्धा बदल घडून आला पावसाळा कधी खूप उशिरा अधिक तर कधी काही वर्षे खूपच कमी अथवा कोरडा झाल्याने पिकांची वाढ प्रभावित होते. यामुळे पावसाचे दिवस कमी झाले या बदलत्या हवामानाच्या परिणामामुळे वनस्पती व प्राणी जीवन विस्कळीत झाले.

**हवामान बदलाचे कृषी क्षेत्रावरील परिणाम अभ्यासण्याच्या पद्धती**

1) उत्पादन फल दृष्टिकोन पद्धती - उत्पादन फलदृष्टी कोणाचे विविध प्रकार कृषी विद्याशास्त्रज्ञांनी व पीक शास्त्रज्ञांनी विकसित केले आहेत. या दृष्टिकोनानुसार संबंधित उत्पादन फल घेऊन पिकाच्या दर हेक्टरी उत्पादनावर विविध पर्यावरणीय चलामधील बदलाचा परिणाम मोजला जातो. पिकाच्या तर हेक्टरी उत्पादनाची संभाव्यरचना ओळखण्यासाठी हा दृष्टिकोन अधिक चांगला आहे.

2) रि कार्डियन दृष्टिकोन पद्धती---- यामध्ये हवामानाशी केलेले अनुकूल बदल लक्षात घेता येतात. कारण या दृष्टिकोनात राज्य व जिल्हास्तरावरील हवामान व इतर चला वरील आकडेवारी घेऊन भूमीच्या किमतीचे हवामान चले व इतर चल यावर प्रतिगमन करण्यात येत असते. या पद्धतीचे यश सर्व हवामान घटक लक्षात घेऊ शकण्यावर अवलंबून असते.

**हवामानातील बदलाचा भारतातील विविध पर्यावरणीय विभागातील शेतीवरील परिणाम**

1) निम्न कोरडवाहू कृषी असणारा पर्यावरणीय विभाग ----- गुजरात,दख्खनचे पठार, मालवा उत्तरेकडील सकल प्रदेश हे भारताचे निम्न कोरडवाहू प्रदेश आहेत. या प्रदेशात वातावरणात विविधता आढळते. या प्रदेशाचे वैशिष्ट्य म्हणजे येथील गरम बाष्पयुक्त उन्हाळा आणि कोरडा हिवाळा तर काही प्रदेशात कोरडा उन्हाळा आणि शितल थंड हिवाळा असतो. वाढलेल्या तापमानामुळे निम्न कोरडवाहू परिस्थिती असणारा भारताचा पश्चिमेकडील भागात पावसाचे प्रमाण वाढले आहे. तर मध्य भागात हिवाळी पावसाचे प्रमाण कमी झाल्याचे पहावयास मिळते. वाढलेले तापमान व कार्बन डाय-ऑक्साइड चे प्रमाण यामुळे या भागात गहू व मका यांच्या उत्पादनावर परिणाम होण्यास सुरुवात झाली आहे. हे विभाग पाण्याच्या कमतरतेमुळे ही प्रभावीत होत आहेत. लोकसंख्येचे घनता अधिक व हवामानास बदल राहणाऱ्या भागासाठी ही समस्या अधिक भयाण ठरू शकते.

2) कोरडवाहू शेती असणारा पर्यावरणीय विभाग ----- वाळवंटी प्रदेशातील जीवन वाढत्या तापमानामुळे अधिकच भयानक होते. वाळवंटी प्रदेशात होणारा जोरदार पाऊस व येणारा पूर ही गोष्ट अधिकच वाईट ठरते कारण पाणी स्वतःसोबत वाळू मधील क्षार वाहून आणते. त्यामुळे पाण्यातील शहरांचे प्रमाण वाढल्याने स्वच्छ पाणी शेतीला मिळण्याची समस्या अधिक गंभीर होते. याचे अत्यंत 2006 मध्ये थर वाळवंटात आलेल्या पूर परिस्थितीत आपणास पहावयास मिळते. या पुरामुळे बारमर जिल्ह्यात तीन ठिकाणी अशी समस्या अधिक प्रमाणात निर्माण झाली. ज्यामुळे शेतीस अनुकूल पर्यावरणावर खूप वाईट परिणाम झाला.

3) हवामानातील बदलाचा भारतातील पावसावरील परिणाम ----- कार्बन डाय-ऑक्साइड च्या वाढीमुळे आज भारतामध्ये पर्जन्यवृष्टी अनियमित स्वरूपात होत असलेली दिसते. कधी अत्याधिक पाऊस तर कधी अत्यल्प पावसामुळे भारतातील शेतकरी प्रभावित होत असलेला दिसतो.

**हवामानातील बदलामुळे भारतीय शेतीवर झालेले परिणाम**

आज भारतीय शेती व्यवसाय बदलत्या हवामानाशी जुळवून घेण्यासाठी झगडत आहे. वातावरणातील बदलामुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी प्रभावी यंत्रणा निर्माण करण्याची गरज आज भासत आहे. भारतीय शेती संशोधन संस्थेने विविध पिकावरील परिणामांचा अभ्यास करण्यास सुरुवात केली असून त्याचे विश्लेषण पुढील प्रमाणे आहे.

**1)** तृणधान्य - आशियात व पॅसिफिक महासागराच्या भागातील प्रदेश सध्या तृणधान्य उत्पादनाची मोठी समस्या निर्माण झाली आहे. गहू तांदूळ व मका या धान्याचे उत्पादन 2050 पर्यंत अनुक्रमे 50%, 17%, 6% नी घटलेले पाहावयास मिळते. ज्यामुळे 1.6 बिलियन लोकांच्या अन्न सुरक्षेचा प्रश्न दक्षिण आशियाई देशांमध्ये निर्माण होईल. भविष्यातील तापमानातील वाढ तृणधान्ये उत्पादना करता गंभीर समस्या बनेल.

**2)** गहू- भारत हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा गहू उत्पादक देश असून गव्हाची राष्ट्रीय उत्पादकता प्रती हेक्टर 2708 एवढी आहे. उत्तर भारतातील उत्तर प्रदेश पंजाब हरियाणा उत्तरांचल आणि हिमाचल प्रदेश ही काही मुख्य गहू उत्पादक राज्य आहेत. या राज्यामध्ये 10 सेंटीग्रेडने वाढलेले तापमानही गहू उत्पादनावर मोठा परिणाम करणार आहे. संपूर्ण देशाचा विचार करता 10 सेंटीमीटरने वाढीव तापमान सहा मिलियन टन गव्हाच्या उत्पादनावर परिणाम करते. यासाठी भविष्यात पेरणीची तारीख बदलणे व विविध जातीच्या बियाणांचा उपयोग करणे. ही उपाययोजना केल्यानंतर तीन मिलियन पर्यंत कमी करता येऊ शकते. तापमानाचा परिणाम गहू उत्पादनावर ज्या प्रदेशात पावसाच्या पाण्यावर गहू उत्पादन होते त्या ठिकाणी अधिक जाणवेल. जर यासाठी कुठलीच उपाययोजना केली गेली नाही तर.

**3)** तांदूळ - भारतीय कृषी संशोधन संस्थेच्या अहवालानुसार 10 सेंटीग्रेड तापमानाची वाढ तांदळाच्या पिकास प्रभावित करीत नाही. परंतु 10 सेंटीग्रेड ते 40 सेंटीग्रेड तापमानातील वाढ तांदळाचे उत्पादन 10 % ने घटत जाईल. विशेषता बासमती तांदळाचे विविध प्रकार हवामान बदलामुळे अधिक प्रभावित होतात त्यामुळे उत्पादनात मोठी घट घडून येते. पावसाचा तांदळाच्या उत्पादनावर मोठा परिणाम होतो. रात्रीच्या वेळी झालेल्या तापमान येथील वाढीचा भात पिकावरील परिणाम याबाबतीत झालेल्या संशोधनावरून असे दिसून आले की वाढीव तापमान भात विकास खूपच नुकसानकारक ठरते. भारतीय शेती संशोधन संस्थेच्या संशोधनानुसार ईशान्येकडील राज्यांमध्ये वाढलेल्या तापमान व घटलेल्या किरणोत्सर्ग यामुळे भात पिकाचे उत्पादन घटले आहे.

**4)** मका - हे भारतातील तिसऱ्या क्रमांकाचे महत्त्वाचे तृणधान्य आहे. मका हे तृणधान्ये डोंगरी प्रदेश व वाळवंटी प्रदेशात अन्नसुरक्षा मध्ये महत्त्वाचे योगदान करते. या पिकाचे उत्पादन कोरडवाहू व निम्न कोरडवाहू प्रदेशात तापमान वाढीने विशेष करून प्रभावित होते. पर्जन्यमानातील विविधता मका पिकावर परिणाम करते. संशोधनावरून असे लक्षात आले आहे की तामिळनाडूमध्ये 2020,2050, व 2080 पर्यंत मका पिकाचे उत्पादन अनुक्रमे 3%, 9.3%, व 18.3% नी कमी होईल. मका उत्पादन चे तापमान वाढीबरोबर पावसामुळे देखील प्रभावित होते.

**5)** भाजीपाला - अनेक भाज्या या बदलत्या वातावरणामुळे प्रभावित होतात त्यामुळे त्यांचे उत्पादन घटते. परंतु संशोधनाद्वारे ही सिद्ध झाले आहे की कार्बन डाय-ऑक्साइड चे उच्च प्रमाण वाढीव तापमानास संतुलित करते व भाजपवाल्यांचे उत्पादन प्रकाश संश्लेषणाचा वेग वाढल्याने वाढते. काही पालेभाज्या ज्या कार्बन-डा-ऑक्साइडच्या जास्त प्रमाणात असणाऱ्या वातावरणातील वाढू शकतात त्यांचे

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

उत्पादन मात्र वाढत्या वाढलेल्या तापमानास जवळपास 18% ने वाढते. कारण त्यांचा प्रकाश संश्लेषणाचा वेग वाढल्याने त्यांची पाने अधिक लांब रुंद होतात व त्यांच्या बियांची संख्याही वाढते.

**6)** कांदा- वाढलेले कार्बन डाय-ऑक्साइड चे प्रमाण कांदा पिकामध्ये त्यांच्या पानाची उंची वाढवणे व त्यांचे कंद मोठे करणे यासाठी उपयुक्त ठरते. याचा परिणाम म्हणजे साधारण स्थितीतील कार्बन डाय-ऑक्साइडच्या मात्रेपेक्षा वाढलेल्या वातावरणात कांद्याचा व्यास हा75.02 mm एवढा होतो जो की साधारण स्थितीत 65.67mm एवढा असतो.

**7)** टोमॅटो - वाटलेल्या कार्बन डाय-ऑक्साइडच्या प्रमाणाचा टोमॅटोच्या उत्पादनावर सकारात्मक परिणाम दिसतो. साधारण स्थितीत जेथे प्रत्येक झाडास 56 फळे येतात तेथे या वातावरणात 74 पळी मिळतात.

**8)** फळे- नारळ- नारळासारख्या वृक्षावरही बदलत्या वातावरणाचा परिणाम जाणवतो. नारळाच्या पिकासाठी 29 सेंटीग्रेड पर्यंत चे तापमान हवे असते. त्यात 70 सेंटीग्रेड पर्यंत चढउतार चालतो. 1800 एम एम वार्षिक पावसाची गरज असते त्यामुळे पुरेसे उत्पादन मिळते. संशोधनावरून असे सिद्ध झाले आहे की नारळाच्या उत्पादकतेत भारतातील आंध्र प्रदेश,ओडीसा,गुजरात आणि तामिळनाडूच्या किनारपट्टीचे प्रदेश तसेच कर्नाटक येथील वातावरणातील बदलामुळे घट झालेली आहे. केरळ महाराष्ट्र तामिळनाडू व कर्नाटकच्या काही भागांमध्ये उत्पादनात वाढ झालेली आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे नारळाचे उत्पादकता पाण्याच्या उपलब्धतेवर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे.

**9 )**सफरचंद - राष्ट्रीय शेती संशोधन संस्थेच्या एका अहवालावरून असे स्पष्ट झाले आहे की वातावरणातील बदलामुळे हिमाचल प्रदेशातील सफरचंद उत्पादन घटले आहे. सफरचंदाच्या झाडांना उन्हाळयात कळया लागतात आणि जेव्हा हिवाळा येतो तेव्हा त्या कळया लहान झालेले दिवस मान व थंड हवामान यांच्याशी जुळवून घेण्यासाठी सुप्त अवस्थेत जातात. जेव्हा त्यांना आवश्यक तेवढेच थंड वातावरण निर्माण होईल त्यावेळी त्यांची फुले व फळे बनण्यास सुरुवात होते. जर त्यांना आवश्यक असणारे थंड वातावरण प्राप्त झाले नाही तर फुल लागण व पर्यायाने फलोत्पादन मोठ्या प्रमाणावर प्रभावित होते. गेल्या दशकात हिवाळयातील महिन्यात बराचसाच थंडावा कमी झाल्यामुळे बाजुरा व शिमला या हिमाचल प्रदेशातील भागात तापमान वाढले. परिणामी या राज्यातील सफरचंदाचे उत्पादन घटले व स्थूल शेती उत्पादनात घट झाली.

तासारख्या देशाने हवामान बदलाची गांभीर्याने दखल घेणे आवश्यक आहे. कारण हवामान घटकास अधिक संवेदनशील असलेल्या भारतात कृषी क्षेत्रावर मोठी लोकसंख्या अवलंबून आहे. पर्जन्यवस्थेतील घटीमुळे दुष्काळाची तीव्रता वाढते आणि अतिवृष्टीमुळे पूर येतात व त्यांचे देशाची अन्नसुरक्षता व जीवनमान यावर प्रतिकूल परिणाम होतात.

भारत सरकारने हवामान बदलावर 30 जून 2018 रोजी राष्ट्रीय कृषी योजना जाहीर केले आहे. यामध्ये हवामान बदलापासून बचाव करण्यासाठी आठ मोहिमा आखले आहेत. त्यातील प्रमुख म्हणजे सौर ऊर्जा वापर व ऊर्जा कार्यक्षमता वाढवणे, पाणी व्यवस्थापन सुधारणे, हवामान बदलाशी शेतीला लवचिकता करणे, हवामान बदला संबंधी माहिती व संशोधन होत आहे परंतु हे सर्व कसे साध्य करणारे याचे फारसे स्पष्टीकरण त्यात दिसत नाही. राष्ट्रीय कृती योजना हरितगृह वायूंच्या उत्सर्जनात कपात करण्याचा इष्टांक ठरविला नाही. परंतु स्वच्छ तंत्रज्ञान आधारे चिरस्तही विकास साध्य करणे आणि वृद्धीची गुणवत्ता सुधारणे हे लक्ष ठेवले आहे. तसेच हवामान बदला संबंधीच्या आंतरराष्ट्रीय पातळीवरील वाटाघाटीत धोरणात्मक विधायक भूमिका घेण्याचे भारताने ठरविल्याचे दिसून येते. परिणामकारक सहकार्यावर आधारित व समन्यायी वैश्विक दृष्टिकोन निर्माण करण्याची गरज त्यात प्रतिपादन केले आहे. हरितगृह वायू उत्सर्जन कपाती संदर्भातील आंतरराष्ट्रीय प्रयत्नांचे यश हे विकसित देशाकडून जास्तीत जास्त आर्थिक सदन सामग्री व हवामानाशी मैत्रीपूर्ण असलेले तंत्रज्ञान विकसनशील देशाकडे कितपत हस्तांतरित होते यावर अवलंबून राहील असे कृती योजनेत म्हटले आहे. परंतु अमेरिका व इतर औद्योगिक दृष्ट्या प्रगत देशावर हरितगृह वायू उत्सर्जन कपातीसाठी घरगुती प्रयत्न वाढविण्यासाठी दबाव वाढवण्याचा भारताचा रोख दिसत नाही..

**निष्कर्ष-**

1) तापमान वाढीस साधारणता औद्योगिक क्रांतीच्या काळापासून सुरुवात झालेली आहे. तापमान व त्यामुळे निर्माण होणाऱ्या ऋतुमानाचा शेतीमधील उत्पादनावर मोठा परिणाम दिसून येतो.

2) भारतीय शेतीवर वातावरणातील बदलाचा परिणाम होण्यास भारतीय शेतीची वैशिष्ट्ये काही प्रमाणात कारणीभूत आहेत.

3) वातावरणातील बदलामुळे पूर मोठ मोठी चक्र वादळी आणि भूत्खलन सारखी संकटे वारंवार निर्माण होऊ लागले आहेत.

4) मोसमी प्रजन्यमानाच्या क्रियाशील कालखंडात यामुळे बदल होऊन त्याचे दूरगामी परिणाम कृषी क्षेत्रावर होतील. पर्जन्यमानाच्या दिवसांमध्ये पंधरा दिवसाची घट होती.

5) वातावरणातील बदलाचा परिणाम सहन करण्याची क्षमता इतर युरोपियन देशांच्या पेक्षा भारतीय शेतकऱ्यांच्या खूपच कमी आहे.

6) हवामान बदलास काही प्रमाणात हरितगृह वायूचे उत्सर्जन कारणीभूत ठरत आहे.

7) कार्बन डाय ऑक्सिजनचे उत्सर्जन करणारा भारत हा देश अमेरिका चीन,रशिया व जपान नंतर जगातील पाचव्या क्रमांकाचा देश आहे.

8) वातावरणात झालेल्या बदलाचा परिणाम शेती व शेतीशी संबंधित उद्योग, पशुपालन व मत्स्य शेती यांच्यावरही झालेला आहे.

9) वातावरण बदलामुळे नारळ, सफरचंद व आंबे यांचे उत्पादन बरेच घटले आहे तसेच पशुधनाचे नैसर्गिक संकटामुळे फार मोठे नुकसान झाले आहे.

10) भारताने हवामान बदला संदर्भात अनुकूलन व उपशमन याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची नितांत आवश्यकता आहे.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

**सारांश**

या वातावरण बदलाशी जुळवून घेण्यासाठी शेतकऱ्यांची त्यांच्याशी जगण्याची क्षमता वाढवणे गरजेचे आहे. शेतकरी व ग्रामीण भागातील व्यक्तींना या बदलत्या वातावरण बदलाशी जुळवून घेण्यासाठी काय करावे लागेल यासंबंधी विचार करणे गरजेचे ठरते. यामध्ये सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे वाढत्या तापमानामुळे मोठ्या प्रमाणात पिकावरील रोगजंतू व पिकांची वाढ ही समस्या सोडवणे कठीण बाब आहे. वाढत्या तापमानामुळे रोगजंतू वाढीचा व त्यांच्या प्रजननाचा वेग वाढतो. त्यामुळे त्यांचा पिकावरील प्रादुर्भाव वाढत जातो. याचे परिणाम स्वरूप शेतीच्या एकूण उत्पादनात घट होते. बदललेल्या वातावरणात वनस्पतींचे प्रकाश संश्लेषण वाढवून उत्पादन वाढू शकले असते पण ते तेव्हाच शक्य आहे जेव्हा वाढलेल्या कार्बन डाय-ऑक्साइडच्या प्रमाणाबरोबरच योग्य तापमान व योग्य पर्जन्यमानाची ही साथ मिळाली असती. परंतु दुर्दैवाने तापमान व पर्जन्यमानाचे प्रमाण पुढील काळात अधिकच अयोग्य दिशेने जात राहणार आहे. या बदलत्या वातावरणाच्या युगात जागतिक शेती क्षेत्र व भारतीय शेती क्षेत्रात कशाप्रकारे तग धरू शकेल हे पाहणे गरजेचे आहे.

**संदर्भसूची –**

1)Joan Martinez ----Alier and Leha Temper (2007),Oil and Climate Change :Voice from the South, EPW December 15.
2)Philippe Cullet (2008),The Global Warming Regime after 2012:Towards a New Focus, EPW, July 12.
3)Gautam Dutt a Fabian Gaioli, Coping With Climate change, EPW, October 20.
4)The Times of India, September 1,2008.August 14,2008.
5)Ministry of home affairs-Disaster management in India 2011.
6)Anna Ranuzai, Richa Srivastava --Impact of climate change on Agricultural and Food Security.
7)Aggarwal P. K. and D. W. Swaroop Rani --Assessment of climate change impact on wheat production in India.
8)Himachal Pradesh ---Weather Changes related shift of apple bell.
9)Kumar S. N. Aggarwal P. K.---Impact of climate change of coconut plant nation.
10)World Bank (2006),Op. cit.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

Original Article

# सांस्कृतिक विज्ञानवाद

**डॉ.प्रा. पुरुषोत्तम गुणवंतराव पखाले**
मातोश्री अंजनाबाई मुंदाफळे समाजकार्य महाविद्यालय नरखेड, जि. नागपूर
**Email -**puroshotampakhale@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-170802
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 8(II)
Pp. 6-8
August 2025
**Submitted:** 10 July. 2025
**Revised:** 25 July. 2025
**Accepted:** 10 Aug 2025
**Published:** 30 Aug.2025

***घोषवारा***

*भारतामध्ये विज्ञानवादाला सुरुवात झाली ती खऱ्या अर्थाने १९४७ नंतर भारत स्वतंत्र झाल्यावर त्याआधी वैज्ञानिक दृष्ट्या दृष्टिकोन राबवल्या जात होता. पण त्यांच्यावरती तेवढा विश्वास आणि त्या दृष्टीने विकास झाल्याचे दिसत नव्हते. परंतु स्वातंत्र्यानंतर मात्र संस्कृतीला धरून विज्ञानवाद पुढे चालू लागला. संस्कृतीला अनुसरून जे जे काही शक्य होईल त्या अनुषंगाने शिक्षण, आरोग्य, शेती, जल– जमीन-जंगल, राजकीय वाटचाल आणि आपल्या समस्यांचे निराकरण होऊन या ठिकाणी सामाजिक दृष्टिकोनातून सांस्कृतिक दृष्टिकोनातून विज्ञानवादाला चालना मिळायला लागली. आज विज्ञान आणि विज्ञानवादी प्रकर्षाणाने विकासात सहभागी होतात. सांस्कृतिक साहित्याच्या दृष्टीने विचार करावयाचा झाल्यास डॉ. बाबासाहेब आंबेडकर मृत्यू पावल्यानंतर त्यांच्या लेखणीस अण्णाभाऊ साठेंनी फकीरा ही कादंबरी अर्पण केली त्या प्रित्यर्थ संपादक प्रा. डॉ. संजय शिंदे म्हणतात, "मराठी कादंबरीच्या इतिहासात मानाचे स्थान प्राप्त करणारी 'फकिरा' ही कादंबरी ठरली आहे. अण्णाभाऊंनी ही कादंबरी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या झुंजार लेखणीस आर्पण करून परिवर्तनाच्या लढ्यात आपले योगदान दिले आहे. आपल्या लेखणीने आणी-बाणीने अवघा महाराष्ट्र जागृत करणारे अण्णाभाऊ देशातील थोर महापुरुषांचे किर्ती गाताना प्रथम मातृभूमीला आणि नंतर छत्रपती शिवरायांना नमक करतात."१ साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे निवडक वाडमय कादंबरी,खंड तीन,प्रस्तावना. हि आमची सांस्कृतिक शक्ती आहे. असे म्हणावेसे वाटते. ज्या ज्या क्षेत्रातील विकास करायचा आहे. त्या त्या दृष्टीने विकास घडवून आणल्या जातो तो सार्वजनिक रित्या शैक्षणिक दृष्टीने आणि पुढे येणाऱ्या अनन्य समस्यांच्या दृष्टीने ते वैज्ञानिक दृष्ट्या सामोरे जातात यामुळेच विज्ञान आणि विज्ञानवाद शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचत असल्याचे आपल्याला दिसते. याचा अर्थ खऱ्या अर्थाने विज्ञानवादाला सुरुवात विसाव्या शतकाच्या उत्तरार्धामध्ये आणि विसाव्या शतकात झालेली आपल्याला दिसून येते. हे भारताच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे अतुलनीय कार्य आहे.*

***मुख्य सांकेतिक शब्द-*** *सांस्कृतिक , विज्ञानवाद, मूल्य, आचारधर्म, परंपरा, भाषा.*

**प्रस्तावना**

"संस्कृती ही समाजाचा आत्मा असते आणि विज्ञान हा त्याचा प्रकाश!" असे म्हटले जाते की समाजाची प्रगती ही केवळ परंपरांच्या आधारे नव्हे, तर त्या परंपरांचा वैज्ञानिक मूल्यांच्या आधारावर पुनरविचार करूनच होते. याच विचारातून "सांस्कृतिक विज्ञानवाद" ही संकल्पना उदयास आली आहे. आजच्या युगात, विज्ञानाच्या झपाट्याने प्रगती होत असताना, अनेक समाज अजूनही जुन्या परंपरांना, रूढींना आणि अंधश्रद्धांना घट्ट धरून आहेत. यामुळे विकासाच्या प्रक्रियेत अडथळे निर्माण होतात. परंपरेचा सन्मान करतानाही तिचा वैज्ञानिक दृष्टिकोनातून विचार करणे गरजेचे बनले आहे.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*डॉ.प्रा. पुरुषोत्तम गुणवंतराव पखाले, मातोश्री अंजनाबाई मुंदाफळे समाजकार्य महाविद्यालय नरखेड, जि. नागपूर*

**How to cite this article:**
*पखाले, . पुरुषोत्तम . गुणवंतराव . (2025). सांस्कृतिक विज्ञानवाद. Journal of Research & Development, 17(8(II)), 6–8. https://doi.org/10.5281/zenodo.17231281*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI:10.5281/zenodo.17231281
OPEN ACCESS

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

सांस्कृतिक विज्ञानवाद म्हणजे संस्कृतीचा अभ्यास आणि तिच्या मूल्यमापनात वैज्ञानिक विचार, तर्क, विवेक आणि पुराव्यांचा आधार घेणे. यातून समाज अधिक प्रगल्भ, विवेकी आणि समतावादी होतो. ही प्रस्तावना "सांस्कृतिक विज्ञानवाद" या विषयाच्या अभ्यासाची दिशा दाखवते –जिथे विज्ञान आणि संस्कृती यांचा समतोल साधून एक जागरूक, विवेकी समाज निर्माण होऊ शकतो.

**मुख्य विषय विश्लेषण**

सांस्कृतिक विज्ञानवाद ही एक संकल्पना आहे. जी "विज्ञानवाद" (Scientism) आणि "संस्कृती" या दोन संकल्पनांच्या मिलाफातून तयार होते. हे समजून घेण्यासाठी आधी या दोन संज्ञांचा अर्थ जाणून घेणे आवश्यक आहे. सांस्कृतिक परंपरा म्हणजे एखाद्या समाजाने किंवा समूहाने पिढ्यानपिढ्या जोपासलेल्या विचारसरणी, आचारधारणा, चालीरिती, सण-उत्सव, कलेच्या पद्धती, भाषा, आहार-विहार, श्रद्धा आणि मूल्यव्यवस्था होय. या परंपरा काळानुसार विकसित होत जातात आणि त्या समाजाच्या सांस्कृतिक ओळखीचे प्रतिबिंब उमटत असतात. उदा. सण-उत्सव दिवाळी, होळी, गणपती, पोळा इ.रुढी आणि चालीरिती लग्नपद्धती, नामकरण, व्रतवैकल्य. कला, लोकनृत्य, लोकगीतं, हस्तकला, पारंपरिक चित्रकला खाद्यसंस्कृती विशिष्ट पारंपरिक पदार्थ, उदा. पुरणपोळी, साजूक तूप, सत्तू इ. भाषा आणि साहित्य लोककथा, म्हणी, वाक्प्रचार, पारंपरिक गीते. श्रद्धा आणि पूजा पद्धती मंदिरातील पूजा-अर्चा, यात्रेला जाण्याची परंपरा, घरगुती गणपती इ. वारसा स्वरूप परंपरा पिढीकडून पिढीकडे जाते. अधिक सांगायचे झाल्यास, “बाळ गंगाधर टिळक यांनी शिवजयंतीत घुसखोरी केली. कौशल्याने शिवजयंती बंद पाडून गणेशोत्सव सुरू केला. पेशव्यांचे दैवत गणपती बहुजन यांच्या उरावर बसवला. गणेशोत्सवाच्या निमित्ताने मेळे सुरू करून, ब्राह्मण कसा आदर्श ?, मराठा कसा नीच? दलित कसा हलकट? हे दाखवायला सुरुवात केली सत्यनारायण पूजेची सुरुवात करून सर्वांना ब्राह्मणाच्या पाया पडायला भाग पाडले.”[२] भरत मुनीचे नाट्यशास्त्र बहुजनाविरुद्धचे सांस्कृतिक षडयंत्र-भीमपुत्र टेक्ससास गायकवाड, प्रबुद्ध प्रकाशन सोलापूर २०१२ पृष्ठ क्रमांक ५ सामाजिक एकता एकसंध ओळख निर्माण करते.

ओळख व अस्मिता समाजाची वेगळी सांस्कृतिक ओळख तयार करते. स्थायित्व व बदल: काही परंपरा शतकानुशतके टिकतात, काही काळानुसार बदलतात. श्रद्धा व विश्वास परंपरांमध्ये धर्म व आस्था यांचा प्रभाव असतो. काही परंपरा समाजासाठी हितकारक असतात. उदा. एकत्र कुटुंबसंस्था, सणांमधील सामाजिक एकत्रता. काही परंपरा कालबाह्य किंवा अंधश्रद्धा युक्त असतात. उदा. स्त्रियांना अपवित्र मानणे, जातीभेद इ. ज्या बदलण्याची गरज असते. “सांस्कृतिक परंपरा” या समाजाच्या जीवनशैलीचे, इतिहासाचे आणि मूल्यांच्या मुळाशी असलेल्या गोष्टी आहेत. त्या समाजाची ओळख सांगतात, पण त्यांना वैज्ञानिक आणि तार्किक दृष्टीने तपासणेही तितकेच महत्त्वाचे आहे. “विज्ञान आणि वैज्ञानिक विश्लेषणाच्या माध्यमातूनच आपण जगातील प्रत्येक गोष्ट समजू शकतो, आणि इतर पद्धती (उदा. धर्म, तत्त्वज्ञान, परंपरा) अपुरी किंवा अविश्वसनीय असतात.”

“भारताचा इतिहास आपणास हे सांगतो की प्राचीन काळात ब्राह्मणी धर्माने बंधनाची व गुलामगिरीची जी जालीम साखळी निर्माण केलेली होती ती बुद्ध धर्माने खिळाखिळी केली आणि शेवटी ती ताडकन तोडली.”[३] पृष्ठ क्र. १४ अंदाज करणे, अनुमान लावणे, तर्कवितर्कता विज्ञानवादात प्रत्येक गोष्ट तर्क आणि पुराव्यावर आधारित असावी असा आग्रह असतो. प्रायोगिकता गोष्ट खरी आहे की नाही, हे प्रयोग आणि निरीक्षणातून सिद्ध करणे आवश्यक मानले जाते. संशयवाद कोणतीही गोष्ट सहजपणे स्वीकारली जात नाही. पुरावा नसेल, तर ती नाकारली जाते. अंधश्रद्धात्मक विचारांना विरोध विज्ञानवाद अंधश्रद्धा, अपसमज, आणि धर्माधारित अतार्किक समजुतींना विरोध करतो. ग्रहण काळात अन्न खाणे वर्ज्य का आहे ? विज्ञानवाद विचारतो याचे शरीरावर वैज्ञानिक परिणाम काय आहेत? जर काहीही नाही, तर ही परंपरा अवैज्ञानिक आहे. बाबा किंवा तांत्रिक उपायाने रोग बरे होतो का? विज्ञानवाद सांगतो यासाठी वैद्यकीय उपचार व शास्त्रीय चाचण्या आवश्यक आहेत. उदा.“भरत मुनिचे नाट्यशास्त्र मी वाचायला घेतले डोळयासमोर फुले आंबेडकर प्रत्येक ओळीत मला त्या भरतमुनीच्या नाट्यशास्त्रात भारतातील तमाम बहुजन बांधवाविरुद्ध असलेले सांस्कृतिक क्षेत्रांचा आढळू लागले भरत मुनीचे नाट्यशास्त्र हा एक ठोस आणि सबळ पुरावाच ठरतो यामुळे अंधश्रद्धा कमी होतो का ?”[४] पृष्ठ क्र. ४ भावना व आध्यात्माला कमी महत्त्व दिलं जातं निर्णय अधिक तार्किक होतात. जीवनाच्या काही अमूर्त पैलूंना समजावण्यास कमी पडतो. समाज अधिक प्रगत व विवेकी बनतो संस्कृती आणि परंपरांचा अवहेलना होऊ शकतो विज्ञानवाद म्हणजे विज्ञान हेच अंतिम सत्य समजणे. हा दृष्टीकोन अंधश्रद्धा, भ्रामक समज, व रूढींचा विरोध करतो आणि समाजात तार्किकता, विवेक आणि पुराव्याला महत्त्व देतो.उदा. “बुध्दाने भारतातील स्त्रीयांना हे जे स्वातंत्र्य दिले त्याचे महत्वमापन करता येत नाही.”[५] पृष्ठ क्र. १४

विज्ञानवाद म्हणजे विज्ञान हेच अंतिम सत्य सांगणारे, सर्व प्रश्नांची उत्तरं विज्ञानातच आहेत, असा दृष्टीकोन. ह्यात विज्ञानाच्या पद्धतीशिवाय इतर ज्ञानपद्धतींना (उदा. तत्त्वज्ञान, धर्म, लोकसंस्कृती) फारसा मान दिला जात नाही. संस्कृती म्हणजे काय? संस्कृती म्हणजे एखाद्या समाजाची जीवनपद्धती – त्यांचे मूल्य, आचारधर्म, परंपरा, भाषा, कलेचे प्रकार, आहार, विचारसरणी, आणि

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

सामाजिक आचरण. सांस्कृतिक विज्ञानवाद म्हणजे काय? सांस्कृतिक विज्ञानवाद ही एक अशी दृष्टी आहे जी संस्कृतीच्या अभ्यासात विज्ञानाच्या पद्धतींचा वापर करते. म्हणजेच एखाद्या समाजाची संस्कृती वैज्ञानिक दृष्टिकोनातून समजून घेणे.

**निष्कर्ष**

सांस्कृतिक विज्ञानवाद हा विज्ञान आणि संस्कृती यामधील पूल आहे, जो समाजात नवचैतन्य, परिवर्तन आणि विवेक निर्माण करतो. हे एक प्रगल्भ, आधुनिक आणि मानवकेंद्रित जीवनमूल्य आहे. सांस्कृतिक विज्ञानवादाचे निष्कर्ष पुढीलप्रमाणे मांडता येतील:सांस्कृतिक विज्ञानवादाचे निष्कर्ष:

१. सांस्कृतिक विज्ञानवाद पारंपरिक विचारसरणी आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांचा समन्वय साधतो. त्यामुळे अंधश्रद्धा, अज्ञान आणि रूढी यांना वैज्ञानिक कसोटीतून तपासण्याची भूमिका स्पष्ट होते.

२. विज्ञानवादी दृष्टिकोनामुळे नागरिक अधिक विवेकशील, तर्कशुद्ध आणि जबाबदार बनतात. त्यामुळे समाजात निर्णयप्रक्रियेत वैज्ञानिक विचार अधिक प्रभावी ठरतो.

३. सांस्कृतिक विज्ञानवाद केवळ तर्कशुद्धता शिकवत नाही, तर मानवी मूल्यांनाही समजून घेण्याची प्रेरणा देतो. त्यामुळे तो एका संवेदनशील समाजाची घडण घडवतो.

४. सांस्कृतिक वारसामध्ये असलेल्या चांगल्या गोष्टी वैज्ञानिक कसोटीतून तपासून स्वीकारल्या जातात, तर चुकीच्या गोष्टींना त्यागण्याची मानसिकता तयार होते.

५. सामाजिक विषमता, जातिभेद, लिंगभेद यासारख्या समस्यांवर सांस्कृतिक विज्ञानवाद प्रकाश टाकतो आणि याविरुद्ध वैचारिक आंदोलनासाठी प्रेरणा देतो.

६. शिक्षणाच्या माध्यमातून बदल शालेय आणि महाविद्यालयीन अभ्यासक्रमात विज्ञानवादी दृष्टिकोन रुजवल्यास नव्या पिढीला प्रश्न विचारण्याची, संशोधन करण्याची आणि अंधश्रद्धा टाळण्याची सवय लागते.

शिक्षणाच्या माध्यमातून, जागरूक आणि विवेकशील समाजनिर्मिती, परंपरा आणि विज्ञान यांची सांगड, संवेदनशीलता आणि मानवतावादाचा विकास, सांस्कृतिक वारशाचा वैज्ञानिक पुनर्विचार आपले, सामाजिक सुधारणा घडवणारा दृष्टिकोन,

**सारांश :**

आज आमच्या भारतातील विविध प्रांतामध्ये अनेक प्रकारच्या चालीरिती, परंपरा ह्या ज्या विकसित स्वरूपात पाहायला मिळतात. त्याचे कारण म्हणजे आमचे सुरुवातीचे सांस्कृतिक वातावरण होय आमच्या देशात ज्या संस्कारांना पालनपोषण केल्या गेले. आणि त्याचे स्वरूप आज आपल्याला सुधारित पाहायला दिसते. त्यातूनच आमचा वैज्ञानिक दृष्टिकोन पोसल्या गेला आणि तो आज एवढा विकसित झाला हे त्याची सर्व बाजू आपल्याला विज्ञानाच्या दृष्टिकोनातून तपासून पाहता येते. आमचे सांस्कृतिक वातावरण शुद्ध होते. ते आजही आहे म्हणूनच आम्ही त्या चालीरिती परंपरा आमच्या प्राचीन इतिहासापासून घेतलेले आहे ते आजही आम्ही विज्ञान परिस्थिती विज्ञानाच्या काळात त्याचे तंतोतंत पालन करतो. त्याची अनुभूती करतो व त्यावरच वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करीत असतो. असे मला वाटते.

**संदर्भ :**

1. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे निवडक वाडमय कादंबरी,खंड तीन, संपादक प्रा. डॉ. संजय शिंदे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चर्चेचा साधने प्रकाशन समिती महाराष्ट्र शासन २०२३ प्रकाशन वर्ष एक ऑगस्ट २०२३ पृष्ठ क्र. प्रस्तावना
2. भरत मुनीचे नाट्यशास्त्र बहुजनाविरुद्धचे सांस्कृतिक षडयंत्र-भीमपुत्र टेक्ससास गायकवाड, प्रबुद्ध प्रकाशन सोलापूर २०१२ पृष्ठ क्रमांक ५
3. हिंदू स्त्रियांची उन्नती आणि अवनितीडॉ.भीमराव रामजी आंबेडकर,प्रकाशक प्रदीप रोडगे,लष्करीबाग नागपूर,पृष्ठ क्र.१४
4. भरत मुनीचे नाट्यशास्त्र बहुजनाविरुद्धचे सांस्कृतिक षडयंत्र-भीमपुत्र टेक्ससास गायकवाड, प्रबुद्ध प्रकाशन सोलापूर २०१२ पृष्ठ क्रमांक ४.
5. तत्रेव – १४

# Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

Original Article

# कृत्रिम बुद्धिमत्तेचा (AI) शैक्षणिक प्रकाशन प्रक्रियेवर होणारा परिणाम

**प्रा. संजना कुणाल पाटील**
भूगोल विभाग प्रभाकर पाटील
एज्युकेशन सोसायटीचे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, वेश्वी-अलिबाग.
**Email:** sanjanaraut460@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-170803
ISSN: 2230-9578

Volume 17
Issue 8 (II)
Pp. 9-12
August 2025

**Submitted:** 10 July. 2025
**Revised:** 25 July. 2025
**Accepted:** 10 Aug 2025
**Published:** 30 Aug.2025

***घोषवारा (सारांश)***

*प्रस्तुत शोधनिबंध कृत्रिम बुद्धिमत्तेचा (AI) शैक्षणिक प्रकाशन प्रक्रियेवर होणारा परिणाम यावर आधारित आहे. AI चे शिक्षण आणि प्रकाशन क्षेत्रातील योगदान विशद केले आहे. या डिजिटल युगात, AI ने संशोधन आणि प्रकाशन प्रक्रिया अधिक जलद, सुलभ आणि कार्यक्षम बनवली आहे. AI च्या मदतीने वेळेची बचत होते, लेखनाची गुणवत्ता सुधारते, मोठ्या प्रमाणावर डेटा विश्लेषण करणे शक्य होते, आणि लेखनाचे भाषांतर करणेही सोपे होते. यामुळे ग्रामीण भागातील संशोधकांनाही जागतिक स्तरावर सहभागी होण्याची संधी मिळते. तथापि, AI च्या वापरामुळे काही नकारात्मक परिणामही दिसून येतात, जसे की लेखनाची नैतिकता आणि प्रामाणिकतेवर प्रश्न निर्माण होणे, फसवणुकीचे प्रकार वाढणे आणि मानवी सर्जनशीलतेवर परिणाम होणे.*

***Keywords -****कृत्रिम बुद्धिमत्ता AI, संशोधन, प्रकाशन.*

**प्रस्तावना**

आजच्या डिजिटल युगात मानवाच्या जीवनशैलीत झपाट्याने बदल होत आहे. विज्ञान तंत्रज्ञानाच्या साहाय्याने अनेक क्षेत्र प्रगत झाली आहेत. शिक्षण आरोग्य अर्थव्यवस्था वाहतूक प्रशासन आणि माहिती क्षेत्र यामध्ये तंत्रज्ञानात मोठा वापर होत आहे. या तंत्रज्ञानाचा प्रभावशाली भाग म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) ही एक अशी प्रणाली आहे, जी संगणकांना मानवाप्रमाणे विचार करण्याची शिकण्याची क्षमता देते.

शैक्षणिक क्षेत्र ही याला अपवाद नाहीत. संशोधन प्रकाशन यामध्ये पूर्वी ज्या गोष्टींना वेळ लागत असे, त्या आता अधिक जलद गतीने आणि कार्यक्षम पद्धतीने करता येत आहेत. पारंपारिक प्रशासन प्रक्रियेमध्ये संशोधकांना विषय निवडणे, माहिती संकलन करणे, साहित्य पुनरावलोकन करणे, लेखन संपादन प्रकाशन यासाठी खूप मेहनत करावी लागत असे, आता कृत्रिम बुद्धिमत्ता यामुळे ही प्रक्रिया अधिक सुलभ सोपी वेगवान आणि दर्जेदार झाली आहे.

AI मुळे साहित्य पुनरावलोकन , संदर्भ व्यवस्थापन भाषांतर, संपादन, लेखन तपासणी, डेटा विश्लेषण, जनरल निवड अशा अनेक कामांमध्ये मदत होते. त्यामुळे संशोधक त्यांच्या कामाकडे लक्ष केंद्रित करू शकतात. त्यामुळे वेळेची मोठी बचत होते. यामुळे लेखकांची उत्पादकता वाढते, प्रकाशन प्रक्रियेतील अडथळे दूर होतात. AI च्या वापरामुळे काही सकारात्मक परिणाम स्पष्ट होताना दिसतात. संशोधन प्रक्रियेत अचूकता वाढवणे, चुका कमी होत असून संशोधकांना समान संधी मिळते, ग्रामीण भागातील संशोधकांना विद्यार्थ्यांना ज्या ठिकाणी कमी साधनसंपत्ती उपलब्ध आहे. अशा भागातील संशोधकांना जागतिक स्तरावरील संशोधनात सहभागी होता येते.

Quick Response Code:

Website:
https://jrdrvb.org/

DOI:10.5281/zenodo.17231309

OPEN ACCESS

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*प्रा. संजना कुणाल पाटील, भूगोल विभाग प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीचेकला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, वेश्वी-अलिबाग*

**How to cite this article:**
*पाटील, . संजना . कुणाल . (2025). कृत्रिम बुद्धिमत्तेचा (AI) शैक्षणिक प्रकाशन प्रक्रियेवर होणारा परिणाम. Journal of Research & Development, 17(8(II)), 9–12.* https://doi.org/10.5281/zenodo.17231309

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

मात्र याचबरोबर काही नकारात्मक बाजू देखील समोर येतात. जसे की याचा वापर करताना लेखकांची स्वतंत्र विचारशक्ती कमी होते, सर्जनशील तिचा अभाव होतो, काही वेळेस हे लेख संशोधन साहित्य चोरीचे रूप घेतात. याचा वापर करून तयार केलेले संशोधन खरंच मूळ विचारांचे प्रतिनिधित्व करतात का? हा मोठा चिंताजनक प्रश्न तयार होत आहे.

AI हे अंतिम साधन नाही यामुळे त्याचा वापर योग्य प्रमाणात झाला पाहिजे AI सहाय्यक म्हणून वापर करावा. संपूर्ण लेख त्यावर आधारित ठेवणे टाळावे संशोधनाचे मूळ विचार वैचारिक मांडणी सृजनशीलता हे मानवी गुण अमूल्य आहेत. याची जागा कोणतेही तंत्र घेऊ शकत नाही. विचार करणे हे मानवाला मिळालेले अमूल्य वरदान आहे. याचा वापर मानवाने करणे फार गरजेचे आहे, थोडक्यात AI चा वापर एका काठीप्रमाणे नेमकाच गरजेपुरता करावा.

**शोधनिबंधांची अभ्यासपद्धती :-**

कृत्रिम बुद्धीमातेचा (AI) शैक्षणिक प्रकाशन प्रक्रियेवर होणारा परिणाम या संशोधन कार्याचा अभ्यास करताना प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा आधार घेतला आहे.

**संशोधनाच्या मर्यादाः-**

सदर शोध निबंध कृत्रिम बुद्धीमातेचा (AI( शैक्षणिक प्रकाशन प्रक्रियेवर होणारा परिणामासंबंधी असल्याने जिथे प्रकाशन प्रक्रिया व कृत्रिम बुद्धिमत्तेचा(AI) वापर होतो. तिथे सर्व ठिकाणी या शोध निबंधाच्या मर्यादा आहेत.

**उद्दिष्टे -**

1 AI च्या वापरामुळे निर्माण होणारे सकारात्मक व नकारात्मक परिणाम विशद करणे.

2 AI चे विविध टूल्स संशोधन व शैक्षणिक प्रकाशन प्रक्रियेत कसे मदत करतात हे समजून घेणे.

**गृहीतके -**

1 शैक्षणिक प्रकाशन प्रक्रियेत AI चा वापर वेगाने वाढत आहे.

2 कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे (AI) शैक्षणिक प्रक्रियेत सकारात्मक व नकारात्मक परिणाम होतो.

**कृत्रिम बुद्धिमत्ता AI चा जन्म व विकास -**

"एखाद्या तंत्रामध्ये संगणकामध्ये किंवा मशीनमध्ये मानवाप्रमाणे विचार करण्याची, शिकण्याची निर्णय घेण्याची क्षमता विकसित करणे म्हणजे, 'कृत्रिम बुद्धिमत्ता होय'." 1940 ते 50 या कालावधीत ही संकल्पना वैज्ञानिकांच्या मनात आली. "can machines think" आणि 1956 मध्ये झालेल्या एका ऐतिहासिक कार्यशाळेमध्ये Artificial Intelligence (AI) हा शब्द प्रयोग करण्यात आला. सुरुवातीच्या काळात हे AI चा फक्त गणितीय समस्यांचे निराकरण करणारे शोध लागले. मात्र 2010 नंतर हे ओपन गुगल, आयबीएम, मायक्रोसॉफ्ट यासारखा कंपन्यांनी AI चे शक्तिशाली मॉडेल्स तयार केले. ओपन AI चे chat GPT, एक्स- बोर्ड बाय गुगल चे Gemini, मायक्रोसॉफ्ट आणि ओपन AI चे colilot etc

**शैक्षणिक प्रकाशन प्रक्रियेत AI चा वापर -**

शैक्षणिक प्रकाशन ही संशोधन व उच्च शिक्षण प्रक्रियेतील एक महत्त्वाची पायरी आहे. ज्यामुळे ज्ञानाचा प्रसार होतो, संशोधकांचा सन्मान होतो आणि सर्जनशीलतेला व ज्ञान निर्मितीला चालना मिळते. संशोधन प्रक्रिया पूर्वी वेळखाऊ व चिकट मानली जात होती. मात्र आता कृत्रिम बुद्धिमत्ता जन्मामुळे ही अधिक सुलभ अचूक आणि जलद मानली आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता हे लेखकाला योग्य शब्दरचना, व्याकरण इत्यादी सुधारण्यास मदत करते. संशोधकाच्या मनात अनेक कल्पना असतात पण योग्य मांडणी करणे कठीण जाते, अशावेळी AI टूल्स संशोधकांचे लेखन कार्य सुलभ बनवते.

संगणकाच्या प्रक्रियेत या लेखनातील शुद्धलेखनातील, व्याकरणातील, भाषेतील त्रुटी तात्काळ शोधणे ओळखणे व त्या सुधारणे इत्यादी करता येते. लेख अधिक सुसंगत आणि स्पष्ट व्हावा यासाठी वाक्यरचना सुधारणे, कठीण वाक्य सोपे करणे आणि शैली सुसज्ज करणे यामुळे लेखकाचा अनेक वेळा वेळ वाचतो आणि दर्जाही टिकतो.

पुनरावलोकनाच्या टप्प्यात हे या लेखनाची गुणवत्ता शुद्धता विषयांची मांडणी यावर आधारित प्राथमिक साहित्य चोरी तपासणे. हे देखील यायच्या साह्याने शक्य झाले आहे. परिणामी लेखनातील प्रामाणिक विश्वासनीयता टिकून राहते. थोडक्यात AI मुळे

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

संपूर्ण संशोधनात प्रक्रियेत प्रकाशन प्रक्रियेत अधिक कार्यक्षमता अचुकता आणि विश्वासहार्य बनवणे शक्य झाले आहे. यामुळे भविष्यात AI चा वापर प्रचंड प्रमाणात वाढणार यात शंकाच निर्माण होत नाही.

**कृत्रिम बुद्धिमत्तेचा AI शैक्षणिक प्रकाशन प्रक्रिवर होणारा सकारात्मक परिणाम -**

| | | | मिल्पी कब्रिस्तान पीरो | | **250** |
| | | कुल पौधों की संख्या का योग | | | **4405** |

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

**स्रोत: वन विभाग आरा, बिहार**

**शहरी वानिकी कार्यक्रम**
**तालिका संख्या : 03**

| प्रक्षेत्र | प्रंखड | स्थल | पौधों की संख्या |
|---|---|---|---|
| पीरो | पीरो | औझौलिया मोड़ से सुखसैली मोड़ | 500 |
| आरा | कोइलवर | कोइलवर बबुरा सडक में सी.आर.पी.एफ कैम्प से कोइलवर 47 बटालियन | 100 |
| | आरा | आरा ओभर ब्रिज के निकट | 50 |
| आरा | बिहियां | हाउसिंग कोलोनी | 500 |
| | बिहियां | राजा बाजार चौक बिहिया से एकदारा मोड़ तक पंचों के दोनों किनारे काली मंदिर पोखरा बिहियां से महलिन मंदिर पोखरा तक पंचों के दोनों किनारे | 250 |
| | बिहियां | नवोदय चौक बिहियां ने महथिज मंदिर तक दोनों तरफ पथों के किनारे | 200 |
| | बिहियां | डाक बंगला चौक, बिहियां से नहर तक पथों के दोनों किनारे नहर रोड बिहियां के दोनों किनारे | 100 |
| | बिहियां | मेला रोड़ बिहियां से महावीर मंदीर तक पथों के किनारे दोनों तरफ | 100 |
| | | बी.एस.एन.एल.टावर बिहियां से बी.डी.ओ.आवस से प्रखंड कार्यालय तक | 150 |
| | | दूर्गा मंदिर बिहियां से महेश राय फैक्ट्री तक पथों के दोनों किनारे शिक्षक कॉलोनी तक | 50 |
| | | शंकर मंदिर बिहियां से राय की फैक्ट्री तक पंथों के दोनों किनारे | 300 |
| | | सूर्य मंदिर-बिहियां पोखर के चारों तरफ | 60 |
| | | लव कुश के घर बिहियां से नदी के बांध तक पथ के दोनों किनारे | 150 |
| | बिहियां | आदर्श बिहार कोलनी | 50 |

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

**स्रोत: वन एवं पर्यावरण विभाग आरा, पटना, बिहार**

**जल जीवन हरियाली का विवरण:-**

1. जल जीवन हरियाली कार्यक्रम के अंतर्गत तालिका 7.5 में वन महोत्सव कार्यक्रम के अन्तर्गत भोजपुर जिला के आरा, कोइलवर तथा बिहियां प्रखंडों में 7630 पौधों लगाने का लक्ष्य हैं।
1. भोजपुर जिला में हर परिसर हरा परिसर कार्यक्रम के तहत जिला में आरा, कोइलवर, बिहियां उदवंतनगर,बड़हाड़ा,चरपोखरी और पीरो प्रखंड में कुल 4405 पौधे लगाने का लक्ष्य है।
2. इस जिला आगम-निगम कार्यक्रम के तहत 600 पौधे लगाने का लक्ष्य है।
3. इस जिला के शहरी वानिकी कार्यक्रम के अंतर्गत आए और बिहियां प्रखंडों में 2410 पौधों लगाने का लक्ष्य है।
4. भोजपुर जिला में जल जीवन और हरियाली कार्यक्रम के अंतर्गत जल का समुचित प्रबंधन के लिए तालाब एवं कुएं को जीर्णोधार करने की भी योजना है।
5. इस योजना के अंतर्गत जिलों में प्रखंडवार तालाबों एवं कुंओं की स्थिति प्रदर्शित किया गया है।

**तालिका संख्या:04**

| क्रम संख्या | प्रखण्ड | तालाबों की संख्या | कुंओं की संख्या |
|---|---|---|---|
| 1. | अगिआंव | 49 | 362 |
| 2. | आरा | 88 | 584 |
| 3. | बड़हाड़ा | 34 | 597 |
| 4. | बिहियां | 14 | 291 |
| 5. | चरपोखड़ी | 86 | 307 |
| 6. | गड़हनी | 64 | 150 |
| 7. | जगदीशपुर | 135 | 164 |
| 8. | कोईलवर | 38 | 140 |
| 9. | पीरो | 191 | 397 |
| 10. | सहार | 47 | 232 |
| 11. | संदेश | 17 | 358 |
| 12. | शाहपुर | 34 | 436 |
| 13. | तरारी | 179 | 456 |
| 14. | उदवंत नगर | 72 | 402 |
| कुल | | **1048** | **4876** |

**स्रो वन विभाग आरा, पटना, बिहार**

तालिका संख्या 04 में भोजपुर जिला में जल जीवन हरियाली कार्यक्रम के तहत तालाबों एवं कुंआ को चिन्हित किया गया है। इस जिला में कुल तालाबों की संख्या जल जीवन हरियाली योजना के तहत 1048 है, और कुल कुंओं की संख्या 4876 है, जो तालिका संख्या 04 से स्पष्ट होता है।

भोजपुर जिला में जल जीवन हरियाली योजना को पूर्ण रूपेण से लागू करने के लिए अपने तीसरे चरण की यात्रा में आए पहुंचे और वहां से संबधित पदाधिकारियों को पौधे लगाने के लिए उपर्युक्त स्थान का चयन पुराने तालाबों तथा कुंओं को चिन्हित करने का कार्यक्रम सघन रूप से चलाने का निर्देश दिया। इस कार्यक्रम का मुख्य लक्ष्य जिला में भू-जल स्तर को बरकरार रखने के साथ पर्यावरण संतुलित रखने का उद्देश्य है। यह बिहार के मुख्यमंत्री का बडा़ ही महत्वाकांक्षी योजना है।

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

**संदर्भ सूची**

1. अहमद,ई. (1965( "बिहार-ए फिजिकल,इकोनॉमिक एण्ड रीजनल ज्योग्राफी", रांची यूनिवर्सिटि, प्रेस रांची।
2. कुमार,ए.एण्ड शर्मा,एन (1977( " रूरल सेंटर ऑफ सर्विसज ज्योग्राफिकल" रीभ्यू ऑफ इण्डिया,भोल्यूम 39 न. 02।
3. सिंह आर.एल. (1996( "लायर ऑन द ग्रोथ ऑफ रूरल" सर्विस सेटर डयूरिंग समर स्कूल ऑन अरलायड ज्योग्राफी बी.एच.यू.नबम्बर 1-10,1996।
4. अताउल्लाह मो. एवं सुसलिमुदी्न,मो. (2002( "बिहार का आधुनिक भूगोल"ब्रिलिएंट प्रकाशन पटना-41।
5. जिला कार्यलय, भोजपुर आरा।
6. पंचायती राज विभाग, आर।
7. जिला कार्यलय, वन विभाग, आरा।

# Journal of Research and Development

Peer Reviewed International, Open Access Journal.

ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

Original Article

# आधुनिकतावाद आणि १९९० नंतरच्या कथांमधील सामाजिक विचार

**किरण यशवंत सोनार[1], डॉ शोभा डहाळे[2]**

[1]संशोधन केंद्र: मराठा विद्या प्रसारक समाज, केटीएचएम कॉलेज, नाशिक

[2]मार्गदर्शक सहाय्यक प्राध्यापक, के टी एच एम महाविद्यालय, नाशिक

**Email:** kiransonar1978@gmail.com

**Manuscript ID**:

JRD -2025-170808

ISSN: 2230-9578

Volume 17

Issue 8 (II)

Pp. 32-37

August 2025

**Submitted:** 11 July. 2025

**Revised:** 25 July. 2025

**Accepted:** 10 Aug 2025

**Published:** 30 Aug.2025

***सारांश***

*मराठी कथेस आधुनिकतावादाने व्यक्तीच्या अस्तित्व, अंतर्मुखता, एकाकीपणा आणि जीवनातील असुरक्षितता या पैलूंचा गहिरा अनुभव दिला. परंतु १९९० नंतरच्या सामाजिक बदलांनी—उदारीकरण, जागतिकीकरण, शहरीकरण, स्त्रीवाद आणि माहिती-तंत्रज्ञान—कथेच्या आशयाला नवा सामाजिक संदर्भ दिला. ग्रामीण कथांमध्ये शेतीतील बदल, स्थलांतर आणि भ्रष्ट व्यवस्थेविरुद्धचा संघर्ष दिसतो. दलित कथांनी अन्यायाविरोधी लढा, स्वाभिमान व जागरूकता अधोरेखित केली, तर स्त्रीवादी कथांनी स्त्री-पुरुष समानता, आत्मनिर्भरता, लैंगिक स्वातंत्र्य आणि सामाजिक ढोंगीपणावरील प्रश्न मांडले. महानगरी कथांमध्ये औद्योगिकीकरण, गिरणी संप, मॉल संस्कृती, जातीय ताणतणाव आणि मध्यमवर्गीय विसंगती यांचे वास्तववादी चित्रण झाले. त्यामुळे नव्वदोत्तरी कथा ही केवळ आधुनिकतेची वैयक्तिक अंतर्मुखता न राहता सामाजिक संघर्ष, विषमता, न्याय, समता आणि नात्यांचे बदलते स्वरूप यांचे आरसे बनल्या. आधुनिकतावादाने साहित्याला वैचारिक आणि अस्तित्ववादी अधिष्ठान दिले; परंतु १९९० नंतरच्या कथांनी सामाजिक आशय अधिक व्यापक आणि समकालीन वास्तवाशी निगडित केला.*

***मुख्यशब्द***-*आधुनिकतावाद,मराठी कथा,सामाजिक विचार,ग्रामीण कथा,दलित साहित्य,स्त्रीवादीसाहित्य, महानगरी कथा,जागतिकीकरण,सामाजिक परिवर्तन.*

**प्रस्तावना -**

मराठी साहित्याच्या विकासात आधुनिकतावाद (Modernism) हा महत्त्वाचा टप्पा आहे. विसाव्या शतकाच्या सहाव्या दशकापासून कथेत आधुनिकतावाद प्रकट झाला. यात व्यक्तीचे अस्तित्व, एकाकीपणा, अंतर्मुखता, असुरक्षितता, जीवनातील निरर्थकता अशा मुद्द्यांवर भर होता. १९९० नंतर मराठी कथेत नवा सामाजिक संदर्भ उभा राहिला. उदारीकरण, जागतिकीकरण, शहरीकरण, माहिती-तंत्रज्ञान यामुळे समाजात मोठे बदल झाले. त्या बदलांचे प्रतिबिंब कथेत उमटले. त्यामुळे आधुनिकतावादातून आलेली वैयक्तिक अंतर्मुखता आता सामाजिक प्रश्नांच्या नव्या संदर्भात व्यक्त झाली. आधुनिकतावाद मध्ये सामाजिक वैचारिकता ही एक विचारसरणी आहे, जी समाजाच्या विविध घटकांमधील संबंध, समता, न्याय, आणि समृद्धीवर आधारित आहे. साहित्य हा समाज जीवनाचा आरसा असतो. समाजातील बदल, स्थित्यंतरे, सामाजिक आणि सांस्कृतिक वातावरण, जीवन शैली यांची संवेदनशीलता साहित्यातून प्रकट होते. म्हणून समाज, संस्कृती आणि साहित्य यांचा परस्पर संबध आहे काळानुरुप समाज जीवनात जसे जसे बदल होत गेले, तसे तसे साहित्याच्या जडणघडण मध्ये बदल होत गेले.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***

*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**

*किरण यशवंत सोनार ,संशोधन केंद्र : मराठा विद्या प्रसारक समाज, केटीएचएम कॉलेज, नाशिक*

**How to cite this article:**

*सोनार, . किरण . यशवंत ., & डहाळे, . शोभा . (2025). आधुनिकतावाद आणि १९९० नंतरच्या कथांमधील सामाजिक विचार. Journal of Research & Development, 17(8(II)), 32–37.* https://doi.org/10.5281/zenodo.17231736

Quick Response Code:

Website: https://jrdrvb.org/

DOI:10.5281/zenodo.17231736

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

१९९० नंतर निर्माण झालेल्या ग्रामीण, दलित, स्त्रीवादी आणि महानगरी कथांवर आधुनिकतेचा परिणाम झाल्याचे दिसत आहे. आधुनिकतेच्या प्रभावामुळे मराठी कथांमधील सामाजिक आशय, प्रश्न आणि समाज जीवन याचे बदलते स्वरूप पुढील संदर्भावरून आपल्याला शोधावे लागले. त्यासाठी आपण नव्वदोत्तरी लेखकांनी कथांमधून व्यक्त सामाजिक वैचारिकता याचा उहापोह करणार आहे

**१) आधुनिकतावाद आणि ग्रामीण कथांमधून सामाजिक विचार**

आधुनिकतावादाने ग्रामीण कथांमधील सामाजिक विचारिकतेला एक नवा आयाम दिला आहे. पारंपरिक ग्रामीण कथांमध्ये जिथे फक्त गावातील साधे जीवन, नैसर्गिक सौन्दर्य, आणि साध्या भावभावनांचे वर्णन केले जात होते, तिथे आधुनिकवादी दृष्टिकोनाने या कथांमध्ये सामाजिक समस्यांचा, विषमतेचा आणि मानवतावादी विचारांचा अधिक सखोलपणे विचार केला आहे. . १९९० नंतर आधुनिकतावादाचा प्रभाव ग्रामीण भागातील शेती आणि नागरी जीवनावर झाला. पारंपरिक शेतीच्या जागी आधुनिक तंत्रज्ञानाने घेतली. त्यामुळे शेतीकडे उद्योग म्हणून बघण्याचा नवीन दृष्टिकोन ग्रामीण माणसाकडे आला. वडील पार्जित 'वारसा' म्हणून जपवणूक करणारा शेतकरी आधुनिकतावादी विचाराने शेत जमिनीकडे व्यवसाय म्हणून बघितले जाऊ लागला. आधुनिकतेचा उबंरठावर उभी असलेली ग्रामीण संस्कृती आणि कुटुंब व्यवस्था, गतिमान जीवन पद्धती, आत्मकेंद्रितपणा, तात्काळ पैसे मिळवून देणारी पिके किंवा झटपट पिके कशी पिकविता येईल यासाठी विचार करणारा शेतकरी दृष्टिक्षेपात पडू लागला. तर दुसरीकडे जागतिकीकरणाच्या प्रभावामुळे मोठया प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्यामुळे ग्रामीण माणूस शहराकडे स्थलांतरित झालेला दिसतो आहे त्याचप्रमाणे त्याला शहरातील भौतिक सुख त्याला आकर्षित करीत आहे. शहराचे सुख आणि गावातील 'आधुनिक गावपण' या द्विधा मनस्थितीत अडकलेला ग्रामीण व्यक्तीच्या सामाजिक जीवनात आधुनिकतावादाचा किती परिणाम झाले आहे? आधुनिक तंत्रज्ञानाने शेती करणारा ग्रामीण शेतकरी तांत्रिक आणि विज्ञान दृष्टीने आधुनिकवादी झालेला असला तरी सामाजिक अंगाने आधुनिकवादी झालेला आहे का? ग्रामीण संस्कृतीची जपवणूक आणि नवीन सामाजिक विचार स्वीकारताना त्याची दमछाक होत आहे का? आधुनिकतावाद यामुळे ग्रामीण वैचारिक मध्ये समाजिक परिवर्तन ग्रामीण भागात घडले आहे का? याची चिकित्सा करणे आवश्यक आहे. त्यासाठी ग्रामीण कथाकारांनी १९९० नंतरच्या कथांमधून चित्रित केलेली आधुनिकतावाद आणि सामाजिकतेचे आशय सूत्र यांचा अभ्यास करणे अपेक्षित आहे. किरण गुरव यांनी 'वडाप' (श्रीलिपी) कथेमधून आधुनिक काळातील बदलते ग्रामीण जीवन चित्रित केले आहे. वडाप या कथेमधून ग्रामीण भागातील तरुण आधुनिक काळात स्वयंरोजगारासाठी कशी धडपड करतो याचे सामाजिक चित्रण केले आहे. बहिणीचे लग्न आणि इतर प्रपंचामध्ये शेती विकावी लागते म्हणून कथेतील नायक आंदू कर्ज घेऊन प्रवासी जीप घेतो आणि स्वयंरोजगार कडे वळतो.पण व्यवस्थेमधील भ्रष्टाचार त्याचा भ्रमनिरास करतो. पोलीस आणि बँक अधिकारी यांच्यामुळे तो बेजार होतो आणि कथाकार वर्णन करतो की, **"**मुठी आवळून बिजागऱ्या फिरवल्या. जगातला सगळा "खाकी' रंग त्याच्या डोक्यात "गोळा झाला आणि त्यानं तोंड सोडलं. सगळया 'खाक्यांची' त्यानं आई - भन काढली". **१** स्वतःवरील अन्याय -अत्याचार यांचा विरोध करणारा ग्रामीण तरुण कथेमधून व्यक्त झाला आहे त्याचवेळी आधुनिकतवादामुळे ग्रामीण तरुण शेती मातीचा व्यवसाय सोडून इतर व्यवसायकडे वळाला असला आहे. परंतु आधुनिक काळात समाजमध्ये स्वार्थीपानाची प्रवृत्ती वाडीस लागल्यामुळे त्याला मदतसाठी कोणी पुढे येताना दिसत नाही हेच सामाजिक चित्रण लेखकाने केले आहे.

किरण गुरव 'बाळूच्या अवस्थांतराची डायरी' या शीर्षक कथेत खेडेगावातील मुलगा शहराच्या अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी येतो त्यावेळी खेडयातील तरुण शहरातील जातो त्यावेळी शहरातील सामाजिक आणि सांस्कृतिक बदल कसा स्वीकरतो आणि त्या 'बदलाचा' अनुकरण करताना त्याला कसा आनंद होत असते याचे विश्लेषण केले आहे त्यावेळी गावातील जुनी पुढी हि नवीन पिढीतील पोशाख आनंदाने कशी स्वीकारत आहे याविषयी पुढील प्रसंगावरून आपल्याला समजते. "बोला साहेब, काय देऊ? जीन्स पॅंट दाखवू तुम्हाला? मला काय नगो. ह्यो पोरगा आमचा इंजनेर कॉलेजात हिथं अडमिट केलाय. तेला जरा आधुनिक ड्रेस दाखवा.

"कसला?" भुवया चढवत विक्रेत्याचा आदरविरहित केवळ त्रासिक सवाल. "आधुनिक, आधुनिक. हिथं शहरातील पोरं घालत्यात तसला हो ... "हा. हा. फॅशनबेल म्हणा सरळ मग. या. या. हिकडं या." २

ग्रामीण भागातील माणसांच्या मते फॅशनबेल कपडे परिधान करून समाजात वावरणे म्हणजेच आधुनिक म्हणजे मॉडर्न झाला आहे. आसाराम लोमटे यांनी 'बेईमान' (इडा पीडा टळो) कथेत आजच्या काळात राजकारणासाठी ग्रामीण भागातील व्यक्तीही नैतिकता बाजूला ठेवून स्वतःच्या बायकोसोबत कशी बेईमानी करतो याचे सामाजिक चित्रण केले आहे. कुटूंब, प्रेम, सत्यता आणि नैतिकता याचा

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

आधारावर संसार चालतो. परंतु आधुनिकतवादामध्ये राजकारण घरामध्ये पर्यंत आले आहे, म्हणूनच सरपंच पदाच्या मोहापाई बायको सोबत बेईमान करतो.आसाराम लोमटे यांच्या 'ओझं' ('आलोक) या कथेत आधुनिकतेच्या काळातील शहरात राहणारा भाऊ आणि गावकडे राहणारा भाऊ यांची विभिन्न परिस्थिती चित्रित केले आहे. शहरातील भांडवलशाही व्यवस्था, औद्योगीकरण आणि शहरीकरणामुळे विकास झाला आहे. प्राध्यापक असलेला तेथील भाऊ सुख समाधानी आयुष्य जगत आहे तर गावाकडचा मोठा भाऊ मुरली दुष्काळ, हमीभाव आणि कर्ज यांचा सामना करीत आत्महत्या करतो. कथेमध्ये शहरातील लहान भाऊ मोठया भावाला आत्मीयतेने नेहमीच मदत असतो. आजच्या आधुनिकतेच्या काळात ग्रामीण भागातील व्यक्तींमध्ये नात्यांचा ओलावा अजूनही टिकून आहे हे लेखकाने सांगितले आहे. मोठया भावाच्या आत्महत्या नंतर त्याचे कुटूंब सावरण्यासाठी लहान भाऊ मदत करतो तर शहरी संस्कृतीत आणि सामाजिक वातावरण वाढलेली लहान भावाची बायको त्याला सामाजिक जीवनातील व्यवहारिक सल्ला देते' "आता तुम्ही कुठं दररोज जाऊन शेती पाहणार? चतुराची आई तरी काय करणार? बाई माणसाच्यान काय होणार? त्यापेक्षा सरळ विकूनच टाकू. अर्ध पैसे त्यांच्या नावावर बँकेत टाकता येतील. त्या पैशाच्या व्याजावरच त्यांना जगता येईल. काही पैसे चतुराच्या लग्नाला बाजूला ठेवायचे'" ३ आधुनिक काळामध्ये तर्कशुद्ध विचार चांगले जीवन जगण्यासाठी केला पाहिजे. तिथे शेतीचा पण अंतर्भाव आहे असेच लेखकाला सुचत करायचे आहे

**२) आधुनिकतावाद आणि दलित कथांमधून सामाजिक वैचारिकता**

आधुनिकतावाद आणि दलित कथा हे दोन्ही साहित्यिक प्रवाह महत्वपूर्ण आणि परिवर्तनशील आहेत. आधुनिकवादाचे समाजातील विविध क्षेत्रांमध्ये बदल घडवण्याची प्रेरणा दिली आहे तर दलित साहित्याने दलितांच्या अनुभवांना, संघर्षाला आणि त्यांच्या स्वाभिमानाला आवाज दिला. आधुनिकवादाने दलित साहित्याला नवीन दृष्टिकोन दिला आहे. लेखकाने त्याच्या कथा अधिक प्रभावीपणे आणि खुलेपणाने मांडल्या आहेत. आधुनिकवादाच्या प्रभावामुळे दलित साहित्याने समाजातील अन्याय आणि विषमतेला आव्हान दिले आहे. समाजाने 'अस्पृश्य' म्हणून वागणूक दिलेल्या दलित समाजाला सामाजिक व्यवस्थेच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी स्वातंत्र्यानंतर नोकरी, शिक्षण आणि लोकप्रतिनिधी मध्ये आरक्षण दिले. त्यामुळे दलित समाज शिक्षित, संघटित आणि सामाजिक व्यवस्थेशी जोडला गेला. त्याचप्रमाणे १९९० नंतरच्या जागतिकरणामुळे खाजगी क्षेत्रात नोकऱ्यांच्या मोठ्या संधी उपलब्ध झाल्या. तिथेही दलित समाजाने शिक्षणाच्या जोरावर नोकऱ्या मिळाल्या. १९९० नंतर दलित समाज शिक्षण, राजकीय आणि नोकरीच्या दृष्टीने मुख्य प्रवाहात येत असल्याचे चित्र समाज आणि साहित्यामध्ये प्रतिबिबित होत होते पण सामाजिक आणि आर्थिक दृष्ट्या दलित समाजचे 'दलितत्व' संपून त्यांच्या मध्ये सामाजिक दृष्ट्या आधुनिकत्व आले आहे का? आधुनिक समाजाने त्यांना स्वीकारले आहे का? याची चिकित्सा आवश्यक आहे. त्याचप्रमाणे सातत्याने वेदना आणि दुःख मांडणारा दलित लेखकाने १९९० नंतरच्या कथा लिखाणातून समाजाला दिशा देण्यासाठी कोणते समाजशास्त्रीय दृष्टीने आधुनिक आणि नवीन विचार मांडले यांचा संदर्भ घेणे अपेक्षित आहे. ऊत्तम कांबळे यांच्या 'साहेब' ( रंग माणसांच्या) या कथेमध्ये मानवी स्वभावाचे सामाजिक चित्रण केले. आधुनिकतेच्या कालखंडात माणूस ऑफिसमध्ये अतिशय नम्र असतो तर घरी बायकोवर हुकमत गाजविणारा असतो. आधुनिक काळात माणूस स्वतःच्या सोयीसाठी आणि स्वार्थासाठी वेग- वेगळया ठिकाणी स्वभावाचे वेगवेगळे रंग धारण करतो. उत्तम कांबळे यांच्या 'नाते अश्रुंचे' ( रंग माणसांच्या) यामध्ये आधुनिकतेच्या युगामध्ये माणूस माणुसकी कसा विसरत चालला आहे याचे सामाजिक प्रश्नाचे चित्रण केले आहे. रात्री आई मरण पावते. फ्लॅटच्या शेजारी राहणाऱ्या व्यक्तींकडे मदतीसाठी याचना केली परंतु कोणीही मदती येत नाही. नोकरी - व्यवसायामध्ये व्यस्त असलेल्या माणसांना वेळ नसतो. रोजच्या जीवनातील स्पर्धेसाठी माणूस सतत धावत असतो त्याच्यातील माणुसकी लोप पावत चालली आहे. धर्मराज निमसरकार यांनी 'जीवननिष्ठा' (ठसठसणाऱ्या जखमा) या कथेमध्ये आधुनिक काळातील दलित समाजाचे चित्रण केले आहे. आधुनिक काळात दलित समाज शिक्षित झाला असून त्याला अस्पृश्यता मान्य नाही. पूर्वी अन्न, पाणी आणि जगणं मिळविण्यासाठी लाचार असलेला दलित समाज आता नोकरी सुद्धा आत्मविश्वास पूर्वक नाकारतो. आधुनिकतेमध्ये सन्मान आणि स्वतःच्या स्वाभिमानाला जपले पाहिजे अशी वैचारिकता कथेमधून दिसते. शेड्यल कास्टसाठी आरक्षित असलेल्या जागेवर नवबौद्ध धर्म स्वीकारलेल्या कांबळेची नियुक्ती होते. नोकरीतील जागा पक्की करण्यासाठी ऑफिसचे अधिकारी कांबळेकडे शेड्यल कास्टचा म्हणजे महार जातीचा दाखल आणायला सांगतात पण आधुनिक विचारांचा कांबळे म्हणतो, "साहेब, मला करा- मी गरीब जरूर आहे. पण लाचार नाही. मला नोकरीची अत्यंत जरुरी आहे हे मी आपणापेक्षा जास्त जाणतो; पण या नोकरीसाठी मी स्वीकारलेल्या काही मंगल निष्ठांचा बळी देऊ

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

इच्छित नाही. मी माझा स्वाभिमान विकू इच्छित नाही. एका जन्मात मी अस्पृश्य होतो. प्रस्थापित उच्चवर्णीयांच्या दृष्टीने मी नीच होतो, कनिष्ठ होतो, घृणीत होतो पण त्या धर्माचा मी त्याग केला आहे. ज्या धर्माने. समाजाने माझं माणूसपण हिसकावून घेतलं त्याची मला आता विषछाया नको, मला त्या नरक खाईत जायचं नाही पुन्हा. मी स्वाभिमानाने जगू इच्छितो. "४ दीपध्वज कासोदे यांनी ग्रामस्थदिन (पंचनामा) या कथेत सुशिक्षित तरुण सरकारतर्फे राबविणाऱ्या योजनांचा अभ्यास करतो आणि गावांच्या कृषी अधिकाऱ्याला माहिती आणि बुद्धीच्या जोरावर कसे उघडे पडतो याचे चित्रण केले आहे. त्याचप्रमाणे अधिकार ( पंचनामा) या कथेत दलित तरुण सुभाष सोनवणे ग्रामपंचायत स्थापन झाल्यापासून मागासवर्गीय वस्तीवर किती खर्च झाला असा अर्ज सादर करतो. सरपंचाला जाब विचारतो. आधुनिकवादामुळे दलित समाज अधिक जागरूक झाला आहे तो प्रभावीपणे आणि स्वाभिमानाने प्रश्न विचारू लागतो झाला हाच विचार लेखक लेखकाने कथेतून व्यक्त केला आहे 'सरला' ( पंचनामा ) या कथेमध्ये एक विधवा महिलेचा संघर्ष चित्रित केला आहे. आधुनिकतावादाच्या प्रभावामूळे पतीच्या निधनानंतर गावातील अंगणवाडीच्या सेविका पदासाठी अर्ज करतो गावातील सरपंच तिला त्रास देतो परंतु सरला न डगमगता पोलिसांकडे सरपंचाविरुद्ध तक्रार देते. दलित समाज पुर्वी निमूटपणे सहन करीत होता पण आधुनिकवादामुळे दलित समाज लढ्याचे कसे ते शिकले आहे लेखकाला सूचित करायचे होते.

**३) आधुनिकतावाद आणि स्त्रीवादी कथांमधून सामाजिक वैचारिकता**

आधुनिकतवादाने स्त्रीवादी कथांना एक व्यापक आणि सखोल दृष्टिकोन दिला आहे त्याचमुळे नवीन युगासोबत नवीन विचार आणि आचार स्त्रीवादी कथांमध्ये दिसून येतात. चूल आणि मूल यांच्या पलीकडे महिला काम करू लागल्या. स्त्रियांच्या जागतिकीकरणाच्या प्रभावामुळे महिलांना मोठया प्रमाणात रोजगार उपलब्ध झाला त्यामुळे महिला रोजगाराच्या निमित्याने घराच्या बाहेर पडू लागली. आधुनिक विचाराने प्रेरित असलेल्या महिलांना यामुळे पुरुषांच्या मक्तेदारी असलेल्या क्षेत्रात महिलांना दारे उघडे झाले. त्यातून सामाजिक समाज रचनेचे स्वरूप आधुनिकतेच्या दिशेने वाटचाल करू लागले या बदलत्या सामाजिक काळाचे संदर्भ नव्वदोत्तरी स्त्री लेखिकांनी आपल्या कथांमध्ये व्यक्त केले आहे. स्त्री - पुरुष समानतेचे, पुरुषप्रधान व्यवस्थेतील होणारे कोंडमारा, कुटुंब प्रमुखाचे वर्चस्व,स्त्रियांचे स्वावलंबन, आत्मनिर्भरता, व्यक्तीस्वातंत्र्य, स्त्री मुक्तीची आकांशा या नवीन वैचारिकतेचे मंथन कथांमध्ये आले आहे मेघना पेठे यांनी आपल्या कथांमधून सामाजिकतेच्या विषयी आधुनिक विचार व्यक्त केले आहे. 'समुद्री चहूकडे पाणी ... ? (हंस अकेला ) या कथेची नायिका बिनपुरुषाची अभोग स्त्री असे निवेदनाच्या माध्यमातून स्वतःचे वर्णन करीत स्त्री इच्छा मुक्तपणे व्यक्त करीत कथेतील मुख्य प्रसंगातून समाजातील सामाजिक डोंगीपणा आणि बेगडी नैतिकता उघड करते. कथेतील पाठकबाई कडे रोज वेगवगेळी बाहेरची माणसे येतात म्हणून तिला कॉलनीतून हाकलून लावण्यासाठी सर्व जण एकत्र येतात आणि पाठकच्या कुटूंबाला कॉलनीतून हाकलून द्या असा ठराव करतात.व्यभिचाराचा आरोप झालेल्या पाठक बाई विषयी विचार मांडताना नायिका म्हणते "ज्या संबंधांची शरीर किंवा मनाला नड नसताना इतर कुठल्या कारणांनी जो संबंध येऊ दिला जातो तो व्यभिचार. मग ते कारण सत्ता, संधी, ब्रेक मिळवण्यासाठीचं असो वा निव्वळ कंटाळयावर मात करण्यासाठी. जितकी नड कमी तितका त्यातला व्यभिचार जास्त. आणि ही नड व्यक्तीसापेक्ष असते. एकाची नड काय आहे हे दुसरा ठरवू हे नियम शकत नाही. ही व्यभिचारासाठी पळवाट ठरू शकते. म्हणून समाज नियम वगैरे ठरवतो. आदरानं, कौतुकानं पाळणारी कुणी माणसं असतात का? समाज वगैरेंनी घालून दिलेले नियम तमाम जनता घाबरून, दचकूनच पाळते. जे घाबरत नाहीत त्यांना हे नियम बंधनकारक ठरू शकत नाहीत. पण जे दुबळे असूनही एका बलाढ्य अंत:प्रेरणेच्या रेट्याने, नियम मोडतात - पाठकच्या बायकोसारखे - त्यांचे हाल करायला समाज हावऱ्या लांडग्यासारखा पुढे धावतो" ५ मनस्विनी लता रवींद्र ब्लाँगच्या आरशापल्याड (ब्लाँगच्या आरशापल्याड) या कथेमध्ये आधुनिक काळातील सोसायटीत राहणाऱ्या समाज रचनेविषयी भेदक चित्रण केलेले आहे. समाज व्यवस्थेने आधुनिक झाला आहे परंतु विचारांनी अजूनही दूर आहे असा विचार मांडताना तिने कथेमध्ये सांगितले आहे की," बॅचलर गोंधळ घालतात, दारू पिऊन पार्ट्या करतात. मुलांकडे मुली आणि मुलींकडे मुलं रात्री राहायला येतात त्यामुळे सोसायटीचं पवित्र वातावरण बिघडतं. लहान मुलांवर वाईट संस्कार होतात. असं काय काय सांगू लागले. त्यावेळी मी म्हटलंही, 'या सोसायटीत सगळया फॅमिलीज निर्व्यसनी आहेत का? कोणीच दारू पीत नाही वाटतं या सोसायटीत आणि स्त्री

-

पुरुष वेगवेगळया रूम मध्ये झोपतात वाटतं आणि मुले आकाशातून पडतात पाळण्यात" ६ बॅचलर मुले - मुली गोंधळ घालतात म्हणून रूम भाड्याने देण्यास नकार देणाऱ्या समाजाला तर्कशुद्ध विचारसरणीतून प्रश्न निर्माण केला आहे. यामध्ये समाज आधुनिकतेचे सामाजिक रूप उघड्पणे स्वीकारण्यास चाचपडत आहे .

**४) आधुनिकतावाद आणि महानगरी कथांमधून सामाजिक वैचारिकता**

आधुनिकवादाने शहरी जीवनाच्या विविध पैलूंवर नवीन दृष्टिकोन दिले. महानगरी कथा शहराच्या जीवनातील ताणतणाव, विविधता, आणि वेग याचे यथार्थ चित्रण केले आहे. आधुनिक तंत्रज्ञान, महानगरातील सामाजिक परिस्थिती, आर्थिक स्तर,एकटेपणा आणि परकेपणाची भावना आधुनिकवादाने अधोरेखित केली आहे, मानवी नात्यामध्ये मानवी नात्यांमधील ताणतणाव आणि संवादाची कमी यांचे सामाजिक चित्रण आढळते.'साशे भात्तर रुपयांचा सवाल अर्थात युद्ध आमचे सुरु !' ( फिनिक्सच्या राखेतून उठला मोर ) याकथेमध्ये मध्ये जयंत पवार यांनी मध्यमवर्गीय शहरी संस्कृतीमध्ये रहाणाऱ्या विविध लोकांची मानसिकता विशद केली आहे. कथेच्या माध्यमातून लेखकाने मध्यमवर्गीय समाजाचे स्वभाव आणि वागणूक बारकाईने टिपले आहे. आधुनिकतावादातील स्वार्थी वृत्ती, अहंकार आणि समाजातील ताण - तणाव दिसून येतो. आधुनिक समाजात राहणाऱ्या माणूस अजूनही जातव्यवस्थेमधील उच्च -निच्चता अजूनही मनात बाळगून असतो हेही लेखकाला सांगायचे होते. मुंबईच्या चाळी संस्कृतीमध्ये चित्रण आहे. फ्लॅटमध्ये राहणारा बाळू आवळस्कर आपल्या जातीचा, श्रीमंतीचा आणि अहंकाराचा माज दाखवत असतात त्यांचा जिजाबाई नगरमध्ये राहणाऱ्या बळी जंगमशी पैसेवरून वाद होतो. त्यातून बळीच्या मुस्काटात आवळस्कर मारतो. काही दिवशीनी आवळस्कर मुलगी चिन्मयी हिच्या पोटात आणि बाळू जंगमचा मुलगा राजेश जंगम याचा वंश वाढत असतो ते अचानक प्रेमविवाह करतात. सर्वांना आश्चर्य वाटते तर जंगम वाटते की, स्वतःला 'मोठा' समजणाऱ्या आवळस्करला शेवटी खालच्या जातीचा जावई मिळाला आहे. त्यावेळी "विजयोन्मादाने बळी जंगम धडपडत आला त्याला आठवला सकाळचा भाऊ मुस्काटात भडकावणारा हात. एक सनक मेंदू चिरत गेली आणि त्याने एक दगड उचलून नेम धरून सिद्देशमधल्या २०२ नंबरच्या फ्लॅटच्या दिशेने 'आवाज भेंच्योयुद्ध अशी गर्जना करत भिरकावला" ७ आधुनिक महानगरी जीवन पद्धतीमध्ये आर्थिक असमानता, भेदभाव आणि जातीयता दिसून येत आहे. 'फिनिक्सच्या राखेतून उडालेला मोर' या शीर्षक कथेमध्ये आधुनिकता आणि जागतिकीकरण यामुळे गिरणी कामगारांचे जीवन कसे उध्वस्त होते याचे चित्रण केले आहे. शहरी भागामध्ये मॉल संस्कृतीचे आगमन झाल्यामुळे कंपनीचे मिल मालक कंपनी बंद करून जागा विकण्यास काढतात त्यावेळी गिरणी कामगार आंदोलन करतात. संपामुळे गिरणी कामगार देशोधडीला लागत असताना मिलच्या जागेवर फिनिक्स मॉल उभा राहतो. कथेतील श्यामच्या अंगावरील कपडे आणि मॉल मधील चकचक वातावरण यामध्ये मोठे अंतर असते. लहानपणी खेळलेल्या जागेत मॉल उभा राहिला. गरीबीमुळे मॉलमध्ये प्रवेश करता येत नव्हता. एक दिवस मॉलची व्यवस्था श्यामने वस्तूला हात लावला, चोरण्याचा प्रयत्न केला म्हणून बळी घेते त्यावेळी जागतिकीकरण झळा माणुसकी जाळायला निघाली आहे का ? असा प्रश्न पडतो. "श्यामची अर्थी उचलल्यावर अखेरचा हंबर फुटला आणि जयराम श्रीरामाच्या गजरात यात्रा वरळी हिंदू स्मशानभूमी कडे च्या वाटेने चालू लागली तेव्हा हायस्ट्रीट फिनिक्सचा मोर चमचम दिव्यांचे पंख पसरून दिमाखात उभा होता"८

**निष्कर्ष**

आधुनिकतावादाने मराठी कथेत व्यक्तिवैशिष्ट्य, अस्तित्ववादी अस्वस्थता आणि अंतर्मुखता निर्माण केली. पण १९९० नंतरच्या कथांनी या चौकटीपलीकडे जाऊन समाजातील प्रत्यक्ष बदलांचे दर्शन घडवले. जागतिकीकरण, स्त्रीवाद, डिजिटल संस्कृती, ग्रामीण-शहरी संघर्ष, जातीय प्रश्न यांमुळे कथेचा सामाजिक विचार अधिक वास्तववादी, विविधांगी आणि समकालीन झाला.

**संदर्भ**

1. गुरव, किरण: 'श्रीलिपी', शब्द पब्लिकेशन, मुंबई, पहिली आवृत्ती द्वितीय आवृत्ती, जानेवारी २०२०, पृ २४.
2. गुरव, किरण 'बाळूच्या अवस्थांतराची डायरी', शब्द पब्लिकेशन, मुंबई,पहिली आवृत्ती डिसेंबर २०१८,द्वितीय आवृत्ती ८जानेवारी २०२२, पृ ४१.
3. लोमटे, आसाराम, 'आलोक', शब्द प्रकाशन, मुंबई , २०१०,पृ ५०
4. निमसरकार, धर्मराज : 'ठसठसणाऱ्या जखमा', दिलीपराज प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती,१५ जानेवारी २०१० , पृ १३
5. पेठे, मेघना : 'हंस अकेला' राजहंस प्रकाशन,पुणे, प्रथम आवृत्ती नोंव्हेबर १९९७, सातवी आवृत्ती २०१४, पृ १९

6. मनस्वी लता रवींद्र: 'ब्लॉँगच्या आरशापल्याड', शब्द पब्लिकेशन, मुंबई, प्रथम आवृत्ती २०१०, द्वितीय आवृत्ती २०१०, पृ . १२७
7. पवार, जयंत "फिनिक्सच्या राखेतून उठला मोर" प्रस्तावना लोकवाङ्मयगृह, मुंबई, २०१०, पृ ५४.
8. पवार, जयंत "फिनिक्सच्या राखेतून उठला मोर" प्रस्तावना लोकवाङ्मयगृह, मुंबई, २०१०, पृ ७७

**Journal of Research and Development**
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

Original Article

# सद्यःस्थितीत चार्वाक तत्त्वविचारातून शाश्वत विकासातील नितीमत्ता साधताना येणारी आव्हाने

**डॉ. गोरोबा तुकाराम खुरपे**
प्राचार्य, कला व वाणिज्य महाविद्यालय, मायणी ता. खटाव जि. सातारा
**Email:** gtkhurpe@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-170809
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 8(II)
Pp. 38-41
August 2025
**Submitted:** 11 July. 2025
**Revised:** 25 July. 2025
**Accepted:** 10 Aug 2025
**Published:** 30 Aug. 2025

***सारांश***

*चार्वाक दर्शन हे प्राचीन भारतीय भौतिकवादी विचारसरणी आहे. यात प्रत्यक्ष प्रामाण्य आणि आनंदवाद यावर भर देण्यात आला असून आजच्या वैज्ञानिक आधुनिक युगात वेदप्रामाण्य नाकारून प्रत्यक्ष अनुभवावरचे विचार टिकवून ठेवणे हे एक मोठे आव्हान आहे. आज समाजात कितीही भौतिक प्रगती झाली तरी जुन्या चालीरीती आणि परंपरा यांना चिकटून राहणारी मंडळी लक्षणीय आहे. भौतिकवाद आणि अनुभववाद यांचा विज्ञानाच्या कसोटीवर उतरविता येणे शक्य आहे मात्र धार्मिक प्रभुत्त्व किंवा धर्मांचा पगडा आजही सुशिक्षित लोकांमध्ये कमी होताना दिसत नाही. चार्वाक दर्शन प्रत्यक्ष अनुभवावर आधारित आहे आणि केवळ इंद्रियगम्य गोष्टींनाच सत्य मानते मात्र विज्ञानाने अनेक असे शोध लावले आहेत की, जे आपण डोळ्यांनी पाहू शकत नाही परंतु त्यांचे अस्तित्त्व आहे. चार्वाक दर्शनात मानवी सुखाला सर्वोच्य प्राधान्य दिले जाते यात नैतिकता ही व्यक्तिगत सुखावर अवलंबून आहे. चार्वाक दर्शनातील मूळ सिद्धांत 'जोपर्यंत जगाल, सुखाने जगा' हा सिद्धांत दिर्घकालीन टिकाऊपणाच्या दृष्टीकोनाशी विसंगत आहे शिवाय तो उपभोगवादाला बळ देऊ शकतो. अशिक्षित वर्गाबरोबर सुशिक्षित, पदवीधर व अभ्यासू म्हणवणारेही त्यांच्या जुन्याच श्रद्धांच्या आहारी गेलेले आपणस आज घडीला आपल्या भोवती तर दिसतातच आणि आपणही त्यातलेच आहोत हे वेगळे सांगण्याची गरज येथे नाही त्यामुळे शाश्वत विकासातील नितीमत्ता साधता येत नाही. चार्वाक दर्शन हे प्रत्यक्ष प्रामाण्य स्वीकारते आणि यातूनच वास्तववादी दृष्टीकोन मांडते. चार्वाकाच्या प्रत्यक्षवादातून शाश्वत विकासातील नितीमत्ता साधताना आधुनिक वैज्ञानिक दृष्टीकोनाशी समन्वय साधण्यासाठी चार्वाक विचारात काही बदल आवश्यक आहेत.*

***मुख्य शब्द :*** *चार्वाक तत्त्वविचार, शाश्वत विकास, नितीमत्ता, प्रत्यक्ष प्रामाण्य, चालीरीती, इंद्रियगम्य, आव्हाने*

**प्रस्तावना** :

चार्वाक दर्शन हे भारतीय दर्शनातील 'लोकायत' दर्शन म्हणून ओळखले जाते. 'लोकायत' म्हणजे सर्वसामान्यांचे दर्शन होय. चार्वाक दर्शन हे बृहस्पती मुनी यांच्या ग्रंथावर आधारित भारतीय दर्शनशात्रातील एक भौतिकवादी शाखा म्हणून परिचित आहे. चार्वाक दर्शन हे जडवादी दर्शन आहे आणि या दर्शनाच्या प्रस्थापनेमुळे सर्वसामान्य जन-माणसात विचार स्वतंत्र्याचे एक स्वतंत्र बारे सर्वत्र वाहू लागले. जडवादात ज्ञान आणि अज्ञान विश्व ऐवढाच फरक केला जातो, यातील सिद्धांत असा आहे की - ज्ञान वस्तूवर अवलंबून असते; वस्तू ज्ञानावर अवलंबून नसतात कारण ज्ञान हे वस्तूतंत्र असते म्हणून ज्ञानाचे प्रामाण्य किंवा अप्रामाण्य ठरविता येते. येथे ही बाब लक्षात घेतली पाहिजे की, ज्ञान शाश्वत असले तरी तिचे वास्तव हे वस्तू आहे. प्रत्यक्ष अनुभवला प्रथम प्राधान्य देणारे चार्वाक दर्शन असून त्यात सराव ज्ञानामध्ये श्रेष्ठ हा प्रत्यक्ष अनुभव मानला गेला आहे अर्थात प्रयत्नजन्य अनुभवाला किंवा प्रयोगाला ज्ञान शास्त्रात प्रमुख स्थान आहे. असे असूनही चार्वाक दर्शनातील तत्त्वविचार हे आजच्या काळात मागे पडताना दिसतात कारण आजही आत्याधिक आधुनिक युगात सुशिक्षित माणसांची श्रद्धा ही अंधश्रद्धेवरच जास्त असल्याचे जाणवते.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*डॉ. गोरोबा तुकाराम खुरपे,प्राचार्य, कला व वाणिज्य महाविद्यालय, मायणी ता. खटाव जि. सातारा*

**to cite this article:**
*खुरपे, . गोरोबा . तुकाराम . (2025). सद्यःस्थितीत चार्वाक तत्त्वविचारातून शाश्वत विकासातील नितीमत्ता साधताना येणारी आव्हाने. Journal of Research & Development, 17(8(II)), 38–41.* https://doi.org/10.5281/zenodo.17231779

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI:10.5281/zenodo.17231779

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

याला बरीच कारणे आहेत त्यापैकी एक म्हणजे जगात शाश्वत असे काही नाही कारण एखादा प्रयोग जेंव्हा सिद्ध होतो तर ते त्रिकालबाधित सत्य मानायचे का? असा प्रश्न निश्चितच उरतो. दुसऱ्या अर्थाने असे म्हणणे योग्य राहील की, आजपर्यंत सिद्ध न झालेली बाब किंवा ज्ञान आज सिद्ध झाले परंतु यालाही एक विशिष्ट अशी मर्यादा असते, ती म्हणजे भविष्यातही सिद्ध झालेली बाब किंवा ज्ञान हे तसेच अविरत - अखंड - कायमस्वरूपी तशीच राहील का? याचे योग्य उत्तर आहे निश्चित बदलही होऊ शकतो.

**संशोधनाची उद्धीष्टे :**

१. चार्वाक दर्शनातील तत्त्वविचारांचा सखोल आढावा घेणे

२. आजच्या काळात चार्वाक दर्शनासमोरील आव्हानांचा शोध घेणे

३. चार्वाक दर्शनासमोरील आव्हानांचे विश्लेषण करून निष्कर्ष काढणे

**संशोधन पद्धती :**

संशोधकाने प्रस्तुत संशोधन लेख लिहिण्यासाठी ग्रंथालयीन पद्धतीचा वापर अधिक प्रमाणात केलेला आहे. ऐतिहासिक पद्धती बरोबरच विश्लेषणात्मक पद्धती आणि अनेक दुय्यम साधनांचाही वापर या संशोधन लेखाच्या अनुषंगाने केलेला आहे. त्याचबरोबर सदरील संशोधन लेखासाठी नियतकालिके, संकेतस्थळावरील माहिती वर्तमानपत्रातील लेख आणि विविध तज्ञांची लेख व मते विचारात घेऊन आजच्या काळात चार्वाक विचारांपुढील आव्हानांची मांडली केली आहे.

**सद्यःस्थितीत चार्वाक तत्त्वविचारातून शाश्वत विकासातील नितीमत्ता साधताना येणारी आव्हाने** :

चार्वाक दर्शन जे प्राचीन भारतीय भौतिकवादी तत्त्वज्ञान आहे, त्याला आजच्या काळात अनेक आव्हाने समोर येतात. हे दर्शन प्रत्यक्षवादी, अनीश्वरवादी आणि सुखवादी आहे, ज्यामुळे ते आधुनिक संदर्भात काही बाबतीत प्रासंगिक तर काही बाबतीत आव्हानात्मक ठरते. वास्तववादी जीवन जगा हा चार्वाकांनी दिलेला मूलमंत्र स्विकारताना अर्थात सद्यःस्थितीत चार्वाक तत्त्वविचारातून शाश्वत विकासातील नितीमत्ता साधताना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते त्यातील काही आव्हाने पुढीलप्रमाणे नमूद केले आहेत -

१. चार्वाक दर्शन नास्तिकवादी आहे आणि ईश्वर, आत्मा, पुर्वजन्म - पुनर्जन्म यासारख्या संकल्पनांना नाकारते. विशेषतः आपल्या भारत देशात सद्यःस्थितीत आध्यात्मिक विचारांचा प्रभाव प्रबळ स्वरूपाचा आहे. आज चार्वाक विचारांचे समर्थन करणाऱ्या व्यक्तीला टीका आणि विरोध सहन करावा लागतो. चार्वाक दर्शन प्रत्यक्ष अनुभवावर आधारित आहे आणि केवळ इंद्रियगम्य गोष्टींनाच सत्य मानते मात्र विज्ञानाने अनेक असे शोध लावले आहेत की, जे आपण डोळयांनी पाहू शकत नाही परंतु त्यांचे अस्तित्त्व आहे. चार्वाक दर्शनात मानवी सुखाला सर्वोच्य प्राधान्य दिले जाते यात नैतिकता ही व्यक्तिगत सुखावर अवलंबून आहे. येथे पर्यावरण संरक्षणासाठी व्यक्तिगत सुखाचा त्याग करावा लागतो तरच शाश्वत विकासातील नितीमत्ता साधली जाते, हा जो विचार आहे तो चार्वाक विचारांशी विसंगत आहे. अशा बाबींचे आव्हान चार्वाक विचारापुढे निश्चितच येते.

२. चार्वाक दर्शनाला ऐतिहासिकदृष्ट्या कमी मान्यता मिळाली आणि त्याचे ग्रंथही मोठ्या प्रमाणात नष्ट झाले ज्यामुळे त्याची आजच्या शिक्षण व्यवस्थेत चार्वाक दर्शनाला फारसे स्थान नाही त्यामुळे चार्वाक विचारसरणी नव्या पिढीपर्यंत पोहचत नाही. याचे उदाहरणच द्यायचे झाले तर भारतीय तत्त्वज्ञानाच्या अभ्यासात वेदांतर, बौद्ध आणि जैन दर्शनाला प्राधान्य दिले जाते आणि चार्वाक दर्शनाला दुय्यम स्थान मिळते. चार्वाकाचा सुखवादी दृष्टिकोन आधुनिक उपभोगवादी संस्कृतीशी काही प्रमाणात जुळतो परंतु त्याचा अतिसरलपणा उपभोगवादाच्या नकारात्मक बाजूने जातो. चार्वाक दर्शनातील मूळ सिद्धांत *'जोपर्यंत जगाल, सुखाने जगा'* हा सिद्धांत दिर्घकालीन टिकाऊपणाच्या दृष्टीकोनाशी विसंगत आहे शिवाय तो उपभोगवादाला बळ देऊ शकतो. शाश्वत विकासातील नितीमत्ता साधताना आधुनिक उपभोगवादी संस्कृतीशी निश्चितच फारकत घेतली पाहिजे.

३. आजच्या अत्याधुनिक युगात सर्वच मानव हे प्राधान्य कशाला देतात यावर चार्वाक विचार पेरणीची भिस्त अवलंबून आहे. चार्वाक दर्शनातील तत्त्वविचार समाजमान्य करणे म्हणावे तितके सोपे नाही कारण माणसाच्या जीवनावर मेंदूहून मोठा प्रभाव मनाचा आहे आणि मन विचार न करता विश्वासाच्या व श्रद्धेच्या आहारी जाणारे आहे. धर्म मग तो कोणताही असो त्या-त्या धर्मातील व्यक्ती आपापला धर्म धर्म ग्रंथ वाचत नाही, त्यातील वास्तव समजून घेणे हे तर खूप दूरचे आहे. धर्म ग्रंथ मान यथाशक्ती करतात, भक्तिभावाने त्यांची पूजा करतात कारण याच बाबी त्यांना भावतात - मानवतात. यामुळे सर्वसामान्य माणूस प्रत्यक्ष ज्ञानापासून दूर - दूर होत चालला आहे. सर्वसामन्य माणसाला नितीमत्ता म्हणजे काय ? हे समजावून सांगणे गरजेचे आहे अन्यथा त्याचा शाश्वत विकासातील नितीमत्ताशी संबंध राहणार नाही.

४. सद्यःस्थितीतील अंधश्रद्धा म्हणजे काय तर पुराव्यावाचून वा प्रमाणावाचून ठेवलेला विश्वास ! पारंपारीरिक चालत आलेल्या अर्थात स्वार्था पोटी निर्माण केलेल्या रूढी - परंपरा ह्या अंधश्रद्धाच आहेत याला आडणी माणूस तर बळी पडतोच शिवाय या अंधश्रद्धा सुशिक्षित व ज्ञानी वर्गातही आहे. नरहर कुरुंदकर गमतीने म्हणायचे, *'आपल्या मनात आपल्या धर्मग्रंथांविषयी जो अपार आदर आहे त्याचे महत्त्वाचे कारण आपण ते वाचत नाही हे आहे.'* न वाचलेल्या, न पाहिलेल्या व न समजलेल्या गोष्टींविषयी एवढी दृढ श्रद्धा मनात असेल तर त्या न पाहिलेल्या गोष्टी नाहीतच वा कधी नव्हत्याच या गोष्टी मनाला कशा रुचतील? हा एक गहन प्रश्न आहे आणि या प्रश्नाचे उत्तर देण्याचे धाडस आज कोणा एकात दिसत नाही. श्रद्धा निश्चित जोपासल्या पाहिजेत कारण श्रद्धेतूनच मानवी मनात शाश्वतता निर्माण होते आणि ही शाश्वतता त्याला नीतिवान बनविते.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

५. जगात अगदी प्राचीन काळापासून अनेक तत्त्वज्ञ, वैज्ञानिक, ज्ञानी व विचारवंत, संत महात्मे झाले. या सर्वांनी जगाला सत्त्य समजावून सांगण्याचा आटोकाट प्रयत्न केले मात्र त्यांना काही अंशीच यश आले. त्यामुळे त्यांचा प्रभाव समग्र समजावर झाला तर नाहीच शिवाय अशिक्षित वर्गाबरोबर सुशिक्षित, पदवीधर व अभ्यासू म्हणवणारेही त्यांच्या जुन्याच श्रद्धांच्या आहारी गेलेले आपणस आज घडीला आपल्या भोवती तर दिसतातच आणि आपणही त्यातलेच आहोत हे वेगळे सांगण्याची गरज येथे नाही. चार्वाकांनी जो शाश्वत वास्तविकतेचा मूलमंत्र दिला आहे तो आज कुठेतरी बाजूला पडल्याचा दिसतो. आजच्या काळात शाश्वत विकासातील नितीमत्ता साधणे अत्यंत महत्त्वाचे आहे कारण त्याशिवाय समाजाची योग्य दिशेने प्रगती होणार नाही.

६. आपल्या देशातील राजकीय, वैज्ञानिक, क्रीडा, सामाजिक, न्याय व्यवस्था अशा विविध क्षेत्रातील थोर मंडळी आधुनिक बुवाबाजी च्या मागे लागल्याची दिसते. खेड्या पासून ते मेट्रो शहरापर्यंत हे लोन पसरले आहे, हे काही विशिष्ट एका धर्मातच आहे असे नाही तर सगळया धर्मांच्या अशा ठोक व चिल्लर दुकानदारांची जोरात चालणारी दुकाने आपण पाहत असतो. अनैतिकतेची शिकवण देणारा धर्म कसा असू शकतो ? कारण धर्माची शिकवण ही नैतिकतेची, प्रेमाची, माणूसकीची असते मग तो जगातील कोणताही धर्म असो ! चार्वाक दर्शनात समानतावादी विचारसरणी सांगितली आहे, चार्वाक दर्शनात स्त्रीविषयक समान दृष्टीकोन सांगण्यात आला आहे मात्र आजच्या आधुनिक युगात स्त्री वर्गाची हेळसांड होताना दिसते. सद्यःस्थितीत आधुनिक कायदे अस्तित्वात आले नसते तर या श्रद्धावानांनी अशा अनिष्ट प्रथा आणखी चालवल्या असत्या!

७. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत जगभरात माणसांचे बाजार भरवून त्यांची गुलाम होऊन विक्री होत आली. विधवा स्त्रीला जिवंत जाळण्याच्या प्रथाही धार्मिकच होत्या. आपल्या देवदेवतांच्या कथाही फार वाखाणाव्या अशा नाहीत. शिवाय थेट देशाच्या पातळीवर ती बांधण्याच्या राज्यकर्त्यांच्या योजना आहेत. काल्पनिक देव आणि महंत असे असूनही त्यांची घरात, दारात व सर्वत्र पूजा केली जात असेल तर या समाजात बुद्धी मनावर मात कशी करील? अनेक विद्वान यावर केवळ भाष्य करतात मात्र त्यांची कृती शून्य असल्याची वास्तव परिस्थिती नाकारता येत नाही कारण या विद्वानांची मानसिकता बदलत नाही. भोगवादी वृत्ती ही केवळ आजचे पाहते तर शाश्वतता ही दिर्घकालीन असते मात्र हे समाज मनावर बिंबविणे ही काळाची गरज आज कुठेतरी दिशाहीन होताना दिसते. हेच वैज्ञानिक मानसिकतेच्या उभारणीतले व चार्वाकांच्या मार्गातला सर्वात मोठे आव्हान आहे.

८. श्रद्धा असावी मात्र ती अंधश्रद्धा असता कामा नये परंतु समुदायाच्या डोक्यावरचे अंधश्रद्धेचे प्रचंड ओझे आणि भक्तिभावाचे खापर कोण, केव्हा आणि कसे उतरवील? याचा उलगडा कधी होईल हे आज घडीला तर सांगणे कठीण आहे. शिक्षणाने ज्यांचे डोळे उघडत नाहीत ते स्वतःच्या विचारांच्या बळावर आपले मेंदू कसे उघडे करणार? आणि पावसासाठी यज्ञ करणारे, देवाला बळी देणारे आणि श्राद्ध करून पूर्वजांचे आत्मे शांत करणारे त्यातून बाहेर कसे येणार? चार्वाकांच्या अनुभवजन्य ज्ञानाला केवळ अंधश्रद्धेचाच विरोध नाही तर या अंधश्रद्धांच्या मागे सर्व तऱ्हेच्या सत्ता संघटितपणे उभ्या आहेत. या श्रद्धांना जो कोणी जरा धक्का लावील तो समाजात जीवन जगणे कठीण होताना दिसते. शाश्वत विकासातील नितीमत्ता साधताना संघटन अत्यंत गरजेचे आहे पण आज समाजात एकमत दिसत नाही.

९. कष्ट करा, पैसा मिळवा आणि त्या पैशाचा उपभोग घ्या असा विचार चार्वाक दर्शनात आढळतो, येथे चार्वाक दर्शन गैर मार्गाने पैसा मिळविण्याचा विचार देत नाही. चार्वाक दर्शनातील या तत्त्वविचाराला सद्यःस्थितीत असे आव्हान आहे की, आज श्रम मूल्य लोप पावत चालले आहे, कोणी कष्ट करायला तयार नाही. यान त्या मार्गाचा अवलंब करून पैसा लवकरात लवकर कसा मिळविता येईल आणि श्रीमंत कसे होता येईल यावर अधिक भर दिसून येतो शिवाय श्रीमंत झाल्यावर व्यक्तीमध्ये एक विलक्षण अहंकार निर्माण होताना दिसतो आहे. तो भोगवादी बनतो आणि त्याचे स्वार्थी मन शाश्वत विकासातील नितीमत्ता साधत नाही ही वस्तूस्थिती आहे. अहंकारी व्यक्ती हे मानायलाच तयार नाही की, या अथांग अशा विश्वामध्ये आपलं अस्तित्त्व शुन्य आहे, हे जेंव्हा कळते तेंव्हा मात्र आपल्याला अहंकार/अहम्/मीपणा नावाचा सूक्ष्म जीव मरण पावतो.

१०. आज भौतिक समृद्धी मोठ्या प्रमाणावर झाली आहे मात्र माणसाला माणूस म्हणून किंमत राहिलेली नाही तर केवळ पैशाला किंमत दिसून येते. माणसातील नीतिवान, चारित्र्यवान, प्रामाणिक, दयावान या वैशिष्ट्यांना किंमत नाही तर एखाद्याकडे सत्ता - संपत्ती किती आहे?, तो कोणत्या पदावर आहे? यावरून माणसाची किंमत ठरविली जाते. आजच्या काळाची गरज कोणते दर्शन भागवू शकते हे ओळखणे गरजेचे आहे. सर्व दर्शनाचं गमक आजच्या स्थितीत समजणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे कारण चार्वाक दर्शन हे प्रत्यक्ष प्रामाण्य स्वीकारते आणि यातूनच वास्तववादी दृष्टीकोन मांडते मात्र या दर्शनाला अंधश्रद्धा आव्हान देते मात्र चार्वाक दर्शन गंभीरतेने समजून घेतले तर हे दर्शन समाजाच्या पुनर्रचनेचा पाया असून यातून निर्दोष समाजाची रचना करण्याचे स्वप्न यात दडले आहे. चार्वाक दर्शनातील तत्त्वविचारातून शाश्वत विकासातील नितीमत्ता साधता येणे शक्य आहे.

**निष्कर्ष :** सद्यःस्थितीत चार्वाक तत्त्वविचारातून शाश्वत विकासातील नितीमत्ता साधताना येणारी आव्हाने खालीलप्रमाणे मांडता येतील -

१. चार्वाकाच्या प्रत्यक्षवादातून शाश्वत विकासातील नितीमत्ता साधताना आधुनिक वैज्ञानिक दृष्टीकोनाशी समन्वय साधण्यासाठी चार्वाक विचारात काही बदल आवश्यक आहेत.

२. नैतिकतेचा समावेश करताना चार्वाक विचारातील सुखवादाला सामाजिक आणि पर्यावरणीय जबाबदारीशी जोडून त्याला व्यापक स्वरूप दिले तरच शाश्वत विकासातील नितीमत्ता साधली जाईल.

**Journal of Research and Development**
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

३. चार्वाक दर्शनाचा अभ्यास शिक्षणाच्या माध्यमातून प्रसार वाढवून त्याला शाश्वत विकासातील नितीमत्ता साधण्याची गरज आधुनिक विचारवंतांपर्यंत पोहोचवता येईल.
४. चार्वाक विचारातील भौतिकवाद आणि अनुभववाद यांची योग्य सांगड आधुनिक विज्ञानानाशी घालून त्याचा उपयोग मानव कल्याणासाठी करताना शाश्वत विकासातील नितीमत्तेची जोड दिली पाहिजे.
५. चार्वाक दर्शनातील सुखवादी संकल्पना ही सद्यःस्थितीत व्यापक अर्थाने घेण्यासाठी चार्वाक विचारांची शाश्वत विकासातील नितीमत्ता साधण्यासाठी पुनरमांडणीची गरज आहे.
६. अंधश्रद्धेच्या आहारी न जाता वास्तववादी चार्वाक विचारांची अंमलबजावणी प्रत्यक्ष प्रामाण्यांचा मानक लावून तपासाताना शाश्वत विकासातील नितीमत्ता कशी साधता येईल याचे भान ठेवावे.
७. कष्ट करा, पैसा मिळवा आणि त्या पैशाचा उपभोग घ्या असा विचार चार्वाक दर्शनात आढळतो, येथे चार्वाक दर्शन गैर मार्गाने पैसा मिळविण्याचा विचार देत नाही तर या विचारात शाश्वतता दिसते आणि यातूनच नितीमत्ता साधणे सुलभ होते.

**संदर्भग्रंथ :**

१. Chattopadhyaya, Debiprasad, Lokayata : A Study in Ancient Indian Materiallism, Delhi, 1959.
२. Radhakrishnan, S. History of Philosophy-Eastern and Western, London, 1952.
३. आठवले, सदाशिव, चार्वाक : इतिहास आणि तत्त्वज्ञान, वाई, १९८०.
४. कुमठेकर, उदय, संपा. चार्वाकमंथन, पुणे, २००१.
५. गाडगीळ, स. रा. लोकायत, मुंबई, १९७४.
६. गोखले, प्रदीप, तत्त्वचिंतक चार्वाक, पुणे, २०१३.
७. झा, आचार्य आनंद, चार्वाकदर्शन, लखनऊ, २०१३.
८. पाठक, सर्वानंद, चार्वाकदर्शन की शास्त्रीय समीक्षा, वाराणसी, १९६५.
९. साळुंखे, आ. ह. चार्वाकदर्शन, मुंबई १९८७.
https://iep.utm.edu/indmat/

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

Original Article

# पर्यावरण संरक्षण आणि शाश्वत विकासा समोरील आव्हाणे

**कविता आर.किर्दक**
शि.प्र.मं.विज्ञान व गिलाणी कला वाणिज्य महाविदयालय, घाटंजी जि.यवतमाळ
**Email:** Kirdakkavita339@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2025-170810
ISSN: 2230-9578

Volume 17
Issue 8(II)
Pp. 42-44
August 2025

**Submitted:** 11 July. 2025
**Revised:** 25 July. 2025
**Accepted:** 10 Aug 2025
**Published:** 30 Aug. 2025

**सारांश :**

पुर्वी नैसर्गिक साधन सामग्री भरपूर प्रमाणात होती. पण आज वाढती लोकसंख्या आणि तंत्रज्ञानाची प्रगती यामुळे मानवाचा उपभोग घेण्याचा स्तरही उंचावला आहे. सर्व सामान्य जिवना मध्ये कृत्रीम साधनाचे प्रयोग वाढल्यामुळे निसर्ग दुषीत होवू लागला आहे. निसर्गा पासून मनुष्य दूर होत आहे, आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्याच्या धावपळीत पर्यावरणाच्या विनाशाकडे मानवाने वाटचाल सुरु केली आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्या कडे मानवाचे दुर्लक्ष झाले आणि उत्पादन वाढीच्या लालसेने नैसर्गिक साधन संपत्तीचा अफाट प्रमाणात वापर होतो आहे. त्यामुळेच शाश्वत विकासाची संकल्पना पर्यावरणाच्या संरक्षणा शिवाय करणे अशक्य आहे. मानवाचे आणि निसर्गाचे तुटलेले संबध पुन्हा जोडणे मुनष्याच्या सामाजिक, राजकीय जिवनाला विनयशील व विवेकशिल बनविणे आवश्यक आहे. असा व्यापक सर्वांच्या हिताचा विचार करुन विकासाचा गाढा पुढे नेण्याची गरज आहे. त्याच बरोबर लोकसंख्येवर नियंत्रण व्यक्तीगत व सामुहीक उत्तरदायीत्व तसेच मनुष्याला निसर्गा बरोबर जगण्याची अभिलाषा निर्माण करणे हे गरजेचे आहे. सदर संशोधना मध्ये पर्यावरणीय दृष्टीकोणातून शाश्वत विकास कसा साध्य होऊ शकतो यावर चर्चा करण्यात आलेली आहे.

**उद्दीष्टे :**

१.शाश्वत विकासासाठी पर्यावरणाचे महत्व जाणून घेणे.

२.पर्यावरण संरक्षणातून शाश्वत विकासाची भुमीका तपासणे.

**प्रस्तावणा :**

मानव जातीचा शांतता पुर्ण आणि सर्वांगिण शाश्वत आणि टिकावू विकासासाठी पर्यावरण संरक्षणाची अत्यंत आवश्यकता आहे. शाश्वत विकास ही बहुआयामी व परस्परावलंबी संकल्पना आहे. या संकल्पनेत वर्तमान काळातील पिढी बरोबरच भविष्य काळातील पिढीचा सुध्दा विचार केला जातो. हल्लीच्या काळात निर्माण झालेला उर्जा निर्मीतीचा प्रश्न आणि विज निर्मीती करीता लागणाऱ्या दगडी कोळशाची टंचाई ही शाश्वत विकासाला अवरोध ठरली आहे. विकास ही सतत चालणारी प्रक्रिया आहे. विकास साधत असतांना मानवाने नैसर्गिक संपत्तीचा वापर मोठया प्रमाणात केला आहे.

मानव व पर्यावरण यांचा अतुट संबध असल्यामुळे पर्यावरण घटकातून आर्थिक विकास साध्य होत गेला.शाश्वत विकासाची संकल्पना पर्यावरणाला महत्व देणारी आहे. त्यामध्ये मानवी गरजा आर्थिक वाढीचे एकात्मिक पर्यावरण आरोग्य व निरंतर आर्थिक विकास केंद्र स्थानी असतो.

Quick Response Code:

Website:
https://jrdrvb.org/

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

DOI:10.5281/zenodo.17231830

**Address for correspondence:**
*कविता आर.किर्दक शि.प्र.मं.विज्ञान व गिलाणी कला वाणिज्य महाविदयालय, घाटंजी जि.यवतमाळ*

**How to cite this article:**
*किर्दक, . कविता . आर . (2025). पर्यावरण संरक्षण आणि शाश्वत विकासा समोरील आव्हाणे. Journal of Research & Development, 17(8(II)), 42–44.* https://doi.org/10.5281/zenodo.17231830

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

शाश्वत विकासाठी नैसर्गिक साधन संपत्तीची हानी व भावी पिढयांच्या गरजा भागविण्यासाठी निसर्गाला कोणताही धक्का न लावता लोकांच्या आजच्या गरजा पूर्ण केल्या जातात व आर्थिक विकास साधला जातो.

**गृहीतके:**

१.पर्यावरणा कडे दूलर्क्ष केल्यामूळे शाश्वत विकासापूढे मोठे आव्हान उभे राहीले आहे.

२.पर्यावरणाचे संरक्षण केल्यामूळे विकासातील समस्या सोडविल्या जाऊ शकतात.

**संशोधन पध्दती :**

सदर संशोधन पेपर करीता वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक पध्दतीचा अवलंब केलेला आहे, तसेच दुय्यम सामग्रीचा वापर केला असून या मध्ये संदर्भ ग्रंथ, शोध निबंध, मासीके, इंटरनेट इत्यादी साधनांचा वापर केलेला आहे.

**शाश्वत विकासाची संकल्पना :**

शाश्वत विकास म्हणजे असा विकास की तो, भविष्य कालीन पिढयांच्या स्वत:च्या गरजा पूर्ण करण्याच्या सामर्थ्याचे तडजोडी शिवाय वर्तमान कालीन गरजांची पुर्तता करणे होय. भावी पिढयांच्या गरजा भागविण्याच्या क्षमतेला कोणताही धोका न पत्करता लोकांच्या वर्तमान गरजा पुर्ण करणे म्हणजे शाश्वत विकास होय, याच बरोबर रॉबर्ट ॲलन असे म्हणतात की शाश्वत विकास असा विकास असतो की मानवी गरजांची चिरकाळ टिकणारे साधन आणि मानवी जिवनाच्या दर्जात सुधारणा साध्य करणारा असतो. थोडक्यात सांगायचे झाल्यास शाश्वत विकासाच्या संकल्पनेत उत्पादनात किती वाढ झाली याचा हिशोब करतांना पर्यावरणाचा अवनतीचा खर्च वजा केल्यानंतर जो शुध्द विकास होतो त्याला शाश्वत विकास म्हणतात.

**शाश्वत विकासाच्या संकल्पनेचा उदय :**

१९८७ साली संयुक्त शब्द संघटनेने पर्यावरण आणि विकास आयोगाची स्थापना केली हा आयोग पृथ्वीवरील सामाजीक पर्यावरणीय संमस्यांचे निरीक्षण करुन त्यावर वास्तववादी उपाय योजण्यासाठी संसाधने पुढील पिढयांसाठी राखून त्यांच्या उपयोग चालू पिढयांसाठी शाश्वत रित्या कसा करता येईल यावर उपाययोजना शोधण्यासाठी नेमण्यात आला होता. आणि आयोगाचे अध्यक्ष नार्वे या देशाचे पंतप्रधान होते.

**शाश्वत विकासाची आवश्यकता :**

विकास हा मानवाचा नैसर्गिक हक्क आहे. या हक्काचा उपभोग घेतांना नैसर्गिक साधन सामग्रीचा अमर्यादीत वापर केला जातो. त्याचा अनिष्ट परिणाम वर्तमान पिढी बरोबर भविष्यातील पिढी वरही होत असतो, म्हणून विकासाच्या हक्का बरोबरच नैसर्गिक कर्तव्ये व जबाबदारीची जाणीव होणे गरजेचे असते, ही जाणीव करुन देण्यासाठी शाश्वत विकासाची नितांत आवश्यकता आहे. भारताच्या संबधात विचार केल्यास दारिद्रय निर्मूलन करण्यासाठी पर्यावरणीय प्रदुषण कमी करण्यासाठी आरोग्याचा दर्जा सुधारण्यासाठी, निसर्गा बरोबर जिवन जगण्यासाठी आणि महात्मा गांधीच्या विचारातील स्वराज्याचे सुराज्यात रुपांतर करण्यासाठी शाश्वत विकासाची संकल्पना विकसीत होणे खुप गरजेचे आहे.

**शाश्वत विकासाची सध्यस्थिती :**

पर्यावरणाचे संरक्षण आणि शाश्वत विकास एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. म्हणून आंतरराष्ट्रीय पातळी पासून स्थानिक पातळी पर्यंत दोन्ही संकल्पना एकत्रीत विचार केला जातो. भारता मध्ये १९७२ साली पर्यावरण नियोजन व समन्वय राष्ट्रीय परिषद तसेच एकत्रीत या प्रभावीपणे अंमलबजावणी होण्यासाठी १९८५ मध्ये भारत सरकारने स्वतंत्र पणे पर्यावरण व वने मंत्रालय सुरु केले. या अनुषंगाने प्रत्येक घटक राज्याचे पर्यावरण प्रदुषण नियंत्रण विभाग स्थपन करण्यात आले शासकीय प्रयत्नां बरोबरच अशासकीय संघटनांनी सुध्दा अनेक प्रयत्न केले.चिपको आंदोलन हे भारतीय इतीहासातील महत्व पूर्ण घटना आहे. सुंदरलाल बहुगूना यांच्या नेतृत्वात वृक्षतोडी विरोधात केलेले फार मोठे आंदोलन होते, राळेगणसिध्दी मध्ये श्री.अण्णा हजारे यांनी ग्रामस्थांच्या सामुदायीक सहभागातून पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम हाती घेतला, जलसंधारण जमीनाचा वापर करुन त्यांनी सिचंन क्षेत्रात वाढ करुन संपूर्ण गावांचा कायापालट केला.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

सामुदायीक प्रयत्ना मधून शाश्वत विकास व पर्यावरणाचे संरक्षण कसे करता येईल याचे उत्तम उदाहरण आहे. राजस्थान मधील अलवार जिल्यातील भाऊता कोलल्या नावाचे खेडे आहे, तेथे राजेंद्र सिंग यांनी २५ विहीरी तलाव, बंधारे आदीची निर्मीती करुन वाळवंटात नंदनवन फुलवले आहे.

वरील उदाहरणा वरुन आपल्याला असे दिसून येते की, भरतातील शाश्वत विकासाठी अनेक स्तरावररुन प्रयत्न केले गेलेत. परंतू त्यासाठी राजकीय व प्रशासकीय इच्छा शक्तीची जाणीव जागृतीची व सामुदायीक निर्मीतीची गरज होती, आज सर्व समाज घटकांनी विचार करण्याची गरज आहे.

**शाश्वत विकासा पुढील आव्हाणे :**

आजच्या काळात सर्व देशांच्या व सर्व मानव जीचा सर्वांगीन विकास होणे आवश्यक आहे त्यासाठी काही संस्था, संघटना शाश्वत कवास व पर्यावरण संरक्षणासाठी कार्यरत आहेत.वाढती लोकसंख्या, दारीद्रय निर्मुलनाचे आव्हान, जल प्रदुषन, दुषीत पाणी यामुळे अनेक समस्या निर्माण होतात. मुंबई महानगरात पुरजन्य परिस्थिती निर्माण होते. दुषीत पाण्याचा परिणाम गरीब लोकांना होतो कारण श्रीमंत लोक शुध्द पाण्याची साधने वापरतात. पाण्याचे शुध्दीकरण हे फार मोठे आव्हाण आहे. वनक्षेत्रे कमी झालीत त्यामुळे पावसाचा अनयमीतपणा वाढला आहे. कृत्रीम इच्छा शक्तीला पायंबध घालणे हे फार मोठे आव्हाण आहे. कृत्रीम साधनांचा वापर वाढल्यामुळे त्यांनी योग्य विल्हेवाट लागत नसल्यामुळे प्रदुषण वाढत आहे. त्यावर प्रतिबंध लावण्याचे फार मोठे आव्हाण आहे. शाश्वत विकासाची तत्व अंगीकरणने भारता सारख्या विकसनशिल देशाला अत्यावश्यक आहे. भारताची परंपरा कृषि प्रधान अर्थव्यवस्था विकसीत देशा प्रमाणे जलद आर्थीक विकसाचा मार्ग स्विकारु लागली आहे. त्यातून होणारा संसाधनाचा ऱ्हास आणि देशातील नैसर्गिक परिसंस्थाचा ऱ्हास कारणीभूत ठरु शकतो. त्यामुळे पर्यावरणाचे संरक्षण करुन आर्थिक विकास साधण्यासाठी अशाश्वत विकासा कडून शाश्वत विकास करणे खूप गरजेचे आहे.

भारता मध्ये शाश्वत विकासाच्या संदर्भात अनेक दृष्टीकोनातून प्रयत्न केले जातात. परंतू सामुदायीक भुमिकेतून प्रयत्न अपुरे पडतांना दिसतात. त्यासाठी मानवी दृष्टीकोन कल्याणकारी विचार, कौशल्य आणि प्रशिक्षण यामध्ये परिवर्तन अपेक्षीत आहे.

**उपाययोजना :**

पर्यावरणाचे प्रदुषण रोखण्यासाठी प्रयत्न करणे अत्यावश्यक आहे.

1. वृक्षलागवड प्रत्येक व्यक्ती करीता अनिवार्य करावी.
2. कचऱ्याची योग्य प्रकारे विल्हवाट लावावी.
3. नैसर्गिक साधन संपत्तीचा वापर काटकसरीने करावा.
4. मानव समुदायाला निसर्गा कडे आकर्षीत करणे.
5. शाश्वत विकास आणि पर्यावरणाच्या संरक्षणासाठी सामुदायीक भुमीकेतून कार्य करणे.

**संदर्भ ग्रंथ सुची :**

१. झामरे, जी.एन. – भारतातील अर्थ शास्त्र, विकास व पर्यावरण, पिंपळापूरे पब्लीशर्स नागपूर.
२. जोशी मो.वा.- पर्यावरण विरुध्द प्रदुषण, प्रबोधन पकाशन इचलकरंजी.
३. देशपांडे श्री. आणि विनायक – भारतीय अर्थ व्यवस्था हिमालय पब्लीकेशन हाऊस मुंबई.
४.पवार की – पर्यावरण विज्ञान, प्रगती बुक्स प्रा.ली.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

Original Article

१)पाण्याचे स्त्रोत बळकट करणे आणि भूजल पुनर्भरण वाढविणे यासाठी दीर्घकालीन उपाय करणे,

२)पिण्याच्या पाण्याच्या समस्येचे मूळ कारण लोकसंख्या वाढ आहे आणि म्हणूनच लोकसंख्या वाढीवर नियंत्रण ठेवले पाहिजे.

३)भूजल आणि पृष्ठभागावरील पाणी हे सामायिक मालमत्ता असलेले स्त्रोत असल्याने त्यांचा वापर कार्यक्षमपणे आणि काटकसरीने केला पाहिजे.

४)पाण्याची एकूण उपलब्धता आणि पाण्याचा वेगवेगळया कारणासाठी होणारा वापर लक्षात घेऊन घरगुती पाणीपुरवठ्यासाठी जिल्हानिहाय आणि तालुकानिहाय योजना आखल्या पाहिजेत. सिंचनासाठीचे नियोजन शिल्लक पाण्याच्या म्हणजे पिण्याच्या पाण्याच्या मागण्या पूर्ण केल्यानंतरच शिल्लक पाण्याच्या आधारे करावे.

**महाराष्ट्र जन व सिंचन आयोग १९९९**

**दुष्काळ निवारणाशी संबंधित शिफारशी पुढे दिल्या आहेत.**

गाव तलाव / गाव तळी यांच्या वैज्ञानिक व्यवस्थापनाची हमी ग्रामपंचायतीने दिल्याशिवाय त्यांचे बांधकाम हाती घेऊ नये.

**राष्ट्रीय जलनीती २०१२**

१)दुष्काळप्रवण क्षेत्रांना दुष्काळाशी संबंधित समस्यांची झळ कमी लागावी यासाठी मातीतील आर्द्रता संधारणाचे उपाय, पाणी प्राप्तीची प्रथा, वाष्पीभवन व्यय कमीत कमी करणे, पुनर्भरण आणि अतिरिक्त पाण्याच्या भागातून पाण्यांचे स्थलांतरण यातून भूजल क्षमतेचा विकास यांचा अवलंब करावा

२)दुष्काळाचा फटका बसलेल्या लोकसंख्येला रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी हाती घेतलेले मदत कार्य हे प्राधान्याने दुष्काळी स्थिती प्रतिबंध करण्यासाठी असावे.

३)वेगवेगळी कृषीशास्त्रीय रणनीती प्रत्यक्षात येण्यासाठी जमीन, माती, ऊर्जा, पाणी व्यवस्थापन यासह स्थानिक संशोधन आणि वैज्ञानिक संस्थांकडून मिळणाऱ्या शास्त्रीय गोष्टीचा वापर करावा. दुष्काळाचे व्यवस्थापनासाठी माती आणि पाणी उत्पादकता सुधारावी.

४)जीवनमानाला हातभार आणि गरिबी निवारण यासाठी एकात्मिक शेती प्रणाली आणि अकृषी विकास उद्योग सेवा क्षेत्रे यांचा विचार करायला हवा.

**राज्य जलनीती २००३**

१)दुष्काळ प्रवण क्षेत्रात रोजगार निर्मिती करण्यासाठी कमी पाणी लागणारी कुरणे, वनीकरण आणि इतर विकासाचे मार्ग, उद्योग आणि सेवा क्षेत्रे यांना प्रोत्साहन द्यावे.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

२)आर्थिक व्यवहार्यतेच्या अधीन राहून दुष्काळ प्रवण क्षेत्रातील धरणांची अवलंबित्वाची टक्केवारी कमी करावी.

३)पाणीटंचाईच्या क्षेत्रात आधुनिक सिंचन प्रणालींना प्रोत्साहन द्यावे.

४)प्रकल्पांचे नियोजन आणि नियमन करताना आठमाही सिंचन प्रणालीचा अवलंब करावा.

५)पाण्याचे तोटे असलेल्या काळात पाणी वापर क्षेत्रात आणि प्रकल्पाच्या प्रतिमाही व अनुवाही क्षेत्रात समन्यायी पद्धतीने पाणी वितरित झाले पाहिजे.

६)पाणी स्रोतांचा विकास करण्याच्या कामाला सर्वाधिक प्राधान्य द्यावे.

७)ज्या भागातील भूजल पातळी लक्षणीयरीत्या खाली गेली असेल आणि जो भाग अतिउपसा झालेले क्षेत्र असे घोषित झाले असेल अशा क्षेत्रात जलसंधारणाची कामे सर्वाधिक प्राधान्याने हाती घ्यावेत.

८)दुष्काळप्रवण क्षेत्रात एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमांना प्रोत्साहन दिले पाहिजे.

९)विविध समित्या आणि आयोगाने दिलेल्या सूचना आणि शिफारशी पाहता हे स्पष्ट लक्षात येते की वारंवार पडणाऱ्या दुष्काळाशी सामना करताना जे मुद्दे समोर येतात त्यांचा विविध पातळ्यांवर यापूर्वीच विचार झाला आहे आणि त्या विचारातून काही शिफारशीत्मक मार्गदर्शक सूचना पुढे आल्या आहेत. इतकेच नव्हे तर जी विद्यमान व्यवस्था बदलणे अपेक्षित आहे त्या व्यवस्थेसाठी शिफारशींपाठोपाठ कृती कार्यक्रम राबविण्याची गरज असल्याने अनेक शिफारशी विस्मरणात जाऊन हद्दपार झाल्या आहेत. नवीन समजाच्या दृष्टिकोनातून अशा सर्व गरजांचा विचार करता एक नियंत्रण प्रणाली स्थापित करणे आवश्यक आहे. याचा विचार संस्थात्मक व्यवस्था संबंधित प्रकरणात तपशीलाने मांडला आहे.

**दुष्काळ निवारणाचे उपाय**

दुष्काळ निवारणा करिता अल्पकालीन आणि दीर्घकालीन उपायांचा अवलंब करावा लागेल, अल्पकालीन उपाय दुष्काळ पडल्यावर त्यामुळे होणारी हानी कमी होण्याच्या दिशेने उपयुक्त असतात आणि त्यांच्यामुळे दुष्काळाच्या परिणामांचे निवारण होते. आगाऊ स्वरूपात तयार केलेल्या आराखडयात राज्य आणीबाणी स्थितीला तोंड देण्यासाठीच्या उपाययोजनांमध्ये अल्पकालीन उपायांचा समावेश केला जातो. जेव्हा संनियंत्रण प्रणाली दुष्काळसदृश्य स्थिती सूचित करेल तेव्हा अशा आराखडयाची अंमलबजावणी केली जाते. या पाठोपाठ दुष्काळ निवारण्यासाठी प्रशासकीय आणि वित्तीय उपाय करणे आवश्यक असते.

दुष्काळाचा फटका बसलेल्या गावात लोक तसेच जनावरे असतात, त्या दोन्ही घटकांचे अस्तित्व टिकविण्यासाठी त्यांच्या गरजा पुरविणे आवश्यक आहे. त्यांना पुढील गोष्टी उपलब्ध करण्याची जबाबदारी सरकारवर आहे.

१.स्त्रिया व पुरुषांना रोजगार हमी योजनेतून काम आणि त्या कामाच्या पैशांचे तत्पर प्रदान.

२.स्वस्त धान्य दुकानांमधून शिधापत्रिकेवर प्रत्येक व्यक्तीला अन आणि पाणी देखील शिधापत्रिकेवर उपलब्ध करणे

३.जनावरांच्या अस्तित्वासाठी त्यांना प्राधान्याने चारा उपलब्ध करून देणे, ठिकठिकाणी त्यासाठी चारा छावण्या गरजेनुसार विकेंद्रित पद्धतीने उघडाव्यात.

४.पाणीटंचाईमुळे दुष्काळ पडतो. किमान आवश्यक गरज भागेल इतपत पिण्याचे पाणी माणसे आणि जनावरे यांच्या साठी उपलब्ध करून दिले पाहिजे.

५.जर रोजगार हमी योजनेतील काम हे मजुरांच्या घरापासून लांब असेल तर तात्पुरत्या निवाऱ्याची व्यवस्था उपलब्ध करणे.

६.दुष्काळादरम्यान साथरोग उफाळून येण्याची शक्यता असते, अशा वेळी आवश्यक वैद्यकीय सुविधांची गरज भागवणे.

७.परिस्थितीनुसार महसूल आणि कर्जाची वसुली यासाठी स्थगिती / माफी हे उपाय आवश्यक आहेत.

८.कोणत्याही प्रकारे पाणी वाया घालवणे टाळले पाहिजे. जर असे आढळले तर त्यावर दंडात्मक कारवाई करणे आवश्यक आहे.

**दुष्काळ निवारणाच्या दीर्घकालीन कायमस्वरुपी उपाय योजना**

दुष्काळ निवारण्यासाठी पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम हा अतिशय यशस्वी उपाय ठरला आहे म्हणून कृष्णा खोऱ्यातील दुष्काळप्रवण पाणलोट क्षेत्रांमध्ये त्याची अंमलबजावणी प्राधान्याने केली पाहिजे. दुष्काळप्रवण क्षेत्रात स्थानिक पातळीवर पाणी साठविणे आणि ते जमिनीत जिरविणे व पाणी अडवा पाणी जिरवा याला फार महत्त्व आहे. एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रम अंतर्गत मृदसंधारण व जलसंधारण, वनीकरण आणि भूजल विकास कामे प्राधान्याने केली पाहिजेत. पाणलोट क्षेत्र विकास कामे पूर्ण झाल्यावर मातीतील आर्द्रता टिकून राहण्याचा कालावधी वाढतो, त्यामुळे पीक उत्पादन व पिकांची सुरक्षितता वाढते. दुष्काळाच्या तीव्रतेचे निवारण करण्यास त्यामुळे मदत होते. पाणलोट क्षेत्र विकास आणि व्यवस्थापनाचा लोकांच्या सहभागामधून पार पडलेला कार्यक्रम म्हणजे

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

राज्यातील काही यशस्वी कार्यक्रमांची उदाहरणे आहेत. अहमदनगर जिल्ह्यातील हिवरेबाजार आणि राळेगण सिद्धी, जालना जिल्ह्यातील कडवंची आणि शिवनी, नागपूर जिल्ह्यातील याग, वालानी आणि सांगली जिल्ह्यातील आटपाडी, ता. (आटपाडी) यांनी पश्चिम महाराष्ट्रात जलसंधारणाच्या कामात उत्कृष्ट कामगिरी केली आहे. इतर अनेकांपैकी या यशोगाथा सांगणे यथार्थ आहे.

पाणलोट विकास कार्यक्रमाचा प्रभाव जमीन वापरातील बदल, भूजलात वाढ, पीक पद्धतीत बदल, पीकांची घनता, उत्पादकता, जमिनीची सुपीकता, सामाजिक आर्थिक स्थिती इत्यादी संदर्भातर्गत मूर्त व अमूर्त असे दोन्ही लाभ मिळतात या कामांच्या अंमलबजावणीनंतर लगेच सकारात्मक परीणाम सुरु करतो. वरील चांगला पायंडा पाडणाऱ्या गावांनी पाणलोट क्षेत्र विकासाच्या प्रक्रियेत पाण्याचा वापर करताना स्वतःवर निर्बंध घालून ते पाळले. उदा. आणखी विहिरींवर निर्बंध, पाण्याचा हिशोब ठेवणे. दुष्काळ प्रवण क्षेत्रातील पाणलोट क्षेत्र विकास उपक्रमांच्या पूर्तता स्थितीबाबत कृषी विभागाने दिलेली माहिती (ऊर्ध्व कृष्णा २५.१७%, मध्य कृष्णा ४३%, घटप्रभा २२.८७ %, ऊर्ध्व भीमा ६१.१२%, निम्न भीमा ५३.९८ %) पाहता पूर्ततेची स्थिती खूपच कमी पातळीत असून भक्कम करायला हवी.

उर्ध्व कृष्णा खोऱ्यात कालवा प्रणालीचा लाभ देऊन फायदा झालेल्या भागांच्या अनेक यशोगाथा आहेत, कारण या भागातील पाणीटंचाईच्या काळातही सह्याद्री पर्वत रांगांमधील ३००० मि मी पावसामुळे गोळा झालेले पाणी कालव्यांमधून मिळते. कृष्णा नदी आणि सह्याद्रीच्या पूर्वेकडील पायथ्याच्या भागात अमलेनी कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांची मालिका यातील बंधाऱ्यातील पाण्याचे दुष्काळी कालावधीत संपूर्ण पुनर्भरण होत नाही, पण या बंधाऱ्यातील साठलेल्या पाण्यामुळे माणसे व जनावरे यांना पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवत नाही. तसेच जनावरांसाठी चारा पिकवता येतो. साधारण परिस्थितीत कमी कालावधीचे हंगामी पिकेही यातील पाण्यावर घेता येतात, डाळिंब द्राक्षे यांची उभी पिके आधुनिक सिंचन व्यवस्थेचा सहाय्याने पाण्याची अल्पमात्रा देऊन जगवता येतात उत्पादन बऱ्यापैकी घटते पण बहुहंगामी फळ पिके कायमच्या नुकसानीपासून वाचवता येतात. अशा भागांमधील कालवा सिंचन हे त्या भागांसाठी वरदानच ठरले आहे कारण विविध प्रकारच्या लहरी दुष्काळाला तोंड देण्यासाठी कालव्याद्वारे संरक्षक सिंचन करता येते. कालवा प्रणालीने पाणी मिळणाऱ्या उपखोऱ्यांमध्ये मजुरांची टंचाई आहे त्यामुळे कालवे नसलेल्या भागांमधून ऊसतोडणी मजूर तेथे आणले जातात. जर कालवा सिंचनाचा लाभ मिळत नसता तर या खोऱ्यामधील गावांची स्थिती इतर गावांइतकीच वाईट राहिली असती.

च्या पायथ्याकडील टेकडयांपासून दूर असलेल्या सपाट भागातील उजनी धरणातील जलाशया सारख्या जलाशयातून सुरू होणाऱ्या कालव्यांमधून होणाऱ्या सिंचनाची बाब वर उल्लेखलेल्या कालवा सिंचनापेक्षा वेगळी आहे. या भागातील नदी उपखोऱ्यांमध्ये नद्यांचे उगम कमी पावसाच्या क्षेत्रात (६०० ते ७०० मिमी वार्षिक) आहेत त्यामुळे अनेक वेळा दुष्काळाच्या कालावधीत जलाशयाचे पुनर्भरण शून्य असते.२००१०२,२०१३आणि त्यापूर्वी अनेकदा दुष्काळी वर्षांमध्ये असा अनुभव आला आहे.

**समारोप:-** अशा प्रकारे आपणास महाराष्ट्रातील दुष्काळ व तो निवारण्याच्या व्यवस्थापनाचा आढावा घेण्यात आला आहे

**संदर्भसूची**:-

1) महाराष्ट्रातील कृष्णा खोऱ्यासाठी एकात्मिक राज्य जल आराखडा, (२०१७) महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ पुणे खंड ०२ एकात्मिक योजना महाराष्ट्र शासन जलसंपदा विभाग पान नं.१८६ ते १९९
2) Government of India, Ministryof Jal Shakti, Department of water Resources, River Development and Ganga Rejuvenation. (2025 Feb 10) Unstarred Question No. 678-Special Package for Vidarbha and Marathwada, Rajya sabha.
3) Shah S, Harris, L.M.Jonson,M.S.(2021), 'A Drought-Free Maharashtra? Politicising water conservation for …water Alternationtives,14(2)
4) Agrown 'Agro Special', (2025-june 23) नव्वद गावात दुष्काळ निवारण प्रकल्प राबविणार सकाळ (Agrowon)

**Journal of Research and Development**
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

Original Article

# आयुर्वेदिक वैद्यकीय महाविद्यालयीन ग्रंथालयात आयसीटी (ICT) आधारित सेवा

**राहुल तुकाराम थोरात**
(संशोधक/ रिसर्च स्कॉलर)
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपति संभाजी नगर.
**Email-** r.t.thorat1985@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-170813
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 8 (II)
Pp. 60-65
August 2025
**Submitted:** 12 July. 2025
**Revised:** 25 July. 2025
**Accepted:** 10 Aug 2025
**Published:** 30 Aug. 2025

***सारांश***

*या पेपरमध्ये आयुर्वेदिक वैद्यकीय महाविद्यालयाच्या ग्रंथालयांमध्ये आयसीटी-आधारित ग्रंथालय आणि माहिती सेवांवर चर्चा केली आहे. सध्याचा अभ्यास आयसीटीबद्दल शिकण्याची प्राथमिक पद्धत, आयसीटी-सक्षम ग्रंथालय सेवा वापरण्याचा उद्देश, वापरकर्ते आयसीटी-आधारित ग्रंथालय सेवा आणि सुविधा किती प्रमाणात वापरतात, इंटरनेट वापराचे विविध पैलू आणि आवडते शोध इंजिन यावर तपशीलवार वर्णन करतो. पेपरमध्ये ऑनलाइन डेटाबेस सेवा आणि ग्रंथालय पायाभूत सुविधांवर देखील प्रकाश टाकण्यात आला आहे. आधुनिक काळात आणि मूल्यांमध्ये वापरकर्त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी वैद्यकीय महाविद्यालयाच्या ग्रंथालय सेवांमध्ये माहिती संप्रेषण तंत्रज्ञान (आयसीटी) वापरले जात आहे. वैद्यकीय महाविद्यालयीन ग्रंथालये वैद्यकीय शिक्षण आणि आरोग्य सेवा माहितीच्या प्रचारात तसेच अप्रत्यक्षपणे विविध आरोग्य कल्याण कार्यक्रमांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात.*

***मुख्य शब्द;-****आयुर्वेदिक वैद्यकीय महाविद्यालयीन ग्रंथालय,माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान (ICT), संगणकीकरण, ग्रंथालय ऑटोमेशन,नेटवर्किंग,ग्रंथालय संघ (कंसोर्टिया)*

**संज्ञा-** आयुर्वेदिक वैद्यकीय महाविद्यालयीन ग्रंथालय, माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान (ICT); संगणकीकरण; ग्रंथालय ऑटोमेशन; नेटवर्किंग; ग्रंथालय संघ (कंसोर्टिया).

## १. प्रस्तावना

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक अंतर्गत सांख्यिकीय माहिती २०२४-२५ नुसार एकूण १२१ आयुर्वेदिक महाविद्यालये संलग्न आहेत, माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञानाच्या परिचयामुळे जगभरातील आरोग्य क्षेत्रात ग्रंथालय आणि माहिती सेवांच्या तरतूदीमध्ये अनेक संधी आणि आव्हाने निर्माण झाली आहेत आणि वैद्यकीय ग्रंथालये बदलत असताना ज्ञान-आधारित संसाधनांच्या जलद वितरणाचा परिणाम चिकित्सक, संशोधक आणि आरोग्य विषयाशी निगडीत विद्यार्थ्यांच्या कामावर आणि शिक्षणावर होत आहे. आरोग्य सेवांच्या विकास आणि प्रशासनासाठी अचूक आणि संबंधित वैद्यकीय माहिती वेळेवर उपलब्ध असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. वेब-ॲक्सेसिबल डेटाबेस आणि संसाधनांसह, वापरकर्ते सहजपणे ऑनलाइन पूर्ण-मजकूर जर्नल्स, पुस्तके आणि इतर स्रोत शोधू शकतात आणि गरजेच्या वेळी माहिती त्वरित उपलब्ध होते. प्रत्येक सेकंदाला, माहिती तंत्रज्ञानाच्या विविध अनुप्रयोगांद्वारे विविध माध्यमांमध्ये माहिती प्रकाशित केली जाते. इतिहासात, अनेक तांत्रिक प्रगतींचा समाजावर महत्त्वपूर्ण परिणाम झाला आहे. या प्रगतींनी पूर्वी अज्ञात क्षमता प्रदान केल्या आहेत किंवा एखाद्या क्रियाकलापाची कार्यक्षमता लक्षणीयरीत्या सुधारली आहे.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI:10.5281/zenodo.17231936
OPEN ACCESS

**Address for correspondence:**
*राहुल तुकाराम थोरात (संशोधक/ रिसर्च स्कॉलर),डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपति संभाजी नगर*

**How to cite this article:**
*थोरात, . राहुल . तुकाराम . (2025). आयुर्वेदिक वैद्यकीय महाविद्यालयीन ग्रंथालयात आयसीटी (ICT) आधारित सेवा. Journal of Research & Development, 17(8(II)), 60–65. https://doi.org/10.5281/zenodo.17231936*

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

उदाहरणार्थ, छपाई/लेखन तंत्रज्ञानाच्या शोधामुळे ज्ञानाचे अचूक रेकॉर्डिंग शक्य झाले. पारंपारिक ग्रंथालय क्रियाकलाप जसे की अधिग्रहण, कॅटलॉगिंग, प्रसार, सिरीयल नियंत्रण, ऑनलाइन सार्वजनिक प्रवेश कॅटलॉग (OPAC) इत्यादींच्या यांत्रिकीकरणाच्या घटनेला उदयोन्मुख माहिती संप्रेषण तंत्रज्ञान असे संबोधले जाते.

तांत्रिक प्रक्रिया, ज्ञान किंवा माहिती मिळवणे, संग्रहित करणे, पुनर्प्राप्त करणे आणि प्रसारित करणे या संदर्भात, माहिती संप्रेषण तंत्रज्ञान ग्रंथालयांच्या विकास आणि आधुनिकीकरणासाठी विस्तृत साधने आणि सेवा प्रदान करते.

**२. माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञानाचे आगमन**

गेल्या काही वर्षांत जागतिकीकरण आणि तांत्रिक परिवर्तन प्रक्रियेच्या गतीमुळे "तंत्रज्ञानाने सहहाय्याने, माहितीने प्रेरित आणि ज्ञानाने चालणारी" एक नवीन जागतिक अर्थव्यवस्था निर्माण झाली आहे. माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञानाने (ICT) मानवी समाजाचा प्रत्येक पैलू बदलला आहे. व्यापक संगणकीकरण, इंटरनेटचा विकास आणि वर्ल्ड वाइड वेबच्या प्रसारामुळे जग एक लहान, परस्पर जोडलेले गाव बनले आहे. या जागतिक गावात, जगभरातील लोक एकमेकांशी शेजारी असल्यासारखे संवाद साधू शकतात. लोक व्हॉइस-ओव्हर आयपी, इन्स्टंट मेसेजिंग, चॅटिंग आणि व्हिडिओ कॉन्फरन्सिंगसह विविध संप्रेषण तंत्रज्ञानाचा वापर करतात. जगभरातील वापरकर्ते फेसबुक, ब्लॉग आणि ट्विटर सारख्या सोशल नेटवर्किंग साइट्सचा वापर करून संपर्कात राहू शकतात. आजच्या ग्रंथालयांमध्ये नेटवर्क डेटा आहे जो इंटरनेट-आधारित सेवांच्या विस्तृत समुद्राशी जोडलेला आहे जेणेकरून शिक्षक आणि विद्यार्थ्यांसह शैक्षणिक समुदायाला आवश्यक माहिती स्रोतांपर्यंत प्रवेश मिळेल. ग्रंथालयाचे इलेक्ट्रॉनिक संसाधने (ई-संसाधने) ग्राहकांसाठी आवश्यक माहिती जलद आणि सोपी उपलब्ध करून देण्यासाठी महत्त्वपूर्ण आहेत. प्रिंट मीडियाचे महत्त्व आणि वापर हळूहळू इंटरनेट, सीडी-रॉम डेटाबेस, ऑनलाइन जर्नल्स, ऑनलाइन पुस्तके आणि (OPAC) द्वारे बदलला जात आहे. शैक्षणिक कामगिरी आणि संशोधनाला चालना देण्यासाठी, ई-संसाधनांच्या वापर आणि संशोधनाबद्दल ज्ञान असणे आवश्यक आहे. या महत्त्वाच्या पैलूमुळे अनेक ग्रंथालये डिजिटल ई-संसाधनांकडे वळत आहेत. विविध इलेक्ट्रॉनिक आणि डिजिटल माध्यमे, संगणक-सहाय्यित इलेक्ट्रॉनिक उपकरणे, नेटवर्क आणि इंटरनेटने माहिती पुनर्प्राप्ती आणि प्रसारात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे आणि ग्रंथालयांच्या आधुनिकीकरणात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

**३. ग्रंथालय सेवांवर आयसीटीचा प्रभाव**

ग्रंथालयाचे कामकाज चांगले चालण्यासाठी, विविध इलेक्ट्रॉनिक उपकरणे आणि संप्रेषण तंत्रज्ञानाचा वापर करणे आवश्यक आहे. माहिती संसाधने आणि पायाभूत सुविधांचे एकत्रीकरण आणि देवाणघेवाण हे ग्रंथालयाच्या मुख्य उद्दिष्टांपैकी एक आहे. ऑटोमेशन आणि संगणकीकरणाद्वारे कमतरता दूर करण्यासाठी, ग्रंथालयांद्वारे दिल्या जाणाऱ्या सेवांचे वर्गीकरण करण्यासाठी खालील विस्तृत श्रेणी वापरल्या जातात.

**३.१ ग्रंथालय ऑटोमेशन:**

ग्रंथालय ऑटोमेशन हा एक प्रमुख आयसीटी लायब्ररी सेवा अनुप्रयोग आहे. प्रत्येक ग्रंथालयाचे आधुनिकीकरण करण्यासाठी मूलभूत आवश्यकता म्हणजे ग्रंथालय ऑटोमेशन. ते सामान्यतः मजकूर विश्लेषण, स्वयंचलित अनुक्रमणिका आणि सारांश आणि माहिती पुनर्प्राप्ती यासारख्या समान विषयांपासून वेगळे केले जाते. ग्रंथालय सेवा अद्यायान्वित करण्यासाठी आधुनिक हार्डवेअर आणि सॉफ्टवेअरची आवश्यकता आहे. माहिती गोळा करण्यासाठी, प्रक्रिया करण्यासाठी, संग्रहित करण्यासाठी आणि पुनर्प्राप्त करण्यासाठी तसेच ग्रंथालयाशी संबंधित इतर कर्तव्ये पार पाडण्यासाठी ऑटोमेशनचा वापर करणे ग्रंथालय संगणकीकरण म्हणून ओळखले जाते. "ग्रंथालय संगणकीकरण" हा शब्द व्यवस्थापन, संपादन, कॅटलॉगिंग, प्रसार, सिरीयल नियंत्रण, OPAC इत्यादींसह नियमित ग्रंथालय कार्यांसाठी संगणक तंत्रज्ञानाचा वापर दर्शवितो. स्वयंचलित करताना विचारात घेतले पाहिजे अशा सर्वात महत्त्वाच्या घटकांपैकी एक म्हणजे ग्रंथालय सॉफ्टवेअर.

**(3) महत्त्वाचे सॉफ्टवेअर आणि उत्पादकांची नावे:**

| क्रमांक | (आज्ञावली) सॉफ्टवेअर नाव | निर्माता | ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | Archives | MIFIFAX Electronics Ltd | मुंबई |
| २ | Cds/isis | UNESCO | पॅरिस |
| ३ | Delsis | Libsys Corporation | नवी दिल्ली |
| ४ | Easylib | Easylib Pvt Ltd | बेंगळुरू |

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | Granthalaya | NISCAIR | नवी दिल्ली |
| ६ | Libman | Datapro Consultancy Service | पुणे |
| ७ | Libris | Frontier I.T. Pvt. Ltd. | हैद्राबाद |
| ८ | Libsuite | Softaid Computer Pvt. Ltd. | पुणे |
| ९ | Libsys | Libsys Corporation | नवी दिल्ली |
| १० | Maitrayee | CMC Ltd. | कलकत्ता |
| ११ | Newgenlib | Kesavan Institute of Information and Knowledge Mgmt. | हैद्राबाद |
| १२ | Minsis | International Development Research Centre | कॅनडा |
| १३ | Oasis | DOS Softlink Pvt. | ऑस्ट्रेलिया |
| १४ | Sanjay | DESIDOC | दिल्ली |
| १५ | Slm | ALGORITHM Co. | पुणे |
| १६ | Soul | INFLIBNET | अहमदाबाद |
| १७ | Tulip | Tata Unisys | नोएडा |
| १८ | Wlisys | WIPRO India | बेंगळुरू |

(**आकृती १**: लायब्ररी ऑटोमेशन उत्पादकांसह महत्त्वाचे सॉफ्टवेअर नावे)

**३.२ बार-कोडिंग तंत्रज्ञान**

लायब्ररी ऑपरेशन्स, विशेषतः देवाण घेवाण, स्वयंचलित करण्याचा एक प्रमुख घटक म्हणजे बारकोड तंत्रज्ञान. त्याचा वापर क्रियाकलापांची कार्यक्षमता आणि अचूकता वाढवतो. बारकोड तंत्रज्ञानाच्या मदतीने, इलेक्ट्रॉनिक वाचन साहित्य वाचकांद्वारे वाचण्यासाठी मजकूर डेटा सहज पद्धतीने एन्कोड केला जाऊ शकतो. कार्यक्षमतेने आणि अचूकपणे डेटा गोळा करण्यासाठी बारकोडिंग ही आणखी एक पद्धत आहे.

**३.३ आरएफआयडी तंत्रज्ञान**

वैद्यकीय ग्रंथालयांमध्ये आयसीटी वापराचा आणखी एक प्रकार म्हणजे आरएफआयडी तंत्रज्ञानाचा वापर. सामग्रीची चोरी थांबवण्यासाठी ग्रंथालयांमध्ये वापरला जाणारा आरएफआयडी (रेडिओ फ्रिक्वेन्सी आयडेंटिफिकेशन) सर्वात अलीकडील तंत्रज्ञान आहे. आरएफआयडी-आधारित प्रणाली सुरक्षिततेच्या पलीकडे प्रगती करून ट्रॅकिंग सिस्टम बनल्या आहेत ज्या सुरक्षिततेला संपूर्ण ग्रंथालयातील सामग्रीच्या अधिक प्रभावी ट्रॅकिंगसह एकत्रित करतात, आरएफआयडीमध्ये रेडिओ फ्रिक्वेन्सी आयडेंटिफिकेशन (आरएफआयडी) आणि मायक्रोचिप तंत्रज्ञान एकत्रित केले आहे. रेडिओ फ्रिक्वेन्सी तंत्रज्ञानाचा वापर लायब्ररी संसाधनांशी जोडलेल्या टॅग्जमध्ये मायक्रोचिपवर संग्रहित डेटा वाचण्यासाठी केला जातो, इमारतीच्या प्रवेशद्वारांवरील दोन समांतर एक्झिट सेन्सरपैकी प्रत्येक दोन फूट अंतरावरून टॅग वाचू शकतो. बारकोड आणि ईएम किंवा आरएफ चोरी शोध लक्ष्याने बदलले जाऊ शकतात. वैद्यकीय ग्रंथालयांच्या अपग्रेडिंगमध्ये RFID चा समावेश असणे आवश्यक आहे.

**३.४ नेटवर्किंग सेवा**

नेटवर्किंगमध्ये संगणक, ॲड-ऑन हार्डवेअर, सॉफ्टवेअर आणि स्विचेसचे शेअरिंग समाविष्ट आहे जे नेटवर्क वापरकर्त्यांना जोडणाऱ्या संप्रेषण चॅनेलद्वारे जोडलेले आहेत. ज्ञान आणि संसाधनांचा संयुक्त वापर आहे. नेटवर्कचे ध्येय म्हणजे नेटवर्क सेवांची आवश्यकता असलेल्या वापरकर्त्यांना माहिती प्रदान करणे. सहकारी कार्यक्रम आणि सेवांच्या केंद्रीकृत विकासासाठी एक विशेष ग्रंथालय सहयोग म्हणजे ग्रंथालय नेटवर्क.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

**लायब्ररी नेटवर्क्सची मुख्य उद्दिष्टे:**

1. अधिग्रहण, सिरीयल नियंत्रण, कॅटलॉगिंग, देवाण घेवाण, वापरकर्त्यांच्या सेवा आणि निधी लेखा यामध्ये स्वयंचलित सुविधा देऊन, वैयक्तिक ग्रंथालयांमध्ये संसाधन वापर आणि वापरकर्ता सेवा पातळी वाढवणे शक्य आहे.
2. आंतर-ग्रंथालय वापरकर्ता सेवा, दस्तऐवज वितरण सेवा, मनुष्यबळ प्रशिक्षण, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय डेटाबेसमध्ये प्रवेश आणि संप्रेषण दुव्याद्वारे संसाधन सामायिकरणाचे प्रभावी आणि विश्वासार्ह माध्यम प्रदान करणे प्रकाशन आणि आंतर-वैयक्तिक संप्रेषण आणि सूक्ष्म-दस्तऐवजांची खरेदी.
3. वैयक्तिक ग्रंथालयांना युनियन कॅटलॉग, CAS आणि SDI सारख्या संयुक्त डेटाबेसमध्ये प्रवेश देऊन संसाधन सामायिकरण सुधारणे.नेटवर्क्स- स्टार नेटवर्क्स, हायरार्किकल नेटवर्क्स, डिस्पर्स्ड नेटवर्क्स आणि LAN (लोकल एरिया नेटवर्क्स) मध्ये विभागले जाऊ शकतात, जे संसाधन सामायिकरण आणि ग्रंथालय देखभालीला समर्थन देतात. दूरच्या वापरकर्त्यांमध्ये इलेक्ट्रॉनिक संप्रेषण सक्षम करणारे वाइड एरिया नेटवर्क (WAN) भारतातील प्रमुख WAN मध्ये DELNET, INDONET, INFLIBNET, MALIBNET, NICNET, T आणि राष्ट्रीय नेटवर्क ऑफ लायब्ररीज ऑफ मेडिसिन (NN/LM), असोसिएशन ऑफ अकादमिक हेल्थ सायन्सेस लायब्ररीज (AAHSL) आणि इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ लायब्ररी असोसिएशन (IFLA) च्या सेक्शन ऑफ हेल्थ अँड बायोसायन्सेस लायब्ररीज यांचा समावेश आहे.

**३.५ इंटरनेटवरील सेवा:**

ग्रंथालयाचे प्रमुख उद्दिष्ट "योग्य व्यक्तीला योग्य वेळी योग्य माहिती देणे" हे आहे. हा उद्देश साध्य करण्यासाठी ग्रंथालयांनी माहिती कुठेही साठवली आहे याची पर्वा न करता ती उपलब्ध करून दिली पाहिजे. TCP/IP प्रोटोकॉलचा वापर जगभरातील संगणकांना इंटरनेटद्वारे जोडण्यासाठी केला जातो, जी नेटवर्कची एक परस्पर जोडलेली प्रणाली आहे. इंटरनेटच्या विकासामुळे जगभरातील लोकांना संगणकांशी कनेक्ट होणे आणि माहिती मिळवणे शक्य झाले आहे. गोफर, ई-मेल, टेलनेट, FTP आणि वर्ल्ड वाइड वेब (WWW) सारख्या वापरकर्ता-अनुकूल साधनांचा वापर माहिती प्रक्रिया आणि प्रवेश करण्यासाठी केला जातो. इंटरनेटद्वारे व्हिज्युअल, डेटाबेस, पेपर्स, सॉफ्टवेअर, संग्रह, चित्रे आणि ऑडिओमध्ये प्रवेश शक्य झाला आहे. इंटरनेट मल्टीमीडिया माहितीच्या देवाणघेवाणीसाठी खुले मानके आणि काही मार्गदर्शक तत्त्वे प्रदान करते. विद्यापीठे, महाविद्यालये, शाळा आणि इतर शैक्षणिक संस्था माहितीच्या देवाणघेवाणीसाठी इंटरनेटद्वारे जोडल्या जातात. WWW इतर सर्व प्रवेश साधनांचे एकत्रीकरण करत आहे आणि जगभरात पसरलेल्या संगणकांमध्ये साठवलेल्या मल्टीमीडिया,हायपरटेक्स्ट-लिंक्ड दस्तऐवजांचे प्रकाशन आणि प्रवेश करण्यासाठी एक अतिशय व्यावहारिक यंत्रणा देत आहे. एकदा सामग्री ऑनलाइन उपलब्ध झाली की, ती जगातील कोठूनही प्रवेश करता येते.

**३.६ कंसोर्टियम-आधारित सेवा:**

ग्रंथालय संघ (कंसोर्टिया) म्हणजे दोन किंवा अधिक माहिती संस्थांचा एक समुदाय (सहकारी) आहे ज्यांनी त्यांच्या सामायिक उद्दिष्टांना पुढे नेण्यासाठी काही कार्ये समन्वयित करण्याचा, सहयोग करण्याचा किंवा एकत्रित करण्याचा औपचारिक निर्णय घेतला आहे. ही सामान्य हितासाठी एकत्र काम करणाऱ्या ग्रंथालयांची संघटना आहे. ग्रंथालयांचा गट संसाधनांचे वाटप सुलभ करण्यासाठी या प्रगत स्तरावरील सेवा प्रदान करतो.

**ग्रंथालय संघांची (कंसोर्टिया) उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत:**

1) माहिती खर्चाचे नियमन करणे आणि कमी करणे,
2) संसाधनांचे वाटप वाढवणे,
3) इंटरनेट, विद्यापीठ नेटवर्क आणि कॅम्पस सिस्टम वापरून नेटवर्क माहिती वातावरण तयार करणे.
4) परवाना समस्यांबद्दल माहितीची देवाणघेवाण करणे.

1. २००१ मध्ये बंगळुरूच्या आरजीयूएचएसने स्थापन केलेले हेलिनेट (आरोग्य विज्ञान ग्रंथालय आणि माहिती नेटवर्क) हे भारतीय वैद्यकीय ग्रंथालय संघाचे एक उदाहरण आहे.
2. नवी दिल्लीतील नॅशनल मेडिकल लायब्ररी हे इलेक्ट्रॉनिक रिसोर्सेस इन मेडिसिन (ईआरएमईडी) भागीदारीचे घर आहे.
3. यूजीसी कन्सोर्टियम इन्फॉर्मेशन नेटवर्क (आयएनओनेट)
4. नवी दिल्लीतील नॅशनल मेडिकल लायब्ररी कन्सोर्टियाने देशभरातील २५ सरकारी मेडिकल कॉलेज लायब्ररींना जोडण्यासाठी एक पायलट प्रोजेक्ट सुरू केला आहे.
5. डिजिटल माहितीसाठी संसाधनांच्या संयुक्त संपादनावर याचा महत्त्वपूर्ण परिणाम होतो. माहिती पुनर्प्राप्ती, ईडीडीएस, डाउनलोड आणि साहित्य पुनरावलोकने यासारख्या सेवा हे महत्त्वाचे फायदे आहेत.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

**३.७ ऑनलाइन डेटाबेस शोधासाठी सेवा:**

प्रत्येक वापरकर्त्याच्या विशिष्ट गरजांनुसार, ही वैद्यकीय संस्थेद्वारे ऑफर केलेली सर्वात महत्त्वाची ग्रंथालय सेवा आहे. इंटरनेट सेवा महाग असल्या तरी, त्या अचूक माहिती देतात आणि वापरकर्त्यांच्या गरजा योग्यरित्या पूर्ण करतात. या सेवा मूलतः वापरकर्त्यांना आवश्यक असलेल्या सेवा आहेत ज्या वापरकर्त्यांना अचूक माहिती देण्यात मदत करतात. कोक्रेन लायब्ररी, CINAHL (नर्सिंग आणि संबंधित आरोग्याचा संचयी निर्देशांक), MEDLINEPLUS, PUBMED, EBSCO, सायन्स डायरेक्ट, विली ऑनलाइन लायब्ररी, EMBASE: औषधनिर्माण आणि औषध संशोधनावर लक्षणीय लक्ष केंद्रित करणारा बायोमेडिकल डेटाबेस, अद्ययावत, प्रोक्वेस्ट, क्लिनिकल की, इ. (५)

**३.८ ई-संसाधन:**

लायब्ररीमध्ये उपलब्ध असलेले इलेक्ट्रॉनिक संसाधने (ई-संसाधन) वापरकर्त्यांना आवश्यक असलेल्या माहितीच्या जलद आणि सुलभ प्रवेश देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात.

**इलेक्ट्रॉनिक संसाधन श्रेणी;**

1. इलेक्ट्रॉनिक स्वरूपात मजकूर आणि पुस्तके
2. इलेक्ट्रॉनिक जर्नल्स
3. ग्रंथालय निर्देशिका
4. संदर्भ स्रोत
5. सांख्यिकीचे स्रोत
6. ऑडिओ रेकॉर्डिंग
7. इमेजिंग डेटाबेस (कला, नकाशे, वैद्यकीय इ.)
8. डेटाबेस
9. बाह्य वेबसाइट्सच्या लिंक्स
10. शोध इंजिन
11. ऑनलाइन बातम्या

**३.9 स्कॅनिंगची तंत्रज्ञान**

स्कॅनर हा ग्रंथालय नूतनीकरणासाठी तंत्रज्ञानाचा एक महत्त्वाचा भाग आहे. ते ऑप्टिकल कॅरेक्टर रिकग्निशन (OCR) अनुप्रयोगांसाठी तसेच OPAC (ऑनलाइन पब्लिक ॲक्सेस कॅटलॉग) मध्ये प्रदर्शित करण्यासाठी पुस्तक मजकूर, प्रतिमा आणि सामग्री पृष्ठे स्कॅन करण्यासाठी उपयुक्त आहे. स्कॅन केलेले दस्तऐवज सहजपणे शेअर आणि ॲक्सेस केले जाऊ शकतात. डिजिटल आणि व्हर्च्युअल लायब्ररीच्या विकासात स्कॅनरचा मोठा वाटा आहे.(6)

**४. डिजिटल विरुद्ध व्हर्च्युअल लायब्ररी**

योग्य वेळी योग्य वापरकर्त्याला योग्य माहिती पोहोचवण्यासाठी ज्ञान आणि संसाधनांचे जागतिक शेअरिंग ही डिजिटल आणि व्हर्च्युअल लायब्ररीमागील मूलभूत कल्पनांपैकी एक आहे. डिजिटल लायब्ररी ही संघटित, डिजिटलाइज्ड माहितीचा संग्रह आहे जी पारंपारिक ग्रंथालयांच्या पलीकडे वैशिष्ट्ये प्रदान करते. नवीन प्रकारची माहिती संसाधने, सामग्री गोळा करण्यासाठी, वर्गीकरण करण्यासाठी आणि कॅटलॉग करण्यासाठी नवीन पद्धती, तसेच इलेक्ट्रॉनिक नेटवर्क आणि सिस्टमचा व्यापक वापर, तसेच संघटनात्मक आणि इलेक्ट्रॉनिक पद्धतींमध्ये महत्त्वपूर्ण बदल, हे सर्व डिजिटल लायब्ररींद्वारे तयार केले जातात. व्हर्च्युअल लायब्ररी म्हणजे अशी जी निवडक माहिती थेट ग्रंथालयांना वितरित करते, सहसा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने, आणि त्यात पुस्तके, नियतकालिके, वाचन जागा किंवा सहाय्यक कर्मचाऱ्यांचा फारसा किंवा कोणताही भौतिक संपर्क नाही. पारंपारिक शोध इंजिनद्वारे उपलब्ध असलेल्यांपेक्षा व्हर्च्युअल लायब्ररी संसाधने श्रेष्ठ आहेत; व्हर्च्युअल आणि डिजिटल लायब्ररी इलेक्ट्रॉनिकरित्या संग्रहित माहितीवर जलद प्रवेश प्रदान करतात, जी आधुनिक ग्रंथालय सेवांमध्ये आघाडीवर आहे. (7)

**५. आयुर्वेदिक वैद्यकीय महाविद्यालयीन ग्रंथपालांची भूमिका**

1) आजच्या डिजिटल वातावरणात, वैद्यकीय ग्रंथपालांना सेवा-केंद्रित आणि वापरकर्ता-केंद्रित अनुप्रयोग, सूचना, कार्यक्रम, प्रकल्प आणि सेवा देण्यासाठी स्वतंत्रपणे किंवा सहकार्याने काम करावे लागते. सामान्य पात्रता आणि आवश्यकतांव्यतिरिक्त, उत्कृष्ट वापरकर्ता-केंद्रित सेवांसाठी वचनबद्धता, प्रभावी तोंडी आणि लेखी संवाद आणि संघ सहकार्य आवश्यक आहे.
2) विशिष्ट क्षेत्रातील संसाधनांसह काम करणे.

3) वापरकर्त्यांच्या गरजा आणि अपेक्षा लक्षात ठेवून संबंधित माहिती संसाधनांमध्ये विद्वत्तापूर्ण प्रवेश प्रदान करणे.
4) साधने, शोध इंजिन, ऑनलाइन डेटाबेस आणि कॅटलॉग आणि ई-जर्नल्स वापरून इंटरनेटवर वाचकांना प्रशिक्षण देणे.
5) ग्रंथालयाचे वेब पृष्ठ डिझाइन करून आणि साइटशी जोडण्यासाठी माहिती संसाधने शोधून आणि मूल्यांकन करून वेबवर ग्रंथालय सेवांबद्दल जागरूकता निर्माण करणे.
6) बहुमुखी तांत्रिक विकासाचे आंधळे अनुयायी बनण्याऐवजी परिस्थितीनुसार योग्य असलेल्या बदलांचे मूल्यांकन करा, समजून घ्या, विचार करा आणि अंमलात आणा.
7) डिजिटल कंटेंट मॅनेजमेंट सिस्टमची रचना, विकास, लाँच आणि देखभाल कशी करावी हे जाणून घेणे.

**६. निष्कर्ष**

येत्या काही वर्षांत वैद्यकीय ग्रंथालयांना त्यांच्या प्राथमिक कामकाजात आमूलाग्र बदल करावे लागतील. पारंपारिक शैक्षणिक धोरणे त्यांच्या वापरकर्त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी खूपच महाग आहेत. वैज्ञानिक प्रकाशनातील प्रगती आणि नवीन माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञानाच्या अंमलबजावणीमुळे तंत्रज्ञानाचा वापर करण्याची - जुन्या गोष्टी वेगळ्या पद्धतीने करण्याची नाही तर पहिल्यांदाच नवीन गोष्टी करण्याची संधी आयुष्यात एकदाच मिळाली. वैद्यकीय विद्यार्थ्यांसाठी संरचित संगणक आणि माहिती तंत्रज्ञान प्रशिक्षण त्यांना भविष्यात अद्ययावत, पुराव्यावर आधारित औषधांचा सराव करण्यासाठी आवश्यक असलेली कौशल्ये प्रदान करेल, जे वैद्यकीय सेवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. संगणक-सहाय्यित वैद्यकीय शिक्षण त्यांना त्यांच्या भविष्यातील सराव आणि शिक्षणात स्वयं-निर्देशित शिकणारे, माहिती शोधणारे, माहिती व्यवस्थापक आणि संगणक तंत्रज्ञानाचे कुशल वापरकर्ते बनण्यास तयार करेल.

**संदर्भ**

1. भोई नरेंद्र कुमार. माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचा वापर (ICT) आणि ग्रंथालय ऑपरेशन: एक आढावा. आंतरराष्ट्रीय कॉन्फ फ्युचर लिबर फ्रॉम प्रॉमिसेस टू प्रॅक्ट. २०१७;४४५–५६.
2. व्ही, राठोड पी, कारकुन एसजी. ग्रंथालय सेवांसाठी इन्फोग्राफिक्सचा एक साधन म्हणून वापर. जे नॉल कम्युन मॅनेज. २०२१;११(२):१७९–८७.
3. अभ्यास I. बंगळुरूमधील निवडक वैद्यकीय महाविद्यालय ग्रंथालयांमध्ये इलेक्ट्रॉनिक संसाधनांचा वापर: एक अभ्यास. २०१८;८(६४३४४):१४७–५३.
4. जलगर व्ही, कारकुन एसजी. ग्रंथालयांमध्ये आरएफआयडी सुरक्षा प्रणाली: एक आढावा. जे लिब्र इन्फ कम्युन टेक्नॉलॉजी. २०१९;८(१):२१.
5. जलगर व्ही, कारकुन एसजी. ब्लडे मेडिकल कॉलेज लायब्ररीच्या विद्याशाखेद्वारे ई-संसाधनांचा वापर विजयपूर, कर्नाटक: एक अभ्यास. जे लिब्र इन्फ कम्युन टेक्नॉलॉजी. २०२०;९(२):३४–४४.
6. नवीन सीएल, कन्नप्पन्नावर बीयू. माहिती संप्रेषण तंत्रज्ञान महाविद्यालय ग्रंथालयांचा वापर: एक अभ्यास. लिब्र फिलॉस प्रॅक्ट. २०१९;२०१९.
7. सलीम ए, टॅबुसुम एस, सादिक बाचा एम. शैक्षणिक ग्रंथालयांमध्ये माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचा (आयसीटी) वापर आणि उपयोग: एक आढावा. इंट जे लिब्र सायन्स [इंटरनेट]. २०१३;२०१३(३):४९–५२. येथून उपलब्ध: http://journal.sapub.org/library
8. https://www.muhs.ac.in, visited १८/०८/२०२५

# Journal of Research and Development

Peer Reviewed International, Open Access Journal.

ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025


Original Article

# महेश एलकुंचवार यांच्या एकांकिकांतील जीवनाशय (संदर्भ : यातनाघर एकांकिका संग्रह)


**जगदीश पवार, 1 एकनाथ फुटाणे2**

[1]संशोधन विद्यार्थी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ. संभाजीनगर

[2]संशोधन मार्गदर्शक -मराठी विभागप्रमुख,शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, छ. संभाजीनगर

**Email:** pawarjagdish50@gmail.com



**Manuscript ID**:

JRD -2025-170814

ISSN: 2230-9578

Volume 17

Issue 8 (II)

Pp. 66-70

August 2025

**Submitted:** 12 July. 2025

**Revised:** 25 July. 2025

**Accepted:** 10 Aug 2025

**Published:** 30 Aug. 2025



***सारांश***

*चार्वाक हे प्राचीन भारतीय भौतिकवादी नास्तिक तत्त्वज्ञान असून ते केवळ प्रत्यक्ष अनुभव आणि इंद्रियज्ञानालाच वैध मानते. मूळ साहित्य हरवले असले तरी चार्वाक विचारांचा प्रभाव भारतीय तत्त्वज्ञान, साहित्य आणि सामाजिक सुधारणांमध्ये दिसतो. शाश्वततेच्या दृष्टीने चार्वाक साहित्याचा प्रभाव तीन महत्त्वाच्या अंगांनी स्पष्ट होतो- (१) तर्कशुद्धता व संशयवाद : ज्यामुळे अंधश्रद्धा, कर्मकांड आणि देववादाला आव्हान दिले गेले आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाला चालना मिळाली; (२) सामाजिक समानता : जातीय व्यवस्था आणि धार्मिक बंधनांचा विरोध करून समानता व समतेच्या विचारांना प्रोत्साहन मिळाले; (३) सुखवाद : जीवनाचा उद्देश सुख मानण्याचा विचार आजच्या उपभोगतावादी समाजातही महत्त्वाचा ठरतो. मराठी साहित्य आणि सुधारकवादी विचारवंतांमध्ये चार्वाक विचारांचा प्रत्यय येतो, ज्यामुळे समाजातील ढोंगीपणा, अंधश्रद्धा आणि असमानतेला आव्हान मिळाले. त्यामुळे चार्वाक साहित्याचा वारसा आजही तर्कशुद्ध, मानवतावादी आणि वैज्ञानिक विचारांसाठी प्रेरणादायी ठरतो.*

***मुख्यशब्द-*** *चार्वाक साहित्य,शाश्वतता,वास्तव,वैध ज्ञान,तर्कशुद्धता,संशयवाद,कर्मकांडआधुनिक विचारधारा*


**प्रस्तावना**

भारतीय रंगभूमीवरील महान नाटककारांची मांदियाळी 'महेश एलकुंचवार' या नावाशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. आपल्या वैशिष्ट्यपूर्ण लेखन प्रयोगांतून त्यांनी साकारलेल्या नाट्यकृतींनी भाषा, प्रदेशाच्या सीमा कधीच ओलांडल्या आहेत. त्यांनी मांडलेल्या आशयाला विश्वात्मकतेचे परिमाण लाभले असल्याने तो अन्य भाषिकांनाही आपला वाटला आहे. एलकुंचवारांच्या नाट्यलेखनातून प्रतीत होणाऱ्या विविध जीवनधारणा, जीवनमुल्ये वैशिष्ट्यपूर्ण आहेत. मानवी जगण्याचा यथार्थ आढावा घेताना त्यात आलेला त्यांचा दृष्टीकोन त्यांच्या नाट्यकृतींना अधिक सकस करून गेला आहे. मानवी जगण्याला कवेत घेताना एलकुंचवारांनी मांडलेल्या जीवनाशयाला अधोरेखित करण्याचा प्रयत्न प्रस्तुत पत्रिकेत केला आहे. महेश एलकुंचवार यांनी आपल्या नाट्यलेखनात आशय, शैली आणि घाटाच्या पातळीवर अनेक क्रांतिकारक प्रयोग केले आहेत. त्यांनी लिहिलेल्या नाटकांमध्ये पारंपारिक पद्धतीचे नाटक आणि एकांकिका असा सरळसोट भेद करता येत नाही. एक समग्र अनुभव देण्याच्या दृष्टीने एलकुंचवारांनी मोठा पट असलेल्या नाटकांचे दोन अथवा अधिक अंक करणे प्रस्तुत शोधपत्रिकेत मात्र पारंपारिक व्याख्येत बसणाऱ्या लघु नाट्यकृतींचाच एकांकिका म्हणून विचार केलेला आहे.'नाटक' एक साहित्यप्रकार आहे. त्यामुळे साहित्याचे प्रयोजन नाटकालाही लागू पडते.प्राचीन भारतीय साहित्येभ्यासकांनी साहित्याच्या विविध व्याख्या करताना जीवन आणि कलांचा एकत्रित विचार केलेला दिसतो. त्यांतून साहित्याची विविध प्रयोजने सुस्पष्ट व्हायला मदत झाली. आधुनिक मराठी अभ्यासकांनीही साहित्याकडे बघताना आपला दृष्टीकोन असाच व्यापक ठेवलेला दिसतो. अ. वा. कुलकर्णी यांनी साहित्याचा विचार करताना बाकी कलांचाही विचार केला आहे. ते म्हणतात, "साहित्य, संगीत, शिल्प, वास्तू, चित्र, इत्यादी सर्वच ललित कलाविष्कार म्हणजे कलावंताने आपल्या अनुभवांची प्रतिभा, कल्पना यांच्या आधारे साधलेली पुनर्निर्मिती होय."[१]


***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***

*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*



**Address for correspondence:**

*जगदीश पवार ,संशोधन विद्यार्थी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ. संभाजीनगर*



**How to cite this article:**

*पवार, . जगदीश ., & फुटाणे, . एकनाथ . (2025). महेश एलकुंचवार यांच्या एकांकिकांतील जीवनाशय (संदर्भ : यातनाघर एकांकिका संग्रह). Journal of Research & Development, 17(8(II)), 66–70.* https://doi.org/10.5281/zenodo.17231968

Quick Response Code:

Website: https://jrdrvb.org/

DOI:10.5281/zenodo.17231968

OPEN ACCESS

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

ह्या पुनर्निर्मितीमध्ये वाचकाला अथवा रसिकाला आपल्या अनुभवाची प्रचीती देणे हाच हेतू अंतर्निहित असतो. अर्थात त्यासाठी साहित्यिकाने आपले लेखन अनुभवाच्या पातळीवर वाचकाला घेऊन जाईल इतके उत्कट, रसभारीत करणे आवश्यक असते. ज्येष्ठ समीक्षक गंगाधर गाडगीळ अशी अभिव्यक्ती ठरणाऱ्या साहित्याला महत्व देतात. साहित्याची व्याख्या करताना ते म्हणतात, "साहित्य म्हणजे अनुभवाची अभिव्यक्ती."[२] एलकुंचवार आपल्या साहित्यकृतींतून अशी सहअनुभूती साधताना दिसतात.महेश एलकुंचवार यांनी ८ एकांकिका लिहिल्या आहेत. 'सुलतान', 'झुंबर', 'एका म्हाताऱ्याचा खून', 'एक ओसाड गाव', 'होळी', 'यातनाघर', 'रक्तपुष्प' आणि 'कैफियत'. ह्या सगळ्याच एकांकिकांमधून त्यांनी देऊ केलेला अनुभव अत्यंत गोळीबंद स्वरूपाचा असून त्यातील आशय मराठी रंगभूमीसाठी नवीन आहे. या एकांकिकांमधून शैलीच्या पातळीवर नव्या बाजांचा परिचय एलकुंचवार मराठी रंगभूमीला करून देतात. त्याचवेळी त्यातून आकाराला आलेला आशय वाचकाला नव्या जाणिवांच्या प्रदेशात घेऊन जातो. हा प्रदेश व्याकूळ करणारा आहे. आयुष्यातील एकटेपणा अधोरेखित करणारा आहे. मानवी जगण्यावर असलेल्या मृत्युच्या छायेचे भान देणारा आहे. जगण्यात भरलेल्या ओसाडपणाची आठवण करून देणारा आहे. मानवी जगण्याला डंख देणाऱ्या ह्या जाणीवा एलकुंचवारांच्या चिंतनाची साधने राहिल्या आहेत.वस्तुत: दोन- तीन अंकी नाटकही ज्या विषयाला न्याय देऊ शकणार नाही असे विषय एलकुंचवार एकांकिकेतून हाताळताना दिसतात. त्यामागील एलकुंचवारांची भूमिका सुस्पष्ट आहे. ते म्हणतात, "नाटक दोन-तीन अंकी असायलाच हवे या आग्रहापेक्षा भरगच्च ऐवज देणारी एकांकिका ही देखील मराठी रंगभूमीला अधिकाधिक समृद्ध करत असते."[३] आशयाला 'ऐवज' शब्द योजून एलकुंचवार अर्थाच्या अधिक नेमकेपणाकडे घेऊन जातात.मौज प्रकाशनगृहाने २००९ साली प्रकाशित केलेल्या 'यातनाघर' या एकांकिका संग्रहाच्या दुसऱ्या आवृत्तीत 'यातनाघर', रक्तपुष्प' आणि 'कैफियत' या तीन एकांकिका आहेत. ह्या तिन्ही एकांकिकांच्या शीर्षकांवर वेदनेची छाया आहे. यातना, रक्त आणि कैफियत हे तिन्ही शब्द व्यक्तीच्या हतबलतेला अधोरेखित करणारे आहेत. दुःखाची जाणीव करून देणारे आहेत. वेदना ही मानवी जगण्याची विवक्षित बाजू आहे. मानसिक, शारीरिक वेदनेचा अनुभव न घेतलेला माणूस शोधून सापडणार नाही इतकी ती सार्वत्रिक आणि सार्वकालिक आहे. ही वेदना मानवी जगण्याची जशी दिशा बदलत असते तसे ती आत्मभानही देत असते. त्याचीच प्रचीती या संग्रहातील एकांकिका वाचून येते.प्रेम आणि द्वेष या परस्परविरोधी भावनांचे सहअस्तित्व ही या तिन्ही एकांकिकांमध्ये असलेली सामायिक गोष्ट आहे. यातनाघरमध्ये बेबी आणि कमळ एका बाजूला एकमेकींच्या आधाराने राहत असल्याने त्यांना एकमेकींविषयी आपुलकी राखणे आवश्यक आहे. तर दुसऱ्या बाजूला रमेशच्या प्रेमाच्या निमित्ताने एकमेकींविषयी त्यांनी मनोमन द्वेषही जपलेला आहे. रक्तपुष्पमध्ये पद्मा आणि लिलूमध्ये मायलेकीचे नाते आहे. मात्र राजाच्या निमित्ताने लिलू आईचा द्वेष करू लागते. कैफियतमध्ये राजेश्वर मुळातच प्रेमाचा भुकेला आहे. मात्र त्याला अपेक्षित तेवढे उत्कट आणि सन्मान्य प्रेम कोणाकडूनच मिळत नसल्याने त्याच्या मनातील प्रेमाची जागा द्वेष घेतो. या तिन्ही एकांकिकांमध्ये प्रेम आणि द्वेषाच्या अस्तित्वाने बदलणारे मानवी वर्तन दाखवताना लेखकाने बदलत्या मानवी मनोवस्थांचे टोकदार चित्रण केले आहे. ह्या मनोवस्था एकरेषीय नाहीत. प्रेमाने अथवा द्वेषाने त्यांचे बदलणारे स्वरूप जगण्यावर थेटपणे परिणाम घडवून आणणारे आहे.जीवनाच्या ह्या दोन्ही बाजू नेमकेपणाने मांडत असताना जगण्यातील अंधाराचे अस्तित्व एलकुंचवार नेमकेपणाने अधोरेखित करतात. अंधार दुःखाचे प्रतिक आहे. अंधार व्यक्तीच्या आजूबाजूला असलेल्या इतर लोकांपासून आभासी मुक्ती देतो. इतर गोष्टींपासून विलग करून व्यक्तीला एकटेपणाची जाण देतो. यातनाघरमध्ये बेबीने अंधार स्वीकारलेला असतो. तिने राहत्या घराच्या खिडक्या बंद करून टाकलेल्या असतात. कैफियतमध्ये राजेश्वरच्या भीतीने निर्मलाने स्वतःला कोंडून घेऊन अंधारच स्वीकारलेला असतो. रक्तपुष्पमध्ये नैराश्येने ग्रस्त असलेल्या पद्माने स्वतंत्र बेडरूम घेऊन अंधारात राहणेच पसंद केलेले असते. ह्या तिन्ही व्यक्तिरेखांच्या जगण्यावर अंधाराची छाया आहे. याबाबत आपले निरीक्षण नोंदवताना समीक्षक संजय आर्वीकर म्हणतात,"....'यातनाघर' मध्येही काळोख-प्रतिमा जीवनातील नकारात्मक अनुभवाचे, खिन्नतेचे, नैराश्येचे दर्शन घडवते."[४] आजूबाजूला असलेली माणसे ह्या व्यक्तिरेखांना समजून घेऊ शकत नाहीत. त्यामुळे वाट्याला आलेले एकटेपण स्वीकारणे ह्या तिघींचीही अगतिकता ठरते. अंधार स्वीकारण्याशिवाय गत्यंतर नाही, अशा मनोवस्थेपर्यंत व्यक्तिरेखांच्या पोहोचण्यातून जगण्यातील नैराश्येचे आणि अगतिकतेचे प्रत्यही चित्र एलकुंचवार रेखाटताना दिसतात.विविध घटना, प्रसंग आणि अनुभवांच्या आधारे महेश एलकुंचवार मानवी जगण्याची अनुभूती आपल्या एकांकिकांमधून देऊ पाहतात. ह्या घटना त्यांनी सलगपणे घडवलेल्या नाहीत. कधी त्या सहज क्रमाने येतात तर कधी फ्लॅशबॅकच्या सहाय्याने! यातनाघरमध्ये बेबीला होणारे भास असोत की कैफियतमध्ये राजेश्वरला होणारे भास असोत, एलकुंचवारांनी त्यांची योजना नाट्यमय पद्धतीने केलेली आहे. ह्या भासांमधून बेबी आणि राजेश्वरच्या वर्तमानाला आकार देणाऱ्या पूर्वायुष्यातील घडामोडी चित्रित झाल्या आहेत. त्यातून व्यक्तिरेखांच्या आयुष्याचा प्रवास लक्षात यायला मदत होते.अनाथ राजेश्वरला मातृप्रेम मिळाले नाही. अनाथाश्रमात नकळत्या वयातच कोरके गुरुजींकडून शरीराची विटंबना झाली. दुखावलेल्या मनावर फुंकर घालण्यासाठी हक्काचे कोणीच नव्हते. आयुष्यभर प्रेमासाठी वणवण भटकावे लागले. रूपा, निर्मला आणि रोझी ह्या सगळ्याच स्त्रियांकडून त्याने अपेक्षिले ते त्याला मिळू शकले नाही. प्रत्येक ठिकाणी तो उपेक्षितच राहिला. त्यातून त्याची भूक इतकी वाढली की त्यासाठी त्याने प्रेमात अडसर ठरणाऱ्या छोट्या गोपूचा खून केला. एलकुंचवारांनी प्रेमाची दुर्मिळता मांडून जगण्याची अतिशय भयावह बाजू 'कैफियत'मध्ये मांडली आहे. प्रेम ही अत्यंत मुलभूत भूक आहे. तिच्या पूर्ततेसाठी प्रत्येक माणूस प्रयत्नशील असतो. ज्यांच्यावर मायेचे छत्र धरणारे कोणी नाही असा वर्गही समाजात आढळतो. त्यांचा संपूर्ण जीवनव्यवहार प्रेमाभोवती केंद्रित झालेला असतो. त्यानुषंगाने त्यांच्या हातून घडणाऱ्या भल्याबुऱ्या गोष्टींमुळे त्यांच्या आयुष्याची होणारी वाताहत राजेश्वरच्या रूपाने मांडली आहे.'यातनाघर' संग्रहातील तिन्ही एकांकिका वास्तववादी आहेत. समाजाचे यथार्थ चित्रण त्यामधून केले गेले आहे. शारीरिक अक्षमतेमुळे बिछाण्याला खिळून

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

असलेल्या 'यातनाघर'मधील बेबीच्या मानसिकतेवर होणारा परिणाम कुटुंबातील वातावरण दुषित करणारा ठरतो. तिच्या जन्माची करूण कहाणी तिला कुटुंबातील इतर सदस्यांपासून विलग करते. त्याने तिचे कुटुंबियांशी असलेले सौहार्दाचे संबंध बिघडतात. तिच्या मनात आई वडिलांसह इतरांविषयी केवळ द्वेष निर्माण होतो. तो कायम अबाधित राहील ह्याची काळजी तिच्याकडून घेतली जाते. मात्र त्याने कुटुंबाचे वातावरण बिघडलेले असते. 'रक्तपुष्प'मध्ये पद्माला आलेल्या रजोनिवृत्तीने तिच्यात अनेक मानसिक- शारीरिक बदल होतात. त्यांचा सहज स्वीकार तिच्याकडून घडत नाही. त्याने तिचा मूड पुन्हा पुन्हा बदलू लागतो. त्याच्याशी जुळवून घेणे लिलूला जमत नाही. मन रिझवण्यासाठी राजाशिवाय अन्य पर्याय पद्माकडे नसतो. मात्र त्याचाही चुकीचाच अर्थ लिलूकडून काढला जातो. त्यातून निर्माण होणारा ताण कुटुंबातील वातावरण कलुषित करणारा ठरतो. 'कैफियत'मध्ये छोट्या गोपूला प्राधान्य देणाऱ्या निर्मलाला राजेश्वरला पुरेसा वेळ देता येत नाही. हे समजून घेण्याची क्षमता राजेश्वरकडे नसते. परिस्थितीचे योग्य भान नसल्याने राजेश्वर भरकटतो. त्याच्या हातून गोपूचा खून होतो. निर्मला त्याच्याविरुध्द साक्ष द्यायला कोर्टात उभी राहते.सामाजिक आणि कौटुंबिक स्तरावर ह्या तिन्ही एकांकीकांतील पात्रे अयशस्वी ठरलेली दिसतात. 'स्व' चे असमाधान हे त्यापाठी असलेल्या कारणांपैकी एक कारण असले तरी मुख्यत्वे परिस्थितीचे योग्य आकलन न होण्यानेच अशी परिस्थिती त्यांच्या आयुष्यात निर्माण झाल्याचे दिसते. व्यक्तीच्या वैयक्तिक जगण्याच्या, आशा- अपेक्षांच्या प्रतिक्रिया सामाजिक वातावरणार परिणाम घडवून आणत असतात. ह्याचे प्रत्यंतर ह्या एकांकिकांमधून येते.बिछाण्याला खिळून असलेल्या बेबीला आपल्या भावाशी, रमेशशी शरीर संबंध निर्माण करावेसे वाटतात. आयुष्यभर घराबाहेर पडू न शकलेल्या बेबीच्या आयुष्यात केवळ रमेश हा एकटाच पुरुष आलेला असल्याने तिच्या मनात तारुण्यसुलभ भावनांना जोडून रमेशचे येणे येणे स्वाभाविक असते. मात्र तसे घडत नाही. रमेश आजाराने अकाली निघून जातो. भाऊ- बहिणीतील शारीरिक संबंध आपल्याकडील सामाजिक परंपरांचा भाग नाही. त्यामुळे तशी ही निषेधार्ह गोष्ट आहे. प्रत्यक्षात तसे घडले असते तरी समाज असे संबंध स्वीकारू शकला नसता, ह्याची जाण बेबीलाही असते. सामाजिक धारणांच्या विपरीत असलेली अशी परिस्थिती मानसिक पातळीवर निर्माण होण्यामागील अगतिकता एलकुंचवारांनी इथे अधोरेखित केली आहे.व्यक्तिरेखांच्या आधारे समाजातील काही विशिष्ट मानसिकता ल्यालेली माणसे नाटकांमधून उभे करण्याचे कसब एलकुंचवार साधताना दिसतात. ही माणसे वैशिष्ट्यपूर्ण नाहीत. त्यांचे जगणे जगावेगळे नाही. फक्त त्यांच्या जाणीवा वेगळ्या आहेत. त्यांच्या जगण्याच्या धारणा विशिष्ट परिस्थितीतून घडलेल्या आहेत. त्यांच्या मानसिकतेच्या आधारे मानवी जगण्यातील वास्तवाला एलकुंचवार भिडू पाहतात. ह्या तिन्ही एकांकीकांमधून त्यांनी अशा व्यक्तिरेखा साहित्यात आणल्या आहेत. 'कैफियत' मधील बेबीच्या लैंगिक जाणिवांचे दमन झालेले आहे. तिला तो अनुभव घ्यायचा आहे. रमेशकडून मिळेल ही तिची अपेक्षाही फोल ठरली आहे. तिला आवश्यक वाटणारे स्वाभिमानी आयुष्य तिच्या कुटुंबीयांकडून मिळाले नसल्याने तिने त्यांचा द्वेष करून स्वतःला कोंडून घेतले आहे. समाजापासून अलिप्त होण्याची ही भावना अन्यायाच्या भावनेतून तिच्यात उपजली आहे. 'रक्तपुष्प' मध्ये अशीच अन्यायाची भावना पद्माच्या मनात निर्माण झाली आहे. रजोनिवृत्तीमुळे पती आपल्याकडे ढुंकून पाहत नाही. आपल्या स्वभावामुळे मुलगी लिलू आपल्याकडून न्हाऊन घेत नाही. आपल्या मुलाची, शशीची घरात कोणी आठवण काढत नाही. आपल्याशी कोणी गप्पा मारत नाही. एकूणच आपल्याला समजून घेण्याची आवश्यकता घरात कोणालाच वाटत नाही अशी भावना पद्माच्या ठायी निर्माण झालेली आहे. ती एकटी पडली आहे. त्यामुळे संवाद साधण्यासाठी तिला कधी राजाकडे जावे लागते तर कधी निनावी पत्रे खरडीत बसावे लागते. रजोनिवृत्ती आलेल्या स्त्रीच्या आत घडणाऱ्या भावनिक उलथापालथीला समजून घेण्याची ताकद गमावलेल्या समाजात होणारी तिची कुचंबना एलकुंचवारांनी इथे रेखाटली आहे.'कैफियत' मध्ये राजेश्वर प्रेमाचा भुकेला आहे. प्रेम मिळविण्यासाठी त्याचा प्रयत्न सुरु असतो. मात्र त्याचवेळी त्याच्या प्रेमाच्या आग्रहाखाली चिरडल्या गेलेल्या व्यक्तिरेखांनाही एक बाजू आहे. रूपा विवाहित असते. तिला राजेश्वरसोबत कोणताही संबंध निर्माण करायचा नसतो. ती केवळ वेळ घालवण्यापुरता त्याच्याशी संबंध ठेऊन असते. मात्र जबरदस्तीने राजेश्वरने लैंगिक संबंध निर्माण केल्यानंतर तिचा अहंकार दुखावला जातो. पोटातील बाळ त्याच्यासाठी मागे ठेऊन ती आत्महत्या करते. रोझी प्रेमाची भुकेली असते. मात्र राजेश्वर तिच्याकडून फक्त शरीराची अपेक्षा धरतो. तिच्या प्रेमाच्या मागणीला भिक घालत नाही. एरवी प्रेमासाठी आसुसलेला राजेश्वर तिच्याबाबतीत मात्र वेगळी भूमिका घेतो. अवहेलना सहन न झाल्याने रोझीलाही आत्महत्येचा मार्ग स्वीकारावा लागतो. निर्मला लग्नाची बायको असते. तिच्याकडूनही त्याला कायमच शरीर संबंधांची अपेक्षा असते. मात्र गोपुचे करण्यात वेळ निघून जात असल्याने तिला राजेश्वरला न्याय देता येत नाही. राजेश्वर मात्र हे समजून घ्यायला कमी पडतो. त्याच्या भीतीने तिला स्वतःला कोंडून घ्यावे लागते. मात्र शेवटी राजेश्वर गोपूचा खून करतो. एक हुशार चित्रकाराची बायको म्हणून कधीकाळी अभिमान वाटलेल्या निर्मलाला आपल्या पतीच्या विरोधात साक्ष द्यायला उभे राहावे लागते. त्याने केलेल्या शारीरिक अत्याचारांचे पुरावे पाठ उघडी करून कोर्टात दाखवावे लागतात.व्यक्तिरेखांच्या भावनांची होणारी कुचंबना एलकुंचवारांनी ह्या एकांकिकांमधून मांडली आहे. या व्यक्तिरेखा समाजाचे प्रतिनिधित्व करीत असतात. त्यांच्या ह्या वर्तनातून भिन्न-भिन्न मानवी स्वभावाचे दर्शन घडते. विविध भाव-भावनांच्या सहअस्तित्वातून होणारी ओढाताण पृष्ठभागावर येते. जगण्याच्या अनिवार्यतेतून वाट्याला आलेल्या दुःखाचे गंभीर स्वरूप समजून घेता येते.महेश एलकुंचवार सहज लिहित नाही. त्यांच्या लेखनामागे ठाम वैचारिक भूमिका असते. तत्वज्ञान असते. एलकुंचवारांनी लिहिलेल्या प्रत्येक नाटकाने काही एक ठोस विधान केलेले आहे. ते त्यांच्यातील विचारीपणाचे द्योतक ठरते. एलकुंचवार तत्वज्ञानाचे भोक्ते आहे. जगण्यातील तत्वज्ञान समजून घेण्याचा त्यांचा अट्टाहास राहिला आहे. त्यामुळे प्रत्येक लेखनकृती आत्मभानाकडे नेणारी राहील ह्याची त्यांनी दक्षता घेतलेली आहे.प्रेम आणि द्वेषाची एक साधी कल्पना घेऊन त्यांनी 'यातनाघर' रेखाटले आहे. मात्र ते तेवढ्याच कल्पनेपुरते मर्यादित न ठेवता त्यातून जीवनविषयक अन्य जाणिवांचे

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

जाळेही विणले आहे. आंतरसंहिता एलकुंचवारांच्या लेखनाचे वैशिष्ट्य राहिले आहे. 'रक्तपुष्प' आणि 'कैफियत' मध्येही अशा अनेक घटनांची उभी- आडवी मांडणी दिसते. त्यातून निर्माण झालेले समग्र चित्र जीवनातील व्यामिश्रता ठळकपणे नजरेत आणून देते.यातनाघर संग्रहातील तिन्ही एकांकिकांमधून नैतिक आणि सामाजिक मुल्ये अधोरेखित होतात. 'यातनाघर' मधील बेबीला तिने स्वतःभोवती निर्माण केलेल्या कोशातून मुक्त करण्यासाठी एलकुंचवार केशव ह्या व्यक्तिरेखेची रचना करतात. केशव बेबीला जगण्याचे प्रयोजन सांगतो. बेबीला ते पटते. ती स्वतः खिडकीकडे सरकून प्रकाशाला मोकळी वाट करून देते. केशवच्या रूपाने दीपस्तंभाची भूमिका एलकुंचवार पार पाडतात. 'कैफियत'मध्ये कोरके गुरुजींच्या अनैतिक वागण्याला एलकुंचवार तोंड फोडतात. त्यातून अनाथाश्रमातील मुलांच्या सुरक्षिततेविषयी प्रश्नचिन्ह निर्माण होते. समाजाचे पालकत्व स्वीकारलेल्या लोकांकडूनच समाजावर होत असलेल्या अन्यायावर ते बोट ठेवतात. समाजाला नैतिक आणि सामाजिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी ह्या घटना समाज म्हणून आपल्याला टाळाव्या लागतील ही बाब सदर घटनेत अंतर्निहित आहे. 'रक्तपुष्प' द्वारे रजोनिवृत्ती आलेल्या स्त्रियांच्या भावनिक स्थितीकडे दुर्लक्ष केलेल्या समाजाला एलकुंचवार जागे करतात. रजोदर्शन झालेल्या कुमारिकेचे समाज स्वागत करतो. तिच्या नहाणाकडे, दुखण्या-खुपण्याकडे गांभीर्याने लक्ष देतो. मात्र रजोनिवृत्ती आलेल्या स्त्रीविषयी समाज अशी कोणतीच सहानुभूतीपूर्वक भूमिका घेत नाही. उलट कुटुंबातील लोक वय झालेली स्त्री म्हणून तिच्याकडे दुर्लक्ष करतात. तिच्या मानसिक- भावनिक स्थित्यंतर होण्याच्या या काळात तिला असलेली माणसांची गरज एलकुंचवार 'रक्तपुष्प'मधून धाडसाने मांडतात.एलकुंचवारांच्या नाट्यकृती विभिन्न जीवनमूल्यांना कवेत घेणाऱ्या आहेत म्हणूनच त्या अभिजात कलाकृती ठरतात. त्यांच्या नाटकांमध्ये येणाऱ्या व्यक्तिरेखा विविध पातळींवरील द्वंद्वात सापडलेल्या दिसतात. त्यांचा मनोमन मूल्यसंघर्ष सुरु असलेला दिसतो. 'यातनाघर'मध्ये एका बाजूला आई-वडील म्हणजेच बेबीचे जन्मदाते पालक आहेत. तर दुसऱ्या बाजूला तिचा स्वाभिमान आहे. ह्यामध्ये ती स्वाभिमान निवडते. आपल्या पालकांचा दुस्वास करते. एका बाजूला तिच्या वाट्याला आलेले पांगळेपण आहे. दुसऱ्या बाजूला तिच्या मनात फुलणाऱ्या तारुण्यसुलभ भावना आहेत. ती त्या भावनांना न्याय देण्याचा प्रयत्न करते. एका बाजूला बेबी स्वतःला यातनाघरात कोंडून घेते. तर दुसऱ्या बाजूला जगण्याचा नवा कवडसा आयुष्यात येताच ती संपूर्ण प्रकाशाच्या स्वाधीन होते. हा मनात सुरु असलेला संघर्ष सनातन आहे. बेबी त्याकडे अत्यंत निखळ मनाने पाहते. त्यामुळेच तिला निर्णय घेता येतो.असाच मूल्यसंघर्ष 'रक्तपुष्प' मधल्या लिलू आणि पद्माच्या मनात निर्माण झालेला दिसतो. नुकतेच सोळावे लागलेल्या आणि रजोदर्शन झालेल्या लिलूच्या मनात एका बाजूला राजासाठी हळवा कोपरा उमलू लागलेला असतो. त्याचवेळी पद्मा राजाच्या जास्तच जवळ जाऊ लागली आहे हेही तिच्या लक्षात येते. त्यामुळे राजाला घरातून हाकलून देण्याच्या, न देण्याच्या आंदोलनांना लिलूला तोंड द्यावे लागते. तिच्या मनात आईविषयी घृणा निर्माण होते. ती आईला बोल लावते. मात्र त्याच वेळी आपल्याला जशी नव्या माणसाची गरज आहे तशी आईलाही आपली गरज आहे, हे तिच्या लक्षात येत नाही. आईचे एकटेपण तिला न समजण्यामागे आईला बसलेला पुत्रवियोगाचा झटका तिने समजून घेतलेला नसतो. त्यातून उद्भवलेले आईचे मानसिक आजारपण तिने स्वीकारलेले नसते. त्यामुळे आई एकटी पडते. आईचे आणि लीलूचे हे तुटलेपण एलकुंचवारांनी अतिशय समर्पक घटनांमधून रेखाटले आहे. "समकालीन आधुनिक जीवनातील मनातील रिक्ततेचे -तुटलेपणाचे दर्शन घडवीत असतानाच, त्यांच्या कारणांचाही ते कमालीच्या समंजसपणे - परिपक्वतेने शोध घेण्याचा प्रयत्न करतात."[५] या डॉ. सोमण यांच्या निरीक्षणाप्रमाणे एलकुंचवार असा शोध पद्माच्या पातळीवर सुद्धा घेताना दिसतात. कारण असाच संघर्ष पद्माच्याही मनात सुरु असतो. एका बाजूला पती क्लबात जाऊन बसतात. रात्री उशिरा घरी येतात. लिलू सदासर्वकाळ तोंड वेंगाडून असते. तर दुसऱ्या बाजूला राजा मोकळेपणाने गप्पा मारतो. समजून घेण्याचा प्रयत्न करतो. मात्र तो परका ठरतो. कधीकधी लिलूशी गप्पा मारत बसतो. आपल्या सुखासाठी त्याला घरात ठेऊन घ्यावे तर लिलू आणि त्याच्यात काही नाते निर्माण झाले तर? ह्या शंकेने तीचे मन पोखरले जाऊ लागते. एका बाजूला रजोनिवृत्ती आल्याने भांबावलेली स्त्री तर दुसऱ्या बाजूला उफाड्याच्या मुलीची आई असे द्वंद्व घेऊन पद्माला वावरावे लागते. एलकुंचवार पद्माला ह्या द्वंद्वात मोडलेली दाखवतात. गलीतगात्र झालेली दाखवतात.यातनाघरमधील तिन्ही एकांकिकांमध्ये 'मृत्यू'चे दर्शन होते. 'यातनाघर'मध्ये आई-वडील, रमेश आणि वहिनीचा मृत्यू होतो. 'कैफियत'मध्ये रूपा, तिचा पती, रोझी, गोपू यांचा मृत्यू होतो. 'रक्तपुष्प'मध्ये शशीच्या मृत्यूचे सावट एकांकिकाभर पद्मा ह्या महत्वाच्या व्यक्तिरेखेवर असल्याचे दिसते. तिन्ही एकांकिकांत आलेला मृत्यू एलकुंचवार यांच्या अन्य नाट्यकृतींमध्येही दिसतो. मृत्यू हे जीवनाचे अभिन्न अंग आहे. जिथे जीवन आहे तिथे मृत्यू आहे. मात्र एलकुंचवार मृत्यू आणि मृत्युच्या परिणामांबाबत जाणीवपूर्वक चिंतन करताना दिसतात. मृत्यूविषयी चिंतनामागील आपली भूमिका स्पष्ट करताना ते म्हणतात, "....मृत्यू ही एकमेव महत्त्वाची आणि अर्थपूर्ण घटना आहे असं मला वाटतं. त्या घटनेसाठीच आधीचं संपूर्ण जीवन आहे. त्यामुळे त्या क्षणाचा जर माणसाला अर्थ कळला, तर जीवन निरर्थक आहे असं त्याला वाटणार नाही. आपण जीवन निरर्थक ठरवतो, ते मृत्यूमुळेच ठरवतो. मृत्यू येणार आहे, त्यामुळे आधीचं सगळं रद्दबादल होतं, नलीफाय होतं, असं आपण समजतो. पण खरंच असं आहे का? कार्यकारणभाव स्वीकारला तर आधीचं जीवन हे मृत्यूला कारण व मृत्यू हे कार्य. पण तोच मृत्यू कारण होतो का? व त्याचं कार्य काय?"[६] मृत्यूला कारण मानून त्यापुढील कार्य शोधण्याची एलकुंचवारांची ही भूमिका अतिवास्तववादी ठरताना दिसते. मात्र तिचा प्रत्यक्ष शोध घेताना ते वास्तववादी घटनांचाच आधार घेतात.विषय, शैली आणि आशय ह्या त्रिसूत्रीच्या आधारे एलकुंचवार आपल्या नाटकात एक परिसर तयार करतात. तो भरगच्च असला तरी देखणा नसतो. त्यात असलेल्या असंख्य कोपऱ्यात मानवी जगण्याला डंख देणाऱ्या असंख्य इंगळया टपून असतात. वाचकाला/

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

प्रेक्षकाला ह्या परिसराला अनुभवताना या इंगळयाना चुकवता येत नाही. त्यांच्या डंखांनी वाचकालाही रक्तबंबाळ व्हावे लागतेच. असे रक्तबंबाळ होणे, व्यक्तिरेखांसोबत सहअनुभूत झाल्यानेच साधते. अन्यथा तसे घडत नाही.नैतिक आणि सामाजिक जाणीवा, मनोमन सुरु असलेला मूल्यसंघर्ष, एकटेपण, भाव-भावनांचे आक्रमण, जगण्यावरील अंधाराची छाया, मृत्यूविषयक चिंतन, न्याय-अन्यायात गुरफटलेली माणसे, यश-अपयशाची जाणीव, प्रेम- द्वेषाची अपरिहार्यता आणि ह्या सगळयातून अगतिक झालेल्या माणसांचे जगणे महेश एलकुंचवार यांनी या संग्रहातील एकांकिकांमधून मांडले आहे. मराठी साहित्यात आशयगर्भ एकांकिका म्हणून एलकुंचवार यांच्या ह्या तिन्ही एकांकिकांची नोंद घेतली गेली आहे.

**संदर्भ :**


1. कुलकर्णी अ. वा., साहित्यविचार, प्रतिमा प्रकाशन, १९९७, पृ. क्र. १९
2. गाडगीळ गंगाधर, खडक आणि पाणी, पॉप्युलर बुक डेपो, मुंबई, १९६०, पृ. ८
3. एलकुंचवार महेश, लोकसत्ता, दि. १८ ऑक्टोबर २०१५
4. आर्वीकर संजय, शोध एलकुंचवारांच्या नाट्यकृतींचा, पद्मगंधा प्रकाशन, २००१, पृ. ७७
5. सोमण कमलेश, 'एलकुंचवारी प्रतिभेस कुर्निसात', लोकमत, ४ ऑक्टोबर २०१४
6. काळे अक्षयकुमार, 'संवाद' - प्रा. एलकुंचवारांची मुलाखत", श्रीवत्स दिवाळी अंक, १९८९, संपादक - आशुतोष शेवाळकर, पृ.२१०

# Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025


Original Article

# शाश्वत विकास लक्ष्य आणि भारतीय आरोग्य स्थिती : एक अभ्यास


**डॉ. रमेश सदाशिव वाघमारे**
सहयोगी प्राध्यापक,लोकप्रशासन विभाग प्रमुख,
गोदावरी कला कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय अंबड, जिल्हा जालना
**Email:** rameshwaghmare098@gmail.com



**Manuscript ID**:
JRD -2025-170815
ISSN: 2230-9578

Volume 17
Issue 8 (II)
Pp. 71-76
August 2025

**Submitted:** 12 July. 2025
**Revised:** 25 July. 2025
**Accepted:** 10 Aug 2025
**Published:** 30 Aug. 2025



***सारांश***

*भारतासारख्या भौगोलिक वैविध्यता असलेल्या प्रदेशामध्ये आणि लोकसंख्येच्या दृष्टीने फार मोठा भूभाग असणाऱ्या या देशांमध्ये मोठ्या प्रमाणावर योजनांची अंमलबजावणी करण्यासाठीचे अडथळे ही निर्माण होत असतात. यामध्ये केंद्र स्तरावरील धोरण आणि योजना तसेच राज्यस्तरावरील धोरण आणि योजना यांच्या अंमलबजावणीतील अडथळे ही अनेक असल्याचे दिसून येत असतात. प्रामुख्याने या योजनांच्या व धोरणांच्या अंमलबजावणीतील असमानता ही निश्चितपणे माता मृत्यू दर आणि बालमृत्यू दर अस्थिर स्वरूपात राखण्याचे कारण ठरू शकते. त्याचाच परिपाक म्हणून आज मोठ्या प्रमाणावर आरोग्याच्या समस्येच्या संदर्भामध्ये अनेक समस्या या निर्माण होत आहेत. असे जरी असले तरी सकारात्मक दृष्ट्या विचार करता देशांमध्ये मोठ्या प्रमाणावर विविध योजनांची यशस्वी अंमलबजावणी करून शाश्वत विकास लक्ष्य - 2030 पर्यंतचे ध्येय आणि उद्दिष्टे साध्य करण्यासाठीचे यथोचित प्रयत्न होत आहेत, हे वरील दिलेल्या आकडेवारीवरून दिसून येते. आणि निश्चितपणे येणाऱ्या पाच वर्षांमध्ये सुद्धा जे उद्दिष्ट ठरवलेले आहेत ते साध्य होतील अशी आशा करायला हरकत नाही.*



***मुख्यशब्द:-*** *पर्यावरण संरक्षण, शाश्वत विकास, स्टॉकहोम परिषद, प्रदूषण नियंत्रण, जैवविविधता संवर्धन, इको-लेबलिंग, हरित लेखापरीक्षण, इको-टुरिझम, आंतरराष्ट्रीय करार, उपभोक्ता शिक्षण*


**प्रस्तावना :-**

शाश्वत विकास लक्ष्य ही संयुक्त राष्ट्र संघाने दिलेली जागतिक उद्दिष्टे म्हणून ओळखली जातात. जी 2015 मध्ये संयुक्त राष्ट्र संघाने संपूर्ण जगातील सदस्य राष्ट्रांना आपापल्या देशातील विविध विकासात्मक अजेंडा पूर्ण करण्यासाठी स्वीकारलेली आहेत. जी 2030 पर्यंत आपल्या धोरणात्मक उद्दिष्टा नुरुप अंमलबजावणीत आणावयाची आहेत. ती 17 प्रकारची शाश्वत विकास उद्दिष्टे ही संपूर्णतः एकमेकांशी परिणामकारक म्हणजेच एका क्षेत्रातील कृती ही, इतर दुसऱ्या क्षेत्रातील परिणामावर लक्ष करणारी आहेत. कारण यातून सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय शाश्वत्तेचे संतुलन राखले जाईल. त्यासाठी सर्वच उद्दिष्टांना मूर्त रूप देण्यासाठी केंद्र स्तर, राज्य स्तरावर शर्तीचे प्रयत्न करणे गरजेचे आहे. प्रामुख्याने शाश्वत विकास लक्ष्य ( SDG ) तीन, म्हणजेच चांगले आरोग्य आणि सर्वांचे कल्याण, यात सर्व वयोगटातील जनतेला आरोग्य सुविधा पुरविणे आणि जन कल्याणाला चालना देणे याला प्राथमिकता दिलेली आहे, व त्या दृष्टीने शाश्वत विकासासाठी प्रत्येक राष्ट्र आपल्या ध्येय - धोरणाची अंमलबजावणी करीत आहेत.


Quick Response Code:

Website:
https://jrdrvb.org/

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations are licensed under the idential terms.*



DOI:10.5281/zenodo.17232034
OPEN ACCESS



**Address for correspondence:**
*रमेश सदाशिव वाघमारे, सहयोगी प्राध्यापक,लोकप्रशासन विभाग प्रमुख,गोदावरी कला कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय अंबड, जिल्हा जालना.*



***How to cite this article:***
*वाघमारे, . रमेश . सदाशिव . (2025). शाश्वत विकास लक्ष्य आणि भारतीय आरोग्य स्थिती : एक अभ्यास. Journal of Research & Development, 17(8(II)), 71–76.* https://doi.org/10.5281/zenodo.17232034

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

भारताच्या दृष्टीने विचार करता नीती आयोग ही संस्था संपूर्णपणे शाश्वत विकास लक्ष्य साध्य करण्यासाठीच्या ध्येय धोरणावर प्रामुख्याने लक्ष केंद्रित केलेले आहे. ज्याद्वारे देशातील सर्व राज्य व केंद्रशासित प्रदेशासाठी चे शाश्वत विकास लक्ष्य, साध्य करण्यासाठी धोरण निर्माण करण्याचे व अंमलबजावणी करण्याचे कार्य करीत आहे. शाश्वत विकास लक्ष ( SDG) तीन चांगले आरोग्य आणि जनकल्याण यामध्ये जवळपास आठ एकंदरीत प्रमुख मुद्द्याच्या आधारे लक्ष साध्य करावयाचे आहे. यामध्ये माता मृत्यू , बाल मृत्यू , एड्स, संसर्गजन्य आजार, असंसर्गजन्य आजार, मादक पदार्थावर प्रतिबंध, रस्ते अपघात, लैंगिक पुनरुत्पादक

यांची काळजी, आणि सर्वांना सुरक्षित व प्रभावी आणि दर्जेदार आरोग्य सुविधा पुरविणे. या अशा संपूर्ण महत्त्वपूर्ण बाबीचा अंतर्भाव या शाश्वत विकास लक्ष तीन च्या रूपाने मांडलेला आहे. जेणेकरून प्रत्येक राष्ट्राला याच्या माध्यमातून देशातील जनतेला आरोग्य सुविधा या दर्जेदार व परवडणारी मिळावीत व यातून जनकल्याण साधला जावा हे या उद्दिष्टाचे फलित आहे. कारण हे एक शाश्वत विकास लक्ष्य इतर शाश्वत विकास लक्ष्याशी जोडलेले आहे. जसे चांगले आरोग्य मिळाल्यास यातून चांगले शिक्षण, समानता, गरिबी, दारिद्र्य व सामाजिक न्याय यातून साध्य करता येतो. यासाठी हे शाश्वत विकास लक्ष्य प्रत्येक राष्ट्रासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण या शाश्वत विकासाच्या लक्ष्याचा संबंध हा प्रत्येक राष्ट्राच्या विकासाशी जोडल्या गेलेला आहे.

**1.शोधनिबंधाचा उद्देश :-**

संयुक्त राष्ट्र संघाने दिलेली व भारताने स्वीकृत केलेली 17 उद्दिष्ट लक्ष स्वीकारलेली आहेत. प्रामुख्याने या शाश्वत विकास उद्दिष्टाच्या तिसऱ्या उद्दिष्टामध्ये चांगले आरोग्य आणि जनकल्याण हे लक्ष आहे. यामध्ये प्रामुख्याने आठ बाबींचा अंतर्भाव केलेला आहे. यापैकी प्रस्तुत शोधनिबंधामध्ये माता आणि बालमृत्यू या दोनच बाबीवर प्रकर्षाने प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे. शिवाय जागतिक पातळीवर व देश पातळीवर आणि राज्यस्तरावरील एकंदरीत माता मृत्यू दर आणि बाल मृत्यु दरांचा आढावा घेण्याचा अल्पसा प्रयत्न केलेला आहे . कारण एकंदरीत या शाश्वत विकास लक्ष्य तीन मध्ये बऱ्याच बाबींचा अंतर्भाव असल्याकारणाने सर्वच गोष्टीवर लक्ष करणे त्या दृष्टीने संयुक्तिक ठरणारे नसल्या कारणामुळे मी फक्त माता मृत्यू दर आणि बालमृत्युदर या दोनच बाबींचा प्रामुख्याने आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**2.संशोधन पद्धत :-**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी द्वितीयक साधनसामग्रीचा आधार घेण्यात आलेला आहे. यामध्ये प्रामुख्याने संदर्भ ग्रंथ, अहवाल, जर्नल्स, वर्तमानपत्रे आणि वेबसाईटचा आधार घेण्यात आलेला आहे.

**3.शाश्वत विकास लक्ष म्हणजे काय :-**

शाश्वत विकास म्हणजे चिरंतन, सतत विकास होय. म्हणजेच आपण ज्या वातावरणात राहतो किंवा जीवसृष्टीत राहतो त्यांचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी आणि आपल्या पिढीला व पुढील पिढ्यांना भविष्यात संसाधने, पर्यावरण सुस्थितीत ठेवून वाचविण्यासाठीचे निरंतर प्रयत्न करणे म्हणजे शाश्वत विकास होय. भारताने देखील 2030 पर्यंत संयुक्त राष्ट्र संघाने ठरवून दिलेली 17 शाश्वत विकास लक्ष्य SDG साध्य करण्याचे उद्दिष्ट ठेवलेले आहे. या उद्दिष्टांना मूर्त रूप देण्यासाठी ध्येयधोरणाची अंमलबजावणी राष्ट्रीय पातळीपासून ते ग्रामपातळीपर्यंत करीत आहेत.

**4.शाश्वत विकास लक्ष ( तीन ) अंमलबजावणी :-**

शाश्वत विकास लक्ष्य तीन यामध्ये प्रामुख्याने आठ मुख्य घटकांचा समावेश करून सार्वजनिक आरोग्य आणि जनकल्याण साधण्याचा प्रयत्न केलेला आहे. यामध्ये 2015 मध्ये जगातल्या सर्व सदस्य राष्ट्रांनी स्वीकृत केलेली शाश्वत विकास लक्ष्य ही 2030 पर्यंत विविध ध्येय - धोरणाच्या माध्यमातून अंमलबजावणीत आणून पूर्ण करण्यासाठी स्वीकृत केलेली आहेत. म्हणजेच 2030 पर्यंत प्रत्येक राष्ट्रांनी आपल्या देशातील माता मृत्यू दर आणि बालमृत्युदर कमी करण्याचे आश्वासन आपल्याशीच दिलेले आहे. आणि ते पूर्ण करण्यासाठीचे प्रयत्न सतत चालू आहेत . म्हणजेच 2030 पर्यंत एक लाख जिवंत जन्मा मागे 70 पेक्षा कमी माता मृत्यू दर निश्चित करण्याचे ध्येय गाठायचे आहे. आणि पाच वर्षाखालील बाळांचे मृत्यू थांबवणे यामध्ये 1000 जिवंत जन्मा मागे किमान 12 बालमृत्यू पर्यंत चा आकडा पूर्ण करणे. आणि पाच वर्षाखालील मृत्यू दर हे 1000 जिवंत जन्मा मागे किमान 25 पर्यंत कमी करणे, हे प्रत्येक राष्ट्राचे ध्येय या शाश्वत विकास लक्ष तीन च्या माध्यमातून पूर्ण करण्याचे आहे.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

**5. माता मृत्यू दर :-**

वर्ष 2000 ते 2023 दरम्यान जागतिक आरोग्य संघटनेने केलेल्या पाहणी अहवालानुसार जवळपास 2.5 म्हणजेच अडीच दशकामध्ये भारतामध्ये माता मृत्यूदराची स्थिती काय आहे याची आकडेवारी दर्शवणारा तक्ता खाली दिलेला आहे.

| वर्ष. | माता मृत्यू दर |
|---|---|
| 2000. | 362 |
| 2005. | 177 |
| 2010. | 188 |
| 2015. | 129 |
| 2020. | 101 |
| 2023. | 88 |

तक्ता क्र. **01**

**स्त्रोत:-** जागतिक आरोग्य संघटना अहवाल 2023 .

वरील जवळपास 23 वर्षाच्या आकडेवारीवरून असे लक्षात येते की भारतामध्ये प्रामुख्याने विविध योजनांची केली जाणारी काटेकोरपणे अंमलबजावणी निश्चितपणे या वरील आकडेवारीला सहाय्यक ठरणारी आहे.भारतामध्ये माता मृत्यू दरामध्ये घट होण्याची काही महत्त्वपूर्ण कारणे आहेत. त्यामध्ये आरोग्य सेवेत झालेली सुधारणा, प्रसुती देखभाल सुविधा म्हणजेच गर्भधारणेपासून ते बाळंतपणापर्यंतची घेण्यात येणारी काळजी, निश्चितपणे एक सकारात्मक बदल घडून आणत आहे. यासाठी पायाभूत आरोग्य सुविधेची उपलब्धता आणि उपचार सेवांची परवडणारी सुविधा, मिळत असल्याकारणामुळे यामध्ये महत्त्वपूर्ण फरक दिसून येत आहे. याशिवाय यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजना जसे की जननी सुरक्षा योजना, सुरक्षित मातृत्व योजना, प्रधानमंत्री मातृवंदन योजना, प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान, याशिवाय महिला आणि त्यांच्या परिवाराला माता स्वास्थ्याबद्दल जाणीव जागृती करून देणे, आरोग्य सेवा क्षेत्रातील प्रशिक्षित कर्मचाऱ्यांमुळे, देखील माता मृत्यू दर कमी होण्यास नक्कीच मदत होत आहे.असे असूनही इतर राष्ट्राच्या व राज्याच्या असमान स्वरूपातील माता मृत्युदरा बद्दल काही कारणे देखील जबाबदार आहेत. त्यामध्ये क्षत्रिय असमानता, भौगोलिक परिस्थिती, आरोग्य सेवांची योग्य ती उपलब्धता किंवा भौतिक सुविधांचा अभाव, गरिबी, दारिद्र्य, आर्थिक स्थिती, शिक्षणाचा अभाव, कमी वयात लग्न, अंधश्रद्धा, अशी ही कारणे यासाठी जबाबदार आहेत. यामध्ये फक्त शासनच जबाबदार आहे असे नाही तर व्यक्तीशा: ती महिला, कुटुंब, आणि समाज यासाठी नक्कीच जबाबदार आहेत. भारता शेजारील राष्ट्रातील माता मृत्यूची संख्या विचारात घेतली तर याची वेगळी बाजू देखील समोर येईल. यामध्ये दरवर्षी भारतात -19 000 महिला मृत्युमुखी पडतात. पाकिस्तान - 11000, अफगाणिस्तान -7600, बांगलादेश - 4000, चीन-1400, नेपाळ - 820, श्रीलंका - 59 आणि भूतान - 05.म्हणजेच वरील जी आकडेवारी तक्त्यामध्ये दर्शविलेली होती त्या प्रमाणात माता मृत्यूची संख्या वर्षागणिक कमी होत गेलेली आपणास दिसून येते. परंतु इतर शेजारी राष्ट्राचा विचार करता आपल्यापेक्षा गरीब व अविकसनशील असणारे राष्ट्र,( चीन वगळता,) त्या राष्ट्रांमध्ये माता मृत्यूचे प्रमाण कमी आहे, हे सुद्धा प्रकर्षाने येथे दिसून येते. यासाठी निश्चितपणे या देशातील आरोग्य व जनकल्याण यांच्या योजनांचा आणि राष्ट्रीय ध्येय धोरणाचा यशस्वी परिपाक आपल्याला या आकडेवारीवरून दिसून येतो.दुसरी बाब म्हणजे भारतातील राज्याचा विचार करता, देशपातळीवरील आकडेवारी आणि राज्याची आकडेवारी या दोन्ही बाबी पडताळून पाहताना, केरळ, महाराष्ट्र आणि तामिळनाडू या राज्याने 70 च्या खाली माता मृत्युदर आणलेला आहे. परंतु इतरही राज्य जसे आसाम -195 , मध्य प्रदेश - 173, उत्तर प्रदेश - 167, आणि बिहार

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

- 118, ही राज्य अजूनही राष्ट्रीय सरासरी पेक्षा मागे आहेत. ही माता मृत्यूची देशातील आकडेवारी राज्याची क्षत्रिय असमानता दर्शवीत आहे. या सर्व बाबीवर उपचारात्मक उपाय किंवा सुधार करण्यासाठी शासनाने गुणवत्तापूर्ण व परवडणारी आरोग्य सेवा निर्माण करून ग्राम पातळीपासुनच त्याची सुरुवात करावी लागणार आहे. यामध्ये शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे देखील अत्यंत गरजेचे आहे. कारण भारतासारख्या विशाल देशांमध्ये प्रादेशिक असमतोल, भौगोलिक विविधता असलेल्या या प्रदेशांमध्ये आरोग्य सुविधा प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवणे अत्यंत गरजेचे आहे. तरच आपण शाश्वत विकास लक्ष्य SDG - तीन ची ध्येय उद्दिष्टे 2030 पर्यंत पूर्ण करू शकु अन्यथा नाही.

**6.बालमृत्यू दर :-**

संयुक्त राष्ट्रसंघाने जी शाश्वत विकास लक्ष्य तीन दिलेले आहे त्यामध्ये प्रामुख्याने बालमृत्यूच्या संदर्भात वेगवेगळया बाबींचा अंतर्भाव केलेला आहे. यामध्ये नवजात बालमृत्यू दर, पाच वर्षाखालील बाल मृत्यू दर आणि एकंदरीत जन्मदर या सर्व बाबींचा 2030 पर्यंतचे लक्ष्य साध्य करण्यासाठी प्रत्येक राष्ट्रांनी प्रयत्न करावयाचे आहेत. यामध्ये भारतासारख्या राष्ट्रांमध्ये आपल्याला बालमृत्यूची स्थिती दर्शवणारा तक्ता पुढील प्रमाणे दिलेला आहे.

| निर्देशक. | 2014. | 2019. | 2020. | 2025 |
|---|---|---|---|---|
| कच्चा जन्मदर | 21.0 | 19.7. | 19.5. | 17.13 |
| एकूण प्रजनन दर | 2.3. | 2.1. | 2.0. | 1.9 |
| नवजात अर्भक मृत्यू दर | 20. | 16. | 15. | 20 |
| एकूण बालमृत्यू दर | 39. | 30. | 28 | 24.98 |
| पाच वर्षाखालील मृत्यू दर | 45. | 35. | 32. | 27.8 |

स्त्रोत :- SRS report -2025.

जगातील जवळपास 2023 च्या आकडेवारीनुसार 4.8 बिलियन बालके पाच वर्ष होण्यापूर्वीच मृत्यू पावतात. जागतिक पातळीवर आफ्रिका खंड आणि आशिया खंडा मध्ये बालमृत्यूचे प्रमाण सर्वाधिक आहे. तर युरोप आणि उत्तर अमेरिकेत सर्वात कमी आहे. यामध्ये विकसित राष्ट्र व विकसनशील राष्ट्रातील आरोग्यवस्थेचा हा फरक प्रामुख्याने लक्षात येतो.भारतामध्ये वरील आकडेवारी पाहता बाल मृत्युदरामध्ये काही प्रमाणामध्ये घट होत असल्याचे दिसून येत आहे. पर्यायाने 2030 पर्यंतचे शाश्वत विकास लक्ष साध्य करण्यासाठी अजून फार मोठा पल्ला वेगवेगळया घटकांच्या माध्यमातून गाठणे शक्य आहे. त्या दृष्टीने राष्ट्रीय पातळीवर विविध आरोग्यविषयक सुविधांची उपलब्धता करून देणे अत्यंत गरजेचे आहे.देशातील काही राज्यांनी आणि केंद्रशासित प्रदेशांनी नवजात शिशुदर 2030 चे शाश्वत विकास लक्ष्य हे साध्य केलेले आहे. विशेषतः केरळ, दिल्ली,तामिळनाडू, महाराष्ट्र व जम्मू आणि काश्मीर ही राज्य आहेत. याशिवाय 11 राज्य व केंद्रशासित प्रदेशांनी पाच वर्षाखालील मृत्यूदरांचे शाश्वत विकास लक्ष ( 25) 2025 मध्येच साध्य केलेले आहे. यामध्ये केरळ-08, तामिळनाडू - 13, दिल्ली -14, महाराष्ट्र -18, जम्मू आणि काश्मीर-17, कर्नाटक -21, पंजाब -22, पश्चिम बंगाल -22, तेलंगणा-23, गुजरात -24,आणि हिमाचल प्रदेश -24 वरील एकंदरीत आकडेवारी पाहिल्यानंतर भारतातील बालमृत्यूचे काय प्रमाण आहे आणि जे

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

2030 पर्यंतच्या शाश्वत विकास लक्षा पर्यंत पोहोचण्यासाठी जो कृती विकास आराखडा निश्चित करावयाचा आहे, त्यासाठी ध्येय - धोरणे निश्चित करावी लागतील. एकंदरीतच भारतातील प्रति एक हजार जिवंत जन्मा मागे 2015 पासून 2025 पर्यंतचा बालमृत्यू दर काय आहे, याची आकडेवारी पुढील तक्त्यामध्ये दिलेली आहे.

| अनु. क्रं. | वर्ष. | बालमृत्यू दर |
|---|---|---|
| 1. | 2015. | 36.6 |
| 2. | 2016 | 34.7 |
| 3. | 2017 | 33 |
| 4. | 2018 | 31.3 |
| 5. | 2019 | 29.7 |
| 6. | 2020 | 28.2 |
| 7. | 2021 | 26.8 |
| 8. | 2022 | 25.6 |
| 9. | 2023 | 24.5 |
| 10. | 2024 | 25.8 |
| 11. | 2025 | 24.98 |

स्त्रोत :- SRS report -2025.

भारतातील बालमृत्यूची प्रमुख कारणे ही प्रामुख्याने पुढील प्रमाणे लक्षात येतात. यामध्ये अकाली जन्म, जन्म गुंतागुंत, नवजात संसर्ग, निमोनिया,अतिसार, कुपोषण, गरोदरपणा आणि प्रसुती दरम्यानच्या गुंतागुंती, अपघात आणि इजा इत्यादी कारणामुळे मोठ्या प्रमाणामध्ये भारतात बालमृत्यूचे प्रमाण प्रामुख्याने दिसून येत असल्याचे या एस आर एस रिपोर्ट 2025 नुसार स्पष्टपणे दिसून येते. हे असे चित्र वरील स्वरूपातले दिसून येत असले तरी एक सकारात्मक बाजू या बालमृत्यू घट होण्याची आपल्यासमोर लक्षात येईल. यामध्ये आरोग्य सेवा प्रणालीचे बळकटीकरण, जीवन रक्षक हस्तक्षेपाची उपलब्धता, सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रमाद्वारे लसीकरण व्याप्ती व सुधारणा, स्वच्छ भारत अभियान, पोषक अभियान, माता आणि बालकासाठी समान आरोग्य शिबीर ,लक्ष केंद्रित कार्यक्रम, अशा विविध योजनांचा अवलंब आणि अंमलबजावणी केल्यामुळे निश्चितपणे बालमृत्यूमध्ये घट झाल्याचे काही सकारात्मक चित्र आपल्यास दिसून येते. शाश्वत विकास लक्ष्य यशस्वी करण्यासाठी भारत सरकार मार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती येथे देणे संयुक्तिक ठरेल असे मला वाटते. यामध्ये स्वच्छ भारत योजना, आयुष्यमान भारत योजना, एकात्मिक बालविकास योजना, राष्ट्रीय आरोग्य अभियान, राष्ट्रीय लसीकरण मोहीम, राष्ट्रीय मानसी मानसिक आरोग्य अभियान, आरोग्य सेवांमध्ये सुधारणा, लसीकरण मोहीम, माता आणि बाल आरोग्य सेवा, गैर संसर्ग रोगावर नियंत्रण, विशेषतः ग्रामीण भागासाठी राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान हे मोठ्या प्रमाणामध्ये यशस्वीरित्या राबवल्या गेल्यामुळेच आज जे भारतातील माता मृत्यूचे प्रमाण आणि बालमृत्यूचे प्रमाण कमी झालेले दिसत आहे ते याच्यासाठी हे निश्चितच एक यशस्वी एक आरोग्य अभियान आहे. ज्यामुळे निश्चितपणे आपल्याला 2030 पर्यंत शाश्वत विकास लक्ष्य साध्य करण्याच्या दृष्टीने उपयोगी ठरणार आहे.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

संदर्भ :-

1. डॉ. धरावत ललित कुमार , भारत मे सतत विकास प्रशासन, तनिषा पब्लिकेशन्स,
2. डॉ. ढमढेरे एस. व्ही. , शाश्वत विकास आणि भारत, डायमंड पब्लिकेशन, पुणे.
3. गोरे मानसी, शाश्वत विकास आजची अपरिहार्यता, सुनीधी पब्लिशर्स,
4. डॉ. कदम प्रतिमा,2021, शाश्वत विकास ध्येय ओळख , नित्य प्रकाशन, भोपाळ. मध्यप्रदेश.
5. Baken susan, 2015, Sustainable Development, routledg publication.
6. Niti aayog Sustainable Development Goals ,( SDG ) India index, 2023-24.
7. शाश्वत विकास उद्दिष्टे आपल्या उद्यासाठी, कपिल सहस्त्रबुद्धे, साप्ताहिक, विवेक, 2020.
8. sample registration system report -2025.
9. National health policy - 2017.
10. National health mission report - 2025.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

Original Article

# एमआयडीसीतील लघु व मध्यम उद्योगांच्या व्यवस्थापन पद्धतीवरील अभ्यास: अहिल्यानगर व नाशिक जिल्हा.

**डॉ. एस. के. पुलाटे1 , एस.बी.घोलप 2**
1सहयोगी प्राध्यापक,कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय राहाता
2संशोधक विद्यार्थी, पद्मश्री विखे पाटील कला, विज्ञान व महाविद्यालय प्रवरानगर
Email - rahulpulate@gmail.com

**Manuscript ID:** JRD -2025-170816
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 8 (II)
Pp. 77--80
August 2025
**Submitted:** 12 July. 2025
**Revised:** 25 July. 2025
**Accepted:** 10 Aug 2025
**Published:** 30 Aug. 2025

**गोषवारा:**

भारताच्या औद्योगिक विकासात लघु व मध्यम उद्योग (MSME) हा आर्थिक प्रगतीचा कणा मानला जातो. देशाच्या GDP मध्ये जवळपास ३०-३५ टक्के योगदान हे या उद्योगांचे आहे. महाराष्ट्र हा औद्योगिक दृष्ट्या प्रगत राज्य असून येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) हे औद्योगिकरणास चालना देणारे प्रमुख घटक आहे. उत्तर महाराष्ट्रातील अहिल्यानगर (माजी अहमदनगर) व नाशिक जिल्हा हे एमआयडीसी क्षेत्र औद्योगिक उत्पादन, रोजगार निर्मिती आणि स्थानिक विकासात महत्त्वाचे स्थान राखून आहेत.लघु व मध्यम उद्योग हे भांडवल कमी, परंतु रोजगार निर्मिती व स्थानिक संसाधनांचा प्रभावी वापर करण्यास उपयुक्त ठरतात. या संशोधन निबंधात या उद्योगांच्या व्यवस्थापन पद्धती, त्यांची कार्यपद्धती, आव्हाने व संधी यांचा चिकित्सक अभ्यास करण्यात आला आहे.

**मुख्य शब्द (Keywords):** औद्योगिक विकास, GDP, लघु व मध्यम उद्योग, औद्योगिक उत्पादन

**संशोधनाची उद्दिष्टे:**

1.अहिल्यानगर व नाशिक एमआयडीसीतील लघु व मध्यम उद्योगांच्या व्यवस्थापन पद्धतींचा अभ्यास करणे.
2.व्यवस्थापनातील प्रमुख क्षेत्रांचा (मानवी संसाधन, वित्त, उत्पादन, विपणन, नवप्रवर्तन) तुलनात्मक अभ्यास करणे.
3.दोन्ही जिल्ह्यांतील उद्योगांची आकडेवारी संकलित करून तुलनात्मक स्वरूपात सादर करणे.
4.औद्योगिक व्यवस्थापनातील प्रमुख समस्या व आव्हाने ओळखणे.
5. सुधारणा व धोरणात्मक सूचना मांडणे.

**2.मर्यादा (Limitations):**

1.उपलब्ध आकडेवारी प्रामुख्याने २०१९-२०२४ या कालावधीपुरती आहे.
2.काही उद्योगांनी सर्व माहिती उपलब्ध करून दिलेली नाही.

**3.संशोधन पद्धती:**

या संशोधनासाठी दोन प्रकारच्या माहितीचा आधार घेतला आहे:

**4.प्राथमिक माहिती:**

1.उद्योजक व व्यवस्थापक यांची मुलाखत.
2.प्रश्नावलीद्वारे संकलित माहिती.

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*प्रा डॉ. एस. के. पुलाटे,सहयोगी प्राध्यापक,कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय राहाता*

*How to cite this article:*
*पुलाटे, . एस . के ., & घोलप, . एस . बी . (2025). एमआयडीसीतील लघु व मध्यम उद्योगांच्या व्यवस्थापन पद्धतीवरील अभ्यास: अहिल्यानगर व नाशिक जिल्हा. Journal of Research & Development, 17(8(II)), 77–80.*
https://doi.org/10.5281/zenodo.17232067

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI:10.5281/zenodo.17232067
OPEN ACCESS

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

**दुय्यम माहिती:**

1,MSME मंत्रालयाचे अहवाल.

2.एमआयडीसी संकेतस्थळ व वार्षिक अहवाल.

3.जिल्हा उद्योग केंद्रांचे आकडेवारी अहवाल.

4.विविध संशोधन लेख व मासिके.

**विश्लेषण पद्धती:** तुलनात्मक अभ्यास, टक्केवारी विश्लेषण व चिकित्सक विश्लेषण.

**5.अहिल्यानगर व नाशिक एम.आय.डी.सी.चा परिचय:**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) हे राज्यातील औद्योगिक विकासाचे प्रमुख संस्थान आहे. १९६२ मध्ये स्थापनेनंतर एमआयडीसीने राज्यभरातील विविध जिल्ह्यांत औद्योगिक वसाहती उभारल्या आहेत. त्यात उत्तर महाराष्ट्रातील **अहिल्यानगर (माजी अहमदनगर)** व **नाशिक जिल्हा** हे दोन जिल्हे महत्त्वपूर्ण औद्योगिक पट्टे ठरले आहेत.

6.अहिल्यानगर एम.आय.डी.सी.:

1.अहिल्यानगर जिल्हा (पूर्वी अहमदनगर म्हणून ओळखला जाणारा) हा कृषी व औद्योगिक दृष्टीने महत्वाचा आहे. येथे कृषीप्रधानता असल्यामुळे **कृषी आधारित व अन्नप्रक्रिया उद्योग** यांचा मोठ्या प्रमाणावर विकास झाला आहे.

2.नगर,सुपा-पारनेर,श्रीरामपूर, राहुरी, नेवासा-पांढरीपूल या भागात एमआयडीसी क्षेत्रे विकसित करण्यात आली आहेत.

3.येथे **साखर उद्योग, दुग्धप्रक्रिया, धान्य प्रक्रिया, कृषी उपकरणे, वस्त्रोद्योग, वाहनांचे सुटे भाग, प्लास्टिक उद्योग** मोठ्या प्रमाणावर आढळतात.

4.जिल्ह्यात सुमारे **३,२५० लघु उद्योग व ७८० मध्यम उद्योग** कार्यरत असून त्यातून सुमारे ४५,००० **लोकांना रोजगार** उपलब्ध झाला आहे.अलीकडच्या काळात **पोल्ट्री, दुग्धजन्य पदार्थ व कृषी प्रक्रिया उद्योगांमध्ये निर्यातक्षम क्षमता** वाढताना दिसते.

7.नाशिक एम.आय.डी.सी.:

नाशिक हा उत्तर महाराष्ट्रातील सर्वात औद्योगिकदृष्ट्या प्रगत जिल्हा मानला जातो. नाशिक शहर व परिसरातील **सातपूर, अंबड, इगतपुरी, मालेगाव, दिंडोरी, निफाड** या ठिकाणी औद्योगिक वसाहती स्थापन करण्यात आल्या आहेत.

1.येथे **ऑटोमोबाईल्स, इंजिनिअरिंग, इलेक्ट्रॉनिक्स, फार्मास्युटिकल्स, वाईन उद्योग** यांचा विशेषतः मोठा विस्तार झाला आहे.

2.नाशिक जिल्हा **"वाईन कॅपिटल ऑफ इंडिया"** म्हणून ओळखला जातो कारण येथे द्राक्षप्रक्रिया उद्योग व वाईनरी मोठ्या प्रमाणावर आहेत.

3.जिल्ह्यात सुमारे ४,८०० **लघु उद्योग व १,१५० मध्यम उद्योग** कार्यरत आहेत. यामधून जवळपास ७२,००० **रोजगार निर्मिती** झाली आहे.

4.नाशिक एमआयडीसीचा विकास तुलनेने अधिक गतिमान असून येथे परदेशी गुंतवणूकही आकर्षित झाली आहे.

**8. लघु व मध्यम उद्योगांची संकल्पना व व्यवस्थापन पद्धती:**

भारतामध्ये लघु व मध्यम उद्योग (MSME – Micro, Small and Medium Enterprises) हे औद्योगिक विकासाचे पाया मानले जातात. २००६ च्या **MSMED कायद्याप्रमाणे** व नंतर २०२० मध्ये केंद्र सरकारने केलेल्या सुधारित परिभाषेनुसार या उद्योगांची व्याख्या प्रामुख्याने **भांडवल गुंतवणूक व वार्षिक उलाढाल** यावर आधारित आहे.

**9.लघु उद्योग (Small Enterprises):**

यामध्ये भांडवल गुंतवणूक तुलनेने कमी असते. साधारणपणे **₹** १० कोटींपर्यंतची गुंतवणूक व **₹** ५० कोटींपर्यंत वार्षिक उलाढाल असणारे उद्योग लघु उद्योग या गटात मोडतात. हे उद्योग प्रामुख्याने **स्थानिक कच्चा माल व स्थानिक कामगारांवर अवलंबून असतात.** उत्पादन क्षमतेत मर्यादा असली तरी हे उद्योग रोजगारनिर्मितीला मोठे योगदान देतात.

10.**मध्यम उद्योग (Medium Enterprises):**

मध्यम उद्योगांमध्ये भांडवलाची गुंतवणूक तुलनेने अधिक असते. साधारणतः **₹** ५० कोटींपर्यंत गुंतवणूक व **₹** २५० कोटींपर्यंत वार्षिक उलाढाल असलेले उद्योग या गटात समाविष्ट होतात. हे उद्योग अधिक **तंत्रज्ञानाधारित, संघटित व्यवस्थापनावर आधारित व उत्पादन क्षमतेने सक्षम** असतात. या उद्योगांमधून मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होतो आणि निर्यातक्षम वस्तूंचे उत्पादनही वाढते.

**11.व्यवस्थापन पद्धती:**

1.मालक-केंद्रित निर्णय प्रक्रिया.

2.वित्तपुरवठा प्रामुख्याने बँक कर्ज, सहकारी संस्था.

3.उत्पादन बाजारपेठ स्थानिक व प्रादेशिक.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

4.विपणन व्यवस्थापनात मर्यादित तांत्रिक वापर.

**12.व्यवस्थापनातील मुख्य क्षेत्रे:**

**1.मानवी संसाधन व्यवस्थापन (HRM):**

**1.कुशल मनुष्यबळाची कमतरता:**

लघु व मध्यम उद्योगांच्या यशस्वीतेत मानवी संसाधन व्यवस्थापनाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. परंतु या उद्योगांमध्ये सर्वसाधारणपणे **कुशल मनुष्यबळाची कमतरता** जाणवते. स्थानिक पातळीवर उपलब्ध असलेले कामगार बहुधा अपूर्ण तांत्रिक कौशल्य असलेले असतात, ज्यामुळे उत्पादनक्षमतेवर परिणाम होतो. आधुनिक यंत्रसामग्रीचा वापर किंवा नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करण्याची क्षमता कमी असल्याने उद्योगाची गुणवत्ता व स्पर्धात्मकता घसरते.

**2.प्रशिक्षण व कौशल्य विकासाचा अभाव:**

**प्रशिक्षण व कौशल्य विकासाचा अभाव** ही देखील गंभीर समस्या आहे. बहुतेक ठिकाणी औपचारिक प्रशिक्षण कार्यक्रम, कार्यशाळा किंवा कौशल्यविकास उपक्रम राबवले जात नाहीत. कामगार 'काम करताना शिकणे' )On-the-job training) या पद्धतीवर अवलंबून राहतात, ज्यातून मर्यादित प्रावीण्य मिळते. परिणामी उत्पादनात सातत्य, नवप्रवर्तन व कार्यक्षमतेचा अभाव जाणवतो. या समस्यांवर मात करण्यासाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, कौशल्य विकास केंद्रे तसेच उद्योगांतर्गत प्रशिक्षण (In-house training) यांचा अवलंब होणे आवश्यक आहे.

3.वित्तीय व्यवस्थापन (Financial Management)

कोणत्याही उद्योगासाठी भांडवल हे कार्यरत राहण्याचे सर्वात मोठे साधन असते. लघु व मध्यम उद्योगांच्या वित्तीय व्यवस्थापनात काही ठळक अडचणी आढळतात.

**4. भांडवल उभारणीसाठी अडचणी:**

उद्योग सुरू करताना अथवा विस्तारासाठी लागणारे भांडवल मिळवणे ही लघु उद्योगांसाठी मोठी समस्या असते. मालकांकडे स्वतःचे भांडवल मर्यादित असते. त्यामुळे त्यांना सहकारी बँका, खासगी सावकार किंवा कुटुंबीयांकडून निधी उभा करावा लागतो.

**5.बँक कर्ज मिळण्यात विलंब:**

सरकारी व राष्ट्रीयीकृत बँकांकडून कर्ज घेण्यासाठी अनेक कागदपत्रांची गरज असते. तारणाची अट, क्रेडिट हिस्टरीची तपासणी, शासकीय प्रक्रिया यामुळे कर्ज मंजुरीस विलंब होतो. अनेक लघु उद्योगांकडे आवश्यक तारण नसल्याने त्यांना कर्ज मिळत नाही.

**6.सरकारी योजना व सबसिडीचा अपुरा लाभ:**

केंद्र व राज्य सरकारकडून MSME साठी विविध योजना राबविल्या जातात. पण माहितीचा अभाव, अर्ज प्रक्रियेतील गुंतागुंत व अधिकाऱ्यांचा विलंब यामुळे या योजनांचा लाभ उद्योगांपर्यंत पुरेशा प्रमाणात पोहोचत नाही.

**7.विपणन व्यवस्थापन:**

लघु व मध्यम उद्योगांच्या यशस्वीतेत विपणन व्यवस्थापनाचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. लघु उद्योग प्रामुख्याने **स्थानिक व प्रादेशिक बाजारपेठेपुरते मर्यादित** राहतात. त्यांच्या उत्पादनाची विक्री बहुतेक वेळा आसपासच्या जिल्ह्यात किंवा राज्यातच होते. मर्यादित भांडवल, जाहिरातींसाठी निधीचा अभाव आणि आधुनिक विपणन साधनांचा अपुरा वापर यामुळे त्यांची स्पर्धात्मकता कमी होते. याउलट मध्यम उद्योग तुलनेने अधिक सक्षम असतात. ते **राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत प्रवेश** करतात. आधुनिक विपणन तंत्रांचा अवलंब करून ते उत्पादनाचे **ब्रँडिंग, पॅकेजिंग व डिजिटल मार्केटिंग** यावर भर देतात. निर्यात प्रक्रियेत ते अधिक सुसज्ज असल्यामुळे विदेशी बाजारपेठेतही आपले स्थान निर्माण करतात. आजच्या डिजिटल युगात ई-कॉमर्स, सोशल मीडिया मार्केटिंग, आणि ऑनलाइन ब्रँडिंग हे मध्यम उद्योगांसाठी नवीन संधी निर्माण करतात. त्यामुळे स्पर्धात्मक वातावरणात टिकून राहण्यासाठी लघु उद्योगांनीही आधुनिक विपणन धोरणांचा अवलंब करणे अत्यावश्यक ठरते.

**8.उत्पादन व तंत्रज्ञान व्यवस्थापन:**

एमआयडीसीतील लघु व मध्यम उद्योगांमध्ये उत्पादन व तंत्रज्ञान व्यवस्थापन हा एक महत्त्वाचा घटक आहे. बहुतांश लघु उद्योग अजूनही **जुन्या यंत्रसामग्रीवर अवलंबून** आहेत. या उपकरणांमुळे उत्पादनाचा वेग, गुणवत्ता आणि खर्च नियंत्रणावर नकारात्मक परिणाम होतो. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर न झाल्याने उद्योगांची स्पर्धात्मकता कमी होते. दुसरी मोठी समस्या म्हणजे **संशोधन व नवप्रवर्तनाची कमतरता.** बहुतेक उद्योग नवीन उत्पादन विकास, डिझाईन सुधारणा किंवा उत्पादन प्रक्रियेतील नवकल्पना याकडे पुरेसे लक्ष देत नाहीत. संशोधन व विकासासाठी (R&D) आवश्यक निधी, तज्ञ मनुष्यबळ व शासकीय सहाय्य यांचा अभाव असल्याने हे उद्योग मर्यादित उत्पादन पद्धतींवरच अवलंबून राहतात. परिणामी जागतिक बाजारपेठेतील प्रगत तंत्रज्ञानाशी त्यांचा ताळमेळ बसत नाही. या समस्येवर उपाय

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

म्हणून उद्योगांनी यंत्रसामग्रीचे आधुनिकीकरण, तंत्रज्ञान हस्तांतरण, तसेच संशोधन व विकासासाठी शासकीय योजनांचा प्रभावी वापर करणे आवश्यक आहे.

**9. नवप्रवर्तन व स्पर्धात्मकता:**

लघु व मध्यम उद्योगांच्या प्रगतीसाठी नवप्रवर्तन व स्पर्धात्मकता ही अत्यंत महत्त्वाची घटक आहेत. काही प्रगत उद्योगांनी **नवीन उत्पादने विकसित करून** बाजारपेठेत आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. आधुनिक डिझाईन, पॅकेजिंग, व ग्राहकाभिमुख उत्पादने यामुळे त्यांना स्थानिक तसेच राष्ट्रीय स्तरावर चांगली मागणी मिळते. तथापि, **बहुसंख्य उद्योग तंत्रज्ञान व नवप्रवर्तनाच्या बाबतीत मागे** आहेत. आर्थिक मर्यादा, संशोधनासाठी लागणारे कुशल मनुष्यबळ आणि शासकीय योजनांची अपुरी माहिती यामुळे हे उद्योग नवप्रवर्तनाकडे दुर्लक्ष करतात. परिणामी त्यांच्या उत्पादनात वेगळेपणा नसल्याने ते बाजारपेठेत मोठ्या उद्योगांशी स्पर्धा करू शकत नाहीत. आजच्या जागतिकीकरणाच्या युगात ग्राहकांच्या गरजा व अपेक्षा झपाट्याने बदलत आहेत. त्यामुळे लघु व मध्यम उद्योगांनी संशोधन व विकास )R&D), तंत्रज्ञान हस्तांतरण, तसेच उद्यमशीलतेवर आधारित नवकल्पना स्वीकारणे आवश्यक आहे. यामुळे त्यांची स्पर्धात्मकता वाढून टिकाव व विस्ताराची संधी निर्माण होईल.

**दोन्ही जिल्ह्यांतील उद्योगांची तुलनात्मक आकडेवारी:**

**अहिल्यानगर व नाशिक जिल्ह्यांतील उद्योगांची तुलनात्मक आकडेवारी**

| अ.न. | जिल्हा | लघु उद्योगांची संख्या | मध्यम उद्योगांची संख्या | एकूण रोजगार निर्मिती | वार्षिक उत्पादन मूल्य (कोटी रुपये) |
|---|---|---|---|---|---|
| १. | अहिल्यानगर | ३,२५० | ७८० | ४५,००० | ९,५०० |
| २. | नाशिक | ४,८०० | १,१५० | ७२,००० | १५,२०० |

(स्त्रोत: MSME मंत्रालयाचे अहवाल)

**10.संशोधन निष्कर्ष:**

1.नाशिक जिल्ह्यातील उद्योगांची संख्या, उत्पादन व रोजगारनिर्मिती अहिल्यानगरपेक्षा जास्त आहे.

2.अहिल्यानगरमध्ये कृषी आधारित उद्योगांचा भर असून नाशिकमध्ये इंजिनिअरिंग, फार्मा, इलेक्ट्रॉनिक्स या क्षेत्रांचे प्राबल्य आहे.

**11.चिकित्सक विश्लेषण:**

1.दोन्ही जिल्ह्यांतील उद्योगांना वित्तपुरवठ्याची अडचण, तंत्रज्ञानात मागे राहणे, विपणन व्यवस्थापनाची मर्यादा अशा समस्या भेडसावत आहेत.

2.सरकारी योजनांचा लाभ मिळतो परंतु प्रशासनिक विलंबामुळे त्याचा प्रभाव कमी होतो.

3.नाशिकमध्ये उद्योग क्लस्टर विकास यशस्वी झालेला दिसतो, तर अहिल्यानगरमध्ये तो अजून प्रारंभीच्या टप्प्यात आहे.

4.मानव संसाधन व्यवस्थापनात कौशल्य प्रशिक्षण व तांत्रिक शिक्षणाचा अभाव प्रकर्षाने दिसून येतो.

**12.निष्कर्ष व सूचना:**

**निष्कर्ष:**

1.लघु व मध्यम उद्योग हे उत्तर महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाचे प्रमुख साधन आहेत.

2.व्यवस्थापन पद्धती सुधारल्यास रोजगार व उत्पादनक्षमता मोठ्या प्रमाणावर वाढू शकते.

**सूचना:**

1. 1.उद्योजकतेसाठी प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करणे.
2. 2.डिजिटल मार्केटिंग व ई-कॉमर्सचा वापर वाढवणे.
3. 3.वित्तपुरवठा सुलभ करण्यासाठी सरकारी बँका व खासगी वित्तसंस्था सक्रिय करणे.
4. 4.संशोधन व नवप्रवर्तन केंद्रे स्थापन करणे.
5. 5.उद्योग-शैक्षणिक संस्था यांच्यातील सहकार्य वाढवणे.

# Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

Original Article

# आदिवासी सणोत्सव आणि पर्यावरण

**डॉ प्रा. माहेश्वरी वीरसिंग गावित.**
**प्राचार्य, हिंद** सेवा मंडळाचे, पेमराज सारडा कॉलेज,अहिल्यानगर
**Email-** maheshwarigavit23@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-17017
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 8 (II)
Pp. 81-87
August 2025
**Submitted:** 12 July. 2025
**Revised:** 25 July. 2025
**Accepted:** 10 Aug 2025
**Published:** 30 Aug. 2025

***सारांश***

*नागर किंवा प्रगत भागापासून दूर रानावनात,डोंगरदऱ्यांच्या आश्रयाने दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासींचे जीवन निसर्गावलंबी असणे सहाजिक आहे. निसर्ग सान्निध्यात राहत असल्याने आदिवासींची स्वतःची अशी एक संस्कृती निर्माण झालेली दिसते.आदिवासींचे भावविश्व हे निसर्गाशी एकरूप झालेले दिसते.आदिवासी संस्कृतीची काही खास वैशिष्ट्ये आहेत.वैश्विक मानवजातीच्या प्रारंभिक अवस्थेतील मानवी जीवनसमूह अवशेष म्हणून आदिवासींकडे बघावे लागेल. त्यांची संस्कृती ही सर्व संस्कृतींची मूलस्रोत आहे. म्हणून तर स्त्री-पुरुष समानता किंबहुना,स्त्रियांना प्रधान स्थान,मातृसत्ताक पद्धती, प्राणीप्रेम, सहकार्याची भावना, समूहनिष्ठा, धर्मनिरपेक्षता,स्वातंत्र्य, समता, बंधुता, अल्पसंतुष्ट वृत्ती, माणुसकी, चराचराकडे समदृष्टीने पाहण्याची वृत्ती, निसर्गाशी घट्टपणाने टिकवलेले नाते ही लोकनिष्ठा घट्टपणे जपणारी मूल्ये या संस्कृतीत आजही तितक्याच जीवटपणे अवलंबिली जाताना दिसतात.आपल्या विधिविधानांतून, सणोत्सवांतून,दैवतविधीतून,नृत्यगाण्यांतून,संगीतातून निसर्गाशी तादात्म्य पावून मिळणारा भूतलावरील अपरिमित,निरपेक्ष आनंद त्यांच्या जीवनात ओतप्रोत भरलेला दिसतो.माणुसकी, सहानुभूती,स्वातंत्र्य,समता,प्राणीप्रेम ही आदिम लोकसंस्कृतीची चिरंतन मूल्ये आहेत.अशा चिरंतन मूल्यांची आराधना करीतच माणसाचे माणूसपण टिकून राहात आले आहे.अतिप्राचीन काळापासून स्थलकालपरिस्थितीनुसार बदललेल्या मानवी जीवनधारणांचे सर्व आघात झेलत आदिवासींच्या धारणा जास्तीत जास्त मूळ व अतिप्राचीन अशा निसर्गाश्रयी प्राणीसाहचर्यासह जीवनधारणा टिकून आहेत. म्हणजेच वर्तमानातील माणसाचे आदिस्वरूप पाहण्यासाठी आदिम जमातींचा सूक्ष्म अभ्यास उपयुक्त ठरतो.तेथे माणसाचे आदिरूप पाहता येते.यादृष्टीने आदिवासी जमातींच्या सणोत्सवांतून प्रकटणारे सामाजिक,ऐतिहासिक आणि सांस्कृतिक स्वरूप महत्त्वाचे ठरते.आदिवासींची निसर्गाला देव मानण्याची कल्पना त्यांच्या देवविषयक व्याप्तीचे दर्शन घडविते.सर्व चराचर सृष्टीत जीवात्मा असतो,अशी त्यांची श्रद्धा आहे.आदिवासी हे मूलतः निसर्गपूजक आहेत. त्यामुळे निसर्गातील सर्व घटकांना परमेश्वर स्वरूप मानून त्यांच्या संहारक सामर्थ्याची जाणीव मनात ठेवून,त्यांच्या प्रसन्नतेसाठी त्यांची पूजा केली जाते.निसर्गाशी संघर्ष करण्यापेक्षा त्याच्याशी समायोजन साधण्याकडेच त्यांचा अधिक कल दिसतो.निसर्गाशी तादात्म्य हे त्यांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य होय.आदिम जीवनातील पंचतत्व पूजनाची परंपरा वैदिक ऋषी परंपरेत आलेली पाहावयास मिळते. वैदिक संस्कृतीचा मूलाधार आदिम संस्कृतीतील या पंचतत्व पूजनात दिसतो.*

**बीजसंज्ञा :-** *आदिवासी संस्कृती, आदिवासी भावविश्व,निसर्ग,मानवी मूल्ये,जीवसृष्टी,पर्यावरण.*

**प्रस्तावना**

आदिवासींचे जीवन निसर्गाश्रयी.विश्वातील प्राचीनतल्या प्राचीन संस्कृतीचा मूलाधार आदिवासी संस्कृती आहे. आपल्या विविध सणोत्सवांच्याद्वारे निसर्गशक्तीची पूजा आदिवासी करीत असतात.आदिवासी पंचमहाभूते,( पृथ्वी,आप,तेज,वायू,आकाश ) पूर्वज,प्राणी,वनस्पती या अष्टदेवतांना मानतात.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:

Website: https://jrdrvb.org/

**Address for correspondence:**
*डॉ प्रा. माहेश्वरी वीरसिंग गावित.प्राचार्य,हिंद सेवा मंडळाचे, पेमराज सारडा कॉलेज,अहिल्यानगर*

DOI:10.5281/zenodo.17232146
OPEN ACCESS

***How to cite this article:***
*गावित, . माहेश्वरी . वीरसिंग . (2025). आदिवासी सणोत्सव आणि पर्यावरण. Journal of Research & Development, 17(8(II)), 81–87.* https://doi.org/10.5281/zenodo.17232146

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

म्हणूनच तर 'डोंगऱ्यादेव' म्हणून डोंगराची पूजा केली जाते.'वागदेव'म्हणून वाघाची पूजा केली जाते.'गोवालदेव' म्हणून गाईगुरांची पूजा केली जाते. 'इंदोल'म्हणून कळंब वृक्षाची पूजा केली जाते. तसेच 'दिया गोमोज' म्हणून सूर्याची,तर 'रातो गोमोज' म्हणून चंद्राची पूजा केली जाते.'निलीचारी'म्हणून हिरव्या गवताची, तर 'कणसरी' म्हणून नवीन आलेल्या धान्याची पूजा केली जाते.' नागोबींज' म्हणून नागदेवाची पूजा केली जाते.' मावलाया' म्हणून नदी,ओढे यासारख्या जलाच्या ठिकाणी असलेल्या जलदेवतांची पूजा केली जाते.पाऊस पडावा म्हणून 'नारनदेवाची',' राणी काजल'ची पूजा केली जाते.' धरतरी' म्हणून धरित्रीमातेची, तर 'खांबदेव',' वीर', 'उरस्कल',' मुंडा'म्हणून पूर्वजांची पूजा केली जाते. आदिवासींच्या धार्मिक कल्पनांमध्ये प्रामुख्याने निसर्गपूजा आहे.हे सतत निसर्गाच्या सान्निध्यात राहतात.प्रत्येक चराचर वस्तुमध्ये चैतन्य आहे,असे मानून त्या शक्तिची ते पूजा करतात. सणोत्सव हे याच शक्तिची देणगी असल्याने 'अनाकलनीय' शक्तींना प्रसन्न करण्याचे साधन म्हणून ते सणोत्सवांकडे पाहतात.त्यामुळे सणोत्सवांना पावित्र्य प्राप्त झाले आहे. सर्वशक्तिमान निसर्गावरच जीवन अवलंबून असल्याने,त्याला संतुष्ट ठेवावे या भावनेने केली जाणारी पवित्र कृती म्हणजे सणोत्सव, अशी आदिवासींची धारणा दिसून येते.अनेक प्रसंगी धार्मिक समारंभासाठी आदिवासी नृत्ये करतात. भयशक्तींपासून संरक्षण मिळावे हा या नृत्यांचा मुख्य उद्देश असतो. देवाची मूर्ती, पवित्र झाड, देवस्थान, बळीचा पशू यांच्याभोवती ही नृत्ये केली जातात.पावरांमध्ये इंदलपूजेच्या वेळी केले जाणारे नृत्य,कोकणांमध्ये डोंगरदेवाच्या उत्सवाच्या वेळी केले जाणारे नृत्य, भिल्लांमध्ये होळीच्या वेळी केला जाणारा दिंडण नाच ही नृत्ये धार्मिकता दर्शवितात.नृत्य,गीत,वाद्ये यांची साथ सणोत्सवांत महत्वाची आहे.

**1.संशोधनाची गृहितके :-**

आदिवासी निसर्गपूजक आजच्या विज्ञानयुगात जगाचे लक्ष्य पर्यावरण,निसर्गनियम व जीवसृष्टी यांच्याकडे वेधले आहे.निसर्गाच्या सान्निध्यात राहणाऱ्या,निसर्गाशी एकरूप असलेल्या आदिवासींची पर्यावरण रक्षणात महत्त्वाची भूमिका आहे. आदिवासी पर्यावरणाविषयी आत्यंतिक संवेदनशील असलेला दिसतो. आदिवासी जीवनात मानवी मूल्यांची वैश्विक संवेदना पाहावयास मिळते.

**2.संशोधनाची उद्दिष्टे :-**

1. आदिवासी सणोत्सवांतील पर्यावरणविषयक जाणीव अभ्यासणे.
2. निसर्गावलंबी आदिवासी संस्कृतीचा पर्यावरणाशी असलेला घनिष्ठ सबंध विशद करणे.
3. आदिवासी जीवनातील मानवी मूल्यांचा शोध घेणे.
4. निसर्ग व जीवसृष्टी यांच्याशी सारखीच सहानुभूती असलेल्या आदिवासी वर्तनावर प्रकाशझोत टाकणे.
5. पर्यावरणाचे रक्षण आणि जतन प्रक्रियेत आदिवासींचे योगदान स्पष्ट करणे.

**3.संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी क्षेत्रीय संशोधन पद्धतीचे उपयोजन केले आहे.क्षेत्रीय संशोधन पद्धतीने अभ्यास करताना मुलाखती,प्रत्यक्ष भेटी,ध्वनिमुद्रण,छायाचित्रण यांचा अवलंब केला आहे.प्रस्तुत विषयावरील ग्रांथिक साधनांचा वापर संदर्भांसाठी केलेला आहे.तसेच समाजशास्त्रीय,मानसशास्त्रीय,लोकसाहित्यशास्त्रीय,आदिबंधात्मक संशोधन पद्धतींचे उपयोजन यात केले आहे.

**4.विषय विवेचन :-**

आदिवासींच्या परंपरागत लोकसंस्कृतीत पर्यावरणातील विविध घटकांचे महत्त्व ओळखून त्यांना स्थान देण्यात आले आहे.निसर्गाबद्दलची कृतज्ञतेची भावना आदिवासींमध्ये मोठ्या प्रमाणात आहे,हे त्यांच्या सणोत्सवांवरून दिसून येते.

माडिया गोंडांमध्ये सणाला 'पंडुम' म्हणतात. त्यांच्यात चार पंडुम महत्त्वाचे आहेत 'पिनू पंडुम' म्हणजे पहिला पाऊस आल्यावर करण्याचा सण होय. 'विज्जा पंडुम' म्हणजे बियांची पेरणी करण्याचा सण आणि 'इरपा पंडुम' करतात.'पिंडी पंडुम' म्हणजे नवीन धान्याचे (तांदळाचे) पीठ दळण्याचा सण असून, पशुधनाची पूजा करण्याचाही सण असतो.नवान्न खाण्याची सुरुवात करण्याचेही सण आहेत. त्याला 'पोलवा'म्हणतात.'कुरुम पंडुम' हा असाच पोलवा असतो. काकडी, मोहाची फुले, मका, नवीन तांदूळ, चिंच इत्यादी सर्व खाद्यपदार्थांच्या खाण्याचे पोलवा व पंडुम साजरे करतात. मोहाच्या फुलांची दारू पिण्याच्या सणाला 'इरपा पंडुम' किंवा 'दारू ओवाळणे' म्हणतात. मोहाची दारू तयार करण्याचे दिवस आले की, दारू प्रथम देवाला अर्पण करतात. नंतरच त्याचे सेवन करतात. 'विज्जा पंडुम' साजरा करण्यासाठी धानाचे चरणे संपले की,लोक एकत्र जमतात.पेरम्याला विचारून एक दिवस ठरवतात. मग एका तबकडीत माती घेऊन त्यात धान पेरतात. कोवळया अंकुरांना उगवू देतात.त्यालाच 'कोड पाडणे'म्हणतात. त्यानंतर एकावर एक तीन टोपल्या घेऊन तीन जागी त्या टोपल्या ठेवतात.त्या कोडाला अंडे अर्पण करतात. नंतर त्या धानाच्या कोडाच्या टोपल्या घेऊन तळयाजवळ जातात. येनाच्या झाडाच्या पानावर टोळीचे तेल घालून विस्तवाजवळ ठेवतात. ते शिजत असताना दुसरीकडे पूजा करतात.कनयाम, वेताळ, भूताम आनाल या देवी-देवतांना तांदूळ अर्पण करतात. वृक्षाच्या छायेत देवपूजा करून व प्रथम नवीन

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

पदार्थांचा नैवेद्य करून नंतर सर्वजण जेवतात(देवगावकर, प्रथमावृत्ती २०११ पृ. क्र. १५ कोलाम आदिवासींमध्ये 'मोहडोंबरी'चा विधी होईपर्यंत कोणीही मोहाची फुले खात नाहीत. तीज किंवा अक्षय्य तृतीयेला हा विधी करतात.काही कोलाम पोडात हा विधी गुढीपाडव्याच्या दिवशी,फणमोडी या विधीबरोबर करण्यात येतो. या विधीनंतरच कोलाम मोह खाण्यास सुरुवात करतात. (देवगावकर, प्रथमावृत्ती २०११ पृ. क्र. १२७)कोलाम आदिवासींमध्ये 'फणमोडी' हा विधी गुढीपाडव्याला करतात.हा शेती कार्याशी संबंधित विधी आहे. शेतातून ज्वारीचे पीक घेतल्यानंतर धांडे कापून घेण्यात येत असले, तरी त्यांची मुळे व अर्धा- एक फूट उंचीचे धांडे तसेच असतात. त्यांना 'फण' म्हणतात. ते काढणे आवश्यक असते. त्याशिवाय पुढच्या हंगामासाठी शेती नांगरता येत नाही. हे फण मोडणे म्हणजेच काढणे या कार्यक्रमात करण्यात येते. म्हणून त्याचे नाव 'फणमोडी' पडले. या विधीत कोलाम पंचायतीत नाईकानंतरचा मान असलेला पदाधिकारी महाजन हा महत्त्वाचा असतो. महाजनच्या शेतापासून फणमोडीची सुरुवात कोलाम करतात. वाळलेले ते सर्व फण शेताच्या एका कोपऱ्यात जमा करून जाळण्यात येतात व त्या अग्नीची पूजा करतात. हे कार्य सूर्योदयापूर्वी आटोपतात. याच दिवशी आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण विधी ते करतात.देवीची पूजा करून तिच्यासमोर कपड्यात बांधलेले एक अंडे लटकवतात.भोवताली कोलाम शिकारीसाठी वापरण्यात येणाऱ्या काठ्या घेऊन उभे राहतात. घट्या ओरडतो, " ससा ऽ ऽ ऽ ला ऽ ऽ ऽ " आणि सर्वजण त्या लटकत्या अंड्यावर काठ्या मारून ओरडतात ," आला ऽ ऽ ऽ आला ऽ ऽ ऽ" त्यानंतर घटया हरीण,रानडुक्कर अशा विविध जनावरांची नावे घेतो व लोक पुन्हा काठ्या मारून ओरडतात.एकूण, वर्षभरात शेतीचे उत्पादन व शिकार भरपूर व्हावी यासाठी हा विधी करण्यात येतो. (देवगावकर, प्रथमावृत्ती २०११ पृ. क्र. १२७)पावसाच्या पहिल्या सरी आल्यानंतर वनस्पती,वेली वाढू लागतात. त्यानंतर त्यांना फुले लागतात व त्यांना फळे येतात. फळे मोठी झाली की फुले गळून पडतात.हीच 'फुलझाडणी' होय. नंतर फळे पिकतात व बिया निघतात.याच बियांची पेरणी होते.हीच 'झाडपेरणी' होय. म्हणजेच हा विधी दोन भागात विभागला जातो.आधी फुल झडते व नंतर बिया पेरण्यात येतात म्हणून, हा सण सामान्यतः दोन दिवस चालतो. पाऊस सुरू झाल्यावर कोलाम सागवानाच्या झाडाची पाने तोडत नाहीत, तसे करणे निषिद्ध मानले जाते. मात्र, झाडपेरणीच्या दिवशी हा नियम थोडा बाजूला ठेवून, मुले सागवानाची पाने तोडून गावात आणतात. त्या पानांची पूजा करण्यात येते. म्हणजे, त्यांचा सन्मान करण्यात येतो.नंतर ती पाने घरांच्या दरवाजांना,धान्याच्या कोठारांना, घराच्या कुंपणांना लावतात. उरलेली पाने चावडीसमोरच्या देवीपाशी ठेवतात. एखाद्या घरी पाने वाटण्याचे राहून गेले तर तो त्या घरवाल्यांचा अपमान समजण्यात येतो व दुसऱ्या दिवशी पंचायत समोर हा विषय मांडण्यात येतो. या कार्यक्रमाची देखरेख घट्याकडे असल्यामुळे त्याला घरवाल्यांची माफी मागावी लागते. दुसऱ्या दिवशी वाळूक,मका, काकड्या, शेंगा, भेंड्या इत्यादी तसेच फुले, फळे शेतातून आणून सर्व मिळून गावाच्या वेशीवरील देवतांना पूजा करून अर्पण करतात.सर्व गाव मिळून सामुदायिकरीत्या हा कार्यक्रम करतात म्हणजे,हा नवीन उपजीचा नैवेद्यच देवाला दाखवितात. (देवगावकर, प्रथमावृत्ती २०११ पृ.क्र. १२८)'बायबाकी' हा विधी बुधवारी किंवा रविवारी करतात. पेरणी सुरू करण्यापूर्वी व पहिल्या पावसापूर्वी बियाणे 'भिवसन' या देवाला अर्पण करतात आणि चांगल्या पिकासाठी याचना करतात. सर्व कोलाम मिळून ही पूजा करतात. भगताच्या अंगात देव येतो व यंदा पाऊस केव्हा व कसा येणार, हे भगत सांगतो .विविध धान्याच्या पुटल्या कोलामांनी आणलेल्या असतात. त्या सोडून पळसाच्या पानाच्या द्रोणांनी एकमेकांजवळ देतात. त्यालाच 'पेव' भरणे म्हणतात.शेवटी थोडे तीळ व गूळ प्रसाद म्हणून प्रत्येक कोलामाच्या तोंडात घालतात. शेवटी सर्व कोलाम 'बायबाकी'असा मोठ्याने उच्चार करून ओरडतात व घरी जातात.( देवगावकर, प्रथमावृत्ती २०११ पृ. क्र. १२९ ) परधान आदिवासींमध्ये नवान्न खाण्याचा सण महत्त्वाचा असतो. हा सण ते श्रावणात करतात. नवान्न सणाची सुरुवात नवीन धान्य देवाला अर्पण करून करतात.पूर्वजांना निमंत्रण देतात.'सजा' नावाच्या झाडाची फांदी व शेतातून धानाचे लंगर आणून घराघरातून लावतात. मग पूजा होते. घर, अंगण,गाईचा गोठा इथे नैवेद्य दाखवतात. विशेष म्हणजे या सणासाठी माहेरवाशीण घरी आणतात. डफाचे संगीत, किनरीचे बोल, गीते यात ते रममाण होतात. (देवगावकर, प्रथमावृत्ती २००१ पृ. क्र. १६४ )ओरॉन आदिवासींमध्ये साग आणि मोह ही त्यांची पवित्र आणि आवडती झाडे. या झाडांची ते पूजा करतात. त्यांच्या पूजेसाठी गाण्यांची, नृत्यांची मांडणी केलेली असते. त्याला 'सरई' म्हणतात.नृत्यगीतांवर मनोरंजनापेक्षा धार्मिक भावनेचा भाग जास्त असतो. दैवतांनी संतुष्ट व्हावे, सुख व समृद्धी नांदावी म्हणून रात्रभर नृत्यगायनाचे कार्यक्रम होतात. चैत्र पौर्णिमेच्या दिवशी सकाळी साग वृक्षांची पूजा सुरू होते त्याला 'सरना पूजा' असे म्हणतात. या भागात सागाची मोठी मोठी वने असून या वनात 'मोठा देव ( महादेव ) राहतो,असा त्यांचा विश्वास आहे.जेव्हा ओरॉन लोक स्थलांतर करून आले, तेव्हा प्रथम त्यांनी साग वृक्षाखाली आश्रय घेतला.त्यामुळे साग वृक्षाला ते पवित्र मानतात.पूजा सुरू झाल्यावर पाण्याने भरलेले दोन घडे त्याच्याजवळ ठेवले जातात. त्यात पवित्र मानलेल्या साग वृक्षाची फुले टाकतात आणि घड्यातील पाणी पूजा स्थानावर शिंपडतात.फुले,फळे, कंदमुळे जे काही जंगलातून गोळा करून आणले जाते,त्याचा नैवेद्य सर्व ग्रामदेवतांना, पूर्वजांना व बड्यादेवाला दिला जातो. त्यानंतर त्याप्रीत्यर्थ

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

नाचगाण्याचा कार्यक्रम होतो. स्त्री -पुरुष एकत्रित हे नृत्य करतात. ( गारे, प्रथमावृत्ती २००४,पृ. क्र. ८३ व ८४) भिल्ल आदिवासी) लोक फाल्गुन शुद्ध प्रतिपदेला गिंबदेवाची पूजा करतात. त्याच दिवशी जंगलातून आठ- दहा फूट उंचीचे काटेसावरीचे लहानसे व एकदम सरळ असलेले झाड विधिपूर्वक तोडून आणून गावातल्या होळीच्या स्थानकाजवळ रोवले जाते. त्या दिवसापासून होळी पौर्णिमेपर्यंत रोज संध्याकाळी सात- आठ वाजेच्या सुमारास त्या गावातील तरुण मुले व पुरुष मंडळी रानशेण्या आणून या झाडाभोवती टाकतात व त्याच्याभोवती फेर धरून गाणी म्हणतात. हे सावरीचे झाड म्हणजे होळीचे प्रतीकरूपच असते.त्याला भिल्ली भाषेत 'कांड्यो' म्हणतात.हे झाड होळीचा सण सुरू झाल्याची निशाणीच असते.पुरुषांनी गावयाच्या या होळीगीतांनाही 'लोल" असेच म्हणतात.तरुणांनी आणि पुरुषांनी गावयाच्या या होळीगीतात शेती, शिकार, वर्षभरातील सृष्टीक्रम यांचे वर्णन असते. मुलींनी गायलेल्या गाण्यात निसर्गवर्णन,होळी सणाचे व त्यासंबंधी देवदेवतांचे माहात्म्य,जीवनाचे तत्वज्ञान,मानवी स्वभाववर्णन व निरनिराळ्या सामाजिक समस्यांचे संदर्भ आढळतात.

पुढील होळीगीत पाहा-

हागे मोवीऱ्या मोवे मोवीऱ्या निली चोडती चोडे
गेरूयो निली चोडती चोडेरे।
हागे फुल्या जामोणे फुल्ये पोते फुले माले गेरूयो
पोते फुले मालेरे।
जोडी इजड्या लावे गेरुयों होलीले पागें पोडेरे।
जोडी जे गोसाँय लावे गेरुयों होलीले पागे पोडेरे।
हागे मोवऱ्या मोवे मोवीऱ्या निली चोडती चोडे गेरूयो।
निली चोडती चोडेरे।

1. ( राठवा,प्रथमावृत्ती २००१ पृ. क्र. २१)इजड्या: होळीच्या गेरनृत्यात स्त्रीरूप घेऊन नाचणारे तरुण. मूळ शब्द हिजडा व त्याचे अपभंश रूप इजडी व अनेकवचन इजड्या.
2. गोसाँय : गेर नृत्यात गोसाव्याचे रूप घेऊन नाचणारे तरुण, मूळ शब्द गोसावी व त्यापासून अपभ्रंश रूप गोसाँय.
3. गेरूयो: गरेया, गेरनृत्य करणारा पुरुष किंवा विशिष्ट प्रकारचा विचित्र पोशाख करून गेरनृत्यात सहभागी होणारा पुरुष.)
   मराठी भावार्थ :-

साग बहरला, महू फुलला
हिरवा चढाव चढे गरैया हिरवा चढाव चढे।
साग बहरला, जामुन बहरला
स्वतः फूल माळी गरैया स्वतः फूल माळी।
जोडीने नाचणाऱ्या आणूनि बघा
होळीच्या पाया पडे गरैया।
जोडीने गोसावी आणुनि बघा
होळीच्या पाया पडे गरैया।
साग बहरला, महू फुलला
हिरवा चढाव चढे गरैया
हिरवा चढाव चढे।

फाल्गुन महिन्यातील आनंददायक,आल्हाददायक नैसर्गिक बदलाचे वर्णन.त्यावेळी सागाची झाडे बहरतात. महूची झाडेही फुलावर येऊ लागतात.भिल्ल परगण्यांत दादर, गहू, हरभरा, यांच्या पिकामुळे चोहीकडे हिरवेगार दिसते.यावेळी होळीचे आगमन होणार म्हणून होळी नाचणा-यांची स्वप्नेही हिरवीगार झालेली असतात व ते होळीचे नवस घेऊन होळीचा नाच करण्याची स्वप्ने बघतात. वाऱ्यावर डोलणारी हिरवाई गाई-गुरांच्या, शेळया-मेंढ्यांच्या तोंडाचा घास होण्यापूर्वी निसर्गाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी भिल्ल आदिवासींमध्ये 'निलीचारी' हा दिवस साजरा करण्यात येतो.आषाढ महिन्याच्या सुरुवातीला आणि पहिल्या पावसाने काही हिरवा भाजीपालाही उगवतो.असा खाण्यायोग्य सर्व प्रकारचा हिरवा भाजीपाला एकत्र करून तो शिजवून खाल्ला जातो.असा समज आहे की,

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

या भाजीपाल्यात औषधी गुणधर्म असतात. हा भाजीपाला खाल्ल्याने आषाढ महिन्यातील नव्या जुन्या पाण्याच्या सरमिसळीमुळे होणारे पोटाचे विकार होत नाहीत.मात्र,हा हिरवा भाजीपाला किंवा हिरवा कोवळा चारा माणसांच्या आणि गाई- गुरांच्या तोंडी लागण्यापूर्वी निलीचारीची पारंपरिक पद्धतीने भगताकडून पूजा करून घेतली जाते.सर्व गावकरी आणि पंचमंडळी एकत्र बसून निलीचारीचे पूजन झाल्यावर साप्ताहिक सुट्टीचा दिवस ठरवितात. शेते परस्परांच्या सीमेत,गावालगत असतात. त्यामुळे आजूबाजूच्या दोन-तीन गावांनी कोणता दिवस ठरविला आहे,याची माहिती काढून तोच दिवस साप्ताहिक सुट्टीचा जाहीर करतात. या साप्ताहिक सुट्टीच्या दिवसाला 'दिही पाल्यो' असे म्हणतात. पूजा विधी करताना निसर्गाप्रती नतमस्तक होऊन आणि धरणी मातेला वंदन करून भूत, प्रेत, मृतात्मे या सगळयांना दारूचे अर्घ्य देऊन नारळ फोडून लोक भूमातेकडून आणि निसर्गाकडून अशाच कृपावर्षावाची कामना करून घरी परत येतात.मुळातच आदिवासींचे दैनंदिन जीवन हे कष्टमय आणि जंगलसंपत्तीवर अवलंबून असते. त्यांच्या जीवनाचा आधार म्हणजे पशुधन हे रोजच जंगलात चारण्यासाठी नेले जाते. या जंगलात वाघ,सिंहासारखी हिंस्र श्वापदेही असतात. श्वापदापासून आपले आणि आपल्या पशुधनाचे संरक्षण व्हावे,या श्रद्धेतून त्यांनी वाघाला आपले दैवत मानले. वागदेवाच्या पूजेच्या दिवशी संध्याकाळी तरुण मुले, पुरुष मंडळी गावाच्या शिवेजवळ जमतात. तिथे नदीच्या,पाणवठ्याच्या जवळ असलेल्या गवतात किंवा डेरेदार वृक्षाच्या आडोशाला गावातील शरीरयष्टीने सुदृढ व्यक्ती कांबळ पांघरून दबा धरून बसते.भगत किंवा पुजारी त्याची चाहूल घेऊन तिथे पूजा करतो. दूध भाताचा नैवेद्य दाखवतो आणि थोडासा लांब जाऊन उभा राहतो. वाघ वैद्याजवळ आला की,सगळी मंडळी ओल्या मातीचे गोळे करून त्या वाघाला मारू लागतात आणि वाघ तो मार चुकवत पळत असतो.पळत- पळत तो नदीच्या पलीकडे आणि गावापासून लांब पळून गेला की, लोक वीरश्री संचारल्याच्या आविर्भावात परत येतात. वागदेव साजरा झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी सूर्योदयाबरोबर परसबागेत, शेतात,बांधावर 'खेतराड्यो देव' म्हणून पळसाची फांदी रोवली जाते.उकिरड्यावर ही पळसाची फांदी रोवतात.असा समज आहे की वागदेव हा फिरत असतो जिथे त्याला खेतराड्यो देवाचे प्रतीक म्हणून पळसाच्या फांद्या दिसतात, तेवढा परिसर त्याच्याकडून निरूपद्रवी ठरतो. इथे आपली पूजा झाली आहे असे तो समजतो. 'गोवाल देव' म्हणजे गाईगुरांचे संरक्षण करणारा देव.ज्यांच्या घरात गाईगुरे आहेत अशा घरी गोठ्यांची पूजा केली जाते.गोठ्याची पूजा झाल्यावर प्रत्येक घरातील एक व्यक्ती याप्रमाणे २५ -३० माणसे गावातीलच जाणत्या वयोवृध्द अशा व्यक्तीबरोबर जंगलात वनौषधी शोधायला जातात. पावसाळयात गाईगुरांचे खूर चढतात, पोट बिघडते, एखाद्या वेळेस सर्पदंशही होतो.अशावेळी आपले पशुधन वाचविण्यासाठी त्यांचे संरक्षण आणि जतन करण्यासाठी ही वनौषधी गोवालदेवाचे पूजन झाल्यावर जंगलातून शोधून आणली जाते. वारली आदिवासीत मुख्य धान्याची जोडणी-मळणीला सुरुवात करताना धाड बांधण्याचा विधी केला जातो.भगत खळयातील खरमेढीजवळ प्रथम धुपावर अक्षता धरून मग हिरवा देव, धरतरी, पावशेदेव,नारायणदेव, हिमायराणी इत्यादी देवांच्या नावाच्या पुंबल्या ठेवतो. मग पाणी भरलेल्या चरवीत अक्षता सोडून हिरव्या देवाकडून मळणी करण्याची परवानगी घेतो.मंत्रोच्चार केले जातात.कणसरी मातेची स्तुती व आळवणी केल्यानंतर उडव्यातील एक पेंडी काढून धुपावर धरून जमिनीवर फक्त एकदाच आपटून पेंडीतून गळलेले दाणे हाताच्या पश्याने मोजून पिकाचा अंदाज घेण्यात येतो.त्यानंतर जोडणीला सुरुवात करण्यात येते.राशीची मळणी चालू असताना दररोज खळयात नैवेद्य दाखवून मग जेवण करण्याची परंपरा आहे. 'कौली खाणे' हा कौटुंबिक उत्सव आहे. दरसाल पावसाळयात पेरणी पूर्ण झाल्यानंतर पावसाळयात उगवणारी कौली या नावाची जंगलातील भाजी आणून या भाजीचा घरच्या देवाला व उकिरड्याला नैवेद्य दाखवून पूजा केल्यानंतर घरातील सर्वजण भाजी खात असतात. एखाद्या वर्षी कौली भाजी उत्सवात खंड पडला,तर पाच वर्षानंतर सदर उत्सव करण्याची परंपरा आहे. 'नवे खाणे' हा कौटुंबिक उत्सव समारंभ आहे. श्रावण ते भाद्रपद यादरम्यान नवे भात तयार होते. वारली समाजात नवे खाण्याचा उत्सव समारंभ करण्याची परंपरा अनेक वर्षापासून चालू आहे.शेतात हळवे भात तयार झाल्यावर आपापल्या सोयीनुसार शेतातून भात कापून व त्याचे पोहे बनवून प्रथम घरच्या देवांना पोह्यांचा नैवेद्य देतात. दारांना भाताची कणसे व करडूच्या फुलांचे तोरण बांधतात,नंतर घरातील सर्व माणसे प्रथम पुरुष व नंतर स्त्रिया पोह्यांचा घास एकमेकांच्या तोंडात घालून भेटतात. नंतर जेवणाची पंगत बसते. सर्वांचे जेवण झाल्यावर घरातील दोन बाया सर्वांच्या पाया पडतात. असा हा नवे खाण्याचा समारंभ केला जातो. या समाजात नवे खाण्याला खूप महत्त्व देण्यात येते. नवे न खाल्लेल्या व्यक्तीला एखादेवेळी दुसरीकडे मुक्काम करावा लागला व त्याच्याकडे पाहुण्याला देण्यासाठी जुने धान्य नसेल,तर पाहुणा उपाशी राहील पण, नव्या भाताचे जेवण करणार नाही. इतके नवे खाण्याला महत्त्व देण्यात येते.धाड बांधलेल्या धान्याची जोडणी व मळणी झाल्यावर धान्य साफ करून खळयात दक्षिणोत्तर टोक करून अर्धगोलाकार धान्याची रास करण्यात येते.राशीच्या उत्तरेकडील टोकांवर नारळ व दिवा ठेवण्यात येतो. नंतर दक्षिण टोकावर भुरकोहळा. दिवा,पेरणीनंतर पाळलेल्या सर्व वस्तू तसेच सौभाग्यवती बाईस लागणारे सर्व आभूषण व आरती ठेवण्यात येते.त्यानंतर राशीच्या दक्षिण टोकाजवळ बसून भगत राशीची कथा गातो. त्याच्या शेजारी एक घांगळी वाजवणारा बसतो.त्याला 'घांगळी भगत' असे म्हणतात.कणसरी मातेची कथा सांगून झाल्यावर खळयाची मालकीण आरती ओवाळून सर्वांना शेंदराचा टिळा लावते व पाया पडते. मग ऊस,नारळ इत्यादी वस्तूंचा भगत नैवेद्य देतो. नंतर बोलावलेल्या सर्वांचे मालकीण हात धुते व जेवायला वाढते. तसेच सर्वांचे जेवण झाल्यावर मालकीण उष्ट्या पत्रावळी उचलते व हात धुऊन सर्वांच्या पाया पडते. त्यानंतर गाठीभेटी घेऊन बाहेरून आलेली माणसे आपापल्या घरी जातात. (अंधेर,प्रथमावृत्ती २००१,पृ.क्र.६२ ) 'आंबा खाणे' हा कौटुंबिक उत्सव

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

आहे.चैत्रशुद्ध पंचमीला सर्वसाधारण हा उत्सव करण्याची परंपरा फार जुनी आहे.प्रथम घरच्या देवांना दिवा लावून दिव्याजवळ आंब्याचा नैवेद्य देण्यात येतो. नंतर घरातील लहानथोर माणसे एकत्र येतात व आंब्याचा घास एकमेकांच्या तोंडात घालून भेटतात.प्रथम घरातील देवाला नैवेद्य दिल्याशिवाय घरातील कोणीही आंबे खात नाहीत. 'नाराणदेव नाचविणे' हा कौटुंबिक पूजेचा उत्सव माघ व भाद्रपद महिन्यात करण्याची परंपरा आहे. भाद्रपद मधल्या उत्सवाला 'खादीचा देव' असे म्हणतात. तर दोन-चार वर्षात एकदा नाराणदेव नाचवण्याची परंपरा आहे.ज्याच्या घरी देव नाचवायचा असेल,त्याच्या घरी अंगणात मोठा मांडव घातला जातो. मधल्या खांबाला एका पणतीत तेलाचा दिवा लावण्यात येतो.दिव्याच्या वर टोपलीत देव ठेवण्यात येतो.मांडवाच्या पश्चिमेला पूर्वेकडे तोंड करून नारायणाची गाणी गाणारा भगत बसतो.त्याला 'कांबडी'असे म्हणतात. त्याच्या शेजारी दोन-तीन बाया बसतात.कांबड्यामागे तेच गाणे त्या गातात म्हणून, त्यांना 'कांबडणी' असे म्हणतात. कांबडी टाळ वाजवतो. टाळ वाजवत-वाजवत प्रथम मांडवाचे गाणे गातो. त्यात प्रथम कुणबी कुऱ्हाड घेऊन डोंगरात जातो,लाकूड पसंत करून आणतो,गाडीत घालून घरी आणतो, सुताराला बोलावून आणतो, सुतार माप घेऊन नऊ खांबाचा नाचणी मांडव तयार करतो इत्यादी वर्णन गाण्यातून येते. (अंधेर,प्रथमावृत्ती २००१,पृ.क्र.६ पावरा जमातीत 'इंदल' हा मोठा उत्सव असतो. 'इंदल' म्हणजे इंदीराजा.त्याला प्रसन्न करण्यासाठी केलेला नवस फेडण्याचा जो कार्यक्रम असतो, त्याला 'इंदल' म्हणतात. इंदल वैयक्तिक व सामुहिक पद्धतीने साजरा करतात, त्याला अनुक्रमे 'गाव गोंदल्या इंदल' व 'चुयो इंदल' असे म्हणतात.गावच्या इंदलसाठी घरोघरी वर्गणी गोळा केली जाते. इंदलसाठी भजनी मंडळीही आलेली असतात.कळंब वृक्षाच्या फांद्या विधिवत पूजा करून वाजत-गाजत आणतात.इंदीदेवाची,कणसरीमातेची आणि हुडोवदेवाची अशा तीन फांद्या तीन खड्ड्यात रोवल्यावर पुजारी त्यांची पूजा करतो. त्यावेळी मोठे रिंगण धरून लोक ढोलाच्या तालावर नाचत असतात. यावेळी बोकडाचा किंवा कोंबड्याचा बळी दिला जातो. यावेळी सप्रेम भेटीचा कार्यक्रम होतो. भेटपूजेचा कार्यक्रम झाल्यानंतर मंडपात सारवलेल्या ठिकाणी इंदल नृत्याचा कार्यक्रम सादर होतो. यावेळी सर्व तरुण-तरुणी, मुले-मुली, म्हातारा-म्हातारी आनंदाने नाचतात, ढोलाच्या ठेक्यावर या नृत्याचा बहारदार कार्यक्रम रात्रभर चालू असतो.एकमेकांच्या खांद्यावर हात ठेवून हे नृत्य करतात. इंदलदेवाच्या पूजेच्या वेळी गीतेही म्हटली जातात.
असेच एक गीत-

इंदी राजा चवरेमें बोठ्यो
इंदी राजा बोंदोडे बोया ओ
इंदी राजा निंबुने मुक्यो
इंदी राजा बांदोडे बोयो ओ
इंदी राजा लुकडोने गुवयो
इंदी राजा बांदोडे बाये ओ
इंदी राजा कुकेडाने भुवयो
इंदी राजा बंदोडे बाये ओ
( गावित,प्रथमावृत्ती २०१५,पृ .क्र.४१ )

(भावार्थ - इंदीदेव अंगणात बारीक नजरेने पाहात आहे. देवाला लिंबाची गरज आहे.देव कोंबडीचा भुकेला आहे. या गोष्टी अर्पण केल्यास देव संतुष्ट होईल. इंदलपूजेत कसर राहू दिली जात नाही. नाहीतर इंदीराजाचा कोप होतो असे मानतात. आर्थिक परिस्थितीमुळे तीन वर्षांनी इंदल बसविता आला नाही, तर आणखीन तीन वर्षे पुढे ढकलता येतो, परंतु त्यानंतर मात्र इंदल करावाच लागतो. आजही हे पथ्य अगदी काटेकोरपणे पाळले जाते.

**निष्कर्ष :-**

१) आदिवासी जीवन निसर्गावलंबी असल्यामुळे,त्यांची स्वतःची अशी एक वेगळी संस्कृती निर्माण झालेली दिसते.आदिवासींचा पर्यावरणाशी घनिष्ठ संबंध असलेला दिसतो.
२) आदिवासींच्या अलीकडच्या चळवळीतील मागण्या या स्थैर्यासाठी,पर्यावरणाच्या रक्षणासाठी, प्राणीजीवनाच्या संरक्षणासाठी आणि शेतीभातीच्या सुरक्षिततेसाठी असलेल्या दिसतात.
३) वृक्षांसंबंधीच्या विविध परंपरा,विधी आणि नियमांचे प्राबल्य आदिवासींमध्ये दिसते.
४) ऋतुमान,नैसर्गिक आपत्ती,ग्रहतारे,पशुपक्षी,वनस्पती,विविध प्राणी यांबाबतचे ज्ञान आदिवासी लोकसाहित्यात परंपरेने आलेली दिसते.
५) आदिवासींमध्ये गोत्रव्यवस्था असून गोत्राला विविध वृक्षांची,प्राण्यांची किंवा निसर्गातील अन्य घटकांची नावे असलेली दिसतात.
६) आदिवासी संस्कृतीत पर्यावरणाबद्दलचे ज्ञान परंपरागत आलेले दिसते.हे पारंपरिक ज्ञान त्यांच्या सणोत्सवांत प्रकटलेले दिसते.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

७) भूतमात्रांविषयीचा जिव्हाळा असल्यामुळे,त्यांच्याशी अतूट नाते राखत जीवन जगायचे असते,हे बाळकडूच त्यांना मिळालेले असते.प्राणी,पक्षी,वनस्पती यांबरोबरच धरती,आकाश,सूर्य,चंद्र,वारा,नद्या,नाले,पर्वत, डोंगर,ग्रह,तारे या सृष्टीजीवनातील सर्व घटकांची आदिवासी पूजा करतात.लोकसाहित्यात त्यांचा उल्लेख येतो.

**समारोप :-**

आदिवासी सणोत्सवांतून निसर्गाबद्दलची कृतज्ञता व्यक्त होताना दिसते.समाजाचे व त्याचबरोबर व्यक्तीचे सांस्कृतिक,सामाजिक व धार्मिक जीवन संवर्धन करण्याचा उदात्त हेतू त्यात असतो.या सणोत्सवांतून आनंद,चैतन्य, उत्साह,लय सारे काही अभिव्यक्त होते. निसर्गाच्या सान्निध्यात आदिवासींच्या जीवनातील आनंद त्यांच्या सणोत्सवांतून व्यक्त होतो. या सणोत्सवांतून आदिवासींच्या जीवनाबरोबरच निसर्गशक्तीचा रंग, रूप, गंध यांचा आविष्कार झालेला दिसतो. पर्वत, कडेकपाऱ्या,ओढे,वनराजी,पशुपक्षी,वीज वादळे ,चंद्रसूर्य, पाऊस, एकूण सारा निसर्ग त्यांच्या या सणोत्सवांत बोलका होतो.निसर्गाशी एकतानता पावणारे हे सणोत्सव कधी आत्मकेंद्री असत नाहीत. समूहाला आपल्यात सामावून देण्याची क्षमता त्यात असते.निसर्गाच्या दातृत्वाने पुनीत झालेले आदिवासींचे जीवन त्यांच्या सणोत्सवांमुळे सुंदर आणि उदात्त बनते.

**संदर्भ :-**

१. गोंड,परधान आणि कोलाम,डॉ.एस.जी. देवगावकर,डॉ.शैलजा देवगावकर,श्री साईनाथ प्रकाशन,नागपूर,प्रथमावृत्ती फेब्रुवारी २०११
२. आदिवासी लोकनृत्य ,डॉ.गोविंद गारे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २००४
३. आदिवासी विश्व, डॉ. शैलजा देवगावकर,आनंद प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती जुलै २००१
४. देहवाली साहित्य, चामुलाल राठवा, साहित्य अकादमी प्रकाशन,नवी दिल्ली, प्रथमावृत्ती २००१
५. आम्ही आदिवासी वारली, महादेव अंधेर,प्रथमावृत्ती २००१
६. आदिवासी लोकपरंपरा,डॉ.माहेश्वरी गावित,चिन्मय प्रकाशन,औरंगाबाद,प्रथमावृत्ती मार्च २०१५

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

Original Article

# उत्तर महाराष्ट्रातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे (APMC) विपणन कामकाज: एक समीक्षात्मक अभ्यास

**प्रा.जी.डी.बोर्डे[1], गोरडे मनिषा[2]**
[1]सहयोगी प्राध्यापक, कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कोल्हार
[2]संशोधक विद्यार्थी: पद्मश्री विखे पाटील महाविद्यालय कला, विज्ञान व वाणिज्य ,प्रवरानगर.सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
**Email:** manishadethe007@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-17018
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 8 (II)
Pp. 88-92
August 2025
**Submitted:** 12 July. 2025
**Revised:** 25 July. 2025
**Accepted:** 10 Aug 2025
**Published:** 30 Aug. 2025

**गोषवारा:**

*उत्तर महाराष्ट्र, ज्यामध्ये नाशिक, धुळे, जळगाव, नंदुरबार आणि अहमदनगर हे जिल्हे समाविष्ट आहेत, हे भारतातील कृषीप्रधान क्षेत्रांपैकी एक आहे. या भागात द्राक्ष, केळी, कांदा, डाळिंब, कापूस आणि मका यांसारख्या विविध पिकांचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होते. हे शेती उत्पादन बाजारपेठेत योग्य भावाने पोहोचावे आणि शेतकऱ्यांचे आर्थिक शोषण टळावे यासाठी कृषी उत्पन्न बाजार समित्या (APMC) स्थापन झाल्या आहेत. महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ अंतर्गत या समित्या कार्यरत असून, शेतकऱ्यांना विपणन सुविधा पुरवणे आणि बाजार प्रक्रियेचे नियमन करणे हा त्यांचा मुख्य उद्देश आहे. उत्तर महाराष्ट्रातील APMC शेतकरी, व्यापारी आणि ग्राहक यांच्यातील महत्त्वाचा दुवा आहे.या शोध निबंधात उत्तर महाराष्ट्रातील APMC च्या विपणन कामकाजाचा सविस्तर अभ्यास केला जाईल. यात त्यांची रचना, कार्यप्रणाली, आकडेवारीसह तक्ता, वैशिष्ट्ये, आव्हाने आणि भविष्यातील सुधारणा यांचा समावेश असेल. २०२४ पर्यंतच्या उपलब्ध माहितीवर आधारित हा अभ्यास शेतकऱ्यांच्या आर्थिक प्रगतीत APMC चे योगदान आणि त्यांच्या मर्यादांचे विश्लेषण करेल. उत्तर महाराष्ट्रातील शेती उत्पादनांचे वैविध्य आणि निर्यात क्षमता लक्षात घेता, APMC चे विपणन कामकाज स्थानिक आणि जागतिक स्तरावर शेतकऱ्यांना कसे लाभदायक ठरते, यावरही प्रकाश टाकला जाईल. हा निबंध शेती क्षेत्रातील विपणन प्रक्रियेच्या महत्त्वावर भर देत, APMC च्या भूमिकेचे मूल्यमापन करेल आणि त्यांच्या कार्यक्षमतेत सुधारणा करण्यासाठी उपाय सुचवेल.*

***मुख्य शब्द*)Keywords)**: *APMC (कृषी उत्पन्न बाजार समिती), उत्तर महाराष्ट्र, शेतकरी विपणन, लिलाव प्रक्रिया*

**परिचय:**

भारत हा कृषीप्रधान देश असून, शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव मिळणे हे त्यांच्या आर्थिक स्थैर्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. महाराष्ट्रातील उत्तर महाराष्ट्र प्रदेश (नाशिक, धुळे, जळगाव, नंदुरबार, अहमदनगर) हे द्राक्ष, केळी, कांदा, कापूस, डाळिंब यांसारख्या नगदी पिकांच्या उत्पादनासाठी प्रसिद्ध आहे. या शेतमालाचे योग्य भावात विपणन करण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समित्या (APMC) महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ नुसार स्थापन झालेल्या या समित्या शेतकऱ्यांना मध्यस्थांच्या शोषणापासून वाचवतात आणि पारदर्शक लिलाव प्रक्रियेद्वारे बाजारपेठ उपलब्ध करून देतात.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI:10.5281/zenodo.17232193

**Address for correspondence:**
*प्रा.जी.डी.बोर्डे, गोरडे मनिषा, सहयोगी प्राध्यापक, कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कोल्हार*

***How to cite this article:***
*बोर्डे, . जी . डी ., & गोरडे, . मनिषा . (2025). उत्तर महाराष्ट्रातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे (APMC) विपणन कामकाज: एक समीक्षात्मक अभ्यास. Journal of Research & Development, 17(8(II)), 88–92.* https://doi.org/10.5281/zenodo.17232193

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

तथापि, मध्यस्थांचे वर्चस्व, अपुर्या पायाभूत सुविधा, डिजिटल तंत्रज्ञानाचा मर्यादित वापर, आणि बाजारभावातील अस्थिरता यामुळे APMC ची कार्यक्षमता प्रभावित होत आहे. हा अभ्यास उत्तर महाराष्ट्रातील APMC च्या संरचना, विपणन प्रक्रिया, आर्थिक योगदान, आव्हाने आणि सुधारणा उपाय यावर प्रकाश टाकतो. तसेच, ई-नाम, सहकारी शेती मॉडेल, आणि आधुनिक कोल्ड स्टोरेज सुविधा यांसारख्या नवीन पद्धतींचा APMC च्या भविष्यातील विकासासाठी कसा उपयोग होऊ शकतो, याची चर्चा केली आहे. शेतकऱ्यांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी APMC चे रूपांतर एक स्पर्धात्मक आणि किसान-हितैषी व्यवस्थेमध्ये कसे करता येईल, हे या निबंधाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

**APMC ची रचना आणि उद्देश:**

उत्तर महाराष्ट्रातील APMC ची स्थापना शेतमालाच्या नियोजित आणि पारदर्शक विपणनासाठी झाली आहे. प्रत्येक बाजार समितीत संचालक मंडळ असते, ज्यामध्ये शेतकरी, व्यापारी, हमाल आणि सरकारी प्रतिनिधींचा समावेश असतो. उदाहरणार्थ, नाशिक APMC ची स्थापना १८ जुलै १९८५ रोजी झाली असून, त्यात २६ गावांचा समावेश आहे. जळगाव APMC केळी आणि कापूस विपणनासाठी प्रसिद्ध आहे, तर धुळे आणि नंदुरबार कांदा आणि मक्यासाठी ओळखले जातात. या समित्या शेतमालाची प्रतवारी, साठवणूक, वाहतूक आणि विक्री प्रक्रिया नियंत्रित करतात.APMC चा मुख्य उद्देश शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालाला योग्य भाव मिळवून देणे, मध्यस्थांचे शोषण थांबवणे आणि बाजारपेठेत स्पर्धात्मक वातावरण निर्माण करणे हा आहे. या समित्यांवर तालुका स्तरावर सहाय्यक निबंधक, जिल्हा स्तरावर उपनिबंधक आणि राज्य स्तरावर पणन संचालक यांचे नियंत्रण असते. स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून APMC ला स्वायत्तता असते आणि त्या नियंत्रित बाजारपेठ (मार्केट यार्ड) उपलब्ध करतात, जिथे लिलाव पद्धतीने माल विकला जातो. उदाहरणार्थ, नांदगाव APMC ची स्थापना १ नोव्हेंबर १९४८ रोजी झाली असून, त्यात ६७ गावांचा समावेश आहे.उत्तर महाराष्ट्रातील APMC चे उद्देश खालीलप्रमाणे आहेत:

1. **शेतकऱ्यांचे संरक्षण**: शेतकऱ्यांना मध्यस्थांच्या लुटीपासून वाचवणे.
2. **पारदर्शकता**: लिलाव प्रक्रियेद्वारे भाव निश्चित करणे.
3. **पायाभूत सुविधा**: साठवणूक, वाहतूक आणि प्रतवारीसाठी सुविधा पुरवणे.
4. **निर्यात प्रोत्साहन**: द्राक्ष आणि केळी यांसारख्या पिकांना जागतिक बाजारपेठेत पोहोचवणे.

या रचनेमुळे शेतकऱ्यांना बाजारातील माहिती, कर्ज सुविधा आणि विमा योजनांचा लाभ मिळतो. तथापि, काही ठिकाणी प्रशासकीय अडचणी आणि अपुऱ्या सुविधांमुळे त्यांचे उद्दिष्ट पूर्णपणे साध्य होत नाही.

**विपणन कामकाजाची प्रक्रिया:**

उत्तर महाराष्ट्रातील APMC मधील विपणन कामकाज अनेक टप्प्यांतून पार पडते:

**1.शेतमाल संकलन**: शेतकरी आपला माल मार्केट यार्डमध्ये आणतात. जळगावमध्ये केळी उत्पादक थेट APMC ला माल आणतात, तर धुळ्यात कांदा उत्पादक मोठ्या प्रमाणात सहभागी होतात.

**2.प्रतवारी आणि प्रमाणीकरण**: मालाची गुणवत्ता तपासली जाते आणि त्यानुसार प्रतवारी केली जाते. नाशिकमध्ये द्राक्षांची प्रतवारी आकार, रंग आणि साखरेच्या प्रमाणानुसार होते, ज्यामुळे निर्यातीसाठी योग्य माल निवडला जातो.

**3.लिलाव प्रक्रिया**: व्यापारी आणि खरेदीदार लिलावात भाग घेतात. धुळे आणि नाशिकमध्ये कांद्यासाठी किमान आधारभूत किंमत )MSP) निश्चित करून लिलाव होतो. हा लिलाव पारदर्शक पद्धतीने आयोजित केला जातो.

**4.साठवणूक आणि वाहतूक**: विक्रीनंतर माल कोल्ड स्टोरेज किंवा गोदामात साठवला जातो. नाशिकमध्ये द्राक्षांसाठी आधुनिक कोल्ड स्टोरेज सुविधा उपलब्ध आहेत, तर जळगावमध्ये केळींसाठी विशेष व्यवस्था आहे.

**5.वितरण**: माल स्थानिक बाजारात किंवा निर्यातीसाठी पाठवला जातो. जळगावची केळी देशभर आणि आखाती देशांत पोहोचते, तर नाशिकची द्राक्षे युरोप आणि आशियाई देशांत निर्यात होतात.या प्रक्रियेत शेतकऱ्यांना बाजार माहिती आणि कर्ज सुविधा मिळतात. नाशिक APMC ने डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारे बाजारभावाची माहितीदेण्यास सुरुवात केली आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांचा निर्णय घेण्याचा अधिकार वाढला आहे. ई-नाम (National Agriculture Market) सारख्या डिजिटल प्लॅटफॉर्मचा वापरही काही APMC मध्ये सुरू झाला आहे, ज्यामुळे ऑनलाइन लिलाव आणि व्यापार शक्य झाला आहे. उदाहरणार्थ, नाशिकमध्ये द्राक्षांचे ऑनलाइन लिलाव २०२३-२४ मध्ये यशस्वीपणे पार पडले, ज्यामुळे शेतकऱ्यांना स्थानिक व्यापाऱ्यांवर अवलंबून राहण्याची गरज कमी झाली.या प्रक्रियेत सहकारी

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

संस्थांचाही महत्त्वाचा वाटा आहे. धुळे आणि नंदुरबारमध्ये शेतकरी एकत्र येऊन माल विकतात, ज्यामुळे त्यांचा सौदेबाजीचा अधिकार वाढतो. तथापि, काही ठिकाणी अपुऱ्या साठवणूक सुविधा आणि मध्यस्थांचे वर्चस्व यामुळे ही प्रक्रिया अडचणींना सामोरे जाते.

**२०२४ पर्यंतच्या आकडेवारीनुसार उत्तर महाराष्ट्रातील APMC चे विपणन कामकाज दर्शविणारा तक्त्या**

| अ.न. | जिल्हा | APMC ची संख्या | शेतमाल विक्री (लाख टन) | आर्थिक उलाढाल (कोटी रुपये) | रोजगार निर्मिती | प्रमुख पीक | निर्यात (टक्के) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | नाशिक | १५ | ५.५ | ४,५०० | २०,००० | द्राक्ष, कांदा | ४०% |
| २. | जळगाव | १२ | ३.२ | ३,००० | १५,००० | केळी, कापूस | ३५% |
| ३. | धुळे | १० | २.८ | २,५०० | १०,००० | कांदा, मका | १५% |
| ४. | नंदुरबार | ८ | १.५ | १,२०० | ५,००० | कापूस, मका | १०% |
| ५. | अहमदनगर | १४ | ४.० | ३,५०० | १८,००० | डाळिंब, कांदा | २५% |
| **एकूण** | | **५९** | **१७** | **१४,७००** | **६८,०००** | | **२५-४०%** |

**(स्रोत: महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०२३-२४)**

**स्पष्टीकरण**:

**1.APMC ची संख्या**: उत्तर महाराष्ट्रात ५९ APMC कार्यरत आहेत, ज्यात नाशिकमध्ये सर्वाधिक (१५) आहेत.

**2.शेतमाल विक्री**: नाशिकमध्ये ५.५ लाख टन शेतमाल विक्री होते, तर नंदुरबारमध्ये १.५ लाख टन.

**3.आर्थिक उलाढाल**: एकूण १४,७०० कोटी रुपये, ज्यात नाशिक (४,५०० कोटी) आघाडीवर आहे.

**4.रोजगार**: ६८,००० लोकांना रोजगार, ज्यात हमाल, व्यापारी आणि कर्मचारी यांचा समावेश आहे.

**5. प्रमुख पीक**: द्राक्ष, केळी आणि कांदा हे प्रमुख पिके आहेत.

**6.निर्यात**: नाशिकमध्ये ४०% शेतमाल निर्यात होतो, तर नंदुरबारमध्ये फक्त १०%.

ही आकडेवारी APMC चे योगदान दर्शवते. उदाहरणार्थ, २०२३-२४ मध्ये नाशिक APMC ने १५,००० टन द्राक्षांची निर्यात केली, ज्याची किंमत १५० कोटी रुपये होती. जळगावातून १५,००० टन केळींची निर्यात झाली, ज्याची किंमत १०० कोटी रुपये होती.

**उत्तर महाराष्ट्रातील APMC ची वैशिष्ट्ये:**

उत्तर महाराष्ट्रातील APMC चे विपणन कामकाज इतर भागांपेक्षा काही बाबतीत वेगळे आहे:

**1.विविध पीक पद्धती**: या भागात द्राक्ष, केळी, कांदा, डाळिंब आणि कापूस यांसारखी नगदी पिके आहेत, ज्यामुळे विपणन प्रक्रिया जटिल आणि व्यापक आहे. उदाहरणार्थ, नाशिकमध्ये द्राक्षांचे उत्पादन आणि निर्यात हे भारतातील सर्वाधिक आहे.

**2.निर्यात केंद्र**: नाशिक आणि जळगाव हे द्राक्ष आणि केळी निर्यातीचे प्रमुख केंद्र आहेत. APMC या पिकांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत पोहोचवण्यासाठी विशेष सुविधा पुरवते, जसे की कोल्ड स्टोरेज आणि प्रमाणीकरण.

**3.आधुनिक तंत्रज्ञान**: नाशिकमध्ये ई-नामचा वापर वाढला आहे, ज्यामुळे ऑनलाइन लिलाव आणि व्यापार शक्य झाला आहे. २०२४ मध्ये नाशिक APMC ने ५०% द्राक्षांचे लिलाव डिजिटल पद्धतीने केले.

**4.सहकारी चळवळ**: धुळे आणि नंदुरबारमध्ये सहकारी संस्थांचा प्रभाव आहे. शेतकरी एकत्र येऊन माल विकतात, ज्यामुळे त्यांचा सौदेबाजीचा अधिकार वाढतो. उदाहरणार्थ, धुळ्यातील कांदा उत्पादक सहकारी संस्थांनी २०२३ मध्ये २०% जास्त भाव मिळवला.

**5.स्थानिक बाजारपेठ**: अहमदनगर आणि नंदुरबारमध्ये स्थानिक बाजारपेठेसाठी आठवडी बाजार भरतात, जिथे शेतकरी थेट ग्राहकांना माल विकतात.या वैशिष्ट्यांमुळे उत्तर महाराष्ट्रातील APMC शेतकऱ्यांना स्थानिक आणि जागतिक बाजारपेठेत स्पर्धात्मक ठेवण्यात यशस्वी ठरतात. तथापि, काही ठिकाणी डिजिटल तंत्रज्ञानाचा अवलंब कमी असल्याने सर्व शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळत नाही.

**आव्हाने:**

उत्तर महाराष्ट्रातील APMC समोर अनेक आव्हाने आहेत:

**1.मध्यस्थांचे वर्चस्व**: अनेक ठिकाणी मध्यस्थ शेतकऱ्यांना कमी भाव देतात आणि स्वतःचा नफा वाढवतात. धुळ्यात कांदा विक्रीत ही समस्या प्रकर्षाने जाणवते. २०२३ मध्ये कांदा उत्पादकांना सरासरी १५ रुपये/किलो भाव मिळाला, तर बाजारात तो ४० रुपये/किलो होता.

**2.पायाभूत सुविधांचा अभाव**: नंदुरबार आणि धुळे येथे कोल्ड स्टोरेज आणि गोदामांची कमतरता आहे, ज्यामुळे शेतमाल खराब होतो. २०२४ मध्ये नंदुरबारमध्ये १०% कापूस खराब झाला.

**3.डिजिटल अवलंबन कमी**: ई-नामचा वापर वाढत असला तरी ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना डिजिटल प्लॅटफॉर्म वापरण्याचे प्रशिक्षण नाही. नाशिक वगळता इतर जिल्ह्यांत डिजिटल लिलाव २०% पेक्षा कमी आहेत.

**4.बाजारभावातील अस्थिरता**: कांदा आणि द्राक्षांच्या भावात चढ-उतार होतात, ज्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होते. २०२३-२४ मध्ये कांद्याचे भाव १० रुपये/किलो ते ५० रुपये/किलो पर्यंत बदलले.

**5.खासगी स्पर्धा**: २०२० च्या शेतकरी कायद्यांनंतर खासगी खरेदीदारांना परवानगी मिळाल्याने APMC ची एकाधिकारशाही कमी झाली आहे. जळगावमध्ये ३०% केळी खासगी कंपन्यांनी थेट खरेदी केली.

**6.प्रशासकीय अडचणी**: काही APMC मध्ये कर्मचारी आणि निधीची कमतरता आहे, ज्यामुळे सुविधांचा विकास मंदावला आहे.

या आव्हानांमुळे शेतकऱ्यांचा APMC वरचा विश्वास कमी होत आहे. उदाहरणार्थ, नाशिकमध्ये २०% शेतकऱ्यांनी खासगी व्यापाऱ्यांना माल विकणे पसंत केले, कारण त्यांना त्वरित पैसे मिळाले.

**सुधारणा आणि भविष्य:**

APMC चे कामकाज सुधारण्यासाठी खालील उपाय सुचवता येतील:

**1.डिजिटलायझेशन**: ई-नामचा विस्तार करून सर्व APMC मध्ये ऑनलाइन लिलाव सुरू करावेत. शेतकऱ्यांना डिजिटल प्रशिक्षण द्यावे.

**2.पायाभूत सुविधा वाढ**: कोल्ड स्टोरेज आणि गोदामांची संख्या वाढवावी. २०२४ मध्ये नाशिकमध्ये १० नवीन कोल्ड स्टोरेज बांधण्याची योजना आहे, ती सर्व जिल्ह्यांत लागू करावी.

**3.MSP लागू करणे**: सर्व पिकांसाठी किमान आधारभूत किंमत निश्चित करावी आणि त्याची अंमलबजावणी काटेकोरपणे करावी.

**4.मध्यस्थांचे नियमन**: मध्यस्थांच्या नफ्यावर मर्यादा घालावी आणि त्यांची नोंदणी अनिवार्य करावी.

**5.सहकारी मॉडेल**: शेतकऱ्यांच्या सहकारी संस्थांना प्रोत्साहन द्यावे. धुळेतील यशस्वी मॉडेल राज्यभर लागू करावे.

**6.खासगी सहभाग**: APMC आणि खासगी कंपन्यांमध्ये भागीदारी करून सुविधा आणि गुंतवणूक वाढवावी.२०२४ मध्ये महाराष्ट्र सरकारने APMC साठी नवीन धोरण जाहीर केले, ज्यामध्ये डिजिटल विपणन आणि खासगी सहभागाला प्रोत्साहन देण्यावर भर आहे. या धोरणांतर्गत ५० नवीन कोल्ड स्टोरेज आणि १०० गोदामे बांधण्याची योजना आहे. तसेच, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी APMC आणि खासगी क्षेत्र यांच्यात समन्वय साधण्याचे उद्दिष्ट आहे. भविष्यात डिजिटल तंत्रज्ञान आणि आधुनिक सुविधांचा वापर वाढल्यास APMC शेतकऱ्यांना अधिक चांगले परिणाम देऊ शकतील.

**निष्कर्ष:**

उत्तर महाराष्ट्रातील APMC शेतकऱ्यांना बाजारपेठ उपलब्ध करून देतात आणि त्यांच्या शेतमालाला योग्य भाव मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. नाशिक आणि जळगाव हे निर्यातीचे प्रमुख केंद्र असून, स्थानिक अर्थव्यवस्थेत APMC चे योगदान मोठे आहे. २०२४ पर्यंतच्या आकडेवारीनुसार, या समित्यांद्वारे १७ लाख टन शेतमालाची विक्री आणि १४,७०० कोटी रुपयांची उलाढाल झाली आहे. तथापि, मध्यस्थांचे वर्चस्व, पायाभूत सुविधांचा अभाव, डिजिटल अवलंबनाची कमतरता आणि बाजारभावातील अस्थिरता यांसारख्या आव्हानांमुळे त्यांची कार्यक्षमता मर्यादित आहे.डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर, सुधारित पायाभूत सुविधा आणि सहकारी मॉडेल यांच्या माध्यमातून ही आव्हाने दूर करता येतील. २०२४ मधील नवीन धोरण हे या दिशेने एक पाऊल आहे, ज्यामुळे APMC आधुनिक आव्हानांना सामोरे जाण्यास सज्ज होऊ शकतील. शेतकऱ्यांचे हित जोपासण्यासाठी APMC आणि खासगी क्षेत्र यांच्यातील सहकार्य

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

महत्त्वाचे ठरेल. भविष्यात, जर या सुधारणा यशस्वी झाल्या, तर उत्तर महाराष्ट्रातील शेतकरी स्थानिक आणि जागतिक बाजारपेठेत अधिक चांगली कामगिरी करू शकतील आणि त्यांचे जीवनमान उंचावेल.

संदर्भ (References):

1.महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३
2.महाराष्ट्र सरकारची आर्थिक पाहणी अहवाल (२०२३-२४)
3.राष्ट्रीय कृषी बाजार (e-NAM) पोर्टल – भारत सरकार
4.नाशिक, जळगाव, धुळे APMC चे अधिकृत अहवाल
5.भारतीय कृषी संशोधन संस्था (ICAR) चे अभ्यास
6.“शेतकरी आंदोलन आणि APMC सुधारणा" – महाराष्ट्र कृषी विभाग
7."उत्तर महाराष्ट्रातील शेती व्यवस्थापन" – डॉ. शिवाजीराव निकम (कृषी अर्थशास्त्रज्ञ)
8."डिजिटल क्रांती आणि शेतीव्यवसाय" – NABARD अहवाल
9."शेतमालाचे भाव आणि बाजार यंत्रणा" – RBI चे कृषी वित्त अभ्यास
10."सहकारी शेतीचे मॉडेल: धुळे आणि नंदुरबारचा अनुभव" – महाराष्ट्र सहकारी संघटना

# Journal of Research and Development

Peer Reviewed International, Open Access Journal.

ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025


Original Article

## महाराष्ट्र विधानसभेतील महिला प्रतिनिधित्वाचा समीक्षात्मक आढावा कालखंड (१९६२ ते २०२४)


**अपर्णा जगताप[1], प्रो. डॉ.अनिल बनकर[2]**

[1](संशोधक अभ्यासक),

[2](मार्गदर्शक) वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर

**Email:** jagtapaparna39@gmail.com



**Manuscript ID:**

JRD -2025-17019

ISSN: 2230-9578

Volume 17

Issue 8( II)

Pp. 93-96

August 2025

**Submitted:** 12 July. 2025

**Revised:** 25 July. 2025

**Accepted:** 10 Aug 2025

**Published:** 30 Aug.2025



***सारांश***

*पुरोगामी भारतात महिलांची स्थिती फारशी समाधानकारक दिसून येत नाही. एकूण लोकसंख्येच्या अर्धी लोकसंख्या महिलांची असून अजूनही सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय बाबतीत त्या दुय्यम स्थानी आहेत. महिला जोपर्यंत शिक्षित होऊन आर्थिक दृष्ट्या सक्षम बनत नाही तोपर्यंत तिला राजकीय प्रतिनिधित्वाची संधी मिळणार नाही आणि तिच्या सामाजिक दर्जात बदल होणार नाही.याला महाराष्ट्रासारखे प्रगत राज्यसुद्धा अपवाद राहिलेले नाही संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर पहिल्या विधानसभा निवडणूकीत १३ महिलांना विधानसभेत निवडून जाण्याची संधी मिळाली. १९६२ ते २०२४ या कालखंडात विधानसभेतील महिला प्रतिनिधींच्या संख्येत चढउतार पाहायला मिळतो. अत्यंत खेदाने एक गोष्ट नमूद करावीशी वाटते की, स्वतंत्र महाराष्ट्र राज्याच्या इतिहासात अद्याप पर्यंत एकाही महिलेला मुख्यमंत्रीपद भूषवता आलेले नाही.*



***बीज शब्द -****प्रतिनिधित्व, महिला सक्षमीकरण, आरक्षण प्रक्रिया।*


**प्रस्तावना:**

स्त्री व पुरुष हे समाज रुपी रथाची दोन चाके आहेत. समाजरुपी रथाचे संचलन योग्य पद्धतीने होण्यासाठी दोन्ही चाके तितकीच महत्त्वाची आणि समरूप असणे आवश्यक आहे. परंतु पुरुषप्रधान भारतीय संस्कृतीत महिलेला नेहमीच दुय्यम स्थान देण्यात आले आहे. भारतीय समाज व्यवस्थेत वेगवेगळ्या कालखंडात स्त्री चे स्थान वेगवेगळे दिसते. स्त्री फक्त एक उपभोगाची वस्तू आहे. तिचे कार्यक्षेत्र उंबऱ्याच्या आत फक्त चुल व मूल इतपत मर्यादित करण्यात आहे . वास्तविक नैसर्गिक भेद हा प्रजननाच्या प्रयोजनासाठी निसर्ग नियमित आहे, तो मान्य आहे पण स्त्री ला कमी बुद्धिमत्ता असते स्त्रीचा संबंध घराण्याच्या इज्जतीशी प्रतिष्ठेशी जोडून तिला पडद्याआड ठेवण्यात समाजव्यवस्था यशस्वी झाली आहे. स्त्री ने कायम जन्मापासून ते मृत्यूपर्यंत आश्रित जीवन जगले पाहिजे. तिचे स्वतंत्र व्यक्तीमत्व नेहमीच नाकारण्यात आले. आणि प्रतिकार करण्याऐवजी आपल्या पुढच्या पिढीत ते संक्रमित करीत राहिली त्यामुळे आपसूकच पुरुषप्रधान व्यवस्थेस ते पोषक बनले. कायम आश्रित असल्यामुळे लहानपणी पित्यावर, तारुण्यात पतीवर आणि म्हातारपणी मुलांवर अवलंबून राहिलेली आहे. आधुनिक काळात परिस्थिती बदलताना दिसत आहे. समाजव्यवस्थेत पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांना स्थान असायला हवे हे आता मान्य होऊ लागले आहे. यासाठी पुरुषप्रधान संस्कृतीत महिलांना वेळोवेळी प्रतिकार करून आंदोलन करावे लागले. भारतीय संविधानातही महिला सक्षमीकरण आणि लिंगभेद नष्ट करण्यासाठी विविध तरतुदी करण्यात आल्या आहेत.


***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***

*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*



**Address for correspondence:**

*अपर्णा जगताप, संशोधक अभ्यासक, वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर*



***How to cite this article:***

*जगताप, . अपर्णा ., & बनकर, . अनिल . (2025). महाराष्ट्र विधानसभेतील महिला प्रतिनिधित्वाचा समीक्षात्मक आढावा कालखंड (१९६२ ते २०२४). Journal of Research & Development, 17(8(II)), 93–96.* *https://doi.org/10.5281/zenodo.17232262*

Quick Response Code:

Website: https://jrdrvb.org/

DOI:10.5281/zenodo.17232262

OPEN ACCESS

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

राजकीय, सामाजिक, आर्थिक न्यायाची हमी देऊन स्त्रीला प्रत्येक क्षेत्रात बरोबरीचे स्थान देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे प्रत्येक स्त्रीला राजकीय सहभाग मिळावा यासाठी प्रौढ मताधिकाराचा अवलंब करण्यात आला. राजकीय प्रतिनिधित्वात वाढ व्हावी यासाठी आरक्षणाच्या तत्त्वाचा अंगीकार करण्यात आला. सुरुवात पंचायतराज व्यवस्थेपासून करण्यात आली.

**७३वी** व **७४व्या** घटनादुरुस्तीच्या माध्यमातून पंचायतराज व्यवस्थेत महिलांना **33%** आरक्षण देण्याची तरतूद करण्यात आली. महाराष्ट्र राज्यात **११०व्या** घटना दुरुस्तीनुसार स्थानिक स्वराज्य संस्थेतील आरक्षण **५०%** करण्यात आले आहे. सध्या "**नारीशक्ती वंदन विधेयक**" मंजूर करण्यात येऊन लोकसभा व राज्यविधानसभेत महिलेला 33% आरक्षण मंजूर करण्यात आले आहे. २०२९च्या निवडणुकीपासून हे आरक्षण लागू करण्यात येणार आहे. एकंदरीत राजकीय क्षेत्रातील पुरुष मक्तेदारी मोडून स्त्री प्रतिनिधित्व वाढविण्यासाठी हे एक क्रांतिकारक पाऊल नक्कीच ठरेल. **महाराष्ट्र राज्य विधानसभा** संयुक्त महाराष्ट्र राज्याची निर्मिती **१ मे १९६०** रोजी करण्यात आली. महाराष्ट्रात द्विसदनीय विधिमंडळ कार्यरत आहे. यापैकी विधानसभेची सदस्य संख्या २८८ तर विधान परिषदेची सदस्य संख्या ७८ इतकी आहे. विधानसभेच्या अधिवेशनापैकी अर्थसंकल्पीय आणि पावसाळी अधिवेशन हे मुंबई तर हिवाळी अधिवेशन महाराष्ट्राची उपराजधानी नागपूर येथे पार पडते. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीपासून महाराष्ट्रात १९६२ ते नोव्हेंबर २०२४ पर्यंत एकूण १४ विधानसभा निवडणुका पार पडल्या.विधानसभेतील निवडणूकनिहाय एकूण सदस्यसंख्या, स्त्री-पुरुष सदस्यसंख्या तसेच स्त्री-पुरुष सदस्य संख्येची टक्केवारी खालील तक्त्यात दर्शविली आहे. उपरोक्त तक्त्यावरून स्पष्ट होते की १९६२ ते २०२४ पर्यंत महाराष्ट्र विधानसभेतील स्त्री प्रतिनिधींच्या सदस्य संख्येत अनेक चढ-उतार झालेले दिसून येतात. महाराष्ट्र राज्य विधानसभेमध्ये १९६२ ते २०२४ या काळात एकूण ३९६५ सदस्यांपैकी ३७८३ पुरुष सदस्य तर केवळ १८२ महिला सदस्य निवडून आल्या आहेत. थोडक्यात पुरुषांचे प्रमाण ९५.४०% तर स्त्रियांचे प्रमाण ४.५९% आहे. महाराष्ट्रात २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत जवळपास २२३७ उमेदवार निवडणूक रिंगणात उभे होते. त्यापैकी केवळ २३५ महिला उमेदवार होत्या १५२ मतदारसंघातून त्यांना प्रतिनिधित्व देण्यात आले होते. एकूण उमेदवारांचा विचार करता त्यांची टक्केवारी फक्त ७.३% एवढीच होती. महाराष्ट्रातील निवडणुकीच्या आजवरच्या इतिहासात म्हणजेच २४ महिला या २०१९ च्या निवडणुकीत निवडून आल्या १९६२ च्या निवडणुकीत १३ महिला निवडून आल्या. होत्या २०१९ पर्यंत हा आकडा कधीच २० च्या वर गेलेला नाही. २०१९ च्या निवडणुकीत विजयी २४ महिला आमदारापैकी १२ विद्यमान महिला आमदार पुन्हा विजयी झाल्या होत्या. त्यापैकी ८ भाजप, ३ काँग्रेस व १ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील होत्या. विधानसभेच्या २०२४ मधील निवडणुकीत ४१३६ सदस्यांनी आपले भविष्य आजमावले. त्यापैकी महिला उमेदवार ३६३ तर ३७७३ पुरुष उमेदवार होते. टक्केवारीच्या दृष्टीने विचार करता ८.८%महिला उमेदवारांनी निवडणूक लढवली त्यापैकी सत्ताधारी पक्षाच्या २० तर विरोधी पक्ष काँग्रेसची एकमेव महिला उमेदवार ज्योती गायकवाड (धारावी) अश्या २१ महिला उमेदवार निवडून आल्या. भाजपच्या सर्वाधिक १४ उमेदवार विजयी झाल्या त्यात १० महिला या विद्यमान आमदार होत्या.

**विधानसभा निवडणूक २०२४-विजयी महिला उमेदवार, त्यांचे मतदार क्षेत्र आणि पक्ष**

| अ क्र | निर्वाचित महिला आमदार | निर्वाचन क्षेत्र | पक्षाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | श्वेता महाले | चिखली | भा. ज. पा. |
| २ | मेघना बोर्डीकर | जिंतूर | भा. ज. पा. |
| ३ | देवयानी फरांदे | नाशिक | भा. ज. पा. |
| ४ | सीमा हिरे | नाशिक पश्चिम | भा. ज. पा. |
| ५ | मंदा म्हात्रे | बेलापूर | भा. ज. पा. |
| ६ | मनीषा चौधरी | दहिसर | भा. ज. पा. |
| ७ | विद्या ठाकूर | गोरेगाव | भा. ज. पा. |
| ८ | माधुरी मिसाळ | पर्वती | भा. ज. पा. |
| ९ | मोनिका राजळे | शेवगाव | भा. ज. पा. |
| १० | नमिता मुंदडा | केज | भा. ज. पा. |
| ११ | श्रीजया चव्हाण | भोकर | भा. ज. पा. |
| १२ | सुलभा गायकवाड | कल्याण | भा. ज. पा. |
| १३ | स्नेहा पंडित | वसई | भा. ज. पा. |
| १४ | अनुराधा चव्हाण | फुलंब्री | भा. ज. पा. |
| १५ | मंजुळा गावित | साक्री | शिवसेना (शिंदे गट) |
| १६ | संजना जाधव | कन्नड | शिवसेना (शिंदे गट) |
| १७ | सुलभा खोडके | अमरावती | राष्ट्रवादी (अ.प.गट) |
| १८ | सरोज अहिरे | देवळाली | राष्ट्रवादी (अ.प.गट) |
| १९ | सना मलिक | अणुशक्ती नगर | राष्ट्रवादी (अ.प.गट) |
| २० | आदिती तटकरे | श्रीवर्धन | राष्ट्रवादी (अ.प.गट) |
| २१ | ज्योती गायकवाड | धारावी | काँग्रेस |

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

| अ. क्र. | वर्ष | एकूण सदस्य | पुरुष सदस्य | महला सदस्य | पुरुष सदस्य टक्केवारी | महिला सदस्य टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १९६२ | २६४ | २५१ | १३ | ९५.७% | ४.९२% |
| २ | १९६७ | २७० | २६१ | ०९ | ९६.६६% | ३.३३% |
| ३ | १९७२ | २७० | २७० | ०० | १००% | ००% |
| ४ | १९७८ | २८८ | २८० | ०८ | ९७.२२% | २.७७% |
| ५ | १९८० | २८८ | २६९ | १९ | ९३.४०% | ६.५९% |
| ६ | १९८५ | २८८ | २७२ | १६ | ९४.४४% | ५.५५% |
| ७ | १९९० | २८८ | २८२ | ०६ | ९७.९१% | २.०८% |
| ८ | १९९५ | २८८ | २७७ | ११ | ९६.१८% | ३.८१% |
| ९ | १९९९ | २८८ | २७६ | १२ | ९५.८३% | ४.१६% |
| १० | २००४ | २८८ | २७६ | १२ | ९५.८३% | ४.१६% |
| ११ | २००९ | २८८ | २७७ | ११ | ९६.१८% | ३.८१% |
| १२ | २०१४ | २८८ | २६८ | २० | ९३.०६% | ६.९४% |
| १३ | २०१५ | २८८ | २६४ | २४ | ९१.६६% | ८.३३% |
| १४ | २०१९ | २८८ | २६६ | २२ | ९२.३६% | ७.६३% |

२०१९ च्या तुलनेत महिला प्रतिनिधींची संख्या घटली असून २४ वरून २१ वर आलेली आहे. विजयी महिला उमेदवारांची टक्केवारी ७.६३% इतकी सांगता येईल लाडकी बहीण योजनेसारख्या असंख्य योजना राज्यातील सरकारने आणलेल्या असताना महिला केंद्रित निवडणुका होत असल्या तरीही राज्यातून महिला उमेदवारांना संधी देण्यास विविध राजकीय पक्षांकडून आजही आखडता हात घेतला जात आहे. अपक्ष महिला उमेदवारही निवडणुकीच्या रिंगणात उतरण्यास इच्छुक नाहीत.

**महाराष्ट्र राज्यातील विविध पदांवर महिलांना संधी**

महाराष्ट्र राज्याच्या इतिहासात अद्याप पर्यंत एकही महिला मुख्यमंत्री किंवा उपमुख्यमंत्री झालेली नाही. महाराष्ट्र राज्य विधानसभा अध्यक्ष, उपाध्यक्ष तसेच विधानपरिषद अध्यक्ष या पदापर्यंत एकही महिला पोहोचू शकली नाही. १९६२ते ६४ या कालखंडात श्रीमती विजयालक्ष्मी पंडित या महाराष्ट्राच्या राज्यपालपदी विराजमान होणाऱ्या पहिल्या आणि एकमेव महिला आहेत. तर विधानपरिषद उपसभापती पदी १९५५ ते १९६२ या काळात जे. पी. सिपाहीमुलांनी आणि नोव्हेंबर २०१९ पासून शिवसेनेच्या नीलम गोरे यांची निवड झाली आहे'

**महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळातील स्त्रियांचा सहभाग**

महाराष्ट्र राज्य विधिमंडळामध्ये १९६२ ते २००९ या कालावधीत एकूण ४७० सदस्यांनी कॅबिनेट मंत्रीपद भूषवले त्यापैकी पुरुष आमदारांची संख्या ४५१ तर महिला आमदारांची १९ संख्या इतकी होती. तसेच राज्यात ३०५ आमदार हे राज्यमंत्री झाले आहेत त्या पैकी २८२ पुरुष आमदारांना आणि केवळ २३ महिला आमदारांना राज्यमंत्री पद मिळाले आहे.एकूण ४८ आमदारांना उपमंत्रीपद मिळाले. त्यापैकी पुरुष उपमंत्र्यांची संख्या ४६ तर महिला उपमंत्र्यांची संख्या २ इतकी होती. २०१२ ला पृथ्वीराज चव्हाण यांच्या मंत्रिमंडळात एकूण ३४ मंत्र्यांचा समावेश होता त्यापैकी केवळ १ महिला सदस्य वर्षा गायकवाड महिला व बालविकास खात्याच्या मंत्री होत्या. हे प्रमाण पुरुषांच्या तुलनेत 3% इतके नगण्य होते. २०१४ ते २०१९ या कालखंडात देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळात पंकजा मुंडे कॅबिनेट मंत्री तर विद्या ठाकूर या राज्यमंत्री या पदावर कार्यरत होत्या. डिसेंबर २०१९ च्या उद्धव ठाकरे यांच्या मंत्रिमंडळाच्या पहिला शपथविधीत सहा कॅबिनेट मंत्र्यांनी शपथ घेतली त्यात एकही महिलेला स्थान नव्हते नंतर डिसेंबर २०१९ च्या मंत्रिमंडळ विस्तारात ३२ कॅबिनेट व १० राज्यमंत्र्यांचा शपथविधी झाला त्यात यशोमती ठाकूर, श्रीमती वर्षा गायकवाड यांना कॅबिनेट मंत्रीपद तर आदिती तटकरे यांना राष्ट्रवादी कॉंग्रेसकडून संधी मिळाली शिवसेना पक्षाकडून एकही महिला उमेदवाराला संधी मिळाली नाही. त्यानंतरच्या भाजप एकनाथ शिंदे शिवसेना यांच्या मंत्रिमंडळात एकही महिलेला मंत्रिमंडळात स्थान मिळालेले नाही. नुकत्याच पार पडलेल्या नोव्हेंबर २०२४च्या निवडणुकीत महायुतीचे सरकार सत्तेवर आले. देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री तर अजित पवार आणि एकनाथ शिंदे हे उपमुख्यमंत्री झाले. भाजपच्या वाटेला १६ कॅबिनेट आणि ३ राज्यमंत्री शिवसेनेच्या वाट्याला ९ कॅबिनेट व २ राज्यमंत्रीपद तर राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गट ८ कॅबिनेट व १ राज्यमंत्रीपद आले. त्यात अजित पवार गटाच्या अदिती तटकरे यांना महिला बालविकास खात्याचे मंत्रीपद तर पंकजा मुंडे यांना पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री हे कॅबिनेट दर्जाचे मंत्रीपद मिळालेले आहे तर राज्यमंत्रीपदी माधुरी मिसाळ सामाजिक न्याय व वैद्यकीय शिक्षण व मेघना बोर्डीकर सार्वजनिक आरोग्य कुटुंब कल्याण व पाणीपुरवठा यांची वर्णी लागलेली आहे.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

**निष्कर्ष**

1. महाराष्ट्र राज्य विधानसभेतील स्त्री सदस्य संख्या ८.३३% पेक्षा पुढे गेलेली नाही.
2. महिलांना राजकारणात किमान ३३% आरक्षण असावे हा विचार करता २८८ च्या ३३% म्हणजे ९५ महिला आमदार विधानसभेत असणे अपेक्षित आहे.
3. महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळात महिलांना पुरेशी संधी मिळालेली नाही.
4. महाराष्ट्र राज्याच्या राजकीय इतिहासात महिलांचे योगदान असले तरी आजपर्यंत राज्याच्या मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री तसेच विधानसभा अध्यक्ष उपाध्यक्ष व विधान परिषद उपाध्यक्षपदी एकाही महिलेची वर्णी लागलेली दिसून येत नाही.
5. .राज्याच्या राजकारणात स्वतंत्रपणे स्त्री प्रतिनिधित्व करू शकतील अशा स्त्री नेतृत्वाचा अभाव आहे जे ही स्त्री नेतृत्व प्रस्थापित आहे ते एकतर घराणेशाही किंवा पुरुषी पाठिंबावर टिकून असलेले दिसते.

**संदर्भसूची:-**

1. यादव विरेन्द्रसिंह,संशक्तीकरण की ओर बढते भारतीय महिलाओ के स्वरणीम कदम, विस्ता इंटरनॅशनल,दिल्ली
2. पवार वैशाली,महिलांच्या सत्ता संघर्षाचा आलेख,डायमंड प्रकाशन २०१४,पुणे
3. नतानी शोभा,भारतीय समाज और नारी,दशा एव दिशा,मार्क्स पब्लिकेशन २०१०,जयपूर
4. फडके य. दि. लोकसभा निवडणुका १९५२ ते १९९९, अक्षर पब्लिकेशन १९९९,मुंबई
5. http://maha.gov.in
6. http://eci.com

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

Original Article

# सूक्ष्म, लघु मध्यम उपक्रम क्षेत्र - राज्यनिहाय गुंतवणुकीचे विश्लेषण

**सकटे निलम मोहन**
Assistant Professor in Commerce (SMDL College, Kalamboli)
**Email-:** nilamsakate2013@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2025-170820
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 8 (II)
Pp. 96-101
August 2025
**Submitted:** 12 July. 2025
**Revised:** 25 July. 2025
**Accepted:** 10 Aug 2025
**Published:** 30 Aug.2025

***सारांश***

*भारताच्या औद्योगिक विकासात सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रम (MSME) क्षेत्राचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. देशातील बेरोजगारी कमी करणे, स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, आणि ग्रामीण भागाचा आर्थिक विकास साधणे यामध्ये या क्षेत्राची भूमिका मोलाची आहे. या शोधनिबंधात MSME क्षेत्रातील राज्यनिहाय गुंतवणुकीचे विश्लेषण करण्यात आले आहे.*

*2006 मध्ये संमत झालेल्या MSME Development Act नुसार उद्योगांचे वर्गीकरण सूक्ष्म, लघु आणि मध्यम अशा तीन श्रेणींमध्ये करण्यात आले असून, 2020 पासून नवीन निकषांनुसार गुंतवणूक व उलाढाल हे मूल्यमापनाचे मुख्य आधार मानले गेले आहेत. या अध्ययनात 2024 या वर्षातील MSME क्षेत्राशी संबंधित गुंतवणूक आकडेवारीचा अभ्यास केला असून, विविध गुंतवणूक श्रेणींमधील उद्योगांचे प्रमाण व त्यातील असमतोल स्पष्ट करण्यात आले आहेत.*

*संशोधनासाठी दुय्यम स्त्रोतांवर आधारित वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. अभ्यासातून असे दिसून येते की भारतात सूक्ष्म उद्योगांचे प्रमाण सर्वाधिक असून, मध्यम उद्योग तुलनेने कमी आहेत. विविध गुंतवणूक श्रेणींमध्ये सूक्ष्म उद्योगांमध्ये अधिक गुंतवणूक झाली आहे.*

*या विश्लेषणाच्या आधारे स्वयंरोजगाराच्या संधी, उद्योजकतेला चालना, तसेच राज्यनिहाय MSME धोरणनिर्मिती यासाठी काही महत्त्वाच्या शिफारसी करण्यात आल्या आहेत. हे संशोधन विद्यार्थी, उद्योजक, धोरणकर्ते आणि संशोधक यांच्यासाठी उपयुक्त ठरते.*

***सूचनक शब्द :*** *MSME (Micro, Small and Medium Enterprises) सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रम.*

**प्रस्तावना:**

सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम क्षेत्र भारताच्या औद्योगिक क्षेत्रांमध्ये सूक्ष्म लघु मध्य उपक्रमाचे खूप मोठे योगदान आहे भारताच्या स्वातंत्र्यपूर्व काळात आणि स्वातंत्र्योत्तर काळात यांचा विचार करता सूक्ष्म लघुउद्योग क्षेत्राचा खूप मोठा परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेला दिसून येतो हे एक गतिमान व परिवर्तन शील क्षेत्र आहे या क्षेत्रामुळे उद्योजकतेच्या विकासात भर पडली स्वातंत्र्यप्राप्ती नंतर भारतासमोर बरेच प्रश्न होते त्यापैकी एक म्हणजे बेरोजगारी हे क्षेत्र देशभरात लाखो लोकांना रोजगाराच्या संधी देऊन देशाच्या विकासाची सामाजिक उद्दिष्टे पूर्ण करण्याचे महत्त्वाचे कार्य करते. 2006 पूर्वी या क्षेत्राला लघु उद्योग क्षेत्र म्हणून ओळखले जात होते. 2006 नंतर या क्षेत्राची व्याप्ती तसेच महत्त्व आणि या क्षेत्राचे अर्थव्यवस्थेमध्ये असणारे योगदान ओळखून या क्षेत्राची व्याख्या व व्याप्ती यांच्यामध्ये विस्तार करण्यात आला.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI:10.5281/zenodo.17232322
OPEN ACCESS

**Address for correspondence:**
*सकटे निलम मोहन, Assistant Professor in Commerce (SMDL College, Kalamboli)*

**How to cite this article:**
*मोहन, . सकटे . निलम . (2025). सूक्ष्म, लघु मध्यम उपक्रम क्षेत्र - राज्यनिहाय गुंतवणुकीचे विश्लेषण. Journal of Research & Development, 17(8(II)), 97–101. https://doi.org/10.5281/zenodo.17232322*

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

त्यासाठी सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रम विकास अधिनियम 2006 हा कायदा संमत करण्यात आला. Micro, Small & medium Enterprises development Act 2006 हा कायदा 2 ऑक्टोबर 2006 पासून संपूर्ण देशभर लागू करण्यात आला. 1 जुलै 2020 पासून सूक्ष्म, लघु, मध्यम उपक्रमांसाठी नवीन निकष केंद्र सरकारने जाहीर केले. त्यात गुंतवणूक आणि उलाढाल या दोन निकषांचा विचार करण्यात आला. वस्तू उत्पादक आणि सेवाप्रदाता यासाठी सारखेच निकष ठेवण्यात आलेले आहेत.

**1.2. अर्थ:** सूक्ष्म उपक्रम - प्रकल्प व यंत्रसामुग्री किंवा साधने यामधील गुंतवणूक एक कोटी किंवा एक कोटी पेक्षा कमी आणि उलाढाल पाच कोटी किंवा त्यापेक्षा कमी गुंतवणूक असणारे उपक्रम या प्रकल्पामध्ये समाविष्ट केले जातात. लघु उपक्रम ( Small Enterprises )- गुंतवणूक दहा कोटी किंवा त्यापेक्षा कमी आणि त्यामध्ये असणारी उलाढाल 50 कोटी किंवा त्यापेक्षा कमी असे उपक्रम लघुउपक्रम यामध्ये मोडले जातात. मध्यम उपक्रम (Medium Enterprises )- ज्या उपक्रमांमध्ये प्रकल्प यंत्रसामग्री किंवा साधने यातील गुंतवणूक पाच कोटी किंवा त्यापेक्षा कमी आणि उलाढाल अडीचशे कोटी किंवा त्यापेक्षा कमी असे उपक्रम या उपक्रमांमध्ये मध्ये मोडले जातात.

**1.3. महत्व:**

1. सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग हे भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा मानले जातात. या संशोधनातून या क्षेत्राने देशाच्या आर्थिक विकासात आणि रोजगार निर्मितीत दिलेले योगदान अधोरेखित होते.
2. विविध गुंतवणूक श्रेणींमध्ये भारतातील राज्ये व केंद्रशासित प्रदेशांमध्ये किती गुंतवणूक झाली आहे, याचे विश्लेषण मिळते. त्यामुळे कोणत्या राज्यांमध्ये MSME क्षेत्र मजबूत आहे हे स्पष्ट होते.
3. कोणत्या गुंतवणूक श्रेणीत सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांचे प्रमाण किती आहे हे आकडेवारीद्वारे समजते, जे धोरण आखणीसाठी उपयुक्त आहे.
4. केंद्र व राज्य सरकार MSME क्षेत्रासाठी नवी धोरणे तयार करताना या संशोधनातील आकडेवारी आणि विश्लेषणाचा वापर करू शकतात.
5. MSME क्षेत्रामध्ये असलेल्या रोजगार निर्मितीच्या व स्वयंरोजगाराच्या संधींचा अभ्यास या संशोधनातून करता येतो.
6. वाणिज्य, अर्थशास्त्र आणि उद्योग व्यवस्थापन या विषयातील विद्यार्थ्यांसाठी व संशोधकांसाठी उपयुक्त माहितीचा स्रोत ठरतो.
7. सूक्ष्म उद्योगांमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक झालेली असताना मध्यम उद्योग तुलनात्मकदृष्ट्या कमी असल्याचे आढळते, जे भविष्यातील विकासाचे दिशा ठरवण्यासाठी महत्त्वाचे आहे.

**1.4. उद्दिष्टे:**

1. सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमाद्वारे राज्यनिहाय गुंतवणुकीचा अभ्यास करणे.
2. राज्यनिहाय गुंतवणुकीचा अभ्यास करून त्याचे विश्लेषण करणे.
3. सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमाद्वारे स्वयंरोजगारासाठी तसेच रोजगार निर्मितीसाठी असणाऱ्या संधींचा आढावा घेणे.

**1.5. संशोधन पद्धती:** प्रस्तुत शोधनिबंधामध्ये माहितीचे संकलन दुय्यम स्त्रोतांद्वारे करण्यात आले आहे. त्यासाठी सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमाचे अधिकृत संकेतस्थळ तसेच शासकीय अहवाल यांचा समावेश केलेला आहे. दिलेल्या माहितीचे विश्लेषण करण्यासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा (Descriptive Research Method) वापर करण्यात आलेला आहे.

**1.6. अभ्यासाच्या मर्यादा:**

1. संबंधित आकडेवारी ही सूक्ष्म, लघु मध्यम उद्योग उपक्रमाच्या संकेतस्थळावरून घेतलेली असून यामध्ये 2024 च्या आकडेवारीचा समावेश करण्यात आला आहे.
2. या उपक्रमांमध्ये भारतातील राज्य तसेच केंद्रशासित प्रदेशातील फक्त गुंतवणुकीचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

**2. सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग उपक्रमांमध्ये भारतातील राज्य तसेच केंद्रशासित प्रदेशातील गुंतवणुक**

0 ते 5 लाख गुंतवणूक श्रेणीमध्ये सर्वाधिक गुंतवणूक सूक्ष्म उपक्रमांची आहे म्हणजेच दोन कोटींपेक्षा अधिक दोन कोटींपेक्षा अधिक गुंतवणूक करण्यात आलेली दिसून येते. त्याखालोखाल लघुउद्योगांमध्ये असलेली गुंतवणूक लाखोंच्या घरात असल्याचे दिसून येते तसेच मध्यम उद्योगांमध्ये असलेली गुंतवणूक हजारोंच्या घरात असल्याचे आढळून येते. वरील तक्त्यावरून असे कळून येते की मध्यम उद्योगांमध्ये असणारी गुंतवणूक सर्वात कमी आहे.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

वरील तक्त्याच्या आधारे 5 ते 25 लाख या द्वितीय गुंतवणूक श्रेणीमध्ये सर्वाधिक गुंतवणूक सूक्ष्म उद्योगांचे असून ती 17 लाखांपेक्षा जास्त आहे. 25 ते 50 लाख या तृतीय गुंतवणूक श्रेणीमध्ये सर्वाधिक गुंतवणूक सूक्ष्म उपक्रमांमध्ये व सर्वात कमी मध्यम उपक्रमांमध्ये झालेली दिसून येते. 50 लाख 1 कोटी या चतुर्थ गुंतवणूक श्रेणीमध्ये सर्वाधिक सूक्ष्म उद्योगांमध्ये गुंतवणूक झालेली आढळून येते ती म्हणजेच एक लाखापेक्षा अधिक असल्याचे कळते. 1 कोटी ते 5 कोटी गुंतवणूक श्रेणीमध्ये सर्वाधिक गुंतवणूक लघु उद्योगांमध्ये एक लाखाहून अधिक झालेली आढळून येते तसेच सूक्ष्म उद्योगांमध्ये असणारी गुंतवणूक ही फक्त 5 उद्योगांइतकीच आहे.

**तक्ता क्रमांक 1**

**सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग उपक्रम**

**भारतातील राज्य तसेच केंद्रशासित प्रदेशातील गुंतवणुक**

| गुंतवणूक श्रेणी | सूक्ष्म | लघु | मध्यम उद्योग | एकूण |
|---|---|---|---|---|
| 0 ते 5 लाख | 2,95,40,452 (99.2216) | 2,24,121(0.7527) | 7,604 (0.02554) | 2,97,72,177 (100) |
| 5 लाख ते 25 लाख | 17,36,366 (88.69) | 2,11,341(10.79) | 10,014 (0.51) | 19,57,721(100) |
| 25 लाख ते50 लाख | 2,55,824 (74.13) | 81,621(23.65) | 7,641(2.21) | 3,45,086 (100) |
| 50 लाख ते 1 कोटी | 1,13,307 (62.83) | 59,275 (32.87) | 7,737 (4.29) | 1,80,319 (100) |
| 1कोटी ते 5 कोटी | 5 (0.0031) | 1,42,149 (89.68) | 16,350 (10.31) | 1,58,504 (100) |
| 5 कोटी ते10 कोटी | 1 (0.0049) | 14,275 (70.71) | 5,910 (29.27) | 20,186 (100) |
| 10 कोटी ते 50कोटी | - | - | 13,757 (100) | 13,757 (100) |

वरील आकडेवारी सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग उपक्रम वार्षिक अहवाल 2024 25 पान क्रमांक 31 यावरून घेण्यात आलेली आहे.

टीप - कंसातील आकडेवारी एकूण संख्येची टक्केवारी दर्शविते.

10 कोटी ते 50 कोटी गुंतवणूक श्रेणीमध्ये सर्वाधिक गुंतवणूक 13 हजारांपेक्षा अधिक फक्त मध्यम उद्योगांमध्ये झालेले आढळून येते . सूक्ष्म व लघु उद्योगांसाठी कोणतीही गुंतवणूक झालेली आढळून येत नाही.

**3. स्वयंरोजगारासाठी उपलब्ध संधी:**

सर्वात जास्त गुंतवणूक 0 ते 5 लाख या श्रेणीत झाली असून, ती मुख्यतः सूक्ष्म उद्योगांमध्ये आहे. याचा अर्थ असा की कमी भांडवलातही व्यवसाय सुरू करता येतो ही स्वयंरोजगारासाठी मोठी संधी आहे. MSME क्षेत्रात सेवा देणारे व्यवसायही मोठ्या प्रमाणात येतात. उदाहरणे: ब्यूटी पार्लर, रिपेअरिंग सेंटर्स, डिजिटल सेवा केंद्र, टेलरिंग युनिट, मोबाईल/कम्प्युटर रिपेअरिंग, होम ट्यूशन यासारख्या उद्योगांचा समावेश होतो. स्थानिक पातळीवर उत्पादन करणारे लघु उद्योग उभारून स्वतःचा व्यवसाय सुरू करता येतो. MSME योजनांमुळे महिलांना कौशल्यावर आधारित व्यवसायासाठी भांडवल व प्रशिक्षण मिळते. महिला बचत गट, स्वयं-सहायता गट यांच्यामार्फत अनेक संधी खुल्या आहेत. डिजिटल मार्केटिंग, सोशल मीडिया मॅनेजमेंट, फ्रीलान्सिंग, ऑनलाईन टिचिंग, ग्राफिक डिझाइनिंग यासारखे व्यवसाय अल्प गुंतवणुकीत सुरू करता येतात. PMEGP, MUDRA, Stand Up India, Startup India, Udyam Portal या योजनांमुळे व्यवसाय सुरू करण्यासाठी आर्थिक मदत मिळू शकते. ही वित्तीय मदत नवउद्योजकांसाठी एक मोठी संधी आहे. ग्रामीण भागातील लोकांसाठी अन्न प्रक्रिया उद्योग, डेअरी, शेती उपकरणे दुरुस्ती, सेंद्रिय खते यासारख्या क्षेत्रांमध्ये स्वयंरोजगार उपलब्ध होतो. MSME उद्योग बहुतेक वेळा स्थानिक ग्राहकांवर आधारित असतात. यामुळे गाव किंवा शहराच्या पातळीवरच व्यवसाय टिकवता येतो, स्थलांतर टाळता येते. Amazon, Flipkart, Meesho, Shopify सारख्या प्लॅटफॉर्मवरून लघु व सूक्ष्म उत्पादने विकता येतात. घरबसल्या व्यवसाय सुरू करून जागतिक बाजारपेठेपर्यंत पोहोचता येते. MSME क्षेत्रामुळे कमी गुंतवणुकीत, स्थानिक पातळीवर, विविध स्वरूपाचे व्यवसाय सुरू करण्याच्या भरपूर संधी उपलब्ध आहेत. हे क्षेत्र केवळ नोकरी मिळवण्याचे नव्हे, तर **नोकरी देणारे** नागरिक घडवण्याचे सामर्थ्य बाळगते.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

**निष्कर्ष :**

1. **सूक्ष्म उद्योगांचा मोठा वाटा:**
   अभ्यासानुसार, भारतातील MSME क्षेत्रामध्ये सर्वाधिक गुंतवणूक ही सूक्ष्म उद्योगांमध्ये झाली आहे, विशेषतः 0 ते 5 लाख या गुंतवणूक श्रेणीत. हे क्षेत्र छोटे पण व्यापक आहे.
2. **मध्यम उद्योगांचा सहभाग तुलनेने कमी:**
   मध्यम उद्योगांमध्ये गुंतवणूक लक्षणीय प्रमाणात कमी असून, या क्षेत्राची वाढ मर्यादित आहे. हे एक चिंताजनक चित्र आहे.
3. **राज्यनिहाय गुंतवणुकीत असमतोल:**
   राज्य व केंद्रशासित प्रदेशांमध्ये MSME क्षेत्रातील गुंतवणुकीत असमतोल दिसून येतो. काही राज्ये आघाडीवर असून काही राज्यांमध्ये गुंतवणूक नगण्य आहे.
4. **स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध:**
   MSME क्षेत्रातून मोठ्या प्रमाणात स्वयंरोजगार निर्माण झाला आहे. कमी भांडवलात व्यवसाय सुरू करता येण्याची संधी असलेल्या या क्षेत्रामुळे अनेक तरुण उद्योजक घडत आहेत.
5. **सरकारच्या धोरणांचा प्रभाव:**
   MSME Development Act 2006 व 2020 मधील नवीन वर्गवारी यामुळे उद्योग सुरू करणे आणि नोंदणी प्रक्रिया सुलभ झाली आहे, ज्यामुळे उद्योगांना प्रोत्साहन मिळाले आहे.

**शिफारसी :**

1. **मध्यम उद्योगांसाठी अधिक प्रोत्साहन योजना लागू कराव्यात:**
   मध्यम उद्योगांचा वाटा वाढवण्यासाठी विशेष आर्थिक सवलती, कर सवलती आणि तांत्रिक सहाय्य पुरवावे.
2. **राज्यस्तरावर MSME जागरूकता मोहीम राबवावी:**
   ज्याठिकाणी MSME गुंतवणूक कमी आहे तिथे प्रशिक्षण, मार्गदर्शन व प्रचार यामार्फत उद्योग क्षेत्रात नागरिकांचा सहभाग वाढवावा.
3. **स्वयंरोजगारासाठी प्रशिक्षण व कौशल्य विकास कार्यक्रम वाढवावेत:**
   ग्रामीण व शहरी भागातील युवक-युवतींसाठी MSME उद्योग सुरू करण्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रम, EDPs (Entrepreneurship Development Programmes) चालवावेत.
4. **महिलांसाठी विशेष MSME धोरण तयार करावे:**
   महिलांना उद्योगासाठी भांडवल, प्रशिक्षण, बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी स्वतंत्र MSME महिला उद्योजिका धोरण राबवावे.
5. **डिजिटल पायाभूत सुविधा मजबूत कराव्यात:**
   MSME उद्योगांना ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर आणण्यासाठी डिजिटल मार्केटिंग, ई-कॉमर्स, डिजिटल पेमेंट प्रणालीबाबत प्रशिक्षण द्यावे.
6. **सहज व पारदर्शक कर्जपुरवठा प्रणाली विकसित करावी:**
   बँकांनी सूक्ष्म व लघु उद्योजकांसाठी कर्ज प्रक्रिया जलद व पारदर्शक ठेवावी. MUDRA, PMEGP सारख्या योजनांची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवावी.
7. **उद्योगांसाठी एकात्मिक सल्लागार केंद्रे स्थापन करावीत:**
   उद्योग सुरू करण्यासाठी कायदेशीर, आर्थिक व विपणन सहाय्य देणारी केंद्रे प्रत्येक जिल्ह्यात असावीत.
8. MSME क्षेत्र भारतातील आर्थिक विकासाचा एक महत्त्वाचा स्तंभ आहे. या क्षेत्रातून लाखो लोकांना रोजगार मिळत असून स्वयंरोजगारासाठी अपार संधी आहेत. या क्षेत्राला योग्य धोरण, सहाय्य व मार्गदर्शन दिल्यास ते आर्थिक स्वावलंबन आणि सामाजिक स्थैर्य साध्य करण्यात मोलाचे योगदान देऊ शकते.

**Journal of Research and Development**
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

**संदर्भसूची**

1. कोळंबे **आर., (२०२४), भारतीय अर्थव्यवस्था, भगीरथ प्रकाशन, पान क्र.** 421
2. https://msme.gov.in/hi/about-us
3. https://msme.gov.in/sites/default/files/MSME-ANNUAL-REPORT-2024-25-ENGLISH.pdf
4. सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग उपक्रम वार्षिक अहवाल 2024 25 पान क्रमांक 31

# Journal of Research and Development

Peer Reviewed International, Open Access Journal.

ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025


Original Article

# स्मार्ट प्रकल्पांतर्गत राबविण्यात आलेल्या उपप्रकल्पांचे वर्णनात्मक अध्ययन. विशेष संदर्भ - उत्तर महाराष्ट्र


**राठोड अंकिता एकनाथ[1] प्रो. डॉ. सौ. सनानसे कांचन[2]**

[1,2]संशोधन केंद्र: गोखले एड्युकेशन सोसायटी आर. एन. सी., जे. डी. बी. कॉमर्स कॉलेज आणि एन. एस. सी. सायन्स महाविद्यालय, नाशिकरोड.

**Email:**-jadhavankita771@gmail.com



**Manuscript ID**:

JRD -2025-170821

ISSN: 2230-9578

Volume 17

Issue 8 (II)

Pp. 102-109

August 2025

**Submitted:** 12 July. 2025

**Revised:** 25 July. 2025

**Accepted:** 10 Aug 2025

**Published:** 30 Aug.2025



***गोषवारा:***

*मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्पांतर्गत बाराशे शेतकरी उत्पादक संस्थांना उपप्रकल्प उभारणीसाठी नुकतीच प्राथमिक मान्यता देण्यात आलेली आहे. त्यातील ५४१ शेतकरी उत्पादक संस्थांनी तयार केलेल्या प्रकल्पांना मंजूरी दिली आहे. महाराष्ट्र राज्यातील २०० शेतकरी उत्पादक संस्थांनी स्वहिश्याची आर्थिक उभारणी मुख्यत: बँकांकडून कर्ज घेऊन केलेली आहे. अशा शेतकरी उत्पादक संस्थांना पहिल्या हप्त्याच्या रूपात ११७ कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत. मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (स्मार्ट) ला जागतिक बँकेद्वारे अर्थसहाय्य केले जाते. या प्रकल्पाचा कालावधी सात वर्षांचा असतो. या प्रकल्पांतर्गत राज्यस्तरीय कक्षनिहाय उपप्रकल्प राबविले जातात. ०३ मार्च २०२४ रोजी पर पडलेल्या राज्यस्तरीय समितीच्या अहवालानुसार उत्तर महाराष्ट्रातील अशा कृषि कक्षांतर्गत येणाऱ्या तीन उपप्रकल्पांचा अभ्यास शोधनिबंधाद्वारे करण्यात आलेला आहे.*



***सुचनक शब्द:*** *SMART, उपप्रकल्प, उत्तर महाराष्ट्र, कृषि, जागतिक बँक, अर्थसहाय्य..*


## 1.1 प्रस्तावना:

मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (स्मार्ट–SMART) या प्रकल्पांतर्गत शेतकरी तसेच नवउद्योजक वर्गास केंद्रस्थानी ठेऊन शेतमालाच्या सर्वसमावेशक आणि स्पर्धात्मक मूल्यसाखळयांचा विकास केला जाणार आहे. प्रकल्पास जागतिक बँकेद्वारे अर्थसहाय्य केले जाते. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना देशांतर्गत तसेच जागतिक बाजारपेठेत प्रवेश मिळवून देणे आवश्यक आहे. त्यासाठी लागणाऱ्या पायाभूत सुविधा आणि तांत्रिक बाबींची पूर्तता करण्यासाठी स्मार्ट प्रकल्पांतर्गत शेतकरी संघटनांना अर्थसहाय्य केले जाते. या प्रकल्पाचा कालावधी २०२०-२१ ते २०२६-२७ असा सात वर्षांचा आहे. सध्या हा प्रकल्प मध्यावर आहे. पण कोविड महामारीमुळे या प्रकल्पाची सुरुवात जरा धीम्या गतीने झाली त्यानंतरचा कालावधी या प्रकल्पाचे महत्व, त्याची कार्यपद्धती, अनुदान प्रक्रिया समजण्यामध्ये गेला. आता या प्रकल्पाचे तीन वर्ष उर्वरित राहिलेले असताना मूल्यसाखळी विकासाच्या कार्याला गतीमान करण्यात येत आहे. या प्रकल्पाचा एकूण खर्च २१०० कोटी रूपये आहे. यात १४७० कोटी रुपयांचे जागतिक बँकेद्वारे कर्ज, महाराष्ट्र राज्य शासनाद्वारे ५६० कोटी रुपये व खाजगी उद्योग क्षेत्राच्या माध्यमातून ७० कोटी रुपये असे एकूण २१०० कोटी रुपयांचा निधी उभारलेला आहे. या निधीचे योग्य रीतीने वितरण करण्याच्या हेतूने शासनाने स्मार्ट प्रकल्पांतर्गत राज्यस्तरीय उपप्रकल्प राबविले आहेत. या उपप्रकल्पांचे प्रकल्प अंमलबजावणी कक्षांमध्ये विभागीकरण केलेले आहे. मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत वेगवेगळे कृषिव्यवसाय करणाऱ्या संस्थांसोबत स्मार्ट प्रकल्पांतर्गत उपप्रकल्प राबविण्यासंबंधी सामंजस्य करार करण्यात येतात.


***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***

*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*



Quick Response Code:

Website: https://jrdrvb.org/

DOI:10.5281/zenodo.17232372

OPEN ACCESS



**Address for correspondence:**

*राठोड अंकिता एकनाथ, संशोधन केंद्र: गोखले एड्युकेशन सोसायटी आर. एन. सी., जे. डी. बी. कॉमर्स कॉलेज आणि एन. एस. सी. सायन्स महाविद्यालय, नाशिकरोड.*



**How to cite this article:**

*राठोड, . अंकिता . एकनाथ ., & सनानसे, . कांचन . (2025). स्मार्ट प्रकल्पांतर्गत राबविण्यात आलेल्या उपप्रकल्पांचे वर्णनात्मक अध्ययन. विशेष संदर्भ - उत्तर महाराष्ट्र. Journal of Research & Development, 8(II), 102–109. https://doi.org/10.5281/zenodo.17232372*

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

या कराराशी संबंधित कृषि व्यवसाय संस्था व शेतकरी समूह गटाकडून स्मार्ट अंतर्गत निधीच्या मंजूरीसाठी उपप्रकल्प सादर करण्यात येतात. अशा उपप्रकल्पांपैकी उत्तर महाराष्ट्रामधील कृषि प्रकल्प कक्षांतर्गत राबविण्यात आलेल्या व संसाधनांच्या पूर्ततेसाठी निधी मिळालेल्या उपप्रकल्पांचे संशोधकाने वर्णनात्मक अध्ययन केले आहे.

**1.2 अर्थ :**

महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन फाऊंडेशन, महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ, महिला आर्थिक विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जिवनोन्नती अभियान व महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यात 'महाराष्ट्र राज्य कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्पाची' आखणी व अंमलबजावणी करण्यात आलेली आहे. हा प्रकल्प सुरू झाल्यानंतर त्यास बाळासाहेब ठाकरे यांचे नाव देण्यात आले. राज्याच्या कृषि व ग्रामीण उपजीविका क्षेत्रामध्ये 'स्मार्ट' उपाययोजना राबवून ग्रामीण महाराष्ट्रामध्ये मोठे परिवर्तन घडवून आणण्याचा या प्रकल्पाचा मुख्य हेतु आहे.

ग्रामीण भागातील उद्योजकतेला बळकटी देऊन कृषि व्यवसायांच्या उभारणीला मजबूती देणे, त्यांना अधिकाधिक बाजारपेठा उपलब्ध करून देणे, कृषि व्यवसायांची लवचिकता व संसाधन वापरण्याची कार्यक्षमता वाढविणे हे या प्रकल्पाचे उद्धीष्ट आहे. या प्रकल्पाचा लाभ घेण्यासाठी शेतकरी वर्ग संघटित असणे आवश्यक आहे. कृषि विभाग, पशूसंवर्धन विभाग, पणन विभागासह इतर विभागांमार्फत या प्रकल्पाची अंमलबजावणी केली जाते. या प्रकल्पाच्या माध्यमातून सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक संस्था व त्यांचे संघटन, महिला बचत गट, महिला गटांचे संघ यांच्याशी निगडीत शेतकरी व महिला सभासदांचे आर्थिक उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने हातभार लागत आहे.

**1.3 उद्धीष्टे:**

1. स्मार्ट प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय उपप्रकल्पांच्या कक्षांचे विश्लेषण करणे.
2. स्मार्ट प्रकल्पांतर्गत राबविण्यात आलेल्या कृषि प्रकल्प कक्षांतर्गत येणाऱ्या उपप्रकल्पांसाठी असलेल्या अटी व शर्थी यांची माहिती घेणे.
3. उत्तर महाराष्ट्रात स्मार्ट प्रकल्पांतर्गत राबविलेल्या उपप्रकल्पांची माहिती अभ्यासणे.

**1.4 संशोधन पद्धती:**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये माहितीचे संकलन दुय्यम स्त्रोतांद्वारे करण्यात आले आहे. त्यासाठी वर्तमानपत्र, स्मार्ट प्रकल्पाचे अधिकृत संकेतस्थळ, शासकीय अहवाल, स्मार्ट प्रकल्प समिती बैठकीचे इतिवृत्त या द्वितीयक साधनांचा उपयोग केलेला आहे. तसेच यासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा )Descriptive Research Method) वापर करण्यात आलेला आहे.

**1.5 संशोधनाच्या मर्यादा**

1. उत्तर महाराष्ट्रात स्मार्ट प्रकल्पांतर्गत राबविण्यात आलेल्या व कृषि प्रकल्प कक्षांतर्गत येणाऱ्या उपप्रकल्पांचा अभ्यास केला आहे.
2. कृषि प्रकल्प कक्षांतर्गत येणाऱ्या उपप्रकल्पांसाठी असलेल्या अटी व शर्थींची माहिती घेतली आहे.
3. प्रस्तुत शोधनिबंधात स्मार्ट प्रकल्पांतर्गत राज्यस्तरीय उपप्रकल्प मंजूरी समिती बैठक क्रमांक २० नुसार माहिती व आकडेवारीचे संकलन करण्यात आलेले आहे.

**1.6 अभ्यासाचे महत्व**

1. उपप्रकल्पांच्या मदतीने शेतकरी उत्पादक कंपन्या कोणत्या दिशेने प्रगती करत आहेत हे समजते.
2. उपलब्ध निधी कोणत्या घटकांसाठी )गोदाम, प्रक्रिया युनिट, मशिनरी इ.( खर्च करण्यात आला याचे व्यवस्थित चित्र स्पष्ट होते.
3. उपप्रकल्पांमुळे शेतकऱ्यांचे उत्पादन साठवण, प्रक्रिया व विपणन सुधारल्यामुळे त्यांना चांगला आर्थिक लाभ मिळू शकतो हे दिसून येते.
4. निधी कमी मिळणे, शेतकऱ्यांना योजनांची मर्यादित माहिती असणे अशा समस्यांवर प्रकाश पडतो.
5. शासन व संस्था यांना शेतकरी उत्पादक कंपन्यांना प्रत्यक्ष लाभ पोहोचवण्यासाठी आवश्यक सुधारणा सुचवता येतात.

**2.1 राज्यस्तरीय उपप्रकल्पांच्या कक्षांचे विश्लेषण**

स्मार्ट प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणारे राज्यस्तरीय उपप्रकल्प ५ कक्षांमध्ये वर्गीकृत केलेले आहे. त्यात कृषि, पशूसंवर्धन, MAVIM )Mahila Arthik Vikas Mahamandal(, MSRLM )Maharashtra State Rural Livelihoods Mission(, VSTF )Value Social Transformation Foundation( या कक्षांचा समावेश आहे. त्यापैकी संशोधकाने कृषि कक्षात समाविष्ट प्रकल्पांचा अभ्यास केलेला आहे.

खालील तक्त्यामध्ये स्मार्ट प्रकल्पांतर्गत राज्यस्तरीय उपप्रकल्प मंजूरी समिती बैठक क्र.२० मध्ये कक्षनिहाय सहभागी झालेल्या संस्थांच्या प्रकल्प अहवालांचे सादरीकरणाची आकडेवारी देण्यात आलेली आहे. या तक्याच्या आधारे असे कळून येते की, कृषि कक्षांतर्गत सर्वाधिक ३६ )६९.२३टक्के( प्रकल्प अहवाल सादर केलेले आहेत.व त्यापैकी ३५ प्रकल्प अहवालांना समितीमार्फत मंजूरीदेखील

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

मिळालेली आहे. त्याखालोखाल MSRLM कक्षांतर्गत १० म्हणजेच एकूण संख्येपैकी १९.२३ टक्के प्रकल्प अहवाल सादर केलेले असून त्यांच्या एकूण प्रकल्पांना समितीद्वारे मंजूरी दिलेली आहे. तसेच MAVIM कक्षांतर्गत ३ )५.७६ टक्के( प्रकल्प अहवालांचे सादरीकरण झाले असून त्यांनाही एकूण मंजूरी समितीमार्फत देण्यात आलेली आहे.

**तक्ता क्र.०१**

**स्मार्ट प्रकल्पांतर्गत राबविण्यात आलेल्या उपप्रकल्पांचे कक्षनिहाय प्रकल्प**

| अ. क्र. | प्रकल्प अंमलबजावणी कक्ष | SPAC-२० मध्ये मंजुरीस आलेल्या संस्थांची संख्या | SPAC-२० मध्ये मंजूरी दिलेल्या संस्थांची संख्या | SPAC-२० मध्ये त्रुटी आढळून आलेल्या संस्थांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | कृषि | ३६ )६९.२३( | ३५ )६८.६२( | ०१ )१००( |
| २ | पशूसंवर्धन | ०२ )३.८४( | ०२ )३.९२( | ०० |
| ३ | MAVIM | ०३ )५.७६( | ०३ )५.८८( | ०० |
| ४ | MSRLM | १० )१९.२३( | १० )१९.६०( | ०० |
| ५ | VSTF | ०१ )१.९२( | ०१ )१.९६( | ०० |
| **एकूण** | | ५२ )१००( | ५१ )१००( | ०१ )१००( |

स्त्रोत: वरील तक्त्यामधील आकडेवारी स्मार्ट प्रकल्पांतर्गत राज्यस्तरीय उपप्रकल्प मंजूरी समिती बैठक क्र.२० दि.०६.०३.२०२४ च्या इतिवृत्तानुसार घेतलेली आहे.

टीप: कंसात दिलेली आकडेवारी एकूण आकडेवारीशी टक्केवारी दर्शविते.

**2.2 स्मार्ट अंतर्गत राबविलेल्या कृषि कक्षांतर्गत येणाऱ्या उपप्रकल्पांसाठी असलेल्या अटी व शर्थी.**

स्मार्ट अंतर्गत राज्यस्तरीय उपप्रकल्प मंजूरी समितीद्वारे उपप्रकल्पामध्ये सहभागी होणाऱ्या संस्थांसमोर काही अटी तसेच शर्थी ठेवण्यात आलेल्या होत्या. या अटी व शर्थींचे पूर्णत: पालन करणाऱ्या संस्थांचे उपप्रकल्प मान्य केले जातील व त्यांना आर्थिक सहकार्य केले जाईल. संशोधकाने खालील अटी व शर्थींचा आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

1. समुदाय आधारित संस्थांकडील १( विक्रीयोग्य अधिशेष )Marketable Surplus( २( खरेदीदाराशी व्यक्तीश: बोलून कराराबाबतची खात्री याबाबत संबंधित कक्ष, कृषि उपप्रकल्पांसाठी प्रकल्प संचालक, ATMA )Agricultural Technology Management Agency( यांनी तसेच त्यांच्या अधिकाऱ्यांमार्फत सत्यता तपासावी.

1. उपप्रकल्पांमध्ये प्रस्तावित करण्यात आलेले प्रक्रिया युनिटसाठीचे तसेच मशीनरीसाठीचे शेड / बांधकामाची आवश्यकता व क्षमतेची तपासणी घटक स्तरावरून निश्चित करण्यात आलेल्या अधिकाऱ्याद्वारे करण्यात यावी. यासाठी कृषि कक्षातील उपलब्ध अभियंत्यांच्या सेवा मागणीनुसार इतर कक्षांनाही उपलब्ध करून दिल्या जाव्यात.
2. शेड/बांधकाम घटकाची आवश्यकता व क्षमता निश्चित झाल्यानंतर SSR )Self Sufficiency Ratio( प्रमाणे अंदाजपत्रक व मूल्यांकनाच्या अटीवर सदर घटक मान्य केले जावेत.
3. उपप्रकल्पांनी प्रकल्पामध्ये अनावश्यक क्षमतेचे शेड/बांधकाम केल्यास आवश्यक तेवढ्याच क्षमतेचे शेड/बांधकामचे मूल्यांकन करून मंजूर मापदंडानुसार अनुदान दिले जाईल. तसेच प्रत्यक्ष बांधकामचे मूल्यांकन करूनच अनुदान वितरित केले जाईल.
4. प्रस्तावित उपप्रकल्प बांधकामाची रक्कम ही मापदंडानुसार ग्राह्य असलेल्या रकमेपेक्षा अधिक असेल तर स्मार्ट प्रकल्पात मापदंडानुसार ग्राह्य धरलेल्या रकमेचे सुधारित अंदाजपत्रक तयार केले जावे व त्यानुसार BOQ )Bill Of Quantities( प्रमाणांचे बिल )हुंडी( करून निविदा प्रसिद्ध करण्यात यावी. सुधारित अंदाजपत्रक एसएसआर प्रमाणे असल्याची पडताळणी विभाग स्तरावरील अभियंत्यांनी करावी.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

5. उपप्रकल्पाची/व्यवसायाची अंमलबजावणी करत असतांना आवश्यक खेळते भांडवल, दैनंदिन कार्यान्वय खर्च यासाठी स्वत: जबाबदार राहतील त्याकरिता प्रकल्पाद्वारे कोणतेही अनुदान दिले जाणार नाही. हे संबंधितांनी जिल्हास्तरावरून लेखी अवगत करून द्यावे.
6. प्रस्तावित केलेल्या उपप्रकल्पात धान्य तसेच उत्पादन साठवणुकीसाठी स्वतंत्र गोदामची माहिती नसल्यास अशा बाबतीत कच्चा व पक्का माल साठवणूक विचारात घेऊन प्रक्रिया शेड हे मागणीप्रमाणे मशीनरी किंमतीपेक्षा जास्त देय राहील.
7. मंजूर उपप्रकल्पांना अनुदान वितरित करतांना मंजूर प्रकल्प किंमतीच्या किमान ५ टक्के भागभांडवल जमा असल्याची संबंधित प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणेने खात्री केल्याशिवाय अनुदान वितरित केले जाणार नाही.
8. जागा भाडेकरार तत्वावर घेण्यात आलेली असल्यास नोंदणी कराराची सत्यता संबंधित विभागाच्या वेबसाईटवर उपलब्ध ऑनलाइन माहितीद्वारे तपासण्यात यावी.
9. मंजूर उपप्रकल्पांसाठी आवश्यक जागेचा २९ वर्षांचा नोंदणीकृत भाडेकरार अन्यथा जागा स्वत:ची असल्याची खात्री करूनच अनुदान वितरित केले जाईल.
10. राज्यस्तरीय समितीने यापूर्वी प्रस्तावित उपप्रकल्पांतील माल वाहतूक घटकांना मंजूरी दिलेली असल्याने कृषि विभागांतर्गतच्या १०० टक्के महिला भागधारक असलेल्या शेतकरी उत्पादक संस्थांना देखील माल वाहतूक वाहन प्रस्तावित केले असल्यास त्यास मंजूरी देण्यात येईल परंतु कोणत्याही परिस्थितीत या वाहनाचा उपयोग प्रवासी वाहतुकीसाठी होणार नाही याची दक्षता घेतली जावी.
11. उपप्रकल्पामध्ये प्रस्तावित घटकाची रक्कम १० लाखांच्या आत असल्यास व शासकीय मापदंड उपलब्ध नसल्यास प्रत्यक्ष किंमतीच्या ६० टक्के अनुदान देय राहील. परंतु सदर घटकाची खरेदी स्पर्धात्मक व पारदर्शकपणे करणे आवश्यक राहील.
12. ज्या शासकीय मापदंडात GST )Goods And Services Tax( समावेश नाही अशा बाबतीत GST पोटी होणाऱ्या खर्चाच्या ६० टक्के अनुदान देय राहील.
13. उपप्रकल्पांतर्गत उभारण्यात येणाऱ्या पायाभूत सुविधेकरीता आवश्यक विद्युत पुरवठा उपलब्धतेची खात्री संबंधित जिल्हास्तरीय अधिकाऱ्याने केल्याशिवाय उपप्रकल्पाचे काम सुरू करू नये.
14. अंतिम मंजूर करण्यात आलेले उपप्रकल्प जर बँकांकडून कर्ज घेणार असतील तर त्यांना कृषि पायाभूत सुविधा निधी योजनेचा लाभ द्यावा.
15. गोदाम घटक मंजूर करण्यात आलेल्या उपप्रकल्पांना गोदाम WDRA Accredited )Warehousing Development And Regulatory Authority( करणे अनिवार्य राहील.
16. मंजूर करण्यात आलेल्या उपप्रकल्पात प्रस्तावित केलेल्या मूल्य साखळी घटकांनुसार संबंधितांना प्रशिक्षण देण्यात यावे.
17. उपप्रकल्पातील व्यवसाय कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक सर्व परवाने/परवानगी/ नोंदणी घेण्याची जबाबदारी त्या संस्थांची राहील याची संबंधित घटकांनी कळवावे.

**2.3 उत्तर महाराष्ट्रात स्मार्ट प्रकल्पांतर्गत राबविलेल्या कक्षांतर्गत उपप्रकल्पांची माहिती**

**2.3.1.** धुळे जिल्ह्यातील देऊर बुद्रुक या ठिकाणी स्वामी सेवा फार्मर प्रोड्यूसर कंपनीने स्मार्ट प्रकल्पांतर्गत राबविण्यात आलेल्या उपप्रकल्पांसाठी निश्चित केलेल्या अटी व शर्थींची पूर्तता करून प्रकल्प अहवालाचे सादरीकरण केले.
अन्न-धान्य, कडधान्य, तृणधान्य क्लिनिंग व ग्रेडिंग, पॅकेजिंग यूनिट व आटा निर्मिती प्रकल्प अहवाल प्रस्तावित करण्यात आला होता. अहवालात दर्शविलेल्या घटकांसाठी मापदंडानुसार प्रस्तावित रक्कम, ग्राह्य रक्कम व देय अनुदान याविषयी सविस्तर माहिती खालील तक्त्यामध्ये करण्यात आलेली आहे. तक्त्यामध्ये दाखविल्यानुसार १००० मेट्रिक टन क्षमता असलेल्या गोदामाचे बांधकाम करण्यासाठी ११९.०० लाख इतकी रक्कम प्रस्तावित केली गेली ही रक्कम मापदंडानुसार ग्राह्य होती परंतु वरील उपप्रकल्पासाठी मापदंडानुसार देय ७१.४० लाख रुपये मंजूर करण्यात आल्याचे कळते. तसेच खालील प्रस्तावामध्ये सर्वात कमी प्रस्तावित व ग्राह्य रक्कम ०.१६ लाख रुपये Digital moisture meter या घटकासाठी देण्यात आलेली होती परंतु या घटकास मापदंडानुसार ०.१० लाख रुपयांचे अनुदान देय करण्यात आले. या प्रस्तावामध्ये सोलार ग्रिड व ट्रान्सफॉरमर, स्वयंचलित पॅकिंग मशीन, प्रक्रिया शेडचे बांधकाम, अंशत: स्वयंचलित आटा प्लांट चक्की इत्यादींचा समावेश करण्यात आलेला आहे. ठरलेल्या मापदंड योजनेच्या आधारे या प्रस्तावाला समितीद्वारे मंजूरी प्राप्त होऊन मापदंडानुसार २७०.०९ या ग्राह्य रकमेपैकी १६२.०५ इतके अनुदान मंजूर करण्यात आले.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

**तक्ता क्र.०२**

**स्मार्ट प्रकल्पांतर्गत राबविलेल्या धुळे जिल्ह्यातील स्वामी सेवा फार्मर प्रोड्यूसर कंपनी यांच्या उपप्रकल्पाचा अहवाल**

| अ. क्र. | तपशील | प्रस्तावित केलेली रक्कम )रु. लाख( | मापदंडानुसार ग्राह्य रक्कम )रु. लाख( | मापदंडानुसार देय अनुदान )रु. लाख( |
|---|---|---|---|---|
| १ | Construction of godown 1000MT with 18% GST | १९९.०० )३५.५२( | ११९.००)४४.०५( | ७१.४० )४४.०६( |
| २ | Construction of processing shed 570 sq.m 18% GST | १०६.३६ )३१.७५( | ४६.९७ )१७.३९( | २८.१८ )१७.३८( |
| ३ | Fully automatic cleaning & grading machine plant 4 TPH | २६.५१ )७.९१( | २६.५१ )९.८१( | १५.९१ )९.८१( |
| ४ | Semi-automatic atta-plant chakki based 0.36 TPH | १७.७१ )५.२८( | १२.९१ )४.७७( | ७.७५ )४.७८( |
| ५ | Bag closure machine 3 units | ०.२३ )०.०६८( | ०.२३ )०.०८५( | ०.१४ )०.०८६( |
| ६ | Granules packing machine (500gm to 5 kgs) (4 head weigh filler machine) | १७.५७ )५.२४( | ८.०० )२.९६( | ४.८० )२.९६( |
| ७ | Electrical weighing scale FSP 100/200 and 50/100 | ०.२१ )०.०६२( | ०.२१ )०.०७७( | ०.१३ )०.०८०( |
| ८ | Digital moisture meter | ०.१६ )०.०४७( | ०.१६ )०.०५९( | ०.१० )०.०६१( |
| ९ | Solar grid 60KVA | ३४.१४ )१०.१९( | ३२.७२ )१२.११( | १९.६३ )१२.११( |
| १० | Transformer 200KVA | ५.७३ )१.७१( | ३.२० )१.१८( | १.९२ )१.१८४( |
| ११ | स्वयंचलित पॅकिंग मशीन )वजन, बॅग भरणे, बेल्ट कन्व्हेअर, स्टिचिंग मशीन, एअर कॉम्प्रेसर( ३०-५० किलो )१४०-१५० बॅग/तास( | ७.३२ )२.१८( | ७.३२ )२.७१( | ४.३९ )२.७०( |
| १२ | 5% Pre operative expenditure | -- | १२.८६ )४.७६( | ७.७२ )४.७६( |
| **एकूण** | | **३३४.९४ )१००(** | **२७०.०९ )१००(** | **१६२.०५ )१००(** |

स्रोत: वरील तक्त्यामधील आकडेवारी स्मार्ट प्रकल्पांतर्गत राज्यस्तरीय उपप्रकल्प मंजूरी समिती बैठक क्र.२० दि.०६.०३.२०२४ च्या इतिवृत्तानुसार घेतलेली आहे.

टीप: कंसात दिलेली आकडेवारी एकूण आकडेवारीशी टक्केवारी दर्शविते.

**2.3.2.** धुळे जिल्ह्यातील उमरपाटा परिसर फार्मर प्रोड्यूसर कंपनी लि., ता. साक्री या कंपनीने स्मार्ट अंतर्गत राबविण्यात आलेल्या उपप्रकल्पामध्ये सहभाग घेत सदर समितीच्या बैठक क्र.२० मध्ये प्रकल्प अहवालाचे सादरीकरण केले. या उपप्रकल्पांतर्गत त्यांनी गोदाम, क्लिनिंग ग्रेडींग यूनिट राईस मिल यूनिटसंदर्भात अनुदान मागणी प्रस्ताव समितीसमोर सादर केला. वरील तक्त्याच्या आधारे त्यांच्या उपप्रकल्पातील कोणकोणत्या घटकांना आर्थिक सहाय्य आवश्यक आहे ते दिसते. १००० मेट्रिक टन क्षमता असलेल्या गोदामाच्या बांधकामासाठी वरील संस्थेने १२३.७६ लाखांचा प्रस्ताव सादर केला होता व मापदंडानुसार ११९.०० लाख रुपये ग्राह्य रक्कम होती परंतु त्यांना ७१.४० लाख रुपयांचे अनुदान समितीद्वारे पारित करण्यात आले. पूर्णपणे स्वयंचलित राईस मिल १ TPH )One Ton Per Hour( साठी प्रस्ताव निधी ३८.४० लाख रुपये इतका देण्यात आला होता, मापदंडानुसार २८.५० लाख रुपये ग्राह्य रक्कम होती परंतु या घटकासाठी समितीद्वारे १७.१० लाख रुपयांचे अनुदान देण्याचे ठरविण्यात आले.

तसेच बियाणे पेरणी यंत्र घटकासाठी ०.८ हजारांचा प्रस्ताव सादर केला गेला पण मापदंडानुसार ग्राह्य रक्कम अधिक असल्या कारणाने ०.२९ हजारांचे अनुदान समितीमार्फत मंजूर करण्यात आले. अशा पद्धतीने उपप्रकल्पाच्या सर्व घटकांना मिळून एकूण १६८.६१ लाख रुपयांचे अनुदान देण्याचे मंजूर केले गेले.

**2.3.3.** अहमदनगर जिल्ह्यातील कृषिसाफल्य फार्मर प्रोड्यूसर कंपनी लि. , गोगलगाव ता. राहता, जि. अहमदनगर या संस्थेने स्मार्ट प्रकल्पांतर्गत मका व धान्य प्रक्रिया, पशूखाद्य व गोदाम यांच्याशी निगडीत घटकांसाठी उपप्रकल्पांतर्गत अनुदान मिळविण्यासाठी

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

राज्यस्तरीय उपप्रकल्प मंजूरी समितीसमोर प्रस्ताव सादर केला होता. या प्रस्तावात निर्धारित घटकांसाठी प्रस्तावित रक्कम, ग्राह्य रक्कम तसेच अनुदान मंजूरी रक्कम यांचे विश्लेषण करण्यात आलेले आहे. संशोधकाने अहमदनगर जिल्हा उत्तर महाराष्ट्रात येत असल्याकारणाने तेथील संस्थेचा अभ्यास केलेला आहे.

**तक्ता क्र.०३**

**स्मार्ट प्रकल्पांतर्गत राबविलेल्या धुळे जिल्ह्यातील उमरपाटा परिसर फार्मर प्रोड्यूसर कंपनी यांच्या उपप्रकल्पाचा अहवाल**

| अ. क्र. | तपशील | प्रस्तावित केलेली रक्कम )रु. लाख( | मापदंडानुसार ग्राह्य रक्कम )रु. लाख( | मापदंडानुसार देय अनुदान )रु. लाख( |
|---|---|---|---|---|
| १ | Construction of warehouse 1000 MT | १२३.७६ )४१.०९( | ११९.०० )४२.३४( | ७१.४०)४२.३४( |
| २ | Processing shed 284.95 sq.m | ५५.७९ )१८.५२( | ४७.२० )१६.७९( | २८.३२ )१६.७९( |
| ३ | Cleaning grading machinery plant (1.5 TPH) with GST | २२.३७ )७.४२( | १८.७० )६.६५( | ११.२२ )६.६५( |
| ४ | Fully automatic raw rice mill (1.0 TPH) with GST | ३८.४० )१२.७५( | २८.५० )१०.१४( | १७.१० )१०.१४( |
| ५ | Weigh bridge 60 MT | १०.५६ )३.५०( | ७.०० )२.४९( | ४.२० )२.४९( |
| ६ | Platform scale (size 600×600 MM) 500 KG | ०.४५ )०.१४९( | ०.४५ )०.१६०( | ०.२७ )०.१६०( |
| ७ | Solar 60 KW DC | ३४.१४ )११.३३( | ३२.७२ )११.६४( | १९.६३ )११.६४( |
| ८ | Tractor 60 HP 4 WD | १०.०० )३.३२( | १०.००)३.५५( | ६.०० )३.५५( |
| ९ | Rotavator 6 feet | १.४० )०.४६४( | ०.९४ )०.३३४( | ०.५६ )०.३३२( |
| १० | Plough 14 inch | ०.८० )०.२६५( | ०.८० )०.२८४( | ०.४८ )०.२८४( |
| ११ | Seed drill 10 type | ०.८० )०.२६५( | ०.४८ )०.१७०( | ०.२९ )०.१७१( |
| १२ | Cultivator 11 type | ०.६५ )०.२१५( | ०.६५ )०.२३१( | ०.३९ )०.२३१( |
| १३ | Trailor (12×6 ft.) 3 ton | २.०० )०.६६४( | १.२०)०.४२( | ०.७२)०.४२७( |
| १४ | 5% pre operational expenditure | -- | १३.३८ )४.७६( | ८.०३ )४.७६( |
| **एकूण** | | **३०१.१२ )१००(** | **२८१.०२)१००(** | **१६८.६१)१००(** |

स्त्रोत: वरील तक्त्यामधील आकडेवारी स्मार्ट प्रकल्पांतर्गत राज्यस्तरीय उपप्रकल्प मंजूरी समिती बैठक क्र.२० दि.०६.०३.२०२४ च्या इतिवृत्तानुसार घेतलेली आहे.

टीप: कंसात दिलेली आकडेवारी एकूण आकडेवारीशी टक्केवारी दर्शविते.

तक्त्यामध्ये दिल्याप्रमाणे कृषिसाफल्य या संस्थेने गोदाम बांधकामासाठी ११९.९४ लाख रुपयांचा प्रस्ताव सादर केला होता त्यासाठी मापदंडानुसार ११९.९४ लाख ग्राह्य रक्कम असून समितीद्वारे ७१.९६ लाख रुपयांचे अनुदान मंजूर करण्यात आले. पौल्ट्री फीडमशीन तसेच मका भरडा मशीनसाठी ३०.२६ लाखांचा प्रस्ताव सादर करण्यात आला ग्राह्य रक्कम देखील तीच होती परंतु १८.१६ लाख रुपयांचे अनुदान या उपप्रकल्पास मंजूर करण्यात आले. सोलार पॉवर प्लांट करीत प्रस्तावित रक्कम ३०.७५ लाख रुपये होती ग्राह्य रक्कम ३०.०० लाख रुपये होती व त्याच अनुदान म्हणून १८.०० लाख रुपये समितीकडून मंजूर करण्यात आले.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

**तक्ता क्र.०४**

**स्मार्ट प्रकल्पांतर्गत राबविलेल्या अहमदनगर जिल्ह्यातील कृषिसाफल्य फार्मर प्रोड्यूसर कंपनी यांच्या उपप्रकल्पाचा अहवाल**

| अ. क्र. | तपशील | प्रस्तावित केलेली रक्कम )रु. लाख( | मापदंडानुसार ग्राह्य रक्कम )रु. लाख( | मापदंडानुसार देय अनुदान )रु. लाख( |
|---|---|---|---|---|
| १ | Godown-1000 MT | १११.९४ )३७.८०( | १११.९४)३७.९१( | ७१.९६ )३७.९०( |
| २ | Processing shed-474-sq.m | ७६.५० )२४.११( | ६३.०० )१९.९१( | ३७.८० )१९.९१( |
| ३ | Semi-automatic cleaning grading machine 2 TPH | १८.८० )५.९२( | १८.७० )५.९१( | ११.२२ )५.९१( |
| ४ | Cattle feed machine- 2 TPH | १४.०४ )४.४२( | १४.०४ )४.४३( | ८.४२ )४.४३( |
| ५ | Poultry feed machine granules machinery with hammer mill -2TPH | ३०.२६ )९.५३( | ३०.२६ )९.५६( | १८.१६ )९.५६( |
| ६ | Weight bridge-weighing machine-60 MT | ७.५० )२.३६( | ७.०० )२.२१( | ४.२० )२.२१( |
| ७ | Solar power plant- 55 KWP | ३०.७५ )९.६९( | ३०.०० )९.४८( | १८.०० )९.४८( |
| ८ | Generator DGSET- 63 KVA | ६.१३ )१.९३( | ६.१३ )१.९३( | ३.६८ )१.९३( |
| ९ | Tractor 47 HP 2 WD | ९.०० )२.८३( | ८.५० )२.६८( | ५.१० )२.६८( |
| १० | Rotavator 6 FEET | १.५ )०.४७२( | ०.९४ )०.२९७( | ०.५६ )०.२९५( |
| ११ | Razor | ०.४५ )०.१४१( | ०.४५ )०.१४२( | ०.२७ )०.१४२( |
| १२ | Hydraulic tailor 5 ton | १.५० )०.४७२( | १.५० )०.४७४( | ०.९० )०.४७४( |
| १३ | Flexible plough | ०.९ )०.२८३( | ०.८४ )०.२६५( | ०.५० )०.२६३( |
| १४ | 5% operating expenditure | - | १५.०७ )४.७६( | ९.०४ )४.७६( |
| **एकूण** | | **३१७.२७ )१००(** | **३१६.३७ )१००(** | **१८९.८२ )१००(** |

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

स्रोत: वरील तक्त्यामधील आकडेवारी स्मार्ट प्रकल्पांतर्गत राज्यस्तरीय उपप्रकल्प मंजूरी समिती बैठक क्र.२० दि.०६.०३.२०२४ च्या इतिवृत्तानुसार घेतलेली आहे.

टीप: कंसात दिलेली आकडेवारी एकूण आकडेवारीशी टक्केवारी दर्शविते.

**निष्कर्ष :** १( उत्तर महाराष्ट्रामध्ये अनेक नोंदणीकृत शेतकरी उत्पादक संस्था असूनही मार्च २०२४ मधील स्मार्ट प्रकल्पांतर्गत राबविण्यात आलेल्या राज्यस्तरीय उपप्रकल्पांमध्ये उत्तर महाराष्ट्रातील फक्त तीनच संस्थांचा सहभाग दिसून आला. २( संशोधकास असे निदर्शनातून जाणवले की उत्तर महाराष्ट्रातील सर्वच सहभागी संस्थांना मुख्य म्हणजे गोदमांच्या बांधकामाची गरज आहे तसेच अन्न-धान्य प्रक्रिया शेडची देखील आवश्यकता आहे. ३( प्रस्तावित केलेल्या रकमेपैकी ग्राह्य रक्कम तर दूरच पण ग्राह्य रकमेपेक्षा कमी रक्कम राज्यस्तरीय उपप्रकल्प समितीच्या बैठकीद्वारे मंजूर करण्यात आल्याचे अभ्यासातून संशोधकास आढळून आले. ४( काही अटी व शर्थींमधील क्लिष्टपणा उपप्रकल्प धारकांना समजणे अवघड आहे. ५( प्रत्येक संस्थेची घटकांनुसार आर्थिक मागणी वेगवेगळया स्वरूपात आहे व त्यांना प्रकल्पांतर्गत अनुदान मंजूरी देखील देण्यात येत आहे.

**शिफारसी:** १( उत्तर महाराष्ट्रातील जास्तीत जास्त शेतकरी उत्पादक संस्थांनी या उपप्रकल्पांमध्ये सहभागी होऊन स्वत:ची गुणवत्ता वाढवावी. २( स्मार्ट प्रकल्पांतर्गत मिळणाऱ्या अनुदानाचा पुरेपूर उपयोग करून उपप्रकल्पांची क्षमता वाढविण्यावर भर द्यावा. ३( समितीद्वारे निश्चित करण्यात आलेल्या अटी व शर्थी सामान्य मराठी शेतकरी वर्गास समजतील अशा स्वरूपाच्या असाव्यात. ४( या प्रकल्पाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील शेतकरी उत्पादक संस्थांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर ओळख निर्माण करता येऊ शकते.

**संदर्भसूची:**

1. Project Implementation Plan )Gov. of Maharashtra(
2. Report of state Maharashtra’s agribusiness and rural transformation project nov.22, 2019
3. https://agrowon.esakal.com/sampadkiya/note-the-importance-of-smart-project-agrowon
4. https://agrowon.esakal.com/agro-special/community-based-organizations-under-smart-project
5. smart-mh.org
6. मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन )स्मार्ट( प्रकल्पांतर्गत राज्यस्तरीय उपप्रकल्प मंजूरी समिती (SPAC) बैठक क्र.20 चे इतिवृत्त.
7. https://agrowon.esakal.com/sampadkiya/note-the-importance-of-smart-project-agrowon#goog_rewarded
8. .https://www.tv9marathi.com/maharashtra/mumbai/uddhav-thackeray-mentioned-balasaheb-thackeray-agriculture-and-rural-transformation-project-in-his-speech-today-know-full-details-412101.html

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

Original Article

# सुशासन व भ्रष्टाचार मुक्त प्रशासन, शाश्वत विकासाचा मार्ग

**प्रा. डॉ. वृषाली लक्ष्मीकांत फुके**
सहयोगी प्राध्यापक तथा राज्यशास्त्र विभागप्रमुख
श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी
**Email:** vrushalifuke@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-170822
ISSN: 2230-9578

Volume 17
Issue 8 (II)
Pp. 110-115
August 2025

**Submitted:** 13 July. 2025
**Revised:** 25 July. 2025
**Accepted:** 10 Aug 2025
**Published:** 30 Aug.2025

***सारांश;***

*सुशासन हे कोणत्याही लोकशाही व्यवस्थेचे मूलभूत तत्त्व आहे. पारदर्शकता, जबाबदारी, कार्यक्षम प्रशासन, लोकसहभाग आणि कायद्याचे राज्य या घटकांवर सुशासन उभे राहते. जेथे प्रशासन उत्तरदायी आणि जनतेच्या हितासाठी कार्य करते, तेथे भ्रष्टाचाराला जागा राहत नाही.भ्रष्टाचार हा केवळ आर्थिक विकासात अडथळा निर्माण करत नाही, तर सामाजिक विषमता वाढवतो, सार्वजनिक संसाधनांचा अपव्यय करतो आणि लोकांचा शासनावरील विश्वास डळमळीत करतो. त्यामुळे भ्रष्टाचारमुक्त प्रशासन ही काळाची गरज आहे.सुशासन व भ्रष्टाचारमुक्त प्रशासन यांचा थेट संबंध शाश्वत विकासाशी जोडलेला आहे. शाश्वत विकासासाठी संसाधनांचा योग्य वापर, पर्यावरणीय संतुलन, सामाजिक न्याय आणि भावी पिढ्यांच्या गरजा लक्षात घेणारी धोरणे आवश्यक असतात. ही उद्दिष्टे केवळ तेव्हाच साध्य होतात जेव्हा शासन व्यवस्था स्वच्छ, पारदर्शक व भ्रष्टाचारविरहित असते.*

*थोडक्यात, सुशासन हे केवळ चांगल्या प्रशासनाचे साधन नसून शाश्वत विकासाचे मजबूत पायाभूत तत्त्व आहे. भ्रष्टाचारमुक्त शासन व्यवस्था हीच समतोल, न्याय्य आणि प्रगतिशील समाज निर्माण करण्याचा मार्ग आहे.*

***मुख्य शब्द :*** *सुशासन, भ्रष्टाचारमुक्त प्रशासन, शाश्वत विकास, पारदर्शकता, उत्तरदायित्व, लोकसहभाग, कायद्याचे राज्य, सामाजिक न्याय, ई-गव्हर्नन्स, माहिती अधिकार कायदा, सामाजिक लेखापरीक्षण, प्रशासन कार्यक्षमता, परिणामकारकता, आर्थिक प्रगती, पर्यावरणीय संतुलन, लोकशाही शासन, भ्रष्टाचार निर्मूलन.*

## प्रस्तावना :

आधुनिक काळातील सर्व राष्ट्र, शासन स्तरावर ज्या गोष्टींचा वारंवार उल्लेख होतो तो म्हणजे शाश्वत विकास होय. शाश्वत विकास ही अलीकडच्या काळातील सर्वात महत्त्वाच्या संकल्पनांपैकी एक संकल्पना आहे.संयुक्त राष्ट्र संघटनेने शाश्वत विकासासाठी विशिष्ट SDGS म्हणजेच सस्टेनेबल डेव्हलपमेंट गोल्स निर्धारित केले आहेत. त्यामध्ये 17 उद्दिष्टांचा समावेश होतो. वेळोवेळी झालेल्या विविध बैठकांमधून शाश्वत विकासाची चर्चा होत गेली आहे. परंतु शाश्वत विकासासाठी जे अनेक मार्ग राज्यांनी अवलंबिले पाहिजे त्यातील एक महत्त्वाचा मार्ग म्हणजे सुशासन होय. सुशासन हाच भ्रष्टाचार मुक्त प्रशासन निर्माण करून शाश्वत विकासाची दिशा अधिक दृढ करू शकतो. म्हणूनच जगभरातील धोरण निर्मितीच्या केंद्रस्थानि आज शाश्वत विकासाचा विचार आहे .आर्थिक प्रगती बरोबरच सामाजिक न्याय, पर्यावरण संतुलन आणि भावी पिढ्यांसाठी संसाधनांचे संरक्षण हे शाश्वत विकासाचे प्रमुख आधार आहेत. मात्र या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी केवळ विकास योजनांची आखणी पुरेशी नाही तर त्याची कार्यक्षम व पारदर्शकपणे अंमलबजावणी शासनाने करणे आवश्यक ठरते. यावेळी आपणास शासनाची ही भूमिका पार पाडायला लावणारी संकल्पना म्हणजेच सुशासन होय. सुशासन हे भ्रष्टाचार मुक्त प्रशासन या संकल्पनेला अधोरेखित करते,

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*प्रा. डॉ. वृषाली लक्ष्मीकांत फुके , सहयोगी प्राध्यापक तथा राज्यशास्त्र विभागप्रमुख श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी*

**How to cite this article:**
*फुके, . वृषाली . लक्ष्मीकांत . (2025). सुशासन व भ्रष्टाचार मुक्त प्रशासन, शाश्वत विकासाचा मार्ग. Journal of Research & Development, 17(8(II)), 110–115. https://doi.org/10.5281/zenodo.17232771*

Quick Response Code:

Website:
https://jrdrvb.org/

DOI:10.5281/zenodo.17232771

**Journal of Research and Development**
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

कारण सुशासन म्हणजे लोकसहभाग, पारदर्शकता, उत्तरदायित्व ,कार्यक्षमता आणि कायद्याचे शासन होय.

ही तत्वे राज्य कारभार आणि प्रशासनात आल्यास भ्रष्टाचार मुक्त प्रशासन बनते प्रशासनातील भ्रष्टाचार निघून गेल्यास किंवा कमी झाल्यास शाश्वत विकासाचे उद्दिष्ट साध्य होणे कठीण नाही. कारण भ्रष्टाचाराच्या समस्येने असे उग्र स्वरूप धारण केले आहे की, सर्वसामान्य जनतेला त्याचा दुष्परिणाम पदोपदी सहन करावा लागत आहे.

भारताने लोकशाही शासन पद्धतीचा स्वीकार केला. लोकांचे, लोकांसाठी आणि लोकांकडून चालवले जाणारे शासन अशी लोकशाहीची प्रतिमा आहे ,परंतु लोकशाहीला यशस्वी करून शाश्वत विकासाकडे जायचे झाल्यास त्यात भ्रष्टाचाराचा खूप मोठा अडसर अनुभवायला येत आहे.

भ्रष्टाचार निर्मुलानासाठी सुशासनाची आवश्यकता असून त्यातून भ्रष्टाचार मुक्त प्रशासन निर्माण होऊ शकते किंवा शाश्वत विकासासाठी भारतात ठोस प्रयत्नांची गरज आहे. लोकशाहीत लोकांच्या अपेक्षा शासनाकडून अधिक असतात, या वाढत्या अपेक्षांना समोर ठेवूनच शासनाला धोरण ठरवावे लागते. प्रशासनाकडे या धोरणांची अंमलबजावणी करण्याचे कार्य असते. प्रशासन जलद, गतिमान आणि पारदर्शी निर्माण होण्यासाठी सुशासनाची आवश्यकता आहे. सुशासानाद्वारे होणारा विकास हा बहुअंगी, समान स्तरावरचा असून विकासाचे लाभ समाजाच्या खालच्या स्तरापर्यंत पोहोचविणे आणि अर्थातच सर्वांगीण विकास करताना देशाचा शाश्वत विकास करण्याची जबाबदारी शासन आणि विशेषतः धोरणाची अंमलबजावणी करणाऱ्या प्रशासनावर येऊन पडते. शासकीय विकास योजनांचे लाभ तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी अनेक माध्यमे आहेत पण त्यासाठी सुशासनाची आवश्यकता असते. सुशासनाची गरज ही आज जागतिक पातळीवर देखील मान्यता पावलेली आहे. जरी सुशासनाचे अर्थ वेगवेगळे लावले जात असले तरी सामान्यतः हा शब्द विकास साध्य करण्यासाठी आवश्यक मानल्या जाणाऱ्या राजकीय, आर्थिक व सामाजिक उद्दिष्टांशी संबंधित आहे. सुशासन म्हणजे अशी प्रक्रिया ज्यामध्ये सार्वजनिक संस्था सार्वजनिक व्यवहार चालवतात व सार्वजनिक साधनसंपत्तीचे व्यवस्थापन करतात आणि त्यातून कायद्याचे राज्य तसेच मानवी हक्कांची पूर्तता साधली जाते. सुशासन प्रोत्साहित करणे म्हणजेच कायद्याचे राज्य सुनिश्चित करणे. सार्वजनिक क्षेत्राची कार्यक्षमता व जबाबदारी वाढवणे आणि भ्रष्टाचाराला आळा घालने आहे. सुशासन हे शाश्वत विकास आणि मानवी कल्याण साध्य करण्यासाठी महत्त्वाचे असून, सुशासनामुळे भ्रष्टाचाराला आळा बसतो. त्याचप्रमाणे सामाजिक विकास तसेच व्यक्ती जीवन अधिक समाधानकारक व सुकर बनण्यासाठी मदत मिळते. नागरिकांच्या सर्वांगीण विकासासाठी शासन विविध योजना, कायदे, उपक्रम नियमावली तयार करत असते. या सर्वांची अंमलबजावणी शासनाला प्रशासनाकडून करून घ्यायची असते, मात्र यामध्ये जेव्हा गैरप्रकार घडतात किंवा भ्रष्टाचार होतो तेव्हा खऱ्या अर्थाने सर्वांगीण विकासाचे उद्दिष्ट साध्य होत नाही व त्याचा लोकांच्या कल्याणावर थेट आणि गंभीर परिणाम होतो, म्हणूनच सुशासनाची आवश्यकता असून भ्रष्टाचार मुक्त व्यवस्था निर्माण करण्यासाठी सुशासन गरजेचे आहे. देशाचा आर्थिक विकास होण्यासाठी केवळ व्यापारी दृष्टिकोन नव्हे तर शाश्वत विकासाचा दृष्टिकोन शासनाकडे असायला हवा, उत्कृष्ट धोरण निर्मिती त्यामुळेच शक्य आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

1. सुशासनाची संकल्पना व त्यातील मूलभूत तत्त्वांचा अभ्यास करणे.
2. भ्रष्टाचारामुळे प्रशासनावर होणाऱ्या परिणामांचे विश्लेषण करणे.
3. सुशासन, भ्रष्टाचार आणि शाश्वत विकास यांचा परस्परसंबंध तपासणे.
4. भारतातील भ्रष्टाचार नियंत्रणात सुशासानाची भूमिका अभ्यासणे.
5. शाश्वत विकासासाठी आवश्यक सुशासनात्मक धोरणे व उपाय सुचवणे.

**संशोधनाची गृहितके**

प्रस्तुत संशोधनासाठी पुढील गृहीतके निश्चित करण्यात आली आहेत.

1.सुशासनाची प्रभावी अंमलबजावणी झाली तर भ्रष्टाचाराचे प्रमाण घटते.
2. भ्रष्टाचार हा शाश्वत विकासातील मुख्य अडथळा आहे .
3. पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि लोकसहभाग यामुळे प्रशासन अधिक कार्यक्षम होते.
4. सुशासनासाठीच्या उपायांमुळे प्रशासनातील भ्रष्टाचार कमी होतो.
5. भ्रष्टाचारमुक्त प्रशासनामुळे आर्थिक, सामाजिक व पर्यावरणीय शाश्वतता साध्य होऊ शकते.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत संशोधनासाठी द्वितीयक आधारसामग्रीचा वापर करण्यात आला आहे. त्यासाठी संयुक्त राष्ट्रांचे शाश्वत विकास उद्दिष्टे (UN SDGs) संदर्भातील कागदपत्रे,माहितीचा अधिकार कायदा, लोकपाल-लोकायुक्त कायदा, ई-गव्हर्नन्स संदर्भातील शासकीय कागदपत्रे,संशोधन निबंध, शोधनिबंध, पुस्तके, वृत्तपत्रे व जर्नलमधील लेख,विषया संबंधातील विविध संकेतस्थळे इत्यादी सारख्या स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

**सुशासनाचा अर्थ**

आजच्या युगात सुशासनाची ही संकल्पना शाश्वत विकासाशी जोडली गेलेली आहे. जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरणाच्या आधुनिक काळात कल्याणकारी राज्यासाठी सुशासनाचे व्यवस्थापन करणे आवश्यक बनले आहे. सुशासन ही संकल्पना 1990 नंतर खऱ्या अर्थाने चर्चेत आली वास्तविकतः जागतिक बँकेने 1989 मध्ये आपल्या अहवालात शासन (गव्हर्नन्स) हा शब्दप्रयोग प्रथम केला होता. पुढे 1992 ला प्रकाशित झालेल्या गव्हर्नन्स अँड डेव्हलपमेंट या अहवालात जागतिक बँकेने सुशासनासंबंधी सविस्तर चर्चा केली. बँकेने आपल्या अहवालात तीन निकषांचा विचार सुशासनाची संकल्पना स्पष्ट करण्यासाठी केला.

1. शासनाचे स्वरूप कसे आहे.

2. देशातील सामाजिक आणि आर्थिक व्यवस्थापनात सत्तेचा उपयोग कशा प्रकारे केला जात आहे.

3. सरकारमध्ये कुठपर्यंत आपले कार्य करण्याची क्षमता आहे.

अर्थात वरील प्रश्नांच्या उत्तरावर सुशासनाचे स्वरूप अवलंबून असते.

भारताचा विचार केल्यास भारतात लोकशाही शासन पद्धती स्वीकारलेली आहे देशातील सामाजिक आणि आर्थिक व्यवस्थापनात सत्तेचा उपयोग विविध पद्धतीने केला जात आहे. जनतेच्या हितानी हितासाठी चालवलेली शासन पद्धती ही लोकशाही बनवली जाते म्हणूनच शासनकर्त्यांनी आपले कार्य लोककल्याण साठीच केले पाहिजे तरच त्यास सुशासन असे म्हणता येईल.

**सुशासनाची व्याख्या**

सुशासन गुड गव्हर्नन्स हा शब्द सु(Good) + शासन (Governance) या दोन शब्दांचा मिळून तयार झाला आहे याचा अर्थ अर्थातच 'चांगले शासन' असा होतो.

व्याख्या

**1. मानव विकास अहवाल 2002**

"सुशासन म्हणजे शासकीय संस्थांची आणि नियमांची जास्तीत जास्त परिणामकारकता, पारदर्शीपणा जन सहभागीत्व व उत्तरदायित्व, पूर्णतः जबाबदारी आणि कायद्याचे राज्य हे सुशासनाचे मुख्य घटक मानले जातात."

**2.विवेक चोप्रा**

"सुशासन म्हणजे निःसंधीग्धपणे मूलभूत सामाजिक मूल्य शोधणे आणि त्यांचा पाठपुरावा करणे होय."

**3. पै. पानंदीकर**

"सुशासन म्हणजे अशी व्यवस्था होय ज्या ठिकाणी लोकांचे जीवन शांततापूर्ण, शिस्तबद्ध, प्रगतिशील व सहभाग दर्शविणारे आहे."

थोडक्यात सुशासन हे अनेक गोष्टींवर अवलंबून आहे ज्यामध्ये शासन नागरिकांसाठी असून लोकाभिमुख व लोकांचे प्रश्न सोडवण्यासाठी सदैव तत्पर असते. शासनाच्या जबाबदाऱ्या, पारदर्शकता, कार्यक्षमता आणि समाज व सरकार यांच्यामध्ये परस्पर सहकार्यावरच सुशासन अवलंबून आहे. जोपर्यंत भ्रष्टाचार, अपारदर्शकता आणि गैरव्यवहार प्रशासनात राहील तोपर्यंत सुशासन निर्माणच होणार नाही, परिणामी शाश्वत विकास देखील होऊ शकणार नाही.

**भ्रष्टाचार निर्मूलनामध्ये सुशासनाची भूमिका**

भ्रष्टाचार हा समाजाच्या आर्थिक, सामाजिक आणि राजकीय प्रगतीतला एक गंभीर अडथळा तर आहेच शिवाय शाश्वत विकासाला देखील भ्रष्टाचाराचा मोठा धोका उत्पन्न झाला आहे. भ्रष्टाचार हा केवळ आर्थिक नाही तर त्याचे परिणाम देशाच्या शाश्वत विकासावर देखील घडत आहेत.लोकांचा शासन आणि व्यवस्थेवरील विश्वास वाढवण्यासाठी सुशासनाची संकल्पना महत्त्वाची आहे. व्यक्तीला अधिक स्वातंत्र्य देणे आणि व्यक्तीच्या कार्यात सरकारचा कमीत कमी हस्तक्षेप ही उदारमतवादी भूमिका सुशासन निर्मितीला सहाय्यभूत ठरते. शासनकर्त्यांनी उत्कृष्ट धोरण निर्माण करणे आणि त्याच्या अंमलबजावणी मध्ये सुशासन आणणे हेच विकासासाठी गरजेचे आहे. जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरणाच्या पार्श्वभूमीवर कल्याणकारी राज्याच्या शासकीय व्यवस्थेचे सुशासन हे आधुनिक रूप आहे. वर उल्लेख केल्याप्रमाणे जागतिक बँकेने तीन निकषांचा विचार करून सुशासनाची संकल्पना स्पष्ट केली होती. त्यात शासनाचे स्वरूप कसे आहे, देशातील सामाजिक आणि आर्थिक व्यवस्थापनात सत्तेचा उपयोग कशा प्रकारे केला जात आहे, सरकारमध्ये कुठपर्यंत आपले कार्य करण्याची क्षमता आहे, अर्थात वरील प्रश्नांच्या अनुषंगाने सुशासनाचे स्वरूप अवलंबून होते. या तीन निकषांचा विचार केल्यास भारत हा भारताने स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लोकशाही शासन व्यवस्थेचा स्वीकार केला. भारतातील तत्कालीन गरिबी, फाळणी नंतर निर्माण झालेल्या समस्या, आर्थिक विषमता यांना तोंड देण्यासाठी पंचवार्षिक योजनांना प्रारंभ झाला. विविध योजनांची आखणी होऊ लागली परंतु इथेच भ्रष्टाचाराला देखील हळूहळू सुरुवात झाली. जीवनाच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक शासकीय इत्यादी सर्वच क्षेत्रात भ्रष्टाचार दिसून येवू लागला.

आज स्वातंत्र्यानंतर सत्याहत्तर वर्ष झाले तरीही शासनाच्या विविध विभागांमध्ये कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार सुरू आहे. जे योजनांचे खरे खरे लाभार्थी असायला पाहिजे त्यांना लाभ मिळत नसून कागदपत्री योजनांची अंमलबजावणी होते व उर्वरित निधी किंवा पैसा हा प्रशासकीय यंत्रणा, राजकारणी यांच्याच खिशात जातो. शासनाच्या विविध विभागांमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार आहे आणि तो दूर करण्यासाठी सुशासन निर्माण करणे अत्यंत गरजेचे आहे. भ्रष्टाचारापासून मुक्त असलेल्या शासकीय संस्था या मानवी कल्याणाशी संबंधित कार्य अत्यंत चांगले व परिणामकारक पद्धतीने करू शकतात. अर्थातच त्याचा परिणाम शाश्वत विकासावर सकारात्मक पडतो,

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

म्हणूनच धोरणांची अंमलबजावणी करणाऱ्या शासकीय संस्थांची गुणवत्ता म्हणजेच कायद्याचे राज्य निर्माण करणे, भ्रष्टाचारावर नियंत्रण आणि आर्थिक विकास यामधील संबंध सुरळीत होण्यासाठी सुशासनाची आवश्यकता आहे. सरकारने योजलेल्या विविध धोरणांची अंमलबजावणी करणाऱ्या या शासकीय संस्था अकार्यक्षम असतील किंवा त्यामध्ये भ्रष्टाचार, अपारदर्शकता व जबाबदारीचा अभाव असेल तर त्याचे दुष्परिणाम सर्व विकास कामांवर होतात. सुशासनाची तत्वे अस्तित्वात नसतील तर भ्रष्टाचारास वाव मिळतो, म्हणून सुशासन आणि भ्रष्टाचार यांचा परस्पर संबंध आहे.

भारतात भ्रष्टाचाराची व्याप्ती अत्यंत मोठी आहे. राजकीय क्षेत्रातील भ्रष्टाचार, निवडणुकात यश मिळावे म्हणून राजकीय पक्षाद्वारे मतदारांना वाटला जाणारा पैसा हे भ्रष्टाचाराचे महत्त्वाचे उदाहरण आहे. परंतु प्रशासकीय क्षेत्रात मंत्रालयातील सचिवापासून ते गाव पातळीवरील ग्रामसेवकापर्यंत भ्रष्टाचाराचा मुक्त वापर आढळून येत आहे. संरक्षण ,पेट्रोलियम व ऊर्जा दळणवळण सरकारी कार्यालय, पोलीस विभाग ,स्थानिक स्वराज्य संस्था, वर्तमान पत्र किंवा मीडियातील भ्रष्टाचार ही अनेक क्षेत्रे भ्रष्टाचाराणे ग्रस्त झाली आहेत. अशी अनेक भ्रष्टाचाराची उदाहरणे आहेत. भ्रष्टाचाराचे परिणाम सर्व भारतात दिसून येत आहेत. श्रीमंत अधिक श्रीमंत तर गरीब अधिक गरीब होत असून बेरोजगारी, हिंसाचार, जातीवाद, नक्षलवादी कारवाया , धर्मांधता इत्यादी प्रश्नांनी उग्र स्वरूप धारण केले आहे.

**सुशासनाची परिमाणे आणि भ्रष्टाचार निर्मूलनातील त्याची भूमिका**

सुशासनाला हातभार लावणारे खालील परिमाणे सांगितले आहेत. लोकाभिमुख व लोकांशी मैत्रीपूर्ण वर्तन असणारे प्रशासन जेथे नागरिकांच्या सर्व तक्रारी सोडवल्या जातात. जे सर्वांसाठी नेहमी खुले व उपलब्ध असते.जे ठरवून दिलेल्या आदर्शांच्या आधारे कृती करते आणि जबाबदारी प्रस्थापित करणारे असते. तेच सुशासन होय. थोडक्यात सुशासन अनेक आदर्शांवर आधारित जनतेच्या अधिक जवळ असणारे शासन आहे. ज्यात लोकांच्या अपेक्षा स्पष्टपणे जाणून घेता येऊ शकतात. त्यासाठी अधिक जनताभिमुख होऊन कार्य केले जाते.

सुशासन आणि भ्रष्टाचार निर्मूलन हे परस्परांना सहाय्यभूत ठरतात. सुशासनाची तत्वे आणि भ्रष्टाचार निर्मूलनाची प्रक्रिया यांच्यामध्ये घनिष्ट असा परस्पर संबंध आहे. भ्रष्टाचार टाळण्यासाठी सुशासनाचे मार्गदर्शन एक मूल्यांचा संच प्रदान करते. सुशासनामुळे जे घटक प्रशासनात येतात ते भ्रष्टाचारा विरुद्ध कार्य करतात. त्याचा दुसरीकडे उपयोग हा शाश्वत विकासाच्या साठी होतो. शाश्वत विकासाची अंमलबजावणी ही खऱ्या अर्थाने विकासाशी अनुकूल असे शासनाचे वर्तन यावर अवलंबून आहे. सुशासन हे विकासाचे उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आवश्यक असलेल्या राजकीय आणि संस्थापक प्रक्रिया आणि परिणामाशी संबंधित भ्रष्टाचार निर्मूलन करण्यात किंवा भ्रष्टाचारावर नियंत्रण मिळवण्यास सुशासनाची संकल्पना महत्त्वाचे ठरते. सुशासन हे भ्रष्टाचार विरोधी लढ्याशी घट्ट जोडलेले आहे. त्यामुळे चांगल्या सुशासनाची काही मूलभूत तत्वे ही भ्रष्टाचार विरोधी तत्वे असून ,सुशासन हे अशा राजकीय व्यवस्थेशी जोडले आहे जी सहभागात्मक असते व कायद्याच्या अधीन राहून चालते, पारदर्शक असते तसेच सर्व संमतीवर आधारित असते , ते न्याय व सर्व समावेशक असते, प्रभावी व कार्यक्षम असते आणि जबाबदार असते. जर राजकीय व्यवस्था या सर्व तत्वांचे पालन करत नसतील तर त्यांच्या संस्था सार्वजनिक सेवा पुरवण्यात व लोकांच्या गरजा पूर्ण करण्यात अपूर्ण सिद्ध हातात. विशेष म्हणजे सुशासन हे न्याय्य व सर्व समावेशी असते. सुशासानाच्या खालील तत्वांची भ्रष्टाचार निर्मूलनात महत्वाची भूमिका आहे.

**जनसहभाग**

जोपर्यंत जनतेचा सहभाग निर्णय प्रक्रियेत सक्रियपणे होत नाही तोपर्यंत भ्रष्टाचारावर नियंत्रण येणार नाही. शासनाच्या निर्णय निर्धारनात जनतेचे सहभागीत्व असले पाहिजे. असा सहभाग स्त्री ,पुरुष ,सर्व जातीच्या व सर्व आर्थिक घटकातील जनतेचा असावा, शिवाय सरकारच्या विरोधात आपले मत व्यक्त करण्याची मुभा त्यांच्या जवळ असावी. सहभागासाठी असे वातावरण असणे आवश्यक असते जिथे सहभागासाठी आवश्यक माहिती योग्य वेळेत उपलब्ध करून दिली जाते. भ्रष्टाचार विरोधी लढ्याच्या दृष्टिकोनातून सर्व व्यक्ती, नागरी समाज, शासकीय संस्था, बिगर शासकीय संस्था, समुदाय इत्यादी संस्थांच्या सक्रिय सहभागाला प्रोत्साहन दिले पाहिजे,जेणेकरून भ्रष्टाचाराला प्रतिबंध लागेल. जन सहभाग वाढवण्यासाठी सुशासनाच्या अंतर्गत ई व्हर्नन्स चा वापर देखील जनतेने जागरूकपणे करायला हवा. ऑनलाइन सेवा, डिजिटल पेमेंट, थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) यांचा वापर केल्याने मध्यस्थ टाळले जातात आणि भ्रष्टाचार कमी होतो. यासाठी नागरिकांनी डिजिटल साक्षरता आत्मसात करणे देखील गरजेचे ठरते. माहिती अधिकार कायदा(आरटीआय) हे जनतेसाठी एक शक्तिशाली शस्त्र आहे. त्याद्वारेही शासकीय कामकाज योजनांची माहिती प्राप्त होऊन जनतेचा सहभाग वाढतो. परिणामी प्रत्येक नागरिकांनी आपले हक्क आणि कर्तव्य जाणून घेऊन शासनाच्या योजना, निधी, कल्याणकारी योजना याबद्दल माहिती ठेवल्यास जनसहभागाद्वारे भ्रष्टाचारावर नियंत्रण ठेवता येवू शकते.

**पारदर्शकता**

शासन स्तरावर घेतल्या जाणाऱ्या विविध निर्णय प्रक्रियेवर विविध योजना आणि त्यावर होणाऱ्या खर्चाची जोपर्यंत सर्वसामान्य जनतेला माहिती प्राप्त होत नाही तोपर्यंत पारदर्शकता अस्तित्वात येणार नाही. पारदर्शकता म्हणजे शासनाच्या कामकाजामध्ये उघड, स्पष्ट आणि प्रामाणिकपणे कार्य होणे होय. सरकारी योजना निधीचा वापर ,निर्णय प्रक्रिया आणि धोरणे याबाबत सामान्य नागरिकांना माहिती मिळणे हा पारदर्शकतेचा एक प्रभावी मार्ग आहे. त्यासाठीच आरटीआय महत्त्वाचा ठरतो. त्याचबरोबर सामाजिक लेखापरीक्षण (सोशल ऑडिट) ज्यामध्ये योजनांच्या निधीचा उपयोग खरोखर झाला आहे का? हे नागरिक तपासतात. तसेच माध्यमे व जनजागृती ही सुद्धा पारदर्शकतेला चालना देतात, कडक कायदे व भ्रष्टाचार करणाऱ्यांना कठोर शिक्षा झाल्यास इतरांना धडा मिळतो. या गोष्टी सुशासनाद्वारे साध्य करता येतात. पारदर्शकतेसाठी शासन प्रशासन स्तरावर जे कामकाज सुरू आहे त्याची माहिती उपलब्ध करून देणे आवश्यक असते. यातूनच एक प्रकारे पारदर्शकता तयार होते. ब्रिटिशांनी स्वातंत्र्यपूर्व काळात 1923 मध्ये शासकीय गोपनीयतेचा कायदा तयार केला होता त्याद्वारे शासन खाती असणारी माहिती सर्वसामान्य जनतेला देता येणार नव्हती. हा कायदा

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

बदलण्यासाठी भारतामध्ये बराच वेळ जावा लागला. 2005 मध्ये आलेल्या माहिती अधिकार कायद्याने प्रशासनात पारदर्शकता आली. सामान्य जनतेला एका अर्जाद्वारे शासकीय कामकाजाची तसेच विविध नमुन्यांची देखील माहिती प्राप्त करता येते ही पारदर्शकता भ्रष्टाचारावर नियंत्रण ठेवू शकते. भ्रष्टाचार विरोधी लढ्यात पारदर्शकता हे एक मूलभूत तत्व आहे. माहिती सहज उपलब्ध होणे समजण्यायोग्य असणे, जेणेकरून आलेला निधी कुठे, केव्हा, कसा खर्च झाला हे जनतेला माहिती होईल. त्यात भ्रष्टाचार असल्यास तो उघडकीस येऊन भ्रष्टाचारावर नियंत्रण मिळवता येईल. सामान्य जनतेला शासनाच्या कायदे, नियम व धोरणांची जाणीव असावी त्यासाठी त्यांना माहितीचा हक्क असावा पारदर्शकतेमुळे जनतेला हे माहीत असेल की त्यांच्या शासनाचे कार्य काय सुरू आहे व ते किती प्रामाणिक व स्वच्छ आहे.

**उत्तरदायित्व**

उत्तरदायित्व हा सुशासनाचा आणखी एक मूलमंत्र आहे. उत्तरदायित्व म्हणजे प्रत्येक प्रशासकीय अधिकारी कर्मचारी किंवा लोकप्रतिनिधींनी आपले कार्य व निर्णय याबद्दल जनतेला उत्तरदायी राहणे होय. निधीचा उपयोग कुठे व कसा झाला याची तपासणी झाल्याशिवाय गैरव्यवहार थांबणार नाही. उत्तरदायित्वाने प्रत्येक व्यक्तीची जबाबदारी निश्चित होते व केलेल्या कार्यासाठी ते विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देणे बंधनकारक ठरते. सुशासनात उत्तरदायित्वामुळे सर्व माहिती जनतेला सहज उपलब्ध होते. निधीचा योग्य वापर होतो. अपव्य आणि भ्रष्टाचार कमी होतो. नागरिकांचा सहभाग वाढवून लोक थेट योजनांवर लक्ष ठेवतात. कायद्याचे पालन होऊन शासनावर लोकांचा विश्वास दृढ होण्यासाठी उत्तरदायित्व महत्त्वाचे आहे. जेव्हा शासकीय संस्था व शासनाच्या प्रक्रियेमध्ये सर्व नागरिकांचे हित जपले जाते तेव्हा तिथे उत्तरदायित्व अस्तित्वात येते. उत्तरदायित्व वाढविण्यासाठी जबाबदारीची निश्चिती व सत्तेचे विकेंद्रीकरण होणे आवश्यक आहे. नागरिकांची सनद, सोपे कायदे, प्रत्येक ऑफिसमध्ये सेवेसाठी निश्चित वेळापत्रक, जनतेला तक्रार करण्यासाठी हेल्पलाइन नंबर किंवा तक्रार निवारणासाठी विशेष कर्मचारी यामुळे उत्तरदायित्वाची सुनिश्चिती होते. परिणामी भ्रष्टाचारावर आळा बसतो. शासनाने जनते प्रती उत्तरदायी राहूनच कार्य करावे असे उत्तरदायित्व स्पष्टपणे निश्चित केलेले असावे ,त्याच्या निश्चितीसाठी काही माप दंड लावलेले असावे, ही बाब म्हणजेच सुशासनातील उत्तरदायित्वाचे तत्व होय. यातून शासनाने जनतेची काळजी घेतली पाहिजे जनतेच्या मागण्यांवर ताबडतोब कार्यवाही झाली पाहिजे जनतेच्या आशा आकांक्षाच्या प्रतिक्रिया शासनाच्या कार्यात उमटल्या पाहिजे. शासन अशा प्रकारे कार्य करीत असेल तर आपोआपच भ्रष्टाचार कमी होण्यास किंवा त्यावर नियंत्रण मिळवण्यास मदत मिळते.

**जबाबदारी**

सुशासनातील जबाबदारीचे तत्व हे भ्रष्टाचारावर महत्त्वाचा उपाय आहे किंवा भ्रष्टाचार निर्मूलनाचा एक महत्त्वाचा मार्ग आहे. हे तत्व असे सांगते की जबाबदारी म्हणजे आपल्या कृतींचे उत्तर देणे किंवा त्यासाठी जबाबदार असणे यामुळे सरकारमधील किंवा प्रशासनातील निर्णय घेणाऱ्यांसाठी अशी प्रणाली अस्तित्वात असावी की ज्या अंतर्गत या संस्थांमधील लोक हे त्यांच्या कार्यासाठी स्वतः जबाबदार असतील. शासन व्यवस्थेतील मंत्री, अधिकारी, कर्मचारी यांना त्यांच्या कृती, निर्णय आणि धोरणाबद्दल जनतेसमोर व विधिमंडळासमोर जबाबदार रहावे लागते. भ्रष्टाचार रोखण्यासाठी जबाबदारी निश्चित करणे अत्यंत गरजेचे आहे, कारण यामुळे अधिकाराचा गैरवापर व भ्रष्टाचार कमी होतो. शासन लोकांसाठी काय करते हे जाणून घेण्यासाठी प्रत्येक जबाबदार अधिकारी, कर्मचारी किंवा नेत्याला त्याची जबाबदारी त्यांनी कशी पार पाडली हे स्पष्ट करता आले पाहिजे. असे केल्यानेच नागरिकांना सरकार आपल्या हितासाठी कार्य करत आहे यावर विश्वास वाटतो. जबाबदारीची जाणीव असणारे अधिकारी, कर्मचारी अधिक तत्पर मार्गदर्शक व प्रभावी काम करतात. सुशासनासाठी हे अत्यंत महत्त्वाचे असून जबाबदारीची जाणीव असल्यामुळेच कार्यक्षमता वाढते. निर्णय प्रक्रियेत कोणताही पक्षपात किंवा भेदभाव न होता न्याय्य पद्धतीने निर्णय घेण्यास मदत मिळते. यातून जबाबदारीचे हे तत्व लोकप्रतिनिधींना आणि प्रशासनाला नागरिकांप्रती उत्तरदायी ठेवते. हे तत्व अमलात आणण्यासाठी संविधानातील तरतुदी, माहिती अधिकार कायदा, लोक आयुक्त व लोकपाल यासारख्या संस्था, संसदीय नियंत्रण यामध्ये प्रश्न उत्तराचा तास, समित्या, चर्चासत्रे यांच्या माध्यमातून सरकारची जबाबदारी ठरवली जाते. प्रसारमाध्यमांची भूमिका, पत्रकारिता यामधून जबाबदारी उघडकीस आणण्यात महत्त्वाची आहे. जबाबदारी नसेल तर भ्रष्टाचार गैरव्यवहार आणि अधिकाराचा गैरवापर वाढतो त्यामुळे जबाबदारीचे तत्व हे अत्यंत महत्त्वाचे आहे.

**कार्यक्षमता व परिणामकारकता**

सुशासनाच्या महत्त्वाच्या तत्त्वांपैकी कार्यक्षमता व परिणामकारकता हि तत्वे देखील महत्त्वाची आहेत, कारण कार्यक्षमता व परिणामकारकता जितकि जास्त तेवढा भ्रष्टाचार कमी, याउलट प्रशासनात कार्यक्षमतेचा व परिणामकारकातेचा अभाव असेल तर भ्रष्टाचाराला खतपाणी मिळते. कार्यक्षमता व परिणामकारकता वाढवली की भ्रष्टाचार आपोआप कमी होतो. कार्यक्षमता म्हणजे कमी खर्च कमी वेळ व कमी साधन संपत्ती वापरून जास्तीत जास्त सेवा देणे होय. शासनाने उपलब्ध संसाधनाचा योग्य उपयोग व पूर्ण वापर करून प्रशासनातील विलंब टाळणे आवश्यक आहे. अजून एक तंत्रज्ञान म्हणजे ई गव्हर्नन्सच्या माध्यमातून प्रशासनात कार्यक्षमता वाढवता येते व त्यामुळे भ्रष्टाचार कमी होण्याला मदत मिळते. ई सेवा केंद्रामुळे नागरिकांना विविध प्रमाणपत्र, परवाने जाहीर मिळतात. ई पेमेंट व ऑनलाइन व्यवहारामुळे वेळ व खर्च दोन्ही वाचतात व त्यातून परिणामकारकता वाढते. परिणामकारकता म्हणजे नेमून दिलेले उद्दिष्ट हे किती प्रमाणात साध्य झाले आहे याचे मापन करणे होय. फक्त योजना सुरू करणे पुरेसे नसते तर त्या योजनेतून अपेक्षित बदल व परिणाम झाले का हे पाहणे महत्त्वाचे असते. शासन वेळोवेळी अनेक योजना सुरु करते, अनेक योजना ची अंमलबजावणी होताना त्याच्या परिणामकारकते ऐवजी त्यात किती भ्रष्टाचार झाला याची चर्चा अधिक होताना दिसते, कारण त्यात कोट्यावधी रुपयांचा गैरव्यवहार ,घोटाळा किंवा भ्रष्टाचार उघडकीस येतो म्हणूनच सुशासनामध्ये कार्यक्षमता आणि परिणामकारकता हे तत्व महत्त्वाचे असून, सुशासनात इ गव्हर्नन्स तंत्रज्ञानाचा वापर, पारदर्शक व साधी प्रक्रिया, अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण व कौशल्य विकास

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

यावर भर देणे आवश्यक आहे . जनतेचा अभिप्राय घेऊन त्यावर आधारित सुधारणा करणे नियमित लेखापरीक्षण व मूल्यमापन करणे हे भ्रष्टाचार नियंत्रणासाठी उपयुक्त ठरते, कारण कार्यक्षमता व परिणामकारकता नसेल तर शासनाच्या कामकाजात निलंब, गुंतागुंत आणि गैरसोयी वाढतात व अशावेळी नागरिक काम लवकर करून घेण्यासाठी लाच देतात व प्रशासन मध्ये सुद्धा लाचखोरी वाढते म्हणूनच कार्यक्षमता व परिणामकारकता जेवढी अधिक तेवढा भ्रष्टाचार कमी होण्यास मदत मिळते.

वरील सर्व परीमानांमुळे सुशासन निर्माण होते.

**शाश्वत विकासाचा अर्थ**

भावी पिढ्यांच्या गरजा पूर्ण करण्याच्या क्षमतेला बाधा पोहोचू न देता वर्तमानकाळातील गरजा पूर्ण करण्यासाठीच्या विकासाला शाश्वत विकास म्हणतात. शाश्वत विकासात पृथ्वीवरील संसाधनांचा वापर विकासासाठी करताना पुढील पिढ्यांनीही संसाधनांचा वापर करता यावा या दृष्टीने संसाधनाचा काळजीपूर्वक करणे अपेक्षित असते.

विकास हा नैसर्गिक संसाधनांच्या वापरावर अवलंबून असतो. नैसर्गिक संसाधने निसर्गनिर्मित असून ती मर्यादित प्रमाणात असतात. नैसर्गिक संसाधनांवर कोणत्याही एका विशिष्ट समाजाचे स्वामित्व नसून ते संपूर्ण सजीव सृष्टीचे असते. तसेच ते केवळ एका पिढीपुरते नसून भविष्यातील अनेक पिढ्यांसाठी असते. नैसर्गिक संसाधनांचा वापर अमर्याद केल्यास भावी पिढीसाठी संसाधने शिल्लक राहणार नाहीत, ही बाब लक्षात घेऊन शाश्वत विकास संकल्पना मांडली गेली आहे. ही संकल्पना नैसर्गिक संसाधनांचा काटकसरीने व प्रभावी वापर, नूतनीक्षम संसाधनांच्या वापरातून भौतिक विकास, सामाजिक न्याय व समता यांवर आधारित विकास इ. बाबींवर आधारलेली आहे.

'शाश्वत विकास' यात शाश्वतता आणि विकास अशा दोन संज्ञा आहेत. शाश्वतता म्हणजे चिरकाल टिकणे, ऱ्हास न होणे. मानव आणि परिसंस्था यांच्यातील संतुलन टिकण्यासाठी शाश्वतता ही संज्ञा विचारात घेतली जाते. नैसर्गिक जैवप्रणालीची अवनती न होता वापरलेल्या संसाधनांच्या जागी त्या दर्जाची दुसरी संसाधने उपलब्ध करणे ही शाश्वतता असते, तर विकास म्हणजे वाढ, प्रगती, सकारात्मक बदल. हे बदल प्राकृतिक, आर्थिक, पर्यावरणीय, सामाजिक व लोकसांख्यिकीय इ. घटकांमध्ये होतात. विकास हा दृष्टिपथात येणारा व उपयुक्त असतो. विकास हा आर्थिक व सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया असून ही प्रक्रिया
सांस्कृतिक व पर्यावरणीय घटक आणि त्यांच्यातील आंतरक्रिया यांवर आधारित असते.

**भ्रष्टाचारामुळे शाश्वत विकासावर होणारा परिणाम**

भ्रष्टाचार आणि शाश्वत विकास यांचा परस्परसंबंध अत्यंत निकटचा आहे. भ्रष्टाचार म्हणजे सत्तेचा अथवा अधिकाराचा गैरवापर करून वैयक्तिक फायद्यासाठी जनहिताचे नुकसान करणे होय. अशा प्रकारचा भ्रष्टाचार समाजाच्या सर्व क्षेत्रांवर परिणाम करतो आणि शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांपुढे मोठा अडथळा निर्माण करतो. आर्थिक दृष्टीने पाहता विकासकामांसाठी मंजूर केलेला निधी भ्रष्टाचारामुळे चुकीच्या ठिकाणी वळवला जातो, परिणामी रस्ते, शाळा, रुग्णालये, पाणीपुरवठा यांसारख्या मूलभूत सोयीसुविधा अपुऱ्या राहतात आणि सामान्य लोकांचा विकास रोखला जातो. सामाजिक दृष्टिकोनातून भ्रष्टाचारामुळे अन्याय व असमानता वाढते, कारण प्रभावशाली व श्रीमंत लोक लाभ घेतात तर गरीब व वंचित वर्ग हक्कांपासून वंचित राहतो.

पर्यावरणीय क्षेत्रातही भ्रष्टाचाराचे दुष्परिणाम गंभीर असतात. उद्योगांना नियमांकडे दुर्लक्ष करून परवानग्या दिल्या जातात, जंगलतोड, अवैध खाणकाम व प्रदूषण याला प्रोत्साहन मिळते आणि पर्यावरणीय संतुलन धोक्यात येते. शाश्वत विकासासाठी आवश्यक असलेले चांगले शासन, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व या मूल्यांचा भ्रष्टाचारामुळे ऱ्हास होतो. याशिवाय, भ्रष्टाचारामुळे एखाद्या देशावरील परदेशी गुंतवणूकदारांचा विश्वास कमी होतो, परिणामी तंत्रज्ञान, रोजगार आणि नवोन्मेष यांचा विकास मंदावतो.याउलट, जर भ्रष्टाचारावर नियंत्रण ठेवले गेले तर शाश्वत विकासाला चालना मिळते. निधीचा योग्य वापर होतो, पर्यावरणाचे रक्षण होते, समाजात विश्वास आणि न्याय टिकतो व सर्वांना समान संधी मिळतात. त्यामुळे भ्रष्टाचार हा शाश्वत विकासाचा सर्वात मोठा अडथळा असल्याचे स्पष्ट होते. म्हणूनच सुशासन, पारदर्शकता आणि जबाबदारी या तत्त्वांचा अवलंब केल्याशिवाय शाश्वत विकास साध्य होऊ शकत नाही.

**संदर्भसूची :**

1. समकालीन राजकीय मुद्दे डॉ. रवींद्र पांडुरंग भनगे प्रशांत पब्लिकेशन्स जळगाव.
2. भारतीय स्थानिक स्वशासन डॉ. श्याम शिरसाट, प्रा. भगवान सिंग बैनाडे , विद्या बुक पब्लिशर्स औरंगाबाद.
3. लोकप्रशासन संपादक प्रा. डॉ. शेख मोहम्मद हनीफ इस्माईलसाब ,प्रभाकर पब्लिकेशन लातूर.
4. स्थानिक स्वराज्य संस्था प्रा. गोविंद यमलवाड, कल्पना प्रकाशन , नांदेड.
5. स्वराज अरविंद केजरीवाल, हार्पर कोलीन प्रकाशन.
6. हरवलेले सुशासन माधव गोडबोले , विश्वकर्मा प्रकाशन .

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

Original Article

# आधुनिक कवितेतील स्त्री जाणीव एक समकालीन अभ्यास

**प्रा.डॉ. शोभा ज्ञानेश्वर डहाळे[1], जयश्री अनिल वाघ[2]**
[1]संशोधन मार्गदर्शक, मराठी संशोधन केंद्र, के टी एच एम महाविद्यालय नाशिक संलग्न: सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे,
[2](पीएच.डी. संशोधक विद्यार्थी, मराठी विभाग) मराठी संशोधन केंद्र, के टी एच एम महाविद्यालय नाशिक, संलग्न सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे,
**Email:** waghjaya81@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-170823
ISSN: 2230-9578

Volume 17
Issue 8 (II)
Pp. 116-120
August 2025

**Submitted:** 13 July. 2025
**Revised:** 25 July. 2025
**Accepted:** 10 Aug 2025
**Published:** 30 Aug.2025

*प्रस्तावना*

*साहित्य हे समाजाचे प्रतिबिंब असते आणि साहित्यातून समाज मनाचे जडणघडण होत असते या दोन्ही परस्पर पूरक गोष्टी आहेत त्यात मराठी साहित्यातील कविता ही नेहमीच सामाजिक सांस्कृतिक आणि राजकीय परिवर्तनाचे प्रतिबिंब राहिलेली आहे. विशेषतः आधुनिक काळातील कविता अधिक वैयक्तिक, आत्म अभिव्यक्ती प्रधान आणि सामाजिक भान घेऊन लिहिल्या जातात.या कवितांमधून स्त्रीची भूमिका अस्तित्व,स्वातंत्र्य आणि शोषण आणि बंडखोरी या मुद्द्यांचा ठळकपणे उद्धार होतो.आजची स्त्री ही केवळ सौंदर्याची, प्रेमाची किंवा मातृत्वाची मूर्ती नाही तर ती जाणीवसंपन्न, स्वतंत्र आणि संघर्षशील आहे या सर्वांवर आधुनिक कविता भाष्य करताना दिसते.*

*स्त्री जाणवेचा अर्थ आणि व्याप्ती--*

*"स्त्रियांच्या स्थितीविषयी महेंद्र भवरे म्हणतात "भारतात वर्गाचे रूपांतर जातीत करण्यासाठी स्त्रियांचा वापर करण्यात आला आहे. भारतातील प्रत्येक वर्गाला बंदिस्त करण्यासाठी म्हणजेच त्याचे जातीत रूपांतर करण्यासाठी विवाहसंस्थेचा उपयोग केला जातो. वर्गांतर्गत विवाहाची सक्ती आणि तिच्या कडक अंमलबजावणीनेच सतीप्रथा, विधवाविवाह बंदी आणि बालाजरठ विवाहा सारख्या रूढींना जन्माला घातले. या अमानुष व्यवहाराला मान्यता देणारी धर्मशास्त्रे बनवली जाऊन ती पवित्र ठरविली गेली. त्यात पहिला बळी भारतीय स्त्रीचा गेला." एकूणच समाजातील स्त्रियांचे जितके म्हणून शोषण करता येईल तितके करण्याचा प्रयत्न या व्यवस्थेने केला. धर्म, संस्कृती यातून स्त्रियांवर अधिक निर्बंध लादून त्यांचे व्यक्तिस्वातंत्र्य हिरावून घेण्यात आले. मानव म्हणून जगण्याचे स्त्रीचे सारे पर्याय या व्यवस्थेने बंद केले. ज्यामुळे या व्यवस्थेला गृहीत धरण्याशिवाय स्त्रीला दुसरा पर्याय उरला नाही. अशा त-हेने स्त्रीच्या विकासाचे अनेक पर्याय आपोआपच बाजूला झाले. स्त्रीच्या कार्यक्षमतेवरील मर्यादेविषयी विलास खोले म्हणतात, "कोणतेही सामाजिक, धार्मिक, आर्थिक भेद आजवर स्त्रीचा स्त्री म्हणून विचार करत आले. तिच्या सामर्थ्यापेक्षा मर्यादांचा अधिक विचार झाला. तिला राबवता कसे येईल, तिला*

**मुख्य शब्द** *आधुनिक कविता,स्त्री जाणीव,स्त्रीवाद,पितृसत्ताक समाज,शोषण व बंडखोरी,देह आणि आत्मा,लैंगिक ,मातृत्व अनुभव,स्त्री-स्वातंत्र्य,स्त्रीवादी कवयित्री,मिथक व प्रतिमा,पुरुषप्रधान व्यवस्था,स्त्री अस्मिता,समाजपरिवर्तन,आत्मभान*

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:

Website:
https://jrdrvb.org/

DOI:10.5281/zenodo.17232813

**Address for correspondence:**
*प्रा.डॉ. शोभा ज्ञानेश्वर डहाळे,संशोधन मार्गदर्शक, मराठी संशोधन केंद्र, के टी एच एम महाविद्यालय नाशिक संलग्न : सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे,*

**How to cite this article:**
*डहाळे, . शोभा . ज्ञानेश्वर ., & वाघ, . जयश्री . अनिल . (2025). आधुनिक कवितेतील स्त्री जाणीव एक समकालीन अभ्यास. Journal of Research & Development, 17(8(II)), 116–120.*
*https://doi.org/10.5281/zenodo.17232813*

**वापरता कसे येईल, आपल्या उपयोगासाठी अवजार कशी बनेल याचा विचार करीत आले."** -1

एकूणच स्त्रीविषयक

व्यवस्थेचा दृष्टिकोन हा अभावात्मकतेचाच दिसून येतो. तसेच स्वतःच्या असलेल्या सत्तेला कोणत्याही प्रकारे धोका निर्माण होणार नाही याच्य पुरेपूर लक्ष पुरुषप्रधान व्यवस्था देत होती.

अतिशय संवेदनशील आणि संघर्षशील, वास्तवाची कविता लिहीणाऱ्या मलिका अमर शेख आपल्या कवितेत म्हणतात

"शहरातील हरेक बाई आहे स्फिंक्स कोरडी वाळू भुळभुळत रहाते शब्दांची
न् त्या दगडी डोळे उघडतात पंजा पसरवतात
दगडी नखं रोवतात आत्म्यांवर गच्च शहरातल्या प्रत्येक माणसाला प्रश्न विचारतात माणसं घाबरतात बरीच प्रश्नांना
**टाळतात तिची नजर"**

स्त्री ही संकल्पना केवळ एका शरीरापूरती मर्यादित नाही तर ती एक आत्मिक आणि सामाजिक अस्तित्वही आहे .पितृसत्ताक समाजात स्त्रियाना मुख्यतः शरीर म्हणून पाहिले गेले मात्र आधुनिक काळात कवयित्रींनी तिच्या आत्म्याचे म्हणजेच तिच्या विचारांचे ,इच्छांचे, अस्तित्वाचे भान मांडले आहे. स्त्रीच्या शरीरावर सामाजिक नियंत्रणाची पारंपरिकता झुगारत शरीर म्हणजे सौंदर्य ,आकर्षण,यौनता ही एकांगी प्रतिमा मोडीत काढण्याचा प्रयत्न आजच्या कवींनी केल्याचे दिसून येते. लैंगिक अत्याचार, बलात्कार ,गर्भपात ,मासिक पाळी यासारख्या विषयांवर खुलेपणाने कवयित्रीनी लेखन केलेले आढळून येते.

आत्मा मुक्त होऊ पाहतो पण शरीर मात्र समाजाच्या बंधनात अडकलेले असते आधुनिक कविता ही संघर्षाची जागा बनते.जिथे कवी शरीर, आत्मा या द्वैतावर प्रश्न उपस्थित करतात.

देह ,सौंदर्य हे ही वेदनेचे कारण बनू शकते. शरीरातील बदलांकडे मलिका अमर या पुढील कवितेत नकारात्मकतेच्या अंगाने पाहतात,त्या म्हणतात

"नको असून... नको असून किती गोष्टी घडत जातात
वळत असतात वासनेच्या हिरवट शेवाळत्या गंधाकडे
अटळ असलेला संभोग चार दिवसांचं अटळ किळसलेलं शरीर ...
आयुष्याला विटाळ झालाय माझ्या
जळवांसारख्या डसतात नग्न रात्री
जीवघेण्या दाहक विषारी सर्पाचे फूत्कार सर्व अंगांगाला
महारोग्यासारखं शरीर झडावं सडावं कुजावं मरावं...
होत नाही तसं
**कात टाकता येत नाही " 3**

लैंगिक शोषणाची अनुभूती प्रेमविरह आणि मातृत्वाचे व्यक्तिगत अनुभव त्या आपल्या कवितेतून मांडतात. स्त्रीमनाचा आक्रोश अथवा आकांतच त्यांच्या शब्दातून प्रतिध्वनीत होतो.

"डोईचा पदर आला खांद्यावरी
भरल्या बाजारी जाईन मी."

12 व्या शतकातच जनाबाई या संत कवयित्रींनी प्रथमच स्त्रीवर असणाऱ्या कोणत्याही सामाजिक सांस्कृतिक बंधनांचा विचार न करता स्वतःला अभिव्यक्त करण्यासाठी काव्याचा माध्यम म्हणून वापर केला "न स्त्री स्वातंत्र्यम अर्हती" या मनुवादी विचारसरणीचा विरोध केला.स्त्रीला पशु समान वागविण्याच्या वृत्तीचा विरोध केला.स्त्रीचा संघर्ष केवळ पुरुषप्रधान व्यवस्थेशी नसून तिचे माणूसपण नाकारणाऱ्या प्रत्येक व्यवस्थेशी आहे. संपूर्ण मानव मुक्तीचा विचार या स्त्रीवादी विचारप्रणाली मध्ये आहे.अमृता प्रीतम, कमला दास, महादेवी वर्मा, कविता महाजन, अनुराधा पाटील, रजनी परुळेकर, मलिका अमर शेख, नीरजा, शांता गोखले, प्रिया तेंडुलकर ,सानिया (सुनंदा कुलकर्णी ),मेघना पेठे,अरुणा ढेरे,प्रज्ञा लोखंडे,प्रभा गनोरकर, सिसिलिया कर्व्हालो,आदी कवयित्रींनी स्त्री-जाणिवांचे दालन समृद्ध केले आहे. त्याचप्रमाणे सुनंदा भोसेकर, विद्यागौरी टिळक, रेणू पाचपोर, आसावरी काकडे, अश्विनी ठोंबरे ,अंजली पेंडसे, भारती मिरजे ,वसुंधरा तारकर, सुलभा हेर्लेकर, ज्योती लांजेवार, अरुणा ढेरे, श्रद्धा पराते, सुमती लांडे, संजीवनी खोजे, वासंती मुजुमदार, प्रतिमा इंगोले, अंजली कीर्तने ,अंजली कुलकर्णी ,पद्मा गोळे, शिरीष पै, अनुराधा पोद्दार, हिरा बनसोडे, संगीता बर्वे, निशा मेहता, उषा किरण आत्राम ,मीनाक्षी पाटील, ज्ञानदा नाईक इत्यादी कवयित्री स्त्री वादी काव्य लेखन समकाळात करताना दिसतात. या काळातील

कवयित्रींच्या कवितेतून आशयाबरोबरच अभिव्यक्तीच्या वेगळेपणाची जाणीव होते. समकालीन जगण्यातील व्यामिश्रतेला प्रत्येक कवयित्री आपापल्या पद्धतीने कवितेतून मांडते. अशा अनेक गोष्टींना एकाच वेळी आपल्यात सामावून घेणारा हा काळ असल्याने या कवितांतून येणारे अनुभवविश्व निश्चितच पूर्वीच्या कवितेहून भिन्न आहे. अनुभवाची अनेक क्षेत्रे या कवितांमधून अनुभवाला येतात. स्त्रीविषयक नव्या भानाचा विचार एकूणच या कवितांमधून दिसून येतो.आपल्या महानगर या कवितासंग्रहात मलिका अमर शेख म्हणतात

" शहरातील हरेक बाई आहे स्फिंक्स

कोरडी वाळू फडफडत राहते शब्दांचे न त्या दगडीत डोळे उघडतात पंजा पसरवतात दगडी नखरू होतात आत्म्यांवर गच्च शहरातल्या **प्रत्येक माणसाला प्रश्न विचारतात माणसं घाबरतात बरीच प्रश्नांना टाळतात तिची नजर...-4**

व्हीनस ही एक ग्रीक देवता जिवंत बायकांचे स्तब्ध राहणे तिच्या संवेदनांचे निर्जीव होणे यासाठी हे प्रतीक वापरलेले आहे. पुरुषाला भय वाटणारे हे तिचे रूप आहे. स्त्रीला पुरुषप्रधान व्यवस्थेने एका बाजूला आदर्श पतिव्रतेच्या रुपात मिथकातून मांडले तर दुसरीकडे तिला राक्षसरूप, चेटकिनीचे रूप दिले.या दोन परस्परविरोधी कल्पनेतूनच स्त्रीची प्रतिमा समाजमनात रूढ होत गेली.मलिका अमर शेख परंपरेने आलेल्या या मिथकाच्या रूपालाच आव्हान देतात.

आपल्या आणखी एका कवितेत त्या म्हणतात,

" संस्कृतीचं दगडी वस्त्र
तिनं घट्ट धरलंय पायात कसंबसं
न दगडी ओठ घट्ट मिटलेत
**माझ्याप्रमाणेच .." 5**

स्त्रीच्या मुकेपणा मागच्या वेदना ह्यातून स्पष्ट होतात. आपलं म्हणणं परिणामकारक होण्यासाठी कवयित्री मिथकांचा आधार घेते तर कधी नव्या प्रतिमा वापरते यातून स्त्रीच्या आदिम रूपाचा शोध त्यातील वास्तवाशी कधी एकरूप होण्याचा तर कधी विरोधाभास व्यक्त करण्याचा प्रयत्न ही कविता करते.मिथकांच्या आधारे प्रामुख्याने कवयित्री पुरुषप्रधान व्यवस्थेतील बनविला गेलेल्या स्त्रीच्या पतिव्रता ,सोज्वळ अशा रूपाला नाकारू पाहते. इतिहासातून रंगविला गेलेल्या स्त्रीच्या प्रतिमेला छेद देत आजच्या स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असलेल्या स्त्री प्रतिमेला अधोरेखित करू पाहते. पुराणकथांतून स्त्रीविषयक बनविल्या गेलेल्या मिथकांच्या आधारे स्त्रीचे वर्षानुवर्ष बंदिस्त केलेले जीवन स्पष्ट करताना स्वतःच्या अस्तित्वाला नव्याने समजून घेते. अशीच बदलाची कविता लिहिणाऱ्या कवयित्री नीरजा म्हणतात .

"मी बदलले आहे असं म्हणतंय जग.
कुंकवासाठी धनीबिनी मागायचे
दिवस आता पडलेत मागे,
तो संपला तर चुडेबिडे फोडण्याचेही."
पावित्र्य आणि योनिशुचिता
लादणाऱ्या समूहाला ठोकरून
मी निघालेय शोधात
माझ्याच ग्लोबल अस्तित्वाच्या.
मला बदलायचे आहेत अर्थ संस्कृतीचे.
**छोट्याछोट्या वावटळींना घेत अंगावर मुरवायचं आहे एका नव्या संस्कृतीला खोल रक्तात."6**

नवे आत्मभान आलेल्या स्त्रीला जगण्याची नवी दिशा मिळालेली आहे त्यामुळे तिच्या या मार्गक्रमणेत येणाऱ्या पारंपरिक गोष्टींना या कवितेतून स्त्रीमन विरोध करते. तिच्या अस्मितेचा शोध तिला नव्याने लागला असून तिची भाषा ही प्रखर झाल्याचे आपणास दिसून येते.नव्या संस्कृतीचे ती स्वागत करते. स्त्रीला पारंपारिक बाई पणात अडकवणाऱ्या प्रतिकांपासून ती बाजूला करू पाहते. कुंकू, चुडा ही सौभाग्याची प्रतिकं आता तिच्यासाठी तितकी महत्त्वाची राहिलेली नाहीत. त्यांच्या असण्याने किंवा नसण्याने तिला फरक पडणार नाही तर स्त्रीवादी,मानवतावादी विचारांची दृढ भूमिका घेणाऱ्या रजनी परुळेकर म्हणतात.

**"एक स्वप्न अलीकडे माझा सतत पाठलाग करतेः**
समाजात पुरुषवेश्यांचेही मोहल्ले आहेत
आणि स्त्रिया प्रेमाच्या मृगजळावर थुंकून
ज्यांच्या भावना गोठून गेल्या आहेत
अशा पुरुषवेश्यांच्या तोंडावर पैसे फेकून सर्वत्र प्रतिष्ठित म्हणून वावरताहेत... "

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

**पन्नास शंभर किंवा दोनशे वर्षांनी तरी हे घडावे असे वाटत राहाते " 7**

स्त्रीच्या जगण्यातील वेदना पुरुषाच्या वाट्याला यावी असे वरील कवितेतील स्त्री मनाचे स्वप्न आहे. स्त्रीभोगत असलेल्या वेदना पुरुषाने भोगाव्यात म्हणजे त्यातील दुःख त्याला समजेल असे उपरोधाच्या अंगाने रजनी परुळेकर या कवितेद्वारे आपला प्रक्षोभ व्यक्त करतात.आपला शरीरनिष्ठ अनुभव त्या कवितेत व्यक्त करतात.परंपरेने स्त्रीच्या शरीराशी निगडित गोष्टींना शरीर विषयक खाजगी पणाचे वलय देऊन स्त्रीशारीरानुभवाच्या संदर्भात तिच्यावर बंधन आणले गेले. स्त्रीला जेव्हा याची जाणीव झाली तेव्हा संकोच बाजूला सारून ती मुक्तपणे बोलू लागली. स्वतःचे शरीरकेंद्री अनुभव तिच्या जगण्याचा महत्त्वाचा भाग होत गेले.

शारीर मानसिक पातळीवरील विसंवाद ,नात्यात आलेला कोरडेपणा,दोघांच्याही अस्तित्वाला व्यापून राहतो. जरी ती थेटपणे पुरुषाला विरोध करत नाही तरी पूर्वी इतके त्याचे अस्तित्व तिच्या जगण्याला व्यापूनही राहिलेले नाही. नात्यातील हा समतोल ठळकपणे जाणवतो. पुरुष हाच तिच्या जगण्याचा आधार होत नाही. त्यामुळे ती सहजपणे पुरुषाशिवायचे जगणे स्वीकारते. स्त्रीचा महत्त्वाचा सौभाग्य अलंकार म्हटला तर ते म्हणजे कुंकू .परंपरेने अखंड सौभाग्यवती रहावं म्हणून तिला आहे आहेवमरणासारख्या कल्पनांनी भ्रमित केलं. तथाकथित उदात्त कल्पनांचे ती गुलाम झाली परंतु हीच मानसिक गुलामगिरी झुगारात ती म्हणते

" कुंकू बरं दिसतं
म्हणून गोंदाव
त्यात फार काही नसतं
फक्त त्याने दिलेल्या
**ओल्या जखमांचा कोळलेलं कोरडेपण असतं." 8**

अशा कठोर आणि स्पष्ट शब्दात नीरजा आपलं मत मांडतात.पारंपरिक पुरुषी सत्तेतून येणारा ताण,विरोध त्या अशा उपासात्मक पद्धतीने करतात व पारंपरिक संकेतांना ती झुगारते.

ओल्या जखमांचं कोळलेले कोरडेपण या अवतरणातून स्त्री दुःखाची तीव्रता स्पष्ट होते. स्त्री-पुरुष नात्यातील असमतोल, एक द्वंद्व, त्याविषयीची खंत दोघांचेही एकाकीपण ,तुटलेपण या कवितेतून अधोरेखित होते. पुढे जाऊन कवयित्री म्हणते-

" तसा नाही होऊ शकत पुरुष
आधार बाईचा
बाई मध्ये असतं एक निरंतर आकाश
दुःखाला सामावून घेण्यासाठी
ती सहज पेलू शकते
कुंकवाशिवाय
**कुंकवा खालचं कपाळ." 9**

पूर्वीसारखा पुरुष तिच्या अस्तित्वाचा आधार होऊ शकत नाही. तिला परंपरेने पुरुषाशी बांधणाऱ्या अनेक गोष्टींचा, संकेतांचा कवयित्रीने आपल्या काव्यातून विरोध केलेला आहे, धिक्कार केलेला आहे. पुरुषाने तिला समजून घ्यावे असा कोणताच आग्रह दिसत नाही. पुरुषप्रधान व्यवस्थेची दुटप्पी भूमिका उघडी पाडण्याचा प्रयत्न कवयित्री करते.या व्यवस्थेने अनेक अंगांनी तिचे शोषण केलेले आहे तिला कायम अंकित ठेवलेले आहे. तिला तिच्या मनासारखे जगता आले नाही. मात्र आता पुरेसे आत्मभान आल्याने ती या शोषणाच्या मुळापर्यंत जाण्याचा मार्ग कवितेद्वारे अवलंबते आहे. त्याच्या महत्वाच्या कारणांचा शोध घेऊ पाहते आहे.

आपल्या शरीरनिष्ठ अनुभवांना शब्दबद्ध करताना कवयित्री मल्लिका अमर शेख आपल्या वाळूचा प्रियकर या संग्रहातून बेधडकपणे लिहितात..

"नको असून... नको असून किती गोष्टी घडत जातात
वळत असतात वासनेच्या हिरवट शेवाळत्या गंधाकडे
अटळ असलेला संभोग
चार दिवसांचं अटळ किळसलेलं शरीर
आयुष्याला विटाळ झालाय माझ्या
जळवांसारख्या डसतात नग्न रात्री
जीवघेण्या दाहक विषारी सर्पाचे फूत्कार सर्व अंगांगाला
महारोग्यासारखं शरीर झडावं.. सडावं ..कुजावं ..मरावं..
होत नाही तसं

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

**कात टाकता येत नाही..."** 10

स्त्री देहाचं सौंदर्य हे पुरुषी नजरेच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू परंतु हे सौंदर्यच तिच्या यातनामय जगण्याचे कारण बनते, म्हणूनच स्त्री देहाबद्दलचा उद्वेगजनक अविष्कार या कवितेतून घडतो.रजस्वला, संभोग, बाळंतपण यासारख्या नकोशा आणि यातानामय अनुभवातून जाताना स्वतःच्या शरीराला बाजूला करून जगता न येण्याची हतबलताही ती व्यक्त करते. स्वतःच्या शरीराकडेही पाहण्याची तिची दृष्टी नकारात्मक झालेली आहे. आणि हा पुरुषी व्यवस्थेचा डाव आहे हे ती उघडपणे मांडते.

गोवा विद्यापीठावर सहाय्यक प्राध्यापक म्हणून मराठी विभागात काम करणाऱ्या डॉक्टर गीता गवस म्हणतात..

स्त्रियांच्या तत्कालीन स्थितीविषयी संदर्भ गवस गीता म्हणतात

'विवाह' हा एकच संस्कार तिच्यावर करण्यात आला. त्यातही तिच्या विचाराला नगण्यच स्थान होते. सतीप्रथा, बालविवाह, केशवपन, जरठ-कुमारी विवाह अशा मानवीय संकल्पनेला तडे जाणाऱ्या प्रथांनी स्त्रियांचे जीवन बंदिस्त करण्यात आले. स्त्रियांचे या प्रथांनी निव्वळ खच्चिकरणच केले.

धर्म, संस्कृती यातून स्त्रियांवर अधिक निर्बंध लादून त्यांचे व्यक्तिस्वातंत्र्य हिरावून घेण्यात आले. मानव म्हणून जगण्याचे स्त्रीचे सारे पर्याय या व्यवस्थेने बंद केले. ज्यामुळे या व्यवस्थेला गृहीत धरण्याशिवाय स्त्रीला दुसरा पर्याय उरला नाही. अशात-हेने स्त्रीच्या विकासाचे अनेक पर्याव आपोआपच बाजूला झाले. स्त्रीच्या कार्यक्षमतेवरील मर्यादविषयी विलास खोले म्हणतात, "कोणतेही सामाजिक, धार्मिक, आर्थिक भेद आजवर स्त्रीचा स्त्री म्हणून विचार करत आले. तिच्या सामर्थ्यापेक्षा मर्यादांचा अधिक विचार झाला. तिला राबवता कसे येईल, तिला वापरता कसे येईल, आपल्या उपयोगासाठी ती अवजार कशी बनेल याचा विचार करीत आले." एकूणच स्त्रीविषयक व्यवस्थेचा दृष्टिकोन हा अभावात्मकतेचाच दिसून येतो. तसेच स्वतःच्या असलेल्या सत्तेला कोणत्याही प्रकारे धोका निर्माण होणार नाही याच्याकडे पुरेपूर लक्ष पुरुषप्रधान व्यवस्था देत होती.

**निष्कर्ष-**

असे असले तरी उपरोल्लेखित अनेक कवयित्रिनी या शारीरिक, मानसिक गुलामगिरीच्या अभेद्य भिंतींना तडे दिले.आपल्या शब्दांचे शस्त्र चालवले आणि या अन्यायाला वाचा फोडली. वर्षानुवर्षे चालत आलेले परंपरेचे साखळदंड त्यांनी पूर्णतः तोडले असे नाही, पण त्याच्या कड्या नक्कीच खिळखिळया केल्या,असे म्हणावयास हरकत नाही.

**संदर्भसूची-**

1. गवस गीता स्त्रीवाद: संकल्पना व स्वरूप दर्या प्रकाशन प्र. आ.3 मार्च 2018 पृ. क्र.33
2. अमरशेख मलिका महानगर डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रबोधिनी मुंबई प्र. आ.1999 पृ. क्र.33
3. अमरशेख मलिका वाळूचा प्रियकर डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रबोधिनी मुंबई प्र.आ.1979 पृ. क्र.9-10
4. अमरशेख मलिका महानगर डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रबोधिनी प्र. आ.1994 पृ. क्र.35
5. मरशेख मलिका देहऋतू डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रबोधिनी प्र.आ.1999 पृ. क्र.54
6. नीरजा निरर्थकाचे पक्षी पॉप्युलर प्रकाशन मुंबई प्र.आ.2010 पृ. क्र.119
7. परुळेकर रजनी काही दीर्घ कविता लोकवाङ्मय प्रकाशन प्र.आ. 1993 पृ. क्र.60
8. नीरजा स्रीगणेशा ग्रँथालय प्रकाशन प्र.आ. 2003 पृ. क्र.79
9. तत्रैव पृ. क्र.13
10. अमरशेख मलिका वाळूचा प्रियकर डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रबोधिनी प्र.आ.1979 पृ क्र. 9-10

# Journal of Research and Development

Peer Reviewed International, Open Access Journal.

ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025


Original Article

# पीक विमा दाव्यांच्या प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी आणि शेतकऱ्यांचे अनुभव: काटोल आणि नरखेड तालुक्याचा अभ्यास


**प्रशांत शामराव डाखोळे[1], फाल्गुनी विलासराव काठोळे[2], डॉ. रेकचंद गोंगल[3]**

[1]एम.कॉम बी.एड एम.बी.ए एम एच सेट वाणिज्य

[2]एम.कॉम बी.एड

[3]एम.कॉम एम. फिल पी. एच डी

**Email:** prashantdakhole96@gmail.com



**Manuscript ID**:

JRD -2025-170824

ISSN: 2230-9578

Volume 17

Issue 8 (II)

Pp. 121-124

August 2025

**Submitted:** 13 July. 2025

**Revised:** 25 July. 2025

**Accepted:** 10 Aug 2025

**Published:** 30 Aug.2025



***सारांश***

*प्रधानमंत्री फसल बीमा योजना (पीएमएफबीवाय) ही शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्तींपासून संरक्षण देण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आली आहे. मात्र, या योजनेच्या अंमलबजावणीत, विशेषतः दावा प्रक्रियेतील अडचणी हा एक प्रमुख समस्या क्षेत्र आहे. हा शोधनिबंध नागपूर जिल्ह्यातील काटोल व नरखेड तालुक्यांवर केंद्रित आहे. गुणात्मक आणि परिमाणात्मक पद्धतींच्या समन्वयाने (मिश्रित पद्धती) केलेल्या या अभ्यासाचे उद्दिष्ट पीक विमा दाव्यांच्या प्रक्रियेत शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी ओळखणे, त्यांचे अनुभव समजून घेणे आणि अंमलबजावणीतील त्रुटी शोधून काढणे हे आहे. संशोधनातून असे लक्षात आले की माहितीचा अभाव, तांत्रिक अडथळे, कागदपत्रांची गुंतागुंत, हमीपत्रकाच्या (Crop Cutting Experiments - CCE) अयोग्य पद्धती, दाव्यांच्या प्रक्रियेत विलंब आणि तक्रारी निवारण प्रणालीचा अप्रभावीपणा हे प्रमुख समस्याक्षेत्र आहेत. या अडचणींमुळे शेतकऱ्यांचा योजनेवरील विश्वास कमी होतो आणि त्यांचा आर्थिक त्रास वाढतो. या समस्यांचे निराकरण करण्यासाठी जागरूकता वाढवणे, तंत्रज्ञानाचा सुलभ वापर, प्रशासकीय प्रक्रिया सोपी करणे आणि पारदर्शक तक्रार निवारण यंत्रणा उभारणे गरजेचे आहे.*



***कीवर्ड्स:*** *पीक विमा, पीएमएफबीवाय, फसल बीमा दावा, शेतकरी अनुभव, अडचणी, अंमलबजावणी, काटोल तालुका, नरखेड तालुका, नागपूर जिल्हा, महाराष्ट्र शासन, नैसर्गिक आपत्ती, तक्रारी निवारण, हमीपत्रक (CCE), कृषी विमा कंपनी (AIC).*


## प्रस्तावना :

भारतातील शेती ही मुख्यत्वे पावसावर अवलंबून असून नैसर्गिक आपत्ती (दुष्काळ, पूर, वादळ, कीटकरोग) हे शेतकऱ्यांसमोरील सततचे धोके आहेत. या धोक्यांपासून संरक्षण व आर्थिक सुरक्षितता देण्यासाठी प्रधानमंत्री फसल बीमा योजना (पीएमएफबीवाय) २०१६ मध्ये सुरू करण्यात आली. या योजनेचा मुख्य हेतू किमान प्रीमियम दरात शेतकऱ्यांना व्यापक विमा कव्हर उपलब्ध करून देणे हा आहे. मात्र, दावा प्रक्रिया हा या योजनेचा सर्वात गंभीर आणि टीकेस पात्र ठरलेला भाग आहे. दाव्यांच्या अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणी, विलंब आणि पारदर्शकतेच्या कमतरतेमुळे शेतकरी वर्ग नाराज आणि निराश आहे. विदर्भ, विशेषतः नागपूर जिल्ह्यातील काटोल (कापूस प्रधान) आणि नरखेड (संत्रा/नागपूरी संत्रा प्रधान) तालुके हे नैसर्गिक आपत्तींना (अनियमित पाऊस, उन्हाळ्यातील पिकांचा तोटा) बळी पडतात. या तालुक्यांतील शेतकऱ्यांच्या दावा प्रक्रियेतील अडचणी आणि त्यांच्या अनुभवांचा सखोल अभ्यास करणे हे या शोधनिबंधाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.


***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***

*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*



**Address for correspondence:**

*प्रशांत शामराव डाखोळे,एम.कॉम बी.एड एम.बी.ए एम एच सेट वाणिज्य*



**How to cite this article:**

*डाखोळे, . प्रशांत . शामराव ., काठोळे, . फाल्गुनी . विलासराव ., & गोंगल, . रेकचंद . (2025). पीक विमा दाव्यांच्या प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी आणि शेतकऱ्यांचे अनुभव: काटोल आणि नरखेड तालुक्याचा अभ्यास. Journal of Research & Development, 17(8(II)), 121–124.* https://doi.org/10.5281/zenodo.17232875

Quick Response Code:

Website: https://jrdrvb.org/

DOI:10.5281/zenodo.17232875

OPEN ACCESS

**Journal of Research and Development**
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

अभ्यासाचे प्रश्न आहेत: (१) दावा सबमिट करण्याच्या प्रक्रियेत कोणत्या अडचणी येतात? (२) हमीपत्रक (CCE) संबंधी कोणत्या समस्या उद्भवतात? (३) दावा मंजुरीत विलंब व नकार यांमागील कारणे काय आहेत?

(४) तक्रारी निवारण प्रक्रिया किती प्रभावी आहे? (५) या अनुभवांचा शेतकऱ्यांच्या योजनेवरील विश्वासावर काय परिणाम होतो?

**संशोधन पद्धत :**

हा अभ्यास मिश्रित पद्धत वापरून करण्यात आला:

**१. क्षेत्र अभ्यास क्षेत्र :** नागपूर जिल्ह्यातील काटोल (कापूस प्रधान) आणि नरखेड (संत्रा/नागपूरी संत्रा प्रधान) तालुका.

**२. नमुना :** दोन्ही तालुक्यांतील एकूण १८० शेतकऱ्यांची यादृच्छिक निवड (९० प्रति तालुका). लहान, मध्यम आणि मोठ्या शेतकऱ्यांचा समावेश.

**३. माहिती संकलन :**

**१) प्रश्नावली सर्वेक्षण :** दावा प्रक्रियेतील अडचणी, माहितीची उपलब्धता, हमीपत्रक (CCE) अनुभव, दावा स्थिती, तक्रारी याविषयी संरचित प्रश्नावली.

**२) सखोल मुलाखती :** ३० शेतकऱ्यांच्या (१५ प्रति तालुका) मुलाखती घेऊन त्यांच्या वैयक्तिक अनुभवांची सखोल माहिती घेतली.

**३) गट चर्चा ( FGDs):** प्रत्येक तालुक्यात दोन FGDs (एकूण ४) आयोजित करण्यात आल्या.

**४) गौण माहिती :** पीएमएफबीवाय अहवाल, महाराष्ट्र शासनाचे कृषी विभागाचे अहवाल, जिल्हा आकडेवारी, संशोधन लेख.

**४. माहिती विश्लेषण :** परिमाणात्मक माहितीचे सांख्यिकीय विश्लेषण (वारंवारता, टक्केवारी, क्रॉस-टॅब्युलेशन) SPSS सॉफ्टवेअर वापरून केले. गुणात्मक माहितीचे (मुलाखत, FGD) विषयवार विश्लेषण (Thematic Analysis) केले.

**शोध निष्कर्ष आणि चर्चा**

**१. माहितीचा अभाव आणि जागरूकतेची कमतरता :**

१) ७५% शेतकऱ्यांना दावा प्रक्रियेची पूर्ण माहिती नव्हती. विम्याचे फायदे, अपात्रता, आवश्यक कागदपत्रे याबद्दल गोंधळ होता (कुंभार, २०२१; पाटील, २०२०).

२) तालुका पातळीवरील जागरूकता कार्यक्रम अपुरे आणि अप्रभावी असल्याचे दिसून आले (महाराष्ट्र शासन, २०२२).

**२. दावा सबमिट करण्यातील अडचणी :**

**१) कागदपत्रांची गुंतागुंत :** जमीन म्हणजेपणा (Land Records - ७-१२), ओळखपत्र, बँक माहिती, बियाणे खरेदी पावत्या इत्यादी कागदपत्रे गोळा करणे ही मोठी आव्हानात्मक कामगिरी होती. अचूक कागदपत्र नसल्याने अर्ज फेटाळले जात (भोसले, २०१९; पाटील, २०२०).

**२) तांत्रिक अडथळे :** ऑनलाईन पोर्टलवर (www.pmfby.gov.in) दावा सबमिट करणे हे मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांसाठी, विशेषत: वृद्ध आणि कमी शिक्षित शेतकऱ्यांसाठी अवघड होते. इंटरनेट कनेक्टिव्हिटीची समस्या देखील होती (गायकवाड, २०२३; तेलंग, २०२२).

**३. हमीपत्रक (CCE) प्रक्रियेतील गंभीर समस्या :**

**१) हमीपत्रक** : ही दावा मंजुरीची गुरुकिल्ली असून येथे सर्वात जास्त तक्रारी होत्या.

**२) वेळेवर न होणे :** CCE वेळेवर होत नाहीत (६८% शेतकऱ्यांचा अनुभव). हंगाम संपल्यानंतरही CCE होत राहिल्याचे दिसून आले (राऊत, २०२१; देशमुख, २०२२).

**३) पारदर्शकतेचा अभाव :** CCE मध्ये शेतकऱ्यांचा सहभाग अपुरा, प्रक्रिया पारदर्शक नाही. काही शेतकऱ्यांनी हातपाय झालेल्या CCE अहवालांचा उल्लेख केला (मोरे, २०२०; FGD निष्कर्ष).

**४) अयोग्य पद्धती :** नमुना प्लॉट योग्य प्रकारे निवडले जात नाहीत, पिकाचे मोजमाप अचूकपणे घेतले जात नाहीत अशी शेतकऱ्यांची तक्रार होती (IDI निष्कर्ष).

**४. दावा मंजुरीत विलंब आणि नाकारणे :**

**१) अत्यधिक विलंब :** ८०% शेतकऱ्यांना दावा मंजुरीसाठी एका हंगामापेक्षा जास्त वेळ लागला. काही प्रकरणांत दोन-तीन हंगाम लागले (सर्वेक्षण निष्कर्ष).

**२) अपारदर्शक कारणांसह नकार :** अनेक दावे CCE अहवाल, कागदपत्रांच्या कमतरतेसारख्या कारणांवरून नाकारले जात. नकाराची स्पष्ट कारणे आणि अपील प्रक्रिया शेतकऱ्यांना समजत नसे (शिंदे, २०२३; गायकवाड, २०२३).

**३) कमी भरपाई :** मंजूर झालेल्या दाव्यांच्या रकमा देखील प्रत्यक्ष नुकसानीच्या तुलनेत खूप कमी असल्याचे शेतकऱ्यांनी नमूद केले )FGD निष्कर्ष).

**५. तक्रारी निवारण प्रणालीचा अप्रभावीपणा.**

१) तक्रारी नोंदवण्याचे मार्ग (हेल्पलाईन, पोर्टल, शासकीय कार्यालये) गुंतागुंतीचे आणि अप्रभावी वाटत. तक्रारींना योग्य प्रतिसाद मिळत नाही (७०% शेतकऱ्यांचा अनुभव) (पाटील, २०२०; तेलंग, २०२२).

**६. शेतकऱ्यांच्या विश्वासात घट**

१) या सर्व अडचणी, विलंब आणि अपारदर्शक प्रक्रियेमुळे शेतकऱ्यांचा पीएमएफबीवाय योजनेवरील आणि विमा कंपन्यांवरील विश्वास लक्षणीयरीत्या कमी झाला आहे. अनेक शेतकऱ्यांनी भविष्यात विमा घेण्याची इच्छा व्यक्त केली नाही (IDI आणि FGD निष्कर्ष; कुंभार, २०२१).

**शिफारसी :**

**वरील निष्कर्षांवर आधारित पुढील शिफारसी करण्यात येत आहेत:**

**१.जागरूकता व मार्गदर्शन वाढवणे:**

गावपातळीवर सतत जागरूकता कार्यक्रम, साधारण भाषेतील माहितीपत्रके, सहाय्यक केंद्रे.

**२.प्रक्रिया सुलभ करणे :**

१) कागदपत्रांची आवश्यकता कमी करणे. सिंगल विंडो सिस्टम.

२) ऑफलाइन दावा सबमिशन सुविधा सुधारणे. स्थानिक स्तरावर तंत्रज्ञान सहाय्यक.

**३. हमीपत्रक (CCE) प्रक्रिया सुधारणे :**

१) CCE वेळेवर, पारदर्शकपणे आणि शेतकऱ्यांच्या सहभागात करणे.

२) तंत्रज्ञान (सॅटेलाइट इमेजरी, ड्रोन) वापरून अचूक नुकसान निश्चिती.

CCE परिणाम त्वरित पोर्टलवर अपलोड करणे.

**४. दावा प्रक्रिया गती आणि पारदर्शकता :**

१) दावा मंजुरीची कमाल वेळ निश्चित करणे आणि ती पाळणे.

२) दावा स्थितीवर रिअल-टाइम अपडेट. नकाराची स्पष्ट व तपशीलवार कारणे देणे.

३) सोपी आणि प्रभावी अपील प्रक्रिया.

**५. प्रभावी तक्रारी निवारण यंत्रणा**:

स्थानिक स्तरावर तक्रारी निवारण अधिकारी, तक्रारींचा ऑनलाइन ट्रॅकिंग, तक्रारींवर त्वरित कारवाई.

**६. स्थानिक गरजांनुसार योजना अनुकूलित करणे**:

काटोल (कापूस) आणि नरखेड (संत्रे) सारख्या विशिष्ट पिकांसाठी नुकसान निश्चितीचे मानके बारकाईने तपासणे.

**निष्कर्ष :**

पीएमएफबीवाय ही शेतकऱ्यांच्या आर्थिक सुरक्षिततेसाठी महत्त्वाची योजना असली तरी, काटोल आणि नरखेड तालुक्यांतील दावा प्रक्रियेतील गंभीर अडचणी या योजनेच्या उद्दिष्टाप्रत धक्का देत आहेत. माहितीचा अभाव, कागदपत्रांची गुंतागुंत, CCE प्रक्रियेतील गैरव्यवहार, दाव्यांच्या प्रक्रियेतील विलंब आणि तक्रारींच्या निवारणाचा अभाव यामुळे शेतकऱ्यांचा योजनेवरील विश्वास उडाला आहे. या अभ्यासातून निघालेले निष्कर्ष स्पष्ट करतात की केवळ विम्याचा दायरा वाढवणे पुरेसे नसून, विद्यमान प्रक्रियांमध्ये मूलभूत सुधारणा करणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांच्या अनुभवाला आणि गरजांना केंद्रस्थानी ठेवून, प्रक्रिया सुलभ, पारदर्शक आणि जबाबदार बनवणे ही खरी गरज आहे. केवळ तेव्हाच पीक विमा योजना खर्या अर्थाने शेतकऱ्यांच्या आर्थिक सुरक्षेसाठी कार्यरत होऊ शकेल.

**संदर्भग्रंथ**

1. कृषी विमा कंपनी ऑफ इंडिया लि. (AIC). (२०२३). पीएमएफबीवाय: अधिकृत मार्गदर्शक तत्त्वे (PMFBY: Official Operational Guidelines). मुंबई: AIC.
2. कुंभार, र. (२०२१). महाराष्ट्रातील पीक विमा योजनेचा शेतकऱ्यांच्या विश्वासावरील परिणाम. महाराष्ट्र कृषी विज्ञान, १५ (२), ४५-५८.
3. गायकवाड, स. (२०२३). पीक विमा दावा प्रक्रियेतील तांत्रिक अडथळे: विदर्भाचा अभ्यास. कृषी तंत्रज्ञान आणि व्यवस्थापन, ८. (१), २२-३५.

4. गोस्वामी, आ., & पारेख, र. (२०१९). भारतातील पीक विमा योजनांचे कार्यप्रदर्शन: एक आढावा. कृषी अर्थशास्त्र संशोधन पत्रिका, ३२*(३), ४१५-४३०. (मूळ इंग्रजी: Goswami, A., & Parekh, R. (2019). Performance of Crop Insurance Schemes in India: A Review. Indian Journal of Agricultural Economics, 32 (3), 415-430.)
5. छेत्री, न., & कुमार, प. (२०२०). पीएमएफबीवाय अंतर्गत दावा प्रक्रिया: अडचणी आणि शक्यता. कृषी विकास आणि सार्वजनिक धोरण, १२*(४), ३०१-३१५. (मूळ इंग्रजी: Chetri, N., & Kumar, P. (2020). Claim Settlement under PMFBY: Challenges and Opportunities. Agricultural Development and Public Policy, 12 (4), 301-315.)
6. जाधव, वि. (२०२२). विदर्भातील शेतकरी संकट: एक संरचनात्मक विश्लेषण . नागपूर: विदर्भ साहित्य संघ.
7. तेलंग, अ. (२०२२). पीक विमा तक्रारी निवारण यंत्रणेचे मूल्यमापन. कृषी प्रशासन आणि विस्तार, १९*(२), ८९-१०४.
8. देशमुख, म. (२०२२). हमीपत्रक (CCE) प्रक्रिया: सैद्धांतिकी आणि वास्तव. कृषी विज्ञान संशोधन पत्रिका, २८ (१), १२३-१३७.
9. नंदूरकर, स. (२०२१). नागपूर जिल्ह्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य. महाराष्ट्र कृषी अर्थशास्त्र संमेलन प्रकाशन, ४७, ११२-१२५.
10. .पाटील, द. (२०२०). पीक विमा दावा प्रक्रियेतील शेतकऱ्यांच्या अडचणी: सांगली जिल्ह्याचे केस स्टडी. कृषी व्यवस्थापन आणि विस्तार, १७ (३), ५५-६८.
11. भोसले, क. (२०१९). पीक विमा योजनेच्या अंमलबजावणीतील अडचणी. कृषी संशोधन आणि विकास, १४ (४), २३४-२४८.
12. महाराष्ट्र शासन, कृषी विभाग. (२०२२). वार्षिक कृषी अहवाल २०२१-२२. मुंबई: महाराष्ट्र शासन.
13. महाराष्ट्र शासन, कृषी विभाग (कृषी विमा उपविभाग). (२०२३). पीएमएफबीवाय स्थिती अहवाल: नागपूर जिल्हा. मुंबई: महाराष्ट्र शासन.
14. मोरे, प. (२०२०). हमीपत्रक (CCE) अहवाल आणि दावा नाकारणे: शेतकऱ्यांचा दृष्टिकोन. कृषी संशोधन समीक्षा, ११ (१), ७८-९२.
15. राऊत, एस. (२०२१). CCE प्रक्रियेतील विलंब आणि त्याचे परिणाम. कृषी अर्थशास्त्र आणि व्यवस्थापन, २५ (२), १५६-१७०.
16. विश्व बँक. (२०२०). भारतातील कृषी विमा: प्रगती आणि आव्हाने (Agriculture Insurance in India: Progress and Challenges). वॉशिंग्टन डी.सी.: विश्व बँक. (मूळ इंग्रजी)
17. शिंदे, र. (२०२३). पीक विमा दावा नकार: कारणे आणि परिणाम. कृषी विकास संदर्भ, ९ (२), ४५-६०.
18. सरकार, ए., & जोशी, प. (२०१८). भारतातील पीक विमा योजनांचे मूल्यांकन. आंतरराष्ट्रीय कृषी व्यवस्थापन पत्रिका, १० (१), १-(मूळ इंग्रजी: Sarkar, A., & Joshi, P.K. (2018). Evaluation of Crop Insurance Schemes in India. International Journal of Agricultural Management, 10 (1),1-18.)
19. सोनवणे, वि., & तांबोळी, य. (२०२१). नरखेड तालुक्यातील संत्रे उत्पादक शेतकऱ्यांचे सामाजिक-आर्थिक स्थैर्य. फलोत्पादन संशोधन, ३६ (३), २१०-२२५.
20. हिवरकर, एम. (२०२२). विदर्भातील शेतकरी आत्महत्या: कारणे आणि उपाययोजना (द्वितीय आवृत्ती). नागपूर: प्रज्ञा प्रकाशन.

# Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

Original Article

# शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांचा शैक्षणिक दृष्टिकोनातून अभ्यास

**डॉ. अंकुश रामचंद्र बनसोडे**
सहयोगी प्राध्यापक,महावीर महाविद्यालय कोल्हापूर
**Email:** ankushbansode4321@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2025-170825
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 8 (II)
Pp. 125-128
August 2025
**Submitted:** 14 July. 2025
**Revised:** 25 July. 2025
**Accepted:** 10 Aug 2025
**Published:** 30 Aug.2025

***सारांश***

*शाश्वत विकासाची संकल्पना आर्थिक वाढ, सामाजिक समता आणि पर्यावरण संरक्षण संतुलित करण्यासाठी जागतिक वचनबद्धता म्हणून उदयास आली आहे. जागरूकता, कौशल्ये, मूल्ये आणि नवोपक्रमांना प्रोत्साहन देऊन संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास उद्दिष्टे (SDGs) साध्य करण्यात शिक्षणाची महत्त्वाची भूमिका आहे. हा अभ्यास शिक्षण आणि शाश्वत विकास यांच्यातील परस्परसंबंधांचा शोध घेतो, २०३० चा अजेंडा साध्य करण्यासाठी शिक्षण कसे परिवर्तनकारी साधन म्हणून काम करते यावर प्रकाश टाकतो. वर्णनात्मक आणि सर्वेक्षण-आधारित दृष्टिकोनाद्वारे, हा पेपर शाश्वततेला प्रोत्साहन देण्यासाठी शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे आणि संशोधन संस्थांच्या भूमिकेचे विश्लेषण करतो. अभ्यासक्रम सुधारणा, शिक्षक प्रशिक्षण, हरित शिक्षण, डिजिटल समावेशकता आणि मूल्य-आधारित शिक्षण हे प्रमुख धोरणे म्हणून भर देतो. निष्कर्षांवरून असे दिसून येते की शिक्षण केवळ पर्यावरणीय जागरूकता आणि सामाजिक जबाबदारी वाढवत नाही तर विद्यार्थ्यांना रोजगारक्षम कौशल्ये आणि जागतिक नागरिकत्व मूल्यांनी सुसज्ज करते. अभ्यासातून असा निष्कर्ष निघतो की शाश्वत विकासाचे शिक्षण प्रणालीमध्ये समाकलन करणे न्याय्य, समतापूर्ण आणि लवचिक समाज निर्माण करण्यासाठी आवश्यक आहे.*

***मुख्यशब्द:*** *शाश्वत विकास, शिक्षण, एसडीजी, एनईपी-२०२०, पर्यावरण जागरूकता, मूल्य-आधारित शिक्षण, हरित शिक्षण, जागतिक नागरिकत्व, नवोन्मेष, सामाजिक समानता*

## प्रस्तावना

एकविसाव्या शतकातील वेगवान औद्योगिकीकरण, नागरीकरण व जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे मानव समाजाच्या विकासाला एक नवी दिशा मिळाली आहे. मात्र या प्रगतीमुळे पर्यावरणीय समतोल बिघडला, सामाजिक असमानता वाढली तसेच आर्थिक विषमता तीव्र झाली. या पार्श्वभूमीवर जागतिक स्तरावर “शाश्वत विकास” )Sustainable Development) ही संकल्पना उदयास आली. संयुक्त राष्ट्राने 2015 मध्ये निश्चित केलेली 17 शाश्वत विकास उद्दिष्टे (Sustainable Development Goals – SDGs) ही 2030 पर्यंत साध्य करण्याची एक सामूहिक व जागतिक वचनबद्धता आहे.या उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. कारण शिक्षण केवळ ज्ञान देत नाही तर व्यक्तिमत्व विकास, मूल्यसंस्कार, पर्यावरण-जागरूकता आणि जबाबदार नागरिक घडविण्यात मदत करते. त्यामुळे या संशोधन पत्रात शाश्वत विकास उद्दिष्टांचा शैक्षणिक दृष्टिकोनातून अभ्यास करण्यात येणार आहे.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:10.5281/zenodo.17233005
OPEN ACCESS

**Address for correspondence:**
डॉ. अंकुश रामचंद्र बनसोडे,सहयोगी प्राध्यापक,महावीर महाविद्यालय कोल्हापूर

**How to cite this article:**
*बनसोडे, . अंकुश . रामचंद्र . (2025). शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांचा शैक्षणिक दृष्टिकोनातून अभ्यास. Journal of Research & Development, 17(8(II)), 125–128.* https://doi.org/10.5281/zenodo.17233005

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

**संशोधन लेखाची उद्दिष्टे**

१. शाश्वत विकासाची संकल्पना आणि वैशिष्ट्ये समजून घेणे.
२. शाश्वत विकासाची उद्दिष्टे व शिक्षणाचा परस्परसंबंध स्पष्ट करणे.
३. शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांचा शैक्षणिक दृष्टिकोनातून अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत संशोधन लेखासाठी वर्तमानपत्रातील शिक्षण तज्ञांच्या मुलाखती, लेख, विविध वाहिण्यावरील पर्यावरणीय प्रसारणे, विविध ग्रंथसंपदा यांचा आढावा घेऊन सर्वेक्षण अभ्यास पद्धतीने वर्णनात्मक तर्कसंगत माहिती संकलित करण्यात आली आहे.

**शाश्वत विकासाची संकल्पना**

"शाश्वत विकास" म्हणजे असा विकास जो वर्तमानकाळातील गरजा पूर्ण करतो, पण पुढील पिढ्यांच्या गरजा धोक्यात आणत नाही. (Brundtland Report, 1987). यात तीन परिमाणे महत्त्वाची मानली जातात:

1. आर्थिक विकास
2. सामाजिक समता
3. पर्यावरण संरक्षण

हे तीनही घटक परस्परपूरक असले तरच विकास शाश्वत ठरतो. थोडक्यात शाश्वत विकास म्हणजेनिसर्ग व मानव यांच्यात समवाय साधून आजचा विकास आणि उद्याची हमी देणारा मार्ग होय.

**शाश्वत विकासाची वैशिष्ट्ये:**

**1. पर्यावरणीय शाश्वतता** – नैसर्गिक साधनसंपत्ती जसे की पाणी, हवा, जंगल, माती, खनिजे यांचा अपव्यय न करता त्यांचा संवर्धनात्मक वापर.

**2. आर्थिक शाश्वतता** – उद्योग, शेती, व्यापार यामध्ये प्रगती साधताना संसाधनांचा तुटवडा किंवा असमानता निर्माण न करता स्थिर अर्थव्यवस्था राखणे.

**3. सामाजिक शाश्वतता** – समाजातील सर्व घटकांना समान संधी, न्याय, शिक्षण, आरोग्य आणि जीवनमान उंचावण्याची हमी देणे.

**4. पिढीगत न्याय** – केवळ वर्तमानच नव्हे तर पुढील पिढ्यांच्या हक्कांचा विचार करणे.

**5. संतुलनाचा दृष्टिकोन** – आर्थिक वाढ, सामाजिक प्रगती आणि पर्यावरणीय संवर्धन यांचा संतुलित मेळ घालणे.

**शाश्वत विकास उद्दिष्टांची (SDGs) रूपरेषा**

संयुक्त राष्ट्राने ठरविलेली 17 उद्दिष्टे ही पुढीलप्रमाणे आहेत:

1. गरिबीचा अंत
2. शून्य उपासमार
3. उत्तम आरोग्य व कल्याण
4. सर्वांसाठी दर्जेदार शिक्षण
5. लिंग समानता
6. स्वच्छ पाणी व स्वच्छता
7. परवडणारी व स्वच्छ ऊर्जा
8. सन्मानजनक काम व आर्थिक वाढ
9. उद्योग, नवोपक्रम व पायाभूत सुविधा
10. असमानतेचा अंत
11. शाश्वत शहरे व वसाहती
12. जबाबदार उपभोग व उत्पादन
13. हवामान कृती
14. सागरी संसाधनांचे संरक्षण
15. स्थलज परिसंस्थेचे संरक्षण
16. शांतता, न्याय व सक्षम संस्था
17. जागतिक भागीदारी

**शाश्वत विकासाची उद्दिष्टे व शिक्षणाचा परस्परसंबंध**

शिक्षण हे सर्व १७ उद्दिष्टांचे मुख्य आधार आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण (SDG 4) हे इतर उद्दिष्टे साध्य करण्यासाठी प्रेरक शक्ती ठरते. शिक्षणाद्वारे पर्यावरण-जागरूकता, सामाजिक न्याय, लिंग-समानता, आरोग्य-जाणीव वाढवता येते.

**१. शिक्षण व जागरूकता**

शाश्वत विकासासाठी दर्जेदार शिक्षण (SDG-4) हे केंद्रबिंदू मानले जाते. पर्यावरण शिक्षण, नैतिक शिक्षण, जीवनकौशल्ये यांचा समावेश केल्यास विद्यार्थी समाजासाठी जबाबदार ठरतात. संशोधनाने सिद्ध केले आहे की, ज्या समाजात शिक्षणाचा स्तर उंचावलेला आहे, तिथे पर्यावरणीय व सामाजिक समस्या तुलनेने कमी प्रमाणात आढळतात.

**२. संशोधन व नवोपक्रम**

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

उच्च शिक्षण संस्थांमधील संशोधन कार्यामुळे ऊर्जा बचत, पर्यावरणपूरक तंत्रज्ञान, कचरा व्यवस्थापन, स्वच्छ ऊर्जा याबाबत नवकल्पना घडतात.

उदाहरणार्थ, हरित तंत्रज्ञान (Green Technology) हे शिक्षणसंस्थांच्या संशोधनातून पुढे आले आहे.

**३. मूल्याधिष्ठित शिक्षण**

शाश्वत विकासाची पायाभूत अट म्हणजे सामाजिक न्याय व समता. शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सहिष्णुता, लिंग समानता, मानवाधिकारांची जाणीव, लोकशाही मूल्ये रुजविता येतात.

**४. कौशल्य विकास**

आर्थिक प्रगतीसाठी विद्यार्थ्यांना कौशल्याधारित शिक्षण देणे अत्यावश्यक आहे. व्यावसायिक शिक्षण, उद्योजकता प्रशिक्षण यामुळे रोजगारनिर्मिती होते आणि गरिबी कमी करण्यास मदत होते.

**५. पर्यावरण शिक्षण**

हवामान बदल, जैवविविधतेचे रक्षण, नवीकरणीय ऊर्जा याबद्दलची व्यवस्थित माहिती शालेय व उच्च शिक्षण स्तरावर देणे गरजेचे आहे. शालेय स्तरावर वृक्षारोपण, ऊर्जा बचत प्रकल्प

महाविद्यालयीन स्तरावर संशोधन प्रकल्प, जनजागृती मोहीमा यामुळे विद्यार्थी प्रत्यक्ष कृतीशील होतात.

**६. डिजिटल शिक्षण व समावेशकता**

आधुनिक डिजिटल साधनांचा वापर करून शिक्षण सर्वांसाठी उपलब्ध करता येते. ग्रामीण भाग, अल्पसंख्याक, दिव्यांग विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहोचल्यास सामाजिक असमानता कमी होते (SDG-10).

**शिक्षणाद्वारे साध्य होणारी उद्दिष्टे**

१. गरिबी निर्मूलन (SDG 1): कौशल्याधारित शिक्षणामुळे रोजगारनिर्मिती.

२. भूकमुक्ती (SDG 2): कृषी शिक्षण व तंत्रज्ञानाचा प्रसार.

३. आरोग्य आणि कल्याण (SDG 3): आरोग्यविषयक शिक्षण, स्वच्छतेची जाणीव.

४. लिंग-समानता (SDG 5): शिक्षणाद्वारे महिला सशक्तीकरण.

५. स्वच्छ पाणी व स्वच्छता (SDG 6): पाणी व्यवस्थापनाविषयी जागरूकता.

६. सन्मानजनक रोजगार व आर्थिक प्रगती (SDG 8): व्यावसायिक शिक्षण.

७. पर्यावरणीय संरक्षण (SDG 13–15): हवामान बदल, जैवविविधता संवर्धनाविषयी अभ्यास.

**शैक्षणिक संस्था व त्यांची भूमिका**

शाळा–महाविद्यालये विद्यार्थ्यांमध्ये शाश्वत जीवनशैलीचे मूल्य रुजवू शकतात. संशोधन संस्था पर्यावरणपूरक तंत्रज्ञान विकसित करू शकतात. विद्यापीठे अभ्यासक्रमात शाश्वत विकास विषयांचा समावेश करू शकतात. शिक्षक हे विद्यार्थ्यांना समाजाशी निगडित जबाबदारीची जाणीव करून देतात.

**शिक्षण पद्धतीतील आवश्यक बदल**

1. प्रात्यक्षिकाधारित व अनुभवाधारित शिक्षणावर भर.
2. स्थानिक गरजा आणि जागतिक आव्हाने यांचा समन्वय.
3. हरित शिक्षण (Green Education) व ई-लर्निंगचा अवलंब.
4. अभ्यासक्रमात शाश्वत विकास विषयांचा अंतर्भाव.

**विद्यार्थ्यांच्या पातळीवरील परिणाम**

1. पर्यावरणपूरक उपक्रमांत सहभाग (उदा. वृक्षारोपण, स्वच्छता अभियान).
2. सामाजिक समरसतेची जाणीव व जबाबदारीची भावना.
3. रोजगारक्षम कौशल्ये विकसित होणे.
4. जागतिक नागरीकत्वाची (Global Citizenship) जाणीव.

**अभ्यासातून मिळणारे लाभ**

1. सामाजिक असमानतेत घट.
2. नैसर्गिक संसाधनांचा जबाबदारीने वापर.
3. पर्यावरण संवर्धनास प्रोत्साहन.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

4. शाश्वत आर्थिक विकासाची पायाभरणी.

**भारतातील शिक्षण व शाश्वत विकास**

भारतासारख्या विकसनशील देशासाठी शाश्वत विकासाची अंमलबजावणी शिक्षणाशिवाय अशक्य आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 (NEP 2020) मध्ये शाश्वत विकासाशी सुसंगत तत्वे समाविष्ट केली आहेत. शालेय अभ्यासक्रमात पर्यावरण शिक्षण, आरोग्य शिक्षण व मूल्य शिक्षणावर भर देण्यात आला आहे.

विद्यापीठांमध्ये शाश्वत विकास अभ्यासक्रम, संशोधन केंद्रे आणि "ग्रीन कॅम्पस" योजना राबविण्यात येत आहेत.

**शिक्षणाद्वारे शाश्वत विकास साधताना येणारी आव्हाने**

१. शैक्षणिक साधनांची कमतरता
२. डिजिटल दरी (Digital Divide)
३. शिक्षकांचे अपुरे प्रशिक्षण
४. अभ्यासक्रमातील पारंपरिक पद्धती
५. संशोधनासाठी मर्यादित निधी

**शिक्षणाद्वारे शाश्वत विकास साधण्यासाठी उपाययोजना**

**शिक्षक प्रशिक्षण :** शिक्षकांना शाश्वत विकासाबद्दल अद्ययावत प्रशिक्षण देणे.
**अभ्यासक्रम सुधारणा :** प्रत्येक विषयात शाश्वत विकासाशी निगडित प्रकरणे समाविष्ट करणे.
**जनजागृती मोहिमा :** विद्यार्थ्यांच्या माध्यमातून ग्रामस्तरावर जनजागृती.
**सरकार व खाजगी क्षेत्र सहकार्य** : शैक्षणिक संस्था, उद्योग व शासन यांच्यात समन्वय साधणे.
**आंतरराष्ट्रीय सहकार्य** : जागतिक अनुभवांचा आदान-प्रदान करून नवकल्पना आत्मसात करणे.

**निष्कर्ष**

शैक्षणिक दृष्टिकोनातून शाश्वत विकास उद्दिष्टांचा अभ्यास केल्यास शिक्षण हे फक्त ज्ञानार्जनाचे साधन न राहता सामाजिक परिवर्तनाचे शक्तिशाली माध्यम ठरते. विद्यार्थ्यांमध्ये मूल्याधारित शिक्षण, पर्यावरण-जागरूकता, जबाबदारी आणि शाश्वत जीवनशैली विकसित केली तर २०३० पर्यंत शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करण्यास मोठी मदत होईल.

शाश्वत विकास ही केवळ आर्थिक प्रगतीची संकल्पना नसून ती सामाजिक न्याय, पर्यावरणीय संतुलन व आर्थिक स्थैर्य यांचा संगम आहे. या उद्दिष्टांची पूर्तता शिक्षणाशिवाय शक्य नाही. शिक्षण हीच ती साधनसामग्री आहे जी जागरूक नागरिक घडवते, मूल्यसंस्कार रुजवते आणि नवोपक्रमांना दिशा देते.

शिक्षण जागरूकता निर्माण करून, समीक्षात्मक विचार कौशल्ये निर्माण करून आणि नवोपक्रमांना प्रोत्साहन देऊन शाश्वत विकासात योगदान देते. ते नागरिकांमध्ये पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी, सामाजिक न्यायाचे समर्थन करण्यासाठी आणि शाश्वत पद्धतीने आर्थिक संधींचा पाठलाग करण्यासाठी जबाबदारीची भावना निर्माण करते. समावेशक शिक्षणाद्वारे, उपेक्षित समुदायांना गरिबीवर मात करण्यासाठी आणि समाजात सकारात्मक योगदान देण्यासाठी साधने मिळतात.

म्हणूनच शिक्षण प्रणालीमध्ये शाश्वत विकास हा अविभाज्य घटक म्हणून समाविष्ट केला गेला पाहिजे. विद्यार्थी, शिक्षक, धोरणकर्ते आणि समाज या सर्वांनी मिळूनच 2030 पर्यंत शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करण्यासाठी प्रभावी योगदान द्यावे, हीच काळाची गरज आहे.

**संदर्भसूची**

1. चित्ते, कीर्ती. (२०२३). शाश्वत विकासासाठी शिक्षण.
a. https://marathivishwakosh.org/65711/
2. Anusuya, C. (2012). Role of Teachers in Education for Sustainable Development
a. retrieved 20 august 2025 from
3. https://www.researchgate.net/publication/360080465_Role_of_Teachers_in_Education_for_Sustainable_Development
4. Brundtland, G. H. (1987). Our Common Future. World Commission on Environment
a. and Development.
5. Comhar, SDC (2007) Recommendations on the Review of the National Sustainable
a. Development Strategy, Dublin.
6. United Nations (1992) Agenda 21, Rio de Janeiro, available: http://www.un.org/esa/sustdev/documents/agenda21/index.htm.
7. United Nations. (2015). Transforming our world: The 2030 Agenda for Sustainable
a. Development. UN.
8. UNESCO. (2020). Education for Sustainable Development: A Roadmap. Paris:
a. UNESCO.
9. Government of India. (2020). National Education Policy 2020. Ministry of Education.
10. Tilbury, D. (2011). Education for Sustainable Development: An Expert Review of Processes and Learning. UNESCO

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

Original Article

# शाश्वत विकास आणि भारताची ध्येय - धोरणे: एक चिकित्सक अभ्यास

**प्रा.डॉ.देविदास ग्यानुजी नरवाडे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख, गोदावरी कला कनिष्ठ व वरिष्ठ
महाविद्यालय अंबड जि.जालना
**Email**- dgnarwade75@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-170826
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 8 (II)
Pp. 129-132
August 2025
**Submitted:** 14 July. 2025
**Revised:** 25 July. 2025
**Accepted:** 10 Aug 2025
**Published:** 30 Aug.2025

**प्रस्तावना :**

*भारतीचा शाश्वत विकास हा एक महत्त्वाचा मुद्दा आहे, जो पर्यावरणीय विकास, आर्थिक विकास आणि सामाजिक विकास यांचा समतोल साधण्यावर केंद्रित आहे.भारत हा एक विकसनशील देश आहे.दोनशे वर्षे ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून मुक्त झालेला आपला देश प्रत्येक क्षेत्रात मागास होता.शेती.ओद्योगिक, व्यापार, शिक्षण, सामाजिक, आर्थिक इत्यादी बाबतीत मुळातून सुरूवात करावी लागली होती.सर्वात जिकरीचा प्रश्न होता अन्नधान्याचा.एवढी मोठी लोकसंख्या तीचे पोट भरणं हा यक्षप्रश्न होता.पंचवावार्षिक योजना आखुन नियोजन आयोगाच्या माध्यमातून शाश्वत विकासाचे उद्दिष्ट भारत सरकारने तयार केले होते1.त्यात शेती, उद्योगांबरोबरच पर्यावरणीय समस्या यांचा विचार करण्यात आला होता.पंचवार्षिक योजना व्दारे विकास करण्यासाठी भारतीय राजकिय व्यवस्थेने सर्वांगीण संपन्नतेचा मुलभूत पाया रचला आहे.याला कुणीही नाकारू शकत नाही. या योजनेची फलश्रुती हरित क्रांती झाली.अन्न धान्यांचे उत्पादन वाढले.अन्नधान्याच्या बाबतीत देश स्वयंपूर्ण झाला.या पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून भारत सरकारने सरकारी मालकीच्या मोठ मोठ्या उद्योगांची निर्मिती केली.सुरूवातीला शेती, रोजगार, गरिबी निर्मूलन यावर भरीव कामगिरी केली आहे2.सामाजिक न्याया साठी या व्दारे प्रयत्न केले आहेत.1951 पासून 2015 पर्यंत योजना आयोग अस्तित्वात होता.यानंतर भारत सरकारने योजना आयोगाचे नाव निती आयोग केले आहे.पाच वर्षाच्या ऐवजी आता दिर्घकालीन योजनेवर काम करण्याचे ठरविण्यात आले आहे.उदा.विकसीत भारत 2047*

**कि - नोट्स**

*योजना आयोग,पंचवार्षिक योजना,निती आयोग,भारताचा सामाजिक, आर्थिक विकासाच्या योजना.*

**उद्देश.**

1.स्वातंत्र भारताच्या शाश्वत विकासाचा अभ्यास करणे.

2.भारतातील विकास योजनांचा अभ्यास करणे.

3.भारत सरकारच्या विकास योजनांचा परिणाम अभ्यासणे.

**गृहितके.**

1.भारतात नियोजन बद्ध विकास करण्यावर भर देण्यात आला आहे.

2.भारतात गरिबी निर्मूलन राबविण्यात येत आहे.

3.भारत शाश्वत विकास योजनांचा अवलंब करत आहे.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*प्रा.डॉ.देविदास ग्यानुजी नरवाडे, राज्यशास्त्र विभाग प्रमुख गोदावरी कला कनिष्ठ व वरिष्ठ ,महाविद्यालय अंबड .जालना*

**How to cite this article:**
*नरवाडे, . देविदास . ग्यानुजी . (2025). शाश्वत विकास आणि भारताची ध्येय - धोरणे: एक चिकित्सक अभ्यास. Journal of Research & Development, 17(8(II)), 129–132.* https://doi.org/10.5281/zenodo.17233081

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI:10.5281/zenodo.17233081
OPEN ACCESS

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

**नियोजन आयोग:**

नियोजन आयोगाची रचना

अध्यक्ष: भारताचे पंतप्रधान हे नियोजन आयोगाचे अध्यक्ष असत. उदा. जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी, इत्यादी.

उपाध्यक्ष: उपाध्यक्ष हे आयोगाचे कार्यकारी प्रमुख असत आणि दैनंदिन कामकाजावर देखरेख ठेवत. उपाध्यक्ष हे तज्ञ अर्थशास्त्रज्ञ किंवा प्रशासकीय अनुभव असलेले व्यक्ती असत. उदा. मॉन्टेक सिंग अहलुवालिया, गुलजारीलाल नंदा.

सदस्य: आयोगात पूर्णवेळ आणि अंशकालीन सदस्य असत, जे अर्थशास्त्र, उद्योग, कृषी, शिक्षण, आरोग्य इत्यादी क्षेत्रांतील तज्ञ असत. सामान्यतः ४ ते ७ पूर्णवेळ सदस्य असत. सदस्यांचे कार्य धोरणे तयार करणे, योजनांचे मूल्यांकन करणे आणि सल्ला देणे हे होते.

सचिव: सचिव हे आयोगाचे प्रशासकीय प्रमुख असत आणि केंद्र सरकारमधील वरिष्ठ सनदी अधिकारी असत. सचिवांनी आयोगाचे प्रशासकीय आणि समन्वयाचे कामकाज पाहिले.सल्लागार समित्या आणि विभाग: आयोगात विविध क्षेत्रांसाठी (उदा., कृषी, उद्योग, शिक्षण) विशेष सल्लागार समित्या आणि तांत्रिक विभाग होते. यामध्ये तज्ञ, शास्त्रज्ञ आणि धोरण विश्लेषकांचा समावेश असे.

राज्यांचा सहभाग: राज्य सरकारांचे प्रतिनिधी आणि मुख्यमंत्र्यांचा राष्ट्रीय विकास परिषद मार्फत सहभाग असे. NDC ही नियोजन आयोगाच्या योजनांना अंतिम मान्यता देणारी सर्वोच्च संस्था होती.कामकाजाची पद्धत: आयोगाने पंचवार्षिक योजनांसाठी उद्दिष्टे ठरवली, संसाधनांचे वाटप केले आणि केंद्र-राज्य समन्वय साधलेला होता. योजनांचे मसुदे तयार करण्यासाठी तज्ञ गट आणि कार्यकारी गट स्थापन केले जात.नियोजन आयोग हि भारत सरकारने स्थापन केलेली एक संस्था होती, जी देशाच्या आर्थिक आणि सामाजिक विकासासाठी नियोजन आणि धोरणे तयार करण्याचे काम करत होते. नियोजन आयोगाची 1950 मध्ये स्थापना झाली.

**नियोजन आयोगाचे मुख्य कार्य:**

पंचवार्षिक योजना तयार करणे, देशाच्या विकासासाठी पाच वर्षांच्या कालावधीच्या योजना तयार करणे.

**संसाधनांचे वाटप:** केंद्र आणि राज्य सरकारांना आर्थिक संसाधनांचे नियोजन आणि वाटप करणे.

आर्थिक धोरणे: उद्योग, कृषी, शिक्षण, आरोग्य यासारख्या क्षेत्रांसाठी धोरणे आखणे.

**विकासाचे मूल्यांकन करणे:** विकास योजनांच्या अंमलबजावणीचे निरीक्षण आणि मूल्यांकन करणे.

**नियोजन आयोगाचे महत्त्व: नियोजन आयोगाने भारताच्या स्वातंत्र्योत्तर आर्थिक प्रगतीत महत्त्वाची भूमिका बजावली, विशेषतः** औद्योगिकरण, कृषी सुधारणा आणि सामाजिक कल्याण योजनांमध्ये भरीव कामगिरी केली आहे. निती आयोगाची जानेवारी 2015 रोजी स्थापना करण्यात आली. याने नियोजन आयोगाची जागा घेतली आहे.

सौजन्य -https://mr.m.wikipedia.org/w

**निती आयोग :**

निती आयोगाचा मुख्य उद्देश भारताच्या विकासासाठी दीर्घकालीन धोरणे आणि कार्यक्रम तयार करणे आणि त्याची अंमलबजावणी सुनिश्चित करणे आहे.

**निती आयोगाची रचना व कार्य**: राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील सामाजिक-आर्थिक मुद्द्यांवर धोरणे तयार करणे. शाश्वत विकास, तंत्रज्ञान, नव उद्योजक आणि आर्थिक वाढीला चालना देण्यासाठी रणनीती बनवणे.

**संघराज्यात सहकार्य निर्माण करणे:** संघराज्यवादाला विकास करण्यासाठी प्रोत्साहन देणे ,राज्यांना त्यांच्या विशिष्ट गरजांनुसार धोरणे तयार करण्यासाठी मार्गदर्शन करणे.

**नव उद्योजक आणि उद्योजकता:** स्टार्टअप्स, नव उद्योजक आणि तंत्रज्ञानाला प्रोत्साहन देण्यासाठी उपाययोजना करणे. अटल इनोव्हेशन मिशन आणि सेटू यासारख्या उपक्रमांचे आयोजन करणे.

**प्रगतीचे मूल्यांकन:** राष्ट्रीय विकास कार्यक्रमांचे मूल्यांकन आणि देखरेख करणे. डेटा आणि विश्लेषणा द्वारे धोरणांच्या प्रभावी पणाचे मूल्यांकन करणे.

**विकास धोरणांचा प्रचार:**

शाश्वत विकास उद्दिष्टे (SDGs), डिजिटल इंडिया, मेक इन इंडिया, स्वच्छ भारत अभियान यांसारख्या योजनांना समर्थन देवून प्रचार, प्रसार करणे. ग्रामीण आणि शहरी विकासात समन्वय स्थापन करण्यासाठी प्रयत्न करणे.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

**सल्लागाराची भूमिका:** केंद्र आणि राज्य सरकारांना धोरणात्मक आणि तांत्रिक सल्ला देणे. जगातील सर्वोत्तम पद्धतींचा अवलंब करणे आणि त्याची अंमलबजावणी करणे.

**निती आयोगाची रचना: निती आयोगाची रचना खालीलप्रमाणे आहे:**

अध्यक्ष: भारताचे पंतप्रधान हे निती आयोगाचे अध्यक्ष असतात.

उपाध्यक्ष: निती आयोगाच्या दैनंदिन कार्याची जबाबदारी उपाध्यक्षा कडे असते. सध्या डॉ. राजीव कुमार हे उपाध्यक्ष आहेत.

**मुख्य कार्यकारी अधिकारी** : निती आयोगाच्या प्रशासकीय आणि कार्यकारी कामकाजाचे नेतृत्व करतात. सध्या श्री. अमिताभ कांत यांनी ही भूमिका पार पाडत आहेत.

सदस्य: पूर्णवेळ आणि अंशकालीन सदस्यांचा समावेश, जे अर्थशास्त्र, विज्ञान, तंत्रज्ञान, सामाजिक धोरण यासारख्या क्षेत्रांतील तज्ञांचा समावेश असतो.

**पूर्णवेळ सदस्य:** साधारणत 4-5 तज्ञांचा समावेश असतो.

**अंशकालीन सदस्य:** विविध क्षेत्रांतील तज्ञ, जे गरजेनुसार सल्ला देतात.

**प्रशासकीय परिषद:** यात सर्व राज्यांचे मुख्यमंत्री आणि केंद्रशासित प्रदेशांचे नायब राज्यपाल यांचा समावेश होतो. ही परिषद धोरणात्मक निर्णय आणि केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्यातील समन्वय प्रस्थापित करण्यासाठी प्रोत्साहन देण्याचे कार्य करत असते.

**प्रादेशिक परिषदा:** विशिष्ट प्रादेशिक मुद्द्यांवर चर्चा आणि उपाययोजना करण्यासाठी स्थापन. यात संबंधित राज्यांचे मुख्यमंत्री आणि केंद्र सरकारचे प्रतिनिधी सहभागी होतात.

**विशेष आमंत्रित:** गरजेनुसार तज्ञ, उद्योजक, आणि इतर क्षेत्रातील व्यक्तींना विशेष आमंत्रित म्हणून सामील केले जाते.

**निती आयोगाचे वैशिष्ट्य:** नियोजन आयोगा पेक्षा वेगळे नियोजन आयोग केंद्री कृत नियोजनावर आधारित होता, तर निती आयोग सहकारी संघ राज्य वाद आणि विकेंद्रित नियोजनावर भर देतो. निती आयोग धोरणात्मक सल्ला आणि मार्गदर्शनावर लक्ष केंद्रित करतो, तर नियोजन आयोग निधी वाटप आणि पंचवार्षिक योजना तयार करत होता.

**थिंक टँक:** निती आयोग एक थिंक टँक म्हणून कार्य करते, जे सरकारला आधुनिक आणि डेटा-आधारित धोरणे तयार करण्यास मदत करते.

**डिजिटल आणि तंत्रज्ञान आधारित:** डेटा विश्लेषण, कृत्रिम बुद्धिमत्ता, आणि तंत्रज्ञानाचा वापर करून धोरणे तयार करणे.

**महत्त्वाचे उपक्रम:**

**अटल इनोव्हेशन मिशन:** नव उद्योजक आणि स्टार्टअप्सना प्रोत्साहन देणे आयुष्यमान भारत योजना व्दारे आरोग्य क्षेत्रात सुधारणा करणे. डिजिटल इंडिया, डिजिटलायझेशन ला चालना देणे

**निती फोरम्स:** विशिष्ट क्षेत्रांवर केंद्रित चर्चा आणि धोरण निर्मिती करणे.

सौजन्य - https://en.m.wikipedia.org/wiki/NITI_Aayog

**भारतातील शाश्वत विकासाचे प्रमुख घटक:**

1. **पर्यावरणीय शाश्वतता:** पर्यावरण संरक्षण आणि हवामान बदलाशी लढा हे शाश्वत विकासाचे आधारस्तंभ आहेत. भारतात वाढत्या प्रदूषण, जंगलतोड आणि जल संकटामुळे पर्यावरणीय धोरणे महत्त्वाचे कार्य करत आहेत. भारताने पॅरिस करार (2015) अंतर्गत कार्बन उत्सर्जन कमी करण्याचे वचन दिले आहे. स्वच्छ भारत अभियान, राष्ट्रीय सौर मिशन आणि नवीकरणीय ऊर्जा धोरणे यासारख्या योजना यात महत्त्वाच्या भूमिकेत कार्य करत आहे.वायु प्रदुषण रोखण्याच्या उद्देशाने भारताने हरित ऊर्जा यात सौरऊर्जा,पवन ऊर्जा, विद्युत ऊर्जा यावर मोठ्या प्रमाणावर भर देण्यात येत आहे.पेटोल,डिझेल यावरील निर्भरता कमी करण्यावर भर देण्यात आला आहे.

**भारता पुढील आव्हाने:** औद्योगिक विकास आणि पर्यावरण संरक्षण यांच्यातील तणाव, कोळसा-आधारित ऊर्जेवर अवलंबन आणि शहरीकरणामुळे पर्यावरणाचा ऱ्हास.बदलत्या आंतरराष्ट्रिय राजकारणातील डावपेचांची समस्या, बड्या राष्ट्रांचे स्वार्थी धोरणे, अमेरिकेच्या टॅरिफ कर घोषणा इत्यादी मुळे भारतीय विकास दरात घसरण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

**2. आर्थिक शाश्वतता:** आर्थिक वाढ टिकवून ठेवताना संसाधनांचा जबाबदारीने वापर करणे आवश्यक आहे. भारतासारख्या विकसनशील देशात रोजगार निर्मिती आणि गरीबी निर्मूलन हे प्राधान्य देण्यात आले आहे.त्याच बरोबर भारत सरकारने स्वयंरोजगार, उद्योग,उपक्रम यावर भर दिला आहे.स्टार्टप सारख्या योजना व्दारे रोजगार निर्मितीचा प्रयत्न सरकार करत आहे.शाश्वत विकासासाठी स्थायी रोजगार

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

निर्मितीचे धोरण आर्थिक विकासाचे उद्दिष्टे आवश्यक आहे. मेक इन इंडिया, स्टार्टअप इंडिया आणि डिजिटल इंडिया यांसारख्या योजना आर्थिक शाश्वतता वाढवण्यासाठी आहेत. तसेच, GST आणि आर्थिक सुधारणा यांनी व्यवसाय सुलभता वाढवली आहे. ग्रामीण-शहरी आर्थिक विषमता, बेरोजगारी आणि शाश्वत औद्योगिक विकास यांचा समतोल राखणे. राजकीय पक्षांचे अल्पकालीन लाभांवर लक्ष केंद्रित करणे दीर्घकालीन धोरणांना बाधक ठरते. उदा. स्मार्ट सिटी मिशन अंतर्गत शहरी विकासाला चालना मिळाली, परंतु ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांचा विकास मंदावला आहे.

**3. सामाजिक शाश्वतता:** सामाजिक समावेशकता, शिक्षण, आरोग्य आणि लिंग समानता हे शाश्वत विकासाचे सामाजिक पैलू आहेत. भारतात विविधता आणि सामाजिक असमानता, जातीय विषमता यामुळे हे घटक महत्त्वाचे ठरतात. आयुष्मान भारत, बेटी बचाओ बेटी पढाओ आणि शिक्षणाचा अधिकार यासारख्या योजनांनी सामाजिक शाश्वततेवर भर दिला आहे.

**आव्हाने:** जाती, धर्म आणि आर्थिक असमानतेवर आधारित सामाजिक ध्रुवीकरण, तसेच राजकीय पक्षांचे मतपेढी-केंद्रित धोरण. उदा.आरक्षण धोरण आणि सामाजिक न्यायाच्या मुद्द्यांवर राजकीय पक्षांमधील वादविवाद शाश्वत विकासाला आकार देतात.

**4. संस्थात्मक आणि राजकीय स्थिरता:** शाश्वत विकासासाठी सुशासन, पारदर्शकता आणि कायदेशीर संरचना आवश्यक आहे. भारतात राजकीय स्थिरता आणि धोरण सातत्य यांचा थेट परिणाम विकासावर होतो.

**राजकीय धोरणे**: डिजिटल गव्हर्नन्स, RTI (माहितीचा अधिकार) आणि भ्रष्टाचारविरोधी उपाय यांनी सुशासनाला चालना दिली आहे.

**आव्हाने:** राजकीय पक्षांमधील भ्रष्टाचार, पक्षांतराची समस्या,नोकरशाहीतील अकार्यक्षमता आणि धोरण अंमलबजावणीतील त्रुटी.

उदा. पारदर्शकतेत सुधारणा आणि राजकीय निधीच्या पारदर्शकतेवर चर्चा शाश्वत विकासाच्या संस्थात्मक आधाराला बळकट करते.

**5. स्थानिक आणि जागतिक सहकार्य :** शाश्वत विकासासाठी स्थानिक समुदाय आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य यांचा समन्वय आवश्यक आहे. भारताने जागतिक मंचावर शाश्वत विकास उद्दिष्टे (SDGs) साध्य करण्यासाठी वचनबद्धता दर्शवली आहे. भारताने संयुक्त राष्ट्र संघाच्यि SDGs अंतर्गत 2030 पर्यंत उद्दिष्टे गाठण्यासाठी निती आयोगाच्या माध्यमातून योजना आखल्या आहेत.

**आव्हाने:** केंद्र-राज्य संबंध, स्थानिक स्वराज्य संस्थांची मर्यादित क्षमता आणि आंतरराष्ट्रीय दबाव.

उदा.पंचायती राज संस्थांना सक्षम करणे आणि जागतिक हवामान, निधीचा वापर यावर राजकीय चर्चा सुरू आहे.

**राजकीय इच्छाशक्ती:** शाश्वत विकासासाठी दीर्घकालीन दृष्टिकोन आणि राजकीय स्थिरता आवश्यक आहे. भारतात निवडणूक-केंद्रित धोरणांमुळे दीर्घकालीन उद्दिष्टे बाधित होतात.

**सार्वजनिक सहभाग:** स्थानिक समुदायांचा सहभाग आणि जागरूकता यांचा अभाव धोरण अंमलबजावणीला अडथळा ठरतो.आंतरखंडीय समन्वय प्रस्थापित करणे आवश्यक आहे.पर्यावरण, अर्थव्यवस्था आणि सामाजिक क्षेत्रांमधील समन्वयासाठी एकात्मिक दृष्टिकोन आवश्यक आहे.

**तंत्रज्ञानाचा वापर**: डिजिटलायझेशन आणि हरित तंत्रज्ञान यांचा अवलंब शाश्वत विकासाला गती प्राप्त करून देऊ शकते.

**समारोप:** भारताच्या दृष्टीने शाश्वत विकास हा एक जटिल आणि बहुआयामी मुद्दा आहे. यशस्वी अंमलबजावणीसाठी राजकीय इच्छाशक्ती, सुशासन, आणि स्थानिक-जागतिक सहकार्य यांचा समन्वय आवश्यक आहे. तथापि, राजकीय ध्रुवीकरण, अल्पकालीन लाभांचा पाठपुरावा आणि संसाधनांचा अभाव यामुळे आव्हाने कायम आहेत. शाश्वत विकासाला गती देण्यासाठी राजकीय पक्षांनी सर्वसमावेशक आणि दीर्घकालीन धोरणांवर भर देणे गरजेचे आहे.

**संदर्भ सूची.**

डॉ. धरावत ललित कुमार, भारत मे सतत विकास प्रशासन, तनिषा पब्लिकेशन्स,

डॉ. ढमढेरे एस. व्ही. , शाश्वत विकास आणि भारत, डायमंड पब्लिकेशन, पुणे.

गोरे मानसी, शाश्वत विकास आजची अपरिहार्यता, सुनीधी पब्लिशर्स,

डॉ. कदम प्रतिमा, 2021, शाश्वत विकास ध्येय ओळख, नित्य प्रकाशन, भोपाळ. मध्यप्रदेश.

Baken susan, 2015, Sustainable Development, routledg publication.

Niti aayog Sustainable Development Goals, (SDG) India index, 2023-24.

शाश्वत विकास उद्दिष्टे आपल्या उद्यासाठी, कपिल सहस्त्रबुद्धे, साप्ताहिक, विवेक, 2020.

**Journal of Research and Development**
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

Original Article

# मासेमारी क्षेत्रातील मानव निर्मित व निसर्गिक समस्यांचे अध्ययन

**डॉ.आर.एस शिंदे.[1] श्री.पंकज एकनाथ भोईर[2]**
[1](सहयोगी प्राध्यापक) अर्थशास्त्र विभाग प्रमुख, राजर्षी शाहू महाविद्यालय-परभणी
[2]संशोधक विद्यार्थी-सा.शा.संकुलन नांदेड, अर्थशास्त्र विभाग स्वा.रा.ती.म.विद्यापीठ नांदेड
**Email**: dr.rameshshinde74@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-170827
ISSN: 2230-9578

Volume 17
Issue 8 (II)
Pp. 133-134
August 2025

**Submitted:** 15 July. 2025
**Revised:** 25 July. 2025
**Accepted:** 10 Aug 2025
**Published:** 30 Aug.2025

***प्रस्तावना:***

*भारताला जलसंपत्तीचे वरदान प्राप्त झाले आहे. यामध्ये समुद्र, नद्या, सरोवरे, तलाव, जलाशय यांसारख्या अनेक ठिकाणी मत्स्यसाठे*

***निसर्गतः** उपलब्ध असतात. भारताला ८११८ किलोमीटर लांबीचा सागरी किनारा लाभला आहे. हा किनारा पश्चिम बाजूला असलेल्या भूखंडामुळेच अधिक श्रीमंत बनला आहे. महाराष्ट्राच्या ७२० किलोमीटर किनाऱ्याचा भूखंड मंच विस्तृत प्रमाणत आहेत. त्यामुळे समुद्रकिनारी भागातील ग्रामीण जनतेचा मासेमारी हे मुख्य उपजीविकेचे साधन आहे. यामध्ये आपल्या देशाला अरबी समुद्र, हिंदी महासागर, बंगालचा उपसागर असे महत्त्वाचे "समृद्ध मत्स्य संपत्ती" असलेले समुद्र लाभलेले आहेत. महाराष्ट्र राज्यात मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या किनारपट्टीवरील जिल्ह्यांचे मिळून अदमासे ८७ हजार चौरस किलोमीटर सागरी क्षेत्र मासेमारीसाठी उपलब्ध आहे. त्यामुळे मानवी आहारात माश्यांना महत्वाचे स्थान आहे. आहारा शिवाय रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणारे क्षेत्र म्हणूनही मस्त्य व्यवसायाचे महत्त्वाचे आहे. अन्न आणि उदरनिर्वाहाची मोठी क्षमता या व्यवसायात दडलेली आहे. त्यामुळे सागरी किनारपट्टीवरील लोकांचा पिढ्यानपिढ्या चरितार्थ निभावणारी ही मत्स्य संपत्ती तिच्या चविमुळे जगप्रसिद्ध आहे. कोकणासह मुंबई क्षेत्रातील मासेमारी यांत्रिक आणि आधुनिक पद्धतीने होत असताना दरवर्षी मासेमारी हंगाम मात्र कात्रित सापडतो. एका बाजूला पर्शियन आणि एलईडी लाईटने मासेमारी मोठ्या प्रमाणात होत असल्याने कित्येक मासेमारी नौकांना हात हलवत किनाऱ्यावर परतावे लागत आहे. रोजच्या बोटींना डिझेल लागतो त्यांचे पैसे वसूल होत नसल्याने मच्छीमार पूर्णता हवालदिल झाला आहे. त्यातच लहरी हवामानाला सामोरे जावे लागत असून मच्छीमारांची अवस्था "आई जेऊ देईन आणि बाप भीक मागू देईना" अशी झाल्याचे पाहण्यास मिळत आहे. मच्छीमारांच्या व्यवसायात स्पर्धा मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. साधनसंपत्ती मोठ्या प्रमाणावर असलेले मच्छीमार आणि साधन संपत्ती कमी असलेले किंवा नसलेले मच्छीमार यांच्यात दिवसेंदिवस संघर्ष वाढत आहे. दोन्ही एका समुद्रात मच्छीमारी करत असल्याने छोट्या मच्छीमारांवर अन्याय होत असल्याचे दिसून येते. उदाहरणार्थ मोठ्या मच्छीमारांकडे आधुनिक सुविधा उपलब्ध असल्याने ते छोट्या मच्छीमारांच्या राखीव असलेल्या भागात जाऊन जलद गतीने मासेमारी करून बाहेर पडतात त्यामुळे छोट्या मच्छीमारांना समुद्रकिनारी मासे मिळणे कठीण होते. त्यामुळे मच्छीमारांमध्ये अनेक वादविवाद निर्माण झाले आहेत. संकट समई एकमेकांना मदत करणारे मच्छीमार आज एकमेकांचे स्पर्धक विरोधक झाले आहेत. उदाहरणार्थ प्रदेशावरून वाद विवाद- उदाहरणार्थ एकमेकांच्या राखीव प्रदेशात प्रवेश केला म्हणून तक्रारी करणे. काळानुसार व बाजारातील मागणीनुसार मासेमारीच्या पद्धतीत बदल झाला*

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*डॉ.आर.एस शिंदे. (सहयोगी प्राध्यापक) अर्थशास्त्र विभाग प्रमुख, राजर्षी शाहू महाविद्यालय-परभणी.*

**How to cite this article:**
*शिंदे, . आर . एस ., & भोईर, . पंकज . एकनाथ . (2025). मासेमारी क्षेत्रातील मानव निर्मित व निसर्गिक समस्यांचे अध्ययन. Journal of Research & Development, 17(8(II)), 133–134.*
*https://doi.org/10.5281/zenodo.17233133*

Quick Response Code:

Website:
https://jrdrvb.org/

DOI:10.5281/zenodo.17233133
OPEN ACCESS

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

. उदाहरणार्थ कोकणच्या उत्तर किनारी ठाणे, मुंबई, रायगड किनाऱ्यावरील बोंबील, कोलीम, वाव, काड मोठ्या प्रमाणावर वीं मिळत होती त्यामुळे परंपरागत डोल जाळयाने त्यांची मासेमारी होत परंतु, सध्या आधुनिक पद्धतीने मासेमारी होत असल्याने माशांचे उत्पादन घटक आहे. उदाहरणार्थ पापलेट मासा या प्रजातीचा आकार दिवसेंदिवस मासेमारी करताना लहान होत चालला आहे. हेच नव्हे तर बांगडा, कारली, कोलंबी, राणी मासे अशा अनेक प्रजातीं बाबत हे घडत आहे. त्यामुळे माशांच्या प्रजनन क्षमतेवर ही विपरीत परिणाम झालेले आपल्याला दिसून येत आहेत. मत्स्य क्षेत्रावरती किंवा मासेमारी व्यवसायावर परिणाम करणाऱ्या समस्यांमध्ये मानवनिर्मित समस्या आणि नैसर्गिक समस्या या दोन्ही घटकांचा मासेमारी व्यवसायावरती परिणाम झालेला दिसून येतो. याचे अध्ययन आपण पुढील मुद्द्यांच्या साह्याने करणार आहोत.

**संशोधनाची उद्दिष्टे:-**

वरील विषयानुसार हा अभ्यास मासेमारी क्षेत्रातील व मासेमारी व्यवसायातील समस्यांचे अध्ययन करून मासेमारी व्यवसाय सावरण्यासाठी उपाययोजना कशा करता येतील यासाठी पुढील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत ते पुढील प्रमाणे-

१.मासेमारी व्यवसायावर मानवनिर्मित समस्यांमुळे व नैसर्गिक धोक्यांमुळे होणाऱ्या परिणामांचे अध्ययन करणे.

२.मासेमारी होणाऱ्या काही भागात मानवनिर्मित समस्यांमुळे व नैसर्गिक धोक्यांमुळे माश्यांच्या नष्ट होणाऱ्या प्रजातींचे अध्ययन करणे.

३.मानवनिर्मित व नैसर्गिक समस्यांमुळे माशांच्या पुनरुत्पादन चक्रातील घटिचे अध्ययन करणे.

४.मासेमारीच्या नियमांचे व कायद्याचे अध्ययन करून उपाय योजना सुचवणे.

**संशोधनाची गृहीतके:**

१.मासेमारी व्यवसायावर मानवनिर्मित समस्यांमुळे व नैसर्गिक धोक्यांमुळे विपरीत परिणाम होत आहेत.

२.मासेमारी होणाऱ्या काही भागात मानवनिर्मित समस्यांमुळे व नैसर्गिक धोक्यांमुळे माश्यांच्या काही प्रजाती नष्ट होत चालल्या आहे.

३.यांत्रिकीकरणामुळे माश्यांच्या पुनरुत्पादन चक्रात घट झाली आहे.

४.मासेमारी क्षेत्रात मासेमारीच्या नियमांचे उल्लघन मोठ्या प्रमाणावर केले जात आहे.

**संशोधन पद्धती:-**

वरील विषयानुसार संशोधनकार्य पूर्ण करण्यासाठी द्वितीय संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. यामध्ये वर्तमानपत्रे, पुस्तके, ई-वर्तमानपत्रे, विकिपीडिया, वृत्तवाहिन्या, आर्टिकल्स, व्हिडिओ, इंटरनेट या विविध प्रकारच्या माध्यमांचा उपयोग करून माहिती संकलित करण्यात आली आहे व माहितीचे विश्लेषण करण्यात आले आहे.

मासेमारी व्यवसायातील मानवनिर्मित समस्या व नैसर्गिक समस्या आणि त्यांचे मासेमारी व्यवसायावर होणारे परिणाम पुढील मुद्यांच्या साह्याने स्पष स्पष्ट करता

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

Original Article

# असुरसंस्कृतीतील पर्यावरण

**प्रा. भक्ती हुबळीकर**
मराठी विभाग, श्री ना दा ठाकरसी कला आणि वाणिज्य महिला महाविद्यालय, पुणे
**Email**: hublikar.bhakti@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-170828
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 8 (II)
Pp. 135-137
August 2025
**Submitted:** 14 July. 2025
**Revised:** 25 July. 2025
**Accepted:** 10 Aug 2025
**Published:** 30 Aug.2025

***सारांश***

*भारतीय संस्कृतीमध्ये देव-असुर यांच्यातील संघर्ष कथा स्वरूपात प्रसिद्ध आहे. परंतु असुर समुदाय हा फक्त पुराणकथांतील दुष्ट प्रतिमा नसून स्वतंत्र आदिवासी जमात म्हणून भारतात आजही अस्तित्वात आहे. छोटानागपूर, बिहार, झारखंड यांसारख्या प्रदेशांत असुर लोक आपल्या परंपरा, श्रद्धा आणि पर्यावरणाशी असलेले सहजीवन जपून आहेत. त्यांच्या जीवनशैलीत निसर्ग, पंचतत्त्वे, प्राणी-पक्षी, वृक्ष-वनस्पती यांना पूजनीय स्थान आहे. झूम शेती, लोह निर्माणकला आणि परंपरागत औषधोपचार यांचा वारसा असुरांनी दिला आहे. त्यांचे सण-उत्सव ऋतुचक्र आणि कृषीक्रियांशी निगडित आहेत. आधुनिकतेच्या आव्हानातही असुर समुदाय आपली सांस्कृतिक ओळख टिकवण्याचा प्रयत्न करीत आहे.*

***मुख्य शब्द ;-****असुर संस्कृती, असुर जमात, पर्यावरण, झूम शेती, लोककथा, पंचतत्त्वे, महिषासुर, लोह निर्माणकला, आदिवासी परंपरा, कृषी उत्सव.*

***प्रस्तावना***

*लहानपणापासून ऐकत असलेल्या कथांमध्ये देवता आणि असुर यांच्या कथा आपण ऐकलेल्या आहेत. यातील सुष्ट-दुष्टाचा झगडा आजही वेगवेगळ्या कथारूपामध्ये आपल्याला मोहित करतो आहे. मात्र ज्यांना आपण असुर म्हणून ओळखतो त्यांची स्वतंत्र आणि समृद्ध परंपरा भारतामध्ये प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. असुरमत अथवा असुर संप्रदाय हा भारतीय संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. या संप्रदायातील एक जमात म्हणजेच असुर समुदाय होय. या संस्कृतीचे पर्यावरणाशी असणारे नाते या लेखामध्ये आपण पाहणार आहोत.*

**असुरमत संप्रदाय :**

भारतीय संस्कृतीमध्ये देव आणि असुर यांच्यातील संघर्ष प्रसिद्ध आहे. हा संघर्ष सुष्ट-दुष्ट झगडा म्हणून ओळखला जातो. मात्र भारतीय संस्कृतीमध्ये देवांसोबत असुरांचे स्थानही अबाधित आहे. वेदांनी देव आणि असुर यांना एकाच प्रजापतीची लेकरे मानले आहे. असुरांचा उल्लेख वेदांमध्ये अनेक ठिकाणी आदराने केला जातो. 'प्राणशक्तीच्या जवळ असणारा' असा अर्थ असुर शब्दाची व्युत्पत्ती म्हणून सांगितला जातो. 'असुर' शब्दाचा संबंध इराणी भाषेतील 'अहुर' या शब्दाशी जोडला जातो. पारशी धर्मातील अतिशय पूजनीय देवता म्हणजे 'अहुर मज्द' होय. ऋग्वेदामध्ये जरी असुरांचा उल्लेख आदराने केलेला असला तरी त्यानंतर मात्र असुर या शब्दाला वाईट अर्थ प्राप्त होऊ लागला. जो सुर नाही तो असुर असाही एक अर्थ सांगितला जातो. सुर शब्दाचा एक अर्थ सुरापान करणारे, म्हणजे देव आणि असुर शब्दाचा अर्थ जे सुरापान करत नाहीत ते असुर असेही म्हटले जाते. पुराणातील कथेमध्ये असाही उल्लेख आढळतो की प्रजापतीला अदिती या पत्नीपासून जी मुले झाली ती म्हणजे देव होत आणि दिती व दनू यांचे पुत्र म्हणजे दैत्य, दानव अथवा असुर होत. असुर, दैत्य, दानव, राक्षस इत्यादींचा उल्लेख एकसंघपणे केला जातो. वेदांना न मानणारी अशी आर्येतर जमाती म्हणून अभ्यासकांनी यांचा उल्लेख केला आहे. त्यांची स्वतंत्र संस्कृती आणि परंपरा आहे. अशा या असुर संप्रदायाला लोकायतदर्शन, चार्वाकदर्शन असेही म्हटले गेले आहे.

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*
Quick Response Code:

**Address for correspondence:**
*प्रा. भक्ती हुबळीकर, मराठी विभाग, श्री ना दा ठाकरसी कला आणि वाणिज्य महिला महाविद्यालय, पुणे*

Website:
https://jrdrvb.org/
DOI:10.5281/zenodo.17233187
OPEN ACCESS

**How to cite this article:**
*हुबळीकर, . भक्ती . (2025). असुरसंस्कृतीतील पर्यावरण. Journal of Research & Development, 17(8(II)), 135–137.* https://doi.org/10.5281/zenodo.17233187

**Journal of Research and Development**
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

म्हणजेच असुर संस्कृती आणि असुर ज्ञानपरंपरा भारतीय परंपरेचा स्वतंत्र आणि अविभाज्य भाग मानला जातो. भारतीय संस्कृतीच्या अभ्यासामध्ये या परंपरेचे महत्त्व मोठे आहे. असुरमतसंप्रदाय अथवा असुर परंपरा ही एक व्यापक संकल्पना आहे. या परंपरेतील एक घटक म्हणजे असुर जमात अथवा असुर हा आदिवासी समुदाय होय. आज भारतामध्ये स्वतंत्र समुदाय म्हणून आपले अस्तित्त्व टिकवून असलेल्या या असुरांचे पर्यावरणाशी असलेले नाते या निबंधात पाहणार आहे.

**असुर समुदाय :**

असुर ही भारतातील आदिवासी जमातींपैकी एक जमात आहे. या जमातीचा उल्लेख आदिम जमात म्हणूनही केला जातो. ते स्वत:ला रावण, महिषासुर यांचे वंशज मानतात. दसऱ्याला रावणाचे दहन करण्याचे नाकारतात. महिषासुराबद्दल शोक दिवस पाळतात. भारतामध्ये छोटा नागपूर, बिहार, झारखंड अशा अनेक ठिकाणी आजही असुर समुदाय आपले अस्तित्त्व टिकवून आहे. आपण कोणी भयानक दिसणारे, जंगली आणि दुष्ट नाही तर आपणही माणसासारखे माणूस आहोत, असे त्यांचे म्हणणे आहे.[i] असुर समुदायाच्या पहिल्या कवयित्री सुषमा असुर यांना प्रश्न विचारला की असुर म्हणजे कोण? तर त्यावर त्यांनी दिलेले उत्तर फार सुंदर आहे. त्या म्हणाल्या की, “ असुर म्हणजे आविष्कार करणारा. असुर शब्द विपरीत अर्थाने प्रचलित झाला आहे. पण आम्ही तसे नाही. विज्ञान, कला यांचा आविष्कार करणारे असुर आहेत. लोह बनविण्याच्या कलेचा आविष्कार असुरांनी केला. झूम शेतीचा आविष्कार असुरांचा आहे.” [ii] अशा या असुरांकडे जंगलाचा सहवास आहे. परंपरागत असे प्रांतीय ज्ञान त्यांच्याकडे आहे. त्यांची जीवनशैली निसर्गाशी जोडलेली आहे. ते उगवत्या सूर्याची पूजा करतात. यासंदर्भात एक लोककथा अशी आहे की, एक कुरवा राजा होता. असुर लोक रात्री लोहा बनविण्याचे काम करत होते. राजाकडे त्यावेळी पाहुणे आले होते. राजाने असुरांना निरोप पाठवला की खूप धूर पसरतो आहे. माझ्याकडे पाहुणे आले आहेत. तुम्ही काम बंद करा. पण असुर राजाचे म्हणणे ऐकू शकत नव्हते. कारण काम जर बंद केले तर ते खातील काय? राजाने शेवटी त्यांना सांगितले की तुम्ही पूर्व दिशेला रहा आम्ही पश्चिमेला रहातो. तेव्हापासून असुर उगवत्या सूर्याची पूजा करू लागले. कुरवा असुर मावळत्या सूर्याची पूजा करू लागले.

जंगल साफ करून झूम शेती करायला असुरांनी सुरूवात केली. सुत्रू नावाची एक प्रकाराची डाळ असते. त्याची शेती असुर करीत. त्यांचा सर्वशक्तिमान परमेश्वर निराकार आहे. सालवृक्षाला ते अतिशय पवित्र मानतात. हा वृक्ष, त्याची फांदी तसेच त्याची पाने असुरांच्या अनेक विधींमध्ये महत्त्वाची आहेत. प्रत्येक गोत्रासाठी विशिष्ट प्रकारचे फूल, झाड, कीटक, प्राणी, पक्षी पूजनीय मानलेले आहे. बेलपान, बेडूक, मासा, कोकिळा, टिटवी अशी काही यासंदर्भात उदाहरणे सांगता येतील. स्वत:प्रमाणे त्यांना मानसन्मान दिला जातो. त्यांना पूजनीय मानले जाते. महिष हे त्यातील एक महत्त्वाचे उदाहरण आहे. महिषाची म्हणजे महिषासुराची ते आजही पूजा करतात. टिटवी आणि कोकिळा यांची एक असुर लोककथा आहे. टिटवी आणि कोकिळा दोघी बहिणी आपापल्या सासरी रहात होत्या. एकदा त्यांची आई खूप आजारी पडली. तिला उठता बसता येईना. आईने मुलींना निरोप पाठवला. कोकिळा सासरी मातीची काळी भांडी घासत होती. भांडी तशीच टाकून ती आईकडे आली. टिटवी मात्र आवरून सावरून बऱ्याच वेळाने पोहोचली. आईने रागाने टिटवीला शाप दिला की तू भटकत राहशील. तुला आकाश, जमीन, पाताळ, झाड काही मिळणार नाही. कोकिळेला जिला असुरी भाषेत कुहू म्हणतात, तिला मात्र आशीर्वाद दिला की, तुला तुझी मुलं सांभाळावी लागणार नाहीत. तू आरामात राहशील. असुर संस्कृतीमध्ये विविध प्राणी-पक्षांच्या कथा आहेत. असुर पंचतत्त्वांना आपले सोयरे समजतात. आपली सुख दु:खे त्यांना सांगतात. त्यांच्यामुळे आपल्याला कधीही एकाकीपण येत नाही असे ते मानतात. त्यांच्यामुळे आपले संतुलन कायम रहाते असे ते मानतात. जल, जंगल आणि जमीन यांवर पूर्णपणे अवलंबून अशी त्यांची संस्कृती आहे.

**जन्म-मरण :**

असुर समुदयामध्ये जेव्हा नवजात बाळाचा जन्म होतो तेव्हा त्याला साक्षात देवाचे रूप मानले जाते. आईच्या पालनपोषणातून त्याला मानुष्यत्त्व येते असे मानले जाते. आईला आणि बाळाला पोषणासाठी परंपरागत नैसर्गिक औषधे दिली जातात. पानाचे भांडे, दूब गवत, पाणी, शेण आणि धान्य या बाळाच्या नामकरण विधीतील आवश्यक गोष्टी आहेत. शेणाने जमीन सारवून त्यावर पानाच्या भांड्यात पाणी ठेवले जाते आणि त्यात धान्य टाकून बाळाचे नामकरण करतात. विवाहविधीमध्ये माती, जंगलातील विशिष्ट झाडे, धान्य, कुलपूजक पक्षी-झाड-फूल यांचे महत्त्व आहे. काही असुर मृत्यूनंतर पुरण्याचा विधी करतात तर काही असुर पशू पक्ष्यांना भोजनासाठी शव सोडणे महत्त्वाचे मानतात. काही असुर शव जाळून त्याची राख एका मातीच्या भांड्यात भरून ते भांडे जमिनीमध्ये पुरतात.

**पूजा आणि सण :**

असुरांचे बहुतेक सण-उत्सव हे ऋतू तसेच कृषीशी संबंधित आहेत. शेतामध्ये धान्य लावण्याआधी असुर **‘खुटियाही पूजा’** करतात. नऊ दिवस धान्य झाकून ठेवतात. दहाव्या दिवशी उघडतात. त्यात अन्य बीजे मिसळून ते पेरतात. पावसाळ्यात धान्य पेरण्याचे काम पूर्ण झाले की चांगले पीक यावे, समृद्धता असावी यासाठी ते **‘करम पर्व’** साजरा करतात. जेव्हा शेतात भरपूर धान्य पिकेल तेव्हा ते **‘खनियारी पूजा’** करतात. कापणीच्या आधी ही पूजा करतात आणि प्रार्थना करतात की पिके नीट कापता यावीत. साप-विंचवाचे भय नको. मग ते कापणी करतात. **‘संडसी–कुटासी पर्व’**मध्ये लोहाची आणि ज्यांनी लोह बनवला त्या सुकरा सुकराईन यांची पूजा केली जाते. वर्षाच्या अखेरीस ते **‘खरोज पूजा’** करतात. वर्षभर आपल्याला चांगले अन्नधान्य मिळाले म्हणून कृतज्ञतेने ही पूजा केली जाते. त्यावेळी ते खरोजगीत गातात. नाचतात. आज असुर समुदायातील बरेच लोक पोटापाण्याच्या व्यवसायासाठी गावांमध्ये, शहरात पसरले आहेत. मात्र आपल्या सणां-उत्सवासाठी ते आपल्या कुटुंबाकडे परत येतात. असुर जमातीच्या अस्तित्त्वाचे, अस्मितेचे अनेक गंभीर प्रश्न आज आहेत. मात्र आपली वैशिष्ट्ये जपत तग धरण्याचा प्रयत्न करत ते आजही आपले अस्तित्त्व टिकवून आहेत.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

**संदर्भसूची**

1. ऋग्वेद. (विविध उल्लेखांमध्ये देव-असुर परंपरेचा संदर्भ).
2. पुराण साहित्य. (दैत्य, दानव आणि असुरांची उत्पत्तीविषयक माहिती).
3. हुबळीकर, भक्ति. असुरसंस्कृतीतील पर्यावरण. (मूळ लेख).
4. ओझा, के.पी. (2002). Tribal Traditions and Culture in India. नवी दिल्ली: कॉन्सेप्ट पब्लिशिंग.
5. दास, सुरेशचंद्र (2015). Asur: A Tribal History of Jharkhand. रांची: झारखंड स्टडी सेंटर.
6. शर्मा, रामकृष्ण (2010). भारतीय आदिवासी समाज आणि संस्कृती. पुणे: Continental प्रकाशन.
7. गुप्ता, एस.सी. (2018). Tribal Festivals and Environmental Consciousness. नवी दिल्ली: अटलांटिक.

**Journal of Research and Development**
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

Original Article

# महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, नागपूर शहरातील शासकीय वाहकाचे आर्थिक स्थितीचे विश्लेषणात्मक अध्ययन

**प्रा. नीलम या. बारमासे[1], डॉ. रेकचंद गणपत गोंगले[2]**
[1]कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक कनिष्ठ वाणिज्य विभाग नबिरा महाविद्यालय, काटोल
[2] सहयोगी प्राध्यापक नबीरा महाविद्यालय,काटोल
**Email:** nilambarmase09@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-170829
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 8 (II)
Pp. 138-141
August 2025
**Submitted:** 15 July. 2025
**Revised:** 25 July. 2025
**Accepted:** 10 Aug 2025
**Published:** 30 Aug. 2025

***प्रस्तावना :-***

*सध्या मानवी गरजा व व्यवहार यांचे प्रमाण बरेच वाढले आहे .प्रत्येक व्यक्तीला आपल्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठी व्यवसायासाठी,शिक्षणासाठी, नोकरीसाठी,नातेवाईकांना भेटण्यासाठी तसेच इतर महत्त्वाच्या कामकाजासाठी दररोज प्रवास करावाच लागतो.मध्यमवर्गीय श्रीमंत लोकांकडे प्रवासाकरता स्वतःची दुचाकी वाहने असतात अशा वाहनाने कमी अंतराचा प्रवास करणे सहज शक्य असते; परंतु अतिलांबच्या प्रवासाकरीता अशा वाहनांचा उपयोग करणे त्रासदायक व जोखमीचे असते. जर प्रवासाचे अंतर अधिक असल्यास रेल्वे किंवा बस यासारख्या किफायतशीर वाहतुकीच्या साधनांचा आधार घ्यावा लागतो. त्यातही रेल्वे सुविधा सर्वत्र उपलब्ध नसल्यामुळे शेवटी प्रवासाकरीता खेडोपाडी धावणाऱ्या एसटी महामंडळाच्या प्रवासी बसचाच पर्याय शिल्लक राहतो. भारतातील परराज्य परिवहन महामंडळामध्ये महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा प्रथम क्रमांक लागतो. रस्ता वाहतुकीमध्ये प्रवासी वाहतूक आणि विशिष्ट सामानाची वाहतूक अशा दोन्हीसाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाला महत्त्वपूर्ण स्थान आहे. महामंडळाने सध्या'जिथे रस्ता तेथे एसटी'हे तत्व स्वीकारल्यामुळे बसची सुविधा अतिशय दुर्गम भागात असलेल्या खेड्यापाड्यापर्यंत जाऊन पोहोचली आहे. महामंडळाद्वारे प्रवाशांना विविध सेवा व सवलती पुरविल्या जातात. याच कारणामुळे संपूर्ण महाराष्ट्रात एसटी बसमधून प्रवास करणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. वाहतूक हा शब्द नियमित व्यवहारात अत्यंत सहजपणे वापरला जातो. वाहतूक याला इंग्रजीमध्ये Transport म्हणतात. Transport हा शब्द लॅटिन शब्दापासून बनलेला आहे. लॅटिन भाषेमध्ये Transport हा शब्द Transporter या शब्दापासून बनला आहे. 'Trans' याचा अर्थ 'दुसऱ्या बाजूला ठिकाणी'असा होतो आणि'portage'याचा अर्थ'वाहून नेणे'असा आहे. यावरून वाहतूक म्हणजे 'एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी व्यक्ती किंवा वस्तू वाहून नेणे'होय. वाहतुकीत मालाची व प्रवाश्यांची एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी ने-आण केली जाते. मालाची ने-आण होतांना अनेक व्यक्ती एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जातात. त्यामुळे आचार-विचारांची देवाण-घेवाण होते. मनुष्य हा जो प्रवास करतो तेव्हा तो आपल्याबरोबर आचार,विचार,संस्कृती,धर्मइ.कल्पनांचीदेवाण-घेवाण करीत असतो.वाहतूकीच्या विविध साधनांमुळे नाशवंत वस्तूंची लांब अंतरावरील बाजारपेठेत विक्री करता येते. विविध प्रकारचा कच्चा माल उत्पादनाच्या ठिकाणी वाहतुकीच्या विविध साधनांमुळे पोहचविणे शक्य होते. वाहतुकीच्या विविध साधनांमुळे श्रमिकांच्या आचार–विचारात व कल्पनांत बदल होऊन त्यांची गतिक्षमता वाढते. देशातील उपलब्ध साधनसामुग्री व नैसर्गिक संपत्तीचा उपभोग घेण्याच्या प्रक्रीयेवर औद्योगिक व आर्थिक विकास अवलंबून असतो. वाहतूकीच्या विविध साधनांचा विकास झाल्यास लोखंड ,पोलाद ,सिमेंट आणि इतर उद्योगांचा आपोआप विकास होतो.*

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:10.5281/zenodo.17233234
OPEN ACCESS

**Address for correspondence:**
*प्रा. नीलम या. बारमासे, (एम. कॉम. एम. एड.) कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक कनिष्ठ वाणिज्य विभाग नबिरा हाविद्यालय, काटोल*

**How to cite this article:**
*बारमासे, . नीलम . या ., & गोंगले, . रेकचंद . गणपत . (2025). महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, नागपूर शहरातील शासकीय वाहकाचे आर्थिक स्थितीचे विश्लेषणात्मक अध्ययन. Journal of Research & Development, 17(8(II)), 138–141.* https://doi.org/10.5281/zenodo.17233234

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

अश्या रितीने एका ठिकाणाहून दुसरीकडे मालाची उतारुंची व विविध कल्पना वाहून नेण्याची क्रिया म्हणजे वाहतूक होय. भारतात शहरांपेक्षा खेडी जास्त आहेत. ग्रामीण भागातील जनतेचा संबंध शहरांशी रस्त्यामुळे येतो. चांगले रस्ते असल्यास खेडयातील मुले- मुली शहरात शिक्षणासाठी येऊ शकतात त्यामुळे त्याचा सामाजिक व शैक्षणिक विकास होतो.

आपापसातील संबंध सलोख्याचे निर्माण होण्यास मदत होते. महाराष्ट्रात ग्रामीण भागात महाविद्यालयीन शिक्षणाचा प्रसार झपाट्याने झाला आहे.चांगले रस्ते नसल्यास एसटी वाहतुकीचा विकास होऊ शकत नाही. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा शिक्षणाचा मार्ग एसटी वाहतुकीच्या विकासामुळे मोकळा होतो.

महाराष्ट्रातील 70% जनता ग्रामीण भागात राहते. ग्रामीण भागातील लोकांना दररोज व्यापार, उद्योग, व्यवसाय, शिक्षण तसेच इतरही महत्वपूर्ण कामानिमित्ताने प्रवास करावा लागतो. प्रत्येकांकडे स्वतःच्या मालकीची वाहतुकीची साधने नसतात. तेव्हा प्रवास करण्याकरिता एसटी महामंडळाची कास धरावी लागते. लांबच्या प्रवासाकरीता प्रवासी वाहतूकीचे दुसरे साधन उपलब्ध नसल्यामुळे एसटी महामंडळाच्या बसनेच अधिकाधिक प्रवास केला जातो. प्रवाश्यांना प्रत्यक्ष वाहतूक सेवा पुरविण्याची अंतिम जबाबदारी बसचालक व वाहकाची असते.

बसचालक व वाहकांना त्यांच्या कार्याच्या प्रमाणात मिळणारे वेतन फार कमी प्रमाणात आहे. तसेच त्यांना इतर विभागातील कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या सोयी सुविधा प्राप्त होत नाही. ग्रामीण भागात बसचालक व वाहक रात्रवस्ती मुक्कामासाठी विश्रांतीगृहाची सोय उपलब्ध नाही त्यामुळे त्यांना बसमध्येच झोपावे लागते. परिणामतः त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. बसचालक व वाहकाचे कामाचे तास इतर कर्मचाऱ्यांच्या तुलनेत जास्त आहे. काही वेळेस त्यांना प्रवाश्यांकडून सुद्धा त्रास होतो. त्यांचा कार्यभार अतिरिक्त असल्यामुळे त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. तसेच त्यांना वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून योग्य वागणूक मिळत नाही.

**मुख्य शब्द;-** शासकीय वाहक,आर्थिक स्थिती,नागपूर शहर,एस.टी. बस सेवा,वाहतूक व्यवस्था,ग्रामीण व शहरी प्रवास,वेतन समस्या,नोकरीची स्थिरता,कामाचा ताण,प्रवाशांशी संवाद,जुन्या बसेसची स्थिती,कर्मचाऱ्यांच्या सोयी-सुविधा,प्रवासी संख्या,महिला व पुरुष वाहक,सामाजिक व शैक्षणिक विकास,औद्योगिक व आर्थिक विकास,उपाय योजना

**संशोधनाचे उद्दिष्टे :-**

१) शासकीय वाहकाच्या आर्थिक घटकांचा अभ्यास करणे.
२) शासकीय वाहकाच्या कार्य स्थितीचा अभ्यास करणे.
३) शासकीय वाहकांचे जीवनमान उंचावण्यासाठी विविध उपाय योजनांचा अभ्यास करणे.
४) शासकीय वाहकाचे कार्य स्थिती व सेवेतील अटींच्या बाबत अभ्यास करणे.

**गृहीत कृत्ये (उपकल्पना) :-**

१) शासकीय वाहकाची आर्थिक स्थिती समाधानकारक नाही.
२) शासकीय वाहकांना त्यांच्या कार्याच्या प्रमाणात मिळणारे वेतन फारच कमी आहे.

**अभ्यास पद्धती:-**

संशोधकाने "**महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ नागपूर शहरातील शासकीय वाहकांच्या आर्थिक स्थितीचे विश्लेषणात्मक अध्ययन"** हा विषय अध्ययन करण्यात आला असून तथ्य संकलन पद्धतीतील प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे .या विषयाच्या अभ्यासाकरिता नागपूर शहरातील गणेश पेठ आगार, इमामवाडा आगार, गंगाबाई घाट रोड आगार, वर्धमान नगर आगार या आगारांमधील शासकीय महिला व पुरुष वाहकांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेऊन व त्यांच्याकडून प्रश्नावली भरून घेऊन त्यावरून विश्लेषण करण्यात आले आहे.

**आर्थिक अडचणी:-**

शासकीय एस.टी. वाहकाच्या आर्थिक अडचणी खालीलप्रमाणे आहे.

**1 वेळेवर न मिळणारे वेतन:**

एसटी कर्मचाऱ्यांच्या वेळेवर वेतनाच्या समस्या आहे त्यामुळे त्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागते

**२) नोकरीची स्थिरता:**

एसटी महामंडळाच्या आर्थिक स्थितीमुळे काही ठिकाणी नोकरीचे स्थिरता कमी झालेली आहे ज्यावेळी कर्मचाऱ्यांमध्ये चिंता वाढू लागली आहे

**३) प्रवाशांची संख्या कमी होणे:**

काही मार्गावर प्रवासी असेल तर ते कमी झाल्याने एसटी बसचे आर्थिक स्थिती आणखी जास्त बिघडलेली आहे.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

**४) जास्त कामाचा ताण:**

वाहकांना जास्त तास काम करावे लागते त्यामुळे त्यांना शारीरिक आणि मानसिक ताण येतो.

**५) प्रवाशांशी संवाद:**

प्रवाशांशी संवाद साधताना अनेकदा त्यांना गैरसमज आणि वाईट अनुभव येतात त्यामुळे कामावर ताण वाढतो.

**६) जुन्या बसेसची स्थिती:**

बस बस डेपो मध्ये काही बसेस फार जुन्या झालेल्या आहेत त्या बसेस मध्ये प्रवास करताना कधी-कधी मध्येच बंद पडतात त्यामुळे बसवाहकाला फारच त्रास होतो. त्यांना त्या दुरुस्त करेपर्यंत फार वाट पाहावी लागते.

**७) अन्य सुविधा:**

बस वाहकांना इतर राज्य कर्मचाऱ्यांसारख्या सोयीसुविधा उपलब्ध नाही त्यामुळे त्यांच्या मनावर काम करताना फार मानसिक ताण येतो.

**८) बसेसची संख्या:**

प्रत्येक डेपोमध्ये काही बसेसची अवस्था भंगारासारखी झालेली आहे. त्यामुळे बसेसची संख्या कमी झालेली आहे परिणामतः काही बसेस मध्ये प्रमाणापेक्षा जास्त प्रवासी वाहून न्यावे लागतात. त्यामुळे वाहकांना खूप त्रास होतो परिणामतः त्याच्या कार्यावर व आरोग्य परिणाम होतो

**९) कमी वेतन:**

इतर राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या तुलनेत बसवाहकांना मिळणारे वेतन फारच कमी आहे त्या वेतनामध्ये त्यांच्या प्राथमिक गरजा सुद्धा पूर्ण होत नाही

**१०) प्रवाशांना सुविधा:**

महामंडळाकडून महिला प्रवाशांना हाफ तिकीट व ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास ही सुविधा पुरविले जाते परंतु यामुळे महामंडळाला आर्थिक तोटा सहन करावा लागतो याचा परिणाम कर्मचाऱ्यांच्या वेतनावर इतर सोयी सुविधावर होतो

**विश्लेषण:**

| आगाराची नावे | शासकीय पुरुष वाहकांची संख्या | शासकीय महिला वाहकांची संख्या | एकुण संख्या पुरुष + महिला वाहक | नाही म्हणणाऱ्या वाहकांची संख्या | होय म्हणणाऱ्या वाहकांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| गणेशपेठ आगार | 20 | 20 | 40 | 28 | 12 |
| इमामवाडा आगार | 10 | 10 | 20 | 14 | 06 |
| गंगाबाई घाट आगार | 15 | 15 | 30 | 21 | 09 |
| वर्धमाननगर आगार | 15 | 15 | 30 | 21 | 09 |
| वाहकांची एकुण संख्या | 60 | 60 | 120 | 84 | 36 |

संशोधकांनी नागपूर शहरातील चार आगारात जाऊन शासकीय बस वाहकाच्या प्रत्यक्ष मुलाखत घेऊन व त्यांच्याकडून प्रश्नावली भरून घेण्यात आली.त्या मुलाखतीमध्ये व प्रश्नावलीमध्ये त्यांना त्यांच्या कामाच्या मोबदल्यात मिळणाऱ्या वेतनात समाधानी आहेत किंवा नाही तसेच त्यांचे आर्थिक स्थिती चांगली आहे किंवा नाही याच्या विषयी माहिती घेऊन ती वरील तक्त्यामध्ये दर्शवली आहे. वरील तक्त्यामध्ये गणेशपेठ आगार, इमामवाडा आगार ,गंगाबाई घाट रोड आगार, वर्धमान नगर आगार मधील शासकीय पुरुष वाहकांची एकूण संख्या 60 घेतली आहे व शासकीय महिला वाहकांची सुद्धा संख्या 60 घेतली आहे या चारही आगारामधील शासकीय पुरुष वाहक व शासकीय महिला वाहक यांची प्रत्यक्ष मुलाखत घेऊन तसेच त्यांच्याकडून प्रश्नावली भरून घेण्यात आल्या व त्यावरून खालील निष्कर्ष काढण्यात आले

1) वरील चारही आगरामधील शासकीय पुरुष व महिला वाहक 84 )70%) यांना वाढत्या महागाईनुसार मिळणारे वेतन फार कमी आहे

2) वरील चारही आगरामधील शासकीय पुरुष व महिला वाहक 36 )30%) यांना मिळणाऱ्या वेतनात समाधानी आहे.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

3) शासकीय पुरुष व महिला वाहकांची (71%) त्यांना मिळणाऱ्या वेतनाच्या तुलनेत त्यांची आर्थिक स्थिती समाधानकारक नाही

4) चारही आगारांमधील शासकीय पुरुष व महिला वाहकांना कार्य करण्याच्या स्थितीमुळे मानसिक दडपण निर्माण होते

5) शासकीय पुरुष व महिला विभागांना मानसिक दडपणामुळे त्यांच्या आरोग्यावर परिणाम होतो.

**उपाय योजना:-**

1) बस वाहकांना त्यांना त्यांच्या कार्याच्या प्रमाणात वेतन देण्यात यावे.

2) बसवाहकांना इतर राज्य कर्मचाऱ्यांसारख्या सोयी सुविधा देण्यात याव्यात.

3) बस डेपो मध्ये शहराच्या लोकसंख्येनुसार बसेसची संख्या वाढवावी.

4) बसेस मध्ये बसच्या प्रमाणात प्रवासी संख्या ठरवून द्यावी.

5) पुरुष वाहकांना खेडेगावात रात्रवस्ती मुक्कामी विश्रांतीगृहाचे सोय करावी.

**संदर्भसूची:-**

1. डॉ.शर्मा व डॉ.गुप्ता भारत में परिवहन जवाहर पब्लिकेशन पुणे
2. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ प्रकाशन अहवाल 2018-19.
3. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ प्रकाशन अहवाल 2017-18
4. संजय नाथे - महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ
5. www.economictime.com
6. www.maharashtra govt.in

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

Original Article

# जागतिक उपासमारीला कारणीभूत असणारे घटक आणि उपाय योजना

**डॉ. अशोक सटवाजी हनवते**
(सहयोगी प्राध्यापक) धनाजी नाना चौधरी विद्या प्रबोधिनी संचलित,
लोकसेवक मधुकरराव चौधरी समाजकार्य महाविद्यालय, जळगाव
**Email:** a.hanwate@rediffmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-170830
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 8 (II)
Pp. 142-145
August 2025
**Submitted:** 14 July. 2025
**Revised:** 25 July. 2025
**Accepted:** 10 Aug 2025
**Published:** 30 Aug. 2025

**सारांश:**

*युनायटेड नेशन यांनी 2030 पर्यंत शुन्य भूक हा दुसरा उद्देश समोर ठेवला आहे. हा उद्देश सफल करण्यासाठी जागतिक स्तरावर शास्वत विकास करण्यासाठी प्रयत्न चालू आहे. परंतु हा उद्देश साध्य करण्याकरीता जागतिक स्तरावर कोणते अडथळे येऊ शकतात. याबाबत या लेखात मांडणी केली आहे. भारत हा देश विकसनशिल देश म्हणून बघितले जाते. सध्याच्या कालावधीत लोकसंख्येबाबत विचार केल्यास भारत देश हा जगात पहिल्या क्रमांकाचे राष्ट्र बनले आहे. या लोकसंख्येचा विचार केल्यास अनेक समस्या निर्माण हात आहेत. ज्यामध्ये सामाजिक, धार्मिक, राजकिय, आर्थिक, इ. अशा सर्वच स्तरावर समस्या निर्माण होत आहेत. यापैकी मानवाला आवश्यक असणारी मुलभूत गरज अन्न, व वस्त्र, निवारा, आरोग्य, शिक्षण या आहेत. यापैकी अन्न या मुलभूत गरजेचा विचार युनायटेड नेशनने केला असुन सर्व लोकांना पोटभर अन्न मिळेल. यातून कोणाचीही उपासमार होणार नाही. हे ध्येय समोर ठेवलेले आहे. परंतु हे ध्येय साध्य करण्यास कोणकोणते अडथळे येऊ शकतात. याबाबतचे अध्ययन या लेखात करण्यात आले आहे.*

***बीजशब्द (Keyword):-*** *प्रस्तुत लेखामध्ये युनायटेड नेशनने घोषित केलेल्या शाश्वत विकासातील दुसरे उद्देशास शुन्य भूक निवारणास अडथळे आणणारे घटक, लोकसंख्या, संघर्ष, शेती उत्पादन इ. महत्वाचे शब्द घेतले आहेत.*

**अध्ययन पध्दती (Study Method )** :- प्रस्तुत लेखा द्वितीय साधनसामग्री प्रकाशित लेख संशोधन लेख आणि प्रकाशित यावर आधारित आहे.

**उद्देश (objective)** - जागतिक उपासमारीला अध्ययन करणे आणि उपाययोजना सुचवणे

गृहितक )**Hypothesis**(:- जागतिक उपासमारीसाठी लोकांच्या हाताशी रोजगार उपलब्ध नसल्यामुळे आणि वाढत्या महागाईमुळे भुकेचा प्रश्न अधिक वाढत आहे.

**सविस्तर विवेचन )in details) -**

देशातील जनतेचे कल्याण करण्याची जबाबदारी शासनाची आहे. लोकांना कल्याणकारी सेवा सुविधा शासनाने उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. देशातील कोणताही व्यक्ती भुकेला राहणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. देशामध्ये भुकेचा प्रश्न अधिकच अधिकच वाढत असल्याचे दिसत आहे. प्रकाशित झालेल्या बातमीनुसार ग्लोबल हंगर इंडेक्स मध्ये भारताची भूकबळीच्या बाबतची स्थिती गंभीर आहे असे त्यामध्ये म्हटले आहे या समस्येचे मूळ कारण अन्नामध्ये निर्माण झालेला तुटवडा हा नसून अन्न नासाडी मध्ये आहे. असे त्याने स्पष्ट केले आहे तसेच इंटरनॅशनल पॉलिसी रिसर्च इन्स्टिट्यूटच्या अहवालामध्ये प्रकाशित केल्यानुसार 119 देशांच्या यादीमध्ये भारताचा १०० वा क्रमांक लागत आहे असे दिसत आहे. इतकेच नव्हे तर या यादीमध्ये बांगलादेश आणि नेपाळ या देशाच्या ही मागे आहे. असा हा अहवाल सांगतो.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*डॉ. अशोक सटवाजी हनवते, (सहयोगी प्राध्यापक) धनाजी नाना चौधरी विद्या प्रबोधिनी संचलित,लोकसेवक मधुकरराव चौधरी समाजकार्य महाविद्यालय, जळगाव*

**How to cite this article:**
*हनवते, . अशोक . सटवाजी . (2025). जागतिक उपासमारीला कारणीभूत असणारे घटक आणि उपाय योजना. Journal of Research & Development, 17(8(II)), 142–145.* https://doi.org/10.5281/zenodo.17233272

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:10.5281/zenodo.17233272
OPEN ACCESS

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

भूक म्हणजे काय? भूक ही एक अस्वस्थ किंवा वेदनादायक शारीरिक संवेदना आहे. जी आहारातील उर्जेच्या अपर्याप्त वापरामुळे उद्भवते. जेव्हा एखादी व्यक्ती सामान्य, सक्रिय आणि निरोगी जीवन जगण्यासाठी, नियमितपणे पुरेशा प्रमाणात कॅलरी (आहारातील ऊर्जा) वापरत नाही. तेव्हा ते क्रॉनिक बनते.

अर्थात व्यक्तीला ऊर्जा पुरवणारा अन्न हा घटक आहे. ज्या व्यतिरिक्त माणसाला जीवन जगणे अशक्य होते.

**युनायटेड नेशनच्या शून्य भूक उद्देशाला अडथळे आणणारे घटक -**

भारतामध्ये शून्य भूक निर्माण करण्यासाठी अनेक अडथळे येतात. त्या अडथळयांपैकी

**अन्न नासाडी**:- भारतामध्ये अन्न उत्पादन मोठ्या प्रमाणामध्ये होत असली तरीसुद्धा संयुक्त राष्ट्राचे आकडेवारीनुसार भारतातल्या भूकबळीची संख्या 40% अन्न वाया जात आहे भारतामध्ये अन्नधान्य साठवणारे मोठमोठाले गोदान उपलब्ध नाहीत यामुळे 40% अन्नधान्य वाया जाते. जेवढ्या मोठ्या प्रमाणात अन्न उत्पादन होते गरजू लोकांपर्यंत अन्न पोहोचत नाही व्यक्तीपैकी 25 टक्के लोक भारतात राहतात भारतामध्ये 19.5 कोटी नागरिक कुपोषित आहेत त्यांना पोषण आहार अतिशय नाममात्र असतो. इतकेच नाही तर भारतामध्ये अनेक ठिकाणी लग्न, कौटुंबिक सोहळे, पार्टी अशा विविध प्रसंगी मोठ्या प्रमाणात अन्न वाया जाते ते अन्न गरजू लोकापर्यंत पोहोचत नाही इतकेच नाही तर ते अन्न साठवून ठेवता येत नाही किंवा ठेवण्याची व्यवस्था नाहीत यामुळे अन्नाची नासाडी होत आहे असे.

**संघर्ष -** देश पातळीवर होत असणारे सीमा प्रश्न दहशतवाद युद्ध आणि संघर्ष यासारख्या अनेक घटकांमुळे देशातील लोकांना अन्न समस्येला सामोरे जावे लागते. उदाहरणार्थ तालिबानी लोकांनी जो राजकीय अस्थिरता निर्माण केली. त्यामध्ये कित्येक लोकांना घरदार सोडून उत्पादनात साधने सोडून जी वाचवण्यासाठी पळावे लागले आहे. यामुळे लोकांना आपला उदरनिर्वाह करणे जीव वाचवणे हेच महत्त्वाचे वाटत होते म्हणून त्यांनी पलायन केले. यासारखे अनेक स्वरूपाचे संघर्ष व्यक्तीच्या सोबत आले आहेत. ज्यामध्ये गरिबी ही नेहमीच पाठलाग करत असते. गरिबी बरोबरच हाताला काम न मिळणे, हे त्यांना अधिक गरीब बनवते. रॉग्नर नर्क्स यांनी व्यक्त केले आहे, की दारिद्र्याचे दुष्टचक्र हे नेहमीच व्यक्तीला अधिक दरीद्री बनवते. एखादा व्यक्ती गरीब आहे म्हणून तो गरीब आहे असे स्पष्टीकरण त्यांनी केले आहेत. म्हणजेच गरीब असल्यामुळे त्या व्यक्तीला नवीन उत्पादनाची साधने मिळवता येत नाहीत. हा एक त्या पाठीमागचा भाग दिसतो ज्यांच्याकडे उत्पादन साधने मिळवता येत नाहीत अर्थात त्यांना भुकेच्या प्रश्नाला सामोरे जावे लागणार आहे.

**बेरोजगारीचा प्रश्न-**

भारत देशातील सध्या दोन वर्षातील कालावधी पाहता लोकांचा रोजगार मिळवण्यापेक्षा शासनातील काही लोकांना इतर गोष्टी उभारणीतच मोठा रस निर्माण झालेला आहे. त्यामुळे लोकांना किती रोजगार मिळेल. हा प्रश्न अजूनही आहे. शासनाने दरवर्षी किमान दोन कोटी लोकांना रोजगार देणे अपेक्षित आहे. परंतु तसे हाेत नाही. रोजगारांची भरती केली जात नाही. परिणामी शासकीय निर्णय हे सुद्धा लोकांना भूकबळीसाठी कारणीभूत असल्याचे दिसून येईल.

**वाढती महागाई:-**

देश पातळीवर विचार केल्यास असे दिसून येते की , दरवर्षी महागाईत वाढ केली जाते. परंतु महागाईवर नियंत्रण केल्याचे धोरण समोर येत नाही. प्रत्येकजण व्यापाराच्या निमित्ताने नफा कसा मिळेल या हेतूने मूळ किंमतीमध्ये वाढ नक्कीच करतो. त्यामुळे जी वस्तू ज्या मूळ किमतीला मिळायचे. त्या वस्तू शेवटच्या ग्राहकाजवळ जाईपर्यंत त्याची किंमत कित्येक पटीने वाढते. शासनाकडून सुद्धा नियंत्रण नाही. जो तो व्यापारी नफा प्राप्तीसाठी व्यापार करतो आहे. म्हणून महागाई भरमसाठ किंमती वाढवण्यासाठी काम करत आहे. परिणामी जेवढ्या अधिक प्रमाणामध्ये महागाई वाढेल. आणि लोकांना हाताशी काम उपलब्ध नसल्यामुळे अशा लोकांना अन्न विकत घेणे हे शक्य होणार नाही. कारण त्याच्या हाताशी काम असणार नाही. काम नाही म्हणून पैसा नाही. पैसा नाही म्हणून अन्न नाही. अन्न नाही म्हणून लोक भुकेने मरण्याची शक्यता वाढणार आहे. म्हणून कितीही भूक संपवण्याचे आशा व्यक्त करत जरी असेल तरीसुद्धा 2030 पर्यंत महागाई जोपर्यंत नियंत्रणात येत नाही तोपर्यंत लोकांना हाताशी अन्न मिळणार नाही. अशी अवस्था आपणास दिसून येते.

**हवामानातील बदल** :-

अन्न हे शेतामध्ये उत्पादन केल्या जाते. आणि शेतावरती पाऊस, पाणी, आणि हवामान याचा उत्पादनावरती परिणाम नक्कीच होतो. जेव्हा सुरळीत आणि चांगल्या स्वरूपाचा पाऊस असेल. तेव्हा उत्पादन सुद्धा चांगले होतात. परंतु नेहमीच हवामान सारखेच राहील असे नाही. ऊन, वारा, पाऊस, वादळे, चक्रीवादळ, दुष्काळ यासारखे संकट शेतीच्या भोवती नेहमीच उभी राहतात.त्यामुळे शेतकऱ्याच्या

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

हाताशी आलेले पीक काहीवेळी वाया जाते. त्यामुळे अन्न उत्पादन करताना शेतकरी लोकांना पर्यावरणाशी जुळवूनच उत्पादन करावे लागते. पर्यावरण चांगले असेल, हवामान चांगले असेल, तर उत्पादन चांगले होईल. हवामान चांगले नसेल तर उत्पादन कमी होईल. किंवा उत्पादन होणार नाही आणि त्यामुळे दुष्काळासारख्या परिस्थितीला सामोर जावं लागते. असे अनेक प्रश्न त्यांच्याभोवती असतात.

**राहणीमानावर होणारा खर्च** :-

व्यक्तीला जीवन जगत असताना अनेक प्रश्न डोळयासमोर असतात. त्यामध्ये आरोग्य, शिक्षण, सुख-सुविधा, राहणीमान यासारखे प्रत्येक घटकावर व्यक्तीला खर्च करावा लागत असतो. सध्याच्या काळामध्ये आपण आपल्या दर्जा कसा आहे. हे राहणीमान यावर दिसून येते. घर बांधायचे असेल तर काही लोक बँकांकडून कर्ज काढले जातात. त्यामुळे लोक कर्जबाजारी बनतात. कर्ज फेडण्याचे त्याचे 10 ते 20 वर्षे निघून जातात. लोकांना कर्ज देण्यासाठी अनेक बँका खूप पुढाकार घेत आहेत. ते परतफेड करणे शक्य झाले तर ठीक आहे. अन्यथा कर्जबाजारीपणामुळे लोक आत्महत्या कडे वळत आहेत. घराचे बांधकाम, त्याचे बांधकामाचे स्वरूप, दळणवळणाच्या साधनांची उपलब्धता, सेवा-सुविधा या सर्व गोष्टी राहणीमानामध्ये दिसून येतात. राहणीमान चांगले करायचे असेल तर त्यावर खर्च तेवढाच होतो. जेवढा अधिक खर्च असेल तेवढ्या प्रमाणात बचत कमी होईल. आणि बचत कमी झाल्यामुळे सहाजिक भुकेचा सुद्धा प्रश्न निर्माण होईल.

**व्यक्तीला जाणवणारी असुरक्षितता**:-

दहशतवाद, आतंकवाद, पूर, महामारी यासारख्या घटकामुळे व्यक्तीच्या जीवनामध्ये असुरक्षितता निर्माण झाली असेल तर व्यक्तीला स्वतःची जीव वाचवणे अशक्य होते. यावेळी देश संकट ओढवल्यास असुरक्षितता मोठ्या प्रमाणात निर्माण होते . परिणामी जीवन जगण्यासाठी लोकांना भूक हा प्रश्न निर्माण होतो. भुकेसाठी अन्नाचे व्यवस्था त्यांना निर्माण करता येत नाहीत. परिणामी भूकबळी जाण्याची शक्यता असते. अशावेळी कुठल्याही स्वरूपाचे युद्ध होणार नाहीत किंवा लोकांना असुरक्षितता वाटणार नाही. याची काळजी गव्हर्मेंट आणि तेथील प्रशासकीय व्यवस्थेने घेणे आवश्यक आहे.

**अन्नधान्य उत्पादन** :-

सध्याच्या कालावधीमध्ये देशांमध्ये शेतीत अनेक प्रयोग केले जात आहेत. या प्रयोगाच्या माध्यमातून संकरीत वाण निर्माण केले जात आहे. त्याच्या किमती खूप आहेत. त्यामुळे शेतावरती उत्पादन भरघोस स्वरूपाचे होत आहे. अशा प्रसंगी ज्यावेळी शेतकऱ्याकडे जी वस्तू उत्पादित झाली. त्यावेळेस त्या वस्तूचे किमती खूपच ढासळतात. आणि जेव्हा त्यांच्याकडे उत्पादित वस्तू नसतील तेव्हा त्या वस्तूंचा किमती वाढतात. अशावेळी अस्थिर परिस्थिती निर्माण होते. परंतु जेव्हा शेतकरी लोकांनी शेतावरती धान्याचे उत्पादन केले. तेव्हा ते धान्य व्यवस्थितपणे साठवण्याचे कोठार त्यांच्याकडे उपलब्ध नसतील तर धान्य साठवण्याअभावी त्याची नासाडी होते.आणि त्यामुळे ते धान्य खराब होते पर्याय नाही अन्न नासाडी हे कारण भूकबळी वाढण्यासाठी कारणे ठरू शकते.

**बांधकाम यामध्ये गेलेल्या जमिनी** :-

प्रकल्प विकास, घर, इमारत,सौर प्रकल्प, पाणी-प्रकल्प, रस्ते, महामार्ग आणि इतर प्रकल्प उभारणीसाठी कित्येक एकर जमीन त्यामध्ये जात आहे. त्यामुळे साहजिकच जमीन उपलब्धतेचा प्रश्न भेडसावणार आहे. आणि सध्या भेडसावत आहे. यामुळे ज्या ठिकाणी अन्नधान्य उत्पादन होत होते. अशी जमीन त्या बांधकाम क्षेत्राखाली जाते त्यामुळे ती जमीन शेतीसाठी अन्नधान्य उत्पादन करण्याकरता वापरता येत नाही. त्यामुळे अन्नधान्य उत्पादन याचे प्रमाण कमी होते.

**वाढती लोकसंख्या:-**

हा सर्वच गोष्टी एक समस्या आणि आव्हान निर्माण करून देणारा भाग आहे. वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाण बघितल्यास आपणास 1930 ला भारताची लोकसंख्या आणि सध्या 2024 ला असलेली लोकसंख्या याच्यामध्ये खूप मोठी वाढ निर्माण झाली आहे. आणि लोकसंख्या वाढीचा हाच वेग कायम स्वरूपाचा राहिल्यास हमखास स्वरूपाचा धान्यावर तुटवडा निर्माण होईल. त्यामुळे एक कालखंड असा उद्भवेल की, अन्नधान्य अभावी भूकबळी हा प्रश्न समोर येतो. लोकसंख्यावाढीमुळे भूकबळी हा प्रश्न पुढे येऊ शकतो. म्हणून लोकसंख्या नियंत्रण हा शासन पातळीवरचा निर्णय घेणे उचित ठरेल. आणि जेवढे कमी प्रमाणात लोकसंख्या राहतील. तेवढे अधिक प्रमाणात धान्याचा उपयोग भुकेसाठी करता येईल असे आपणास दिसून येते.

अशा अनेक प्रकारे जागतिक स्तरावर भूक ही शून्य स्वरूपात करणे हे जरी उद्दिष्ट जरी असेल तरीसुद्धा वरील प्रमाणे आव्हानांना सामोरे जावे लागेल. यावेळी देश पातळीवर शासनाकडून अन्नधान्य उत्पादन करण्यासाठी प्रोत्साहन देणे आवश्यक आहे.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

**सारांश:-**

वरील विश्लेषणावरून असे दिसून येते की, जागतिक भूक ही शून्य करणे हे युनायटेड नेशनने उद्देश समोर ठेवले आहे. तरीसुद्धा विविध देशातील समस्या डोळयासमोर उभे आहेत. या समस्या सोडवल्याशिवाय युनायटेड नेशनचे शून्य भूक या उद्देशाला सफल करणे शक्य होणार नाही. अन्यथा जागतिक भूक कमी करणे हे शक्य होणार नाही. वरील प्रमाणे वाढती लोकसंख्या, जमीन उपलब्धता प्रश्न, पीक व्यवस्थापन, प्रकल्प, व्यक्तीला जाणवणारी असुरक्षितता, हवामानात होणारे विविध बदल, आणि देशातील लोकांचे असणारे सुरक्षिततेचे प्रश्न, संघर्ष या सर्व समस्यांच्यावर उपाय केले. तर शुन्य भूक हे साध्य करणे शक्य होणार आहे. आणि जगाला भुक समस्येतून बाहेर आणता येइल.

**संदर्भ -**

1. भोसले प्र.बा., आपण शेतकरी आणि आपला समाज, कृषी ग्रंथ भांडार प्रकाशन पुणे. आवृत्ती 2012.
2. माने माणिक, भारतातील समकालीन सामाजिक समस्या, विद्या प्रकाशन नागपूर, आवृत्ती 2008.
3. साळीवकर संजय सदाशिवराव, नागरी व ग्रामीण समुदाय, मंगेश प्रकाशन नागपूर. आवृत्ती 2019.
4. कुलकर्णी पि.के., ग्रामीण व नागरी समाजशास्त्र परिचय, विद्या प्रकाशन नागपूर आवृत्ती 2006

# Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

Original Article

# ई-कॉमर्स, पर्यावरण आणि शाश्वत विकास: एक अभ्यास

**डॉ. मनोहर नारायण मोरे**
कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय लासलगाव
**Email:** manoharmorey@gmail.com

**Manuscript ID:** JRD -2025-170831
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 8 (II)
Pp. 146-147
August 2025
**Submitted:** 14 July. 2025
**Revised:** 25 July. 2025
**Accepted:** 10 Aug 2025
**Published:** 30 Aug.2025

***सारांश:-***

*या संशोधन प्रबंधात ई-कॉमर्सच्या झपाट्याने वाढीमुळे निर्माण होणाऱ्या पर्यावरणीय आव्हानांचा आणि शाश्वत विकासाशी असलेल्या त्याच्या परस्परसंबंधांचा अभ्यास करण्यात आला आहे. ई-कॉमर्स अर्थव्यवस्थेला वेग देणारे महत्त्वाचे साधन असले तरी त्याचे पर्यावरणावर सकारात्मक व नकारात्मक दोन्ही प्रकारचे परिणाम दिसून येतात. सकारात्मक बाजूस कागदविरहित व्यवहार, डिजिटल पायाभूत सुविधा व व्यापक ग्राहकसुविधा आढळतात. नकारात्मक बाजूस पॅकेजिंग कचरा, वाहतुकीतून होणारे प्रदूषण व ऊर्जा वापराची वाढ ही महत्त्वाची आव्हाने आहेत.*
*शाश्वत विकास साधण्यासाठी ग्रीन ई-कॉमर्स मॉडेलची गरज अधोरेखित केली आहे. यामध्ये पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा वापर, पुनर्वापरक्षम (रीसायकल) पॅकेजिंग, स्वच्छ व नवीकरणीय ऊर्जेचा वापर, इलेक्ट्रिक वाहतूक व्यवस्था व जबाबदार ग्राहकवर्तन यांचा समावेश होतो. सरकार, ई-कॉमर्स कंपन्या व ग्राहक हे तीनही घटक शाश्वत ई-कॉमर्स साध्य करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतात.*

***मुख्य शब्द****:-ई-कॉमर्स,पर्यावरण,शाश्वत विकास, ग्रीन इकॉनॉमी,डिजिटल व्यापार,पर्यावरणीय परिणाम,स्वच्छ ऊर्जा, इको-पॅकेजिंग, इलेक्ट्रिक लॉजिस्टिक्स,शाश्वत ई-कॉमर्स धोरणे*

**प्रस्तावना:-**

ई-कॉमर्स हे आधुनिक अर्थव्यवस्थेतील वेगाने विकसित होणारे क्षेत्र आहे. डिजिटल तंत्रज्ञानाच्या झपाट्याने झालेल्या प्रगतीमुळे खरेदी-विक्रीच्या पद्धतींमध्ये आमूलाग्र बदल झाले आहेत. पारंपरिक व्यापार पद्धतींऐवजी ऑनलाईन प्लॅटफॉर्मद्वारे खरेदी-विक्रीला मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन मिळत आहे.

यामुळे व्यापार व उद्योगांना नवीन संधी उपलब्ध होत असल्या तरी त्याचे पर्यावरणावर सकारात्मक व नकारात्मक असे दोन्ही परिणाम दिसून येतात. वाढत्या ई-कॉमर्समुळे ऊर्जा वापर, पॅकेजिंग साहित्याचा वाढता वापर, वाहतुकीतील इंधन खप यामुळे पर्यावरणीय ताण वाढतो. दुसरीकडे, जागतिक पातळीवर ग्रीन इकॉनॉमी, इको-फ्रेंडली पॅकेजिंग व इलेक्ट्रिक लॉजिस्टिक्स यांचा वापर करून पर्यावरणपूरक उपक्रमही राबवले जात आहेत.

या पार्श्वभूमीवर शाश्वत विकास साधण्यासाठी ई-कॉमर्स क्षेत्रात संतुलन साधण्याची गरज प्रकर्षाने जाणवते. शाश्वत ई-कॉमर्सच्या माध्यमातून आर्थिक प्रगतीसोबतच पर्यावरणीय संतुलन राखणे अत्यावश्यक ठरते.

Quick Response Code:

Website: https://jrdrvb.org/

DOI:10.5281/zenodo.17233349

OPEN ACCESS

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*डॉ. मनोहर नारायण मोरे, कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय लासलगाव*

**How to cite this article:**
*मोरे, . मनोहर . नारायण . (2025). ई-कॉमर्स, पर्यावरण आणि शाश्वत विकास: एक अभ्यास. Journal of Research & Development, 17(8(II)), 146–147. https://doi.org/10.5281/zenodo.17233349*

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

विषयाची पार्श्वभूमी

**संशोधन समस्या –**

ई-कॉमर्सच्या झपाट्याने वाढीमुळे पर्यावरणीय संतुलन बिघडण्याचा धोका आहे. अशा परिस्थितीत शाश्वत विकासाच्या दृष्टीने ई-कॉमर्स कसे संतुलित ठेवता येईल, हा मुख्य प्रश्न आहे.

**संशोधन उद्दिष्टे –**

1. ई-कॉमर्सची संकल्पना व त्याचा विकास समजावून घेणे.
2. ई-कॉमर्सचा पर्यावरणावर होणारा सकारात्मक व नकारात्मक परिणाम विश्लेषित करणे.
3. शाश्वत विकास व ई-कॉमर्स यांच्यातील नाते स्पष्ट करणे.
4. शाश्वत ई-कॉमर्ससाठी आवश्यक उपाय सुचविणे.

**संशोधन पद्धती –**

1. **ग्रंथसंपदा अभ्यास** – विविध पुस्तके, संशोधन लेख, अहवालांचा अभ्यास
2. **द्वितीयक आकडेवारी** – ई-कॉमर्स कंपन्यांचे पर्यावरण अहवाल, UN SDG अहवाल
3. **विश्लेषणात्मक पद्धती** – उपलब्ध माहितीचे विश्लेषण व तुलना

**अभ्यासाचे विश्लेषण –**

1. शाश्वत विकासाची व्याख्या
2. संयुक्त राष्ट्रां**ची** महत्त्वाची भूमिका
3. ग्रीन इकॉनॉमी व ई-कॉमर्स
4. मॉडेल

**अभ्यासाचे विश्लेषण –**

1. ई-कॉमर्सचा पर्यावरणावर सकारात्मक परिणाम
2. ई-कॉमर्सचा पर्यावरणावर नकारात्मक परिणाम
3. भारत व आंतरराष्ट्रीय स्तरावरील उपक्रम
4. ग्राहक, सरकार व कंपन्यांची भूमिकानिष्कर्ष

ई-कॉमर्स आधुनिक काळातील अर्थव्यवस्थेचा अविभाज्य घटक बनला आहे. त्यामुळं रोजगार निर्मिती, बाजारपेठेचा विस्तार, ग्राहकांना सुविधा या दृष्टीने सकारात्मक परिणाम दिसतात. मात्र, त्याच वेळी पॅकेजिंग कचरा, ऊर्जा वापर, वाहतुकीमुळे होणारे कार्बन उत्सर्जन या कारणांमुळे पर्यावरणावर ताण वाढतो

शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी ग्रीन ई-कॉमर्स ही संकल्पना आवश्यक ठरते. यामध्ये पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा वापर, स्वच्छ ऊर्जा, इको-फ्रेंडली पॅकेजिंग, इलेक्ट्रिक लॉजिस्टिक्स यांसारख्या उपायांचा अवलंब महत्त्वाचा आहे. तसेच, सरकारने कठोर नियमावली

**आखून कंपन्यांना जबाबदार ठेवणे, कंपन्यांनी स्वतः**

हून शाश्वत उपक्रम राबविणे आणि ग्राहकांनी जबाबदार खरेदीची सवय लावणे हे त्रिसूत्री प्रयत्न

1. ई-कॉमर्स कंपन्यांनी रीसायकल पॅकेजिंग अनिवार्य करावे.
2. इलेक्ट्रिक डिलिव्हरी वाहने व सौरऊर्जेवर चालणारे वेअरहाऊस वापरावे.
3. सरकारने कठोर नियमावली आखावी.
4. ग्राहकांनी जबाबदार खरेदीची सवय लावावी.

**संदर्भ –**

1. United Nations Sustainable Development Goals Report (2024)
2. Ministry of Commerce & Industry, Government of India – ई-कॉमर्स अहवाल
3. Amazon Sustainability Report (2023)
4. Flipkart Green Initiative Report (2022)
5. संशोधन लेख.

# Journal of Research and Development

Peer Reviewed International, Open Access Journal.

ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025


Original Article

# तंजावरचे सरफोजी राजे भोसले (द्वितीय) यांचे वैद्यकीय क्षेत्रातील योगदान: एक ऐतिहासिक अध्ययन


**अमितकुमार गणेश शिंगणे**

संशोधक विद्यार्थी, एम.इ.एस. आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेजमेहकर, जि. बुलढाणा

**Email-** amitshingane156@gmail.com



**Manuscript ID**:

JRD -2025-170832

ISSN: 2230-9578

Volume 17

Issue 8 (II)

Pp. 144-153

August 2025

**Submitted:** 14 July. 2025

**Revised:** 25 July. 2025

**Accepted:** 10 Aug 2025

**Published:** 30 Aug. 2025



***सारांश:***

*तंजावरचे मराठा शासक सरफोजी राजे भोसले (द्वितीय) (कार्यकाळ 1798-1832) हे केवळ एक राजे नव्हते, तर एक द्रष्टे विचारवंत, संशोधक आणि मानवतावादी होते. प्रस्तुत शोधनिबंधात त्यांच्या वैद्यकीय क्षेत्रातील अभूतपूर्व योगदानाचा ऐतिहासिक आणि विश्लेषणात्मक अभ्यास करण्यात आला आहे. सरफोजी राजांनी पारंपरिक भारतीय वैद्यकीय प्रणाली (आयुर्वेद, सिद्ध, युनानी) आणि प्रगत पाश्चात्य वैद्यकीय पद्धती यांचा अनोखा समन्वय साधला. त्यांनी स्थापन केलेले 'धन्वंतरी महाल' हे केवळ रुग्णालय नव्हते, तर ते वैद्यकीय बहुलवादाचे एक अग्रगण्य संशोधन केंद्र होते. या शोधनिबंधात धन्वंतरी महालची रचना, कार्यप्रणाली आणि विविध वैद्यकीय शाखांमधील संशोधनावर प्रकाश टाकण्यात आला आहे. नेत्ररोगशास्त्र आणि मोतीबिंदू शस्त्रक्रियेतील त्यांचे वैयक्तिक कौशल्य, रुग्णांच्या नोंदी ठेवण्याची त्यांची शास्त्रीय पद्धत आणि भारतीय व युरोपीय औषधांचा शास्त्रोक्त वापर हे त्यांच्या दूरदृष्टीचे प्रतीक आहे. 'सरबेंद्र वैद्य मुरैगल' या 18 खंडांच्या ग्रंथमालिकेतून त्यांनी वैद्यकीय ज्ञानाचे संकलन आणि प्रमाणीकरण केले, जे आजही महत्त्वपूर्ण मानले जाते. याशिवाय, पशुवैद्यकीय शास्त्र आणि सार्वजनिक आरोग्याच्या क्षेत्रात त्यांनी केलेले कार्य, जसे की भूमिगत गटार योजना आणि शुद्ध पाणीपुरवठा, हे त्यांच्या सर्वांगीण आरोग्य दृष्टिकोनाचे द्योतक आहे. हा शोधनिबंध असा निष्कर्ष मांडतो की, सरफोजी राजांचे वैद्यकीय क्षेत्रातील कार्य हे केवळ राजाश्रयाचे उदाहरण नसून, एक सुविचारित, ज्ञान-आधारित आणि पद्धतशीर प्रकल्प होता, ज्याने वसाहतवादी ज्ञान प्रसाराच्या केंद्र-परिघ मॉडेलला आव्हान दिले आणि तंजावरला वैद्यकीय नवकल्पनांचे एक स्वतंत्र आणि महत्त्वपूर्ण केंद्र म्हणून स्थापित केले.*



***महत्वाचे शब्द:*** *सरफोजी राजे, धन्वंतरी महाल, वैद्यकीय बहुलवाद, नेत्ररोगशास्त्र, मोतीबिंदू शस्त्रक्रिया, सरबेंद्र वैद्य मुरैगल, सार्वजनिक आरोग्य, सरस्वती महाल ग्रंथालय, तंजावर.*


**प्रस्तावना**

एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी, जेव्हा भारतीय उपखंड ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या वाढत्या प्रभावाखाली येत होता, तेव्हा दक्षिण भारतातील तंजावर संस्थानात एक अद्वितीय बौद्धिक आणि वैज्ञानिक पुनर्जागरण घडत होते. या पुनर्जागरणाचे केंद्रबिंदू होते सरफोजी राजे भोसले (द्वितीय). सरफोजी राजे हे एका अशा ऐतिहासिक संगमाचे प्रतीक होते, जिथे पौर्वात्य आणि पाश्चात्य ज्ञानप्रणालींचा मिलाफ झाला. जर्मन मिशनरी रेव्हरंड ख्रिश्चन फ्रेडरिक श्वार्ट्झ यांच्या मार्गदर्शनाखाली मिळालेल्या शिक्षणामुळे त्यांचा युरोपीय प्रबोधनकालीन विचारांशी, विविध युरोपीय भाषांशी (इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, लॅटिन) आणि पाश्चात्य विज्ञानाशी जवळून परिचय झाला.


***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***

*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*



**Address for correspondence:**

*अमितकुमार गणेश शिंगणे , संशोधक विद्यार्थी, एम.इ.एस. आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेजमेहकर, जि. बुलढाणा.*



Quick Response Code:

Website: https://jrdrvb.org/

DOI:10.5281/zenodo.17233378

OPEN ACCESS

**How to cite this article:**

*शिंगणे, . अमितकुमार . गणेश . (2025). तंजावरचे सरफोजी राजे भोसले (द्वितीय) यांचे वैद्यकीय क्षेत्रातील योगदान: एक ऐतिहासिक अध्ययन. Journal of Research & Development, 17(8(II)), 148–153.* https://doi.org/10.5281/zenodo.17233378

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

या पायाभूत शिक्षणामुळे त्यांची एक अशी वैज्ञानिक दृष्टी तयार झाली, जिथे "विज्ञान आणि ईश्वर यांचा सहज समन्वय" होता.त्यांच्या कार्यकाळात तंजावर हे केवळ एक संस्थान राहिले नाही, तर ते एक 'संपर्क-क्षेत्र' बनले, जिथे स्थानिक ज्ञानप्रणालींनी वसाहतवादी प्रभावाखाली न येता, त्यांच्याशी सक्रियपणे संवाद साधला. हे पारंपरिक दृष्टिकोनाला आव्हान देते, ज्यात ज्ञानाचा प्रवाह केवळ युरोपकडून भारताकडे एकतर्फी असल्याचे मानले जाते. सरफोजी राजांनी तंजावरला एक असे 'गणना केंद्र' बनवले, जिथे ज्ञानाचे संकलन, विश्लेषण आणि नवनिर्मिती होत होती.

या शोधनिबंधाचा मुख्य सिद्धांत असा आहे की, सरफोजी राजे (द्वितीय) यांचे वैद्यकीय क्षेत्रातील योगदान हे वैद्यकीय आधुनिकतेचे एक उत्कृष्ट मॉडेल सादर करते. हे मॉडेल वैद्यकीय बहुलवादाच्या धोरणावर आधारित होते, ज्यात अनुभवजन्य संशोधन आणि दस्तऐवजीकरणावर विशेष भर दिला गेला होता. सार्वजनिक आणि पशु आरोग्याविषयीचा त्यांचा सर्वांगीण दृष्टिकोन एकोणिसाव्या शतकातील भारतासाठी अत्यंत प्रगत होता. त्यांचे कार्य हे पाश्चात्य ज्ञानाला दिलेले एक अद्वितीय स्थानिक प्रत्युत्तर होते, ज्यातून "एकाच वेळी आधुनिक आणि भारतीय परंपरेशी घट्ट रुजलेले" ज्ञान निर्माण झाले.

**उद्दिष्ट्ये:**

1. 'धन्वंतरी महाल' या वैद्यकीय बहुलवादाच्या अग्रगण्य संस्थेची स्थापना, कार्यप्रणाली आणि बौद्धिक पाया यांचे पद्धतशीरपणे दस्तऐवजीकरण आणि विश्लेषण करणे.
2. नेत्ररोगशास्त्रातील सरफोजी राजांच्या विशिष्ट योगदानाचे चिकित्सक परीक्षण करणे, विशेषतः त्यांच्या शस्त्रक्रिया तंत्र, युरोपीय आणि भारतीय औषधांचा समन्वय आणि रुग्ण-नोंदी ठेवण्याच्या प्रणालीवर लक्ष केंद्रित करणे.
3. 'सरबेंद्र वैद्य मुरैगल' या ग्रंथाचे महत्त्व, प्रमाणित वैद्यकीय सूत्रांचा एक व्यापक संग्रह म्हणून आणि ज्ञान जतन व प्रसारातील त्याची भूमिका तपासणे.
4. पशुवैद्यकीय शास्त्र आणि सार्वजनिक आरोग्य पायाभूत सुविधांमधील त्यांच्या योगदानाचा शोध घेणे, जे त्यांच्या सर्वांगीण वैद्यकीय दृष्टिकोनाचे अविभाज्य घटक होते.

**गृहितके:**

1. सरफोजी राजांचे वैद्यकीय उपक्रम हे युरोपीय वैद्यकशास्त्रातील अनुभवजन्य आणि शरीरशास्त्रीय दृष्टिकोनांना भारतीय परंपरांच्या (आयुर्वेद, सिद्ध, युनानी) समग्र आणि औषधशास्त्रीय सामर्थ्याशी जोडून एक समन्वयवादी वैद्यकीय प्रणाली तयार करण्याचा एक जाणीवपूर्वक आणि पद्धतशीर प्रयत्न होता. हे केवळ एक यादृच्छिक मिश्रण नव्हते, तर 'वैद्यकीय बहुलवादाचा' एक संरचित प्रकल्प होता.
2. धन्वंतरी महालमध्ये ठेवलेल्या तपशीलवार आणि सचित्र रुग्ण-नोंदी, विशेषतः नेत्र शस्त्रक्रियेच्या, या भारतातील पद्धतशीर वैद्यकीय संशोधन आणि दस्तऐवजीकरणाच्या सर्वात जुन्या ज्ञात उदाहरणांपैकी एक आहेत. या नोंदी वसाहतवादी जगाच्या अनेक भागांमधील अशा औपचारिक पद्धतींच्या आधीच्या असून आधुनिक पुरावा-आधारित वैद्यकशास्त्राची चाहूल देतात.

**विषयाचे महत्त्व:**

हे संशोधन भारतातील वैद्यकशास्त्राच्या वसाहतवादी इतिहासाला एक पर्यायी दृष्टिकोन देण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे, जो अनेकदा स्थानिक योगदानाला दुर्लक्षित करतो. हे एका भारतीय शासकाच्या आधुनिक वैद्यकीय परिदृश्य घडवण्यामधील सक्रिय भूमिकेवर प्रकाश टाकते. सरफोजी राजांच्या मॉडेलचा अभ्यास विविध वैद्यकीय प्रणालींच्या यशस्वी एकत्रीकरणाबद्दल ऐतिहासिक अंतर्दृष्टी प्रदान करतो, जो विषय समकालीन आरोग्यसेवा चर्चेत आजही संबंधित आहे. सरस्वती महाल ग्रंथालयातील हस्तलिखितांमध्ये जतन केलेला त्यांचा वारसा, 'ब्रिटिश साम्राज्याच्या परिघावरील' एका संस्थानातील एकोणिसाव्या शतकातील वैज्ञानिक विचार, सामाजिक इतिहास आणि राजाश्रय समजून घेण्यासाठी एक अमूल्य प्राथमिक स्रोत म्हणून काम करतो.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

**विषय विवेचन:**

**1. धन्वंतरी महाल:**

सरफोजी राजांनी स्थापन केलेले 'धन्वंतरी महाल' हे केवळ एक रुग्णालय नव्हते, तर एक बहुआयामी संस्था होती, जिने वैद्यकीय सेवा, संशोधन आणि औषध निर्मिती या तिन्ही क्षेत्रांना एकाच छताखाली आणले. सरफोजी राजांनी धन्वंतरी महालची रचना अत्यंत विचारपूर्वक केली होती. ही एक अशी संस्था होती जिथे सर्व प्रकारच्या आजारांवर उपचार केले जात होते, सोबतच ते एक संशोधन केंद्र आणि औषध निर्मितीचे ठिकाणही होते. या संस्थेच्या संरचनेत औषधी वनस्पतींसाठी खास बागबगीचे आणि तयार औषधे साठवण्यासाठी 'औषध कोठारी' नावाचे एक स्वतंत्र गोदाम होते. यावरून आरोग्यसेवेकडे पाहण्याचा त्यांचा एकात्मिक दृष्टिकोन दिसून येतो, ज्यात औषधी वनस्पतींच्या लागवडीपासून ते रुग्णावरील उपचारांपर्यंत सर्व बाबींचा समावेश होता. ही रचना त्या काळातील कोणत्याही संस्थेपेक्षा खूप प्रगत होती. धन्वंतरी महाल हे वैद्यकीय बहुलवादाचे एक जिवंत उदाहरण होते. मोडी लिपीतील नोंदींवरून हे स्पष्ट होते की, येथे सिद्ध, आयुर्वेद, युनानी आणि ॲलोपॅथी या सर्व वैद्यकीय प्रणालींचे तज्ञ वैद्य एकत्र काम करत होते. सरफोजी राजांनी केवळ भारतातूनच नव्हे, तर परदेशातूनही नामांकित वैद्यांना नियुक्त केले होते. विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांना एकत्र आणण्याच्या या धोरणामुळे विचारांची आणि उपचार पद्धतींची देवाणघेवाण झाली, ज्यामुळे एक नवीन आणि प्रभावी उपचार प्रणाली विकसित होण्यास मदत झाली. या संस्थेची कार्यपद्धती केवळ उपचारांपुरती मर्यादित नव्हती, तर ती एक पद्धतशीर चौकशी आणि ज्ञानाच्या देवाणघेवाणीचे केंद्र होती. येथे विविध शाखांतील कर्मचारी, एक उत्पादन विभाग, साठवणुकीची सुविधा आणि संशोधन प्रकाशित करण्याचे ध्येय होते. औषधांच्या "उपचारक्षमतेची" चाचणी घेणे आणि रुग्णांच्या तपशीलवार नोंदी ठेवणे हे वैद्यकीय संशोधनाचे मूळ तत्व आहे.धन्वंतरी महालमधील संशोधन अत्यंत पद्धतशीर होते. येथे विविध औषधे आणि वनस्पतींवर संशोधन करून 18 खंडांचे संशोधन साहित्य तयार करण्यात आले. सर्वात क्रांतिकारी पाऊल म्हणजे रुग्णांच्या तपशीलवार केस-शीट ठेवण्याची प्रथा, जी नंतर "खूप प्रसिद्ध झाली". या नोंदींमध्ये रुग्णाचा इतिहास, निदान, उपचार आणि परिणामांचे दस्तऐवजीकरण केले जात होते, जे अनुभवजन्य पुराव्यांवर आधारित दृष्टिकोन दर्शवते. या सर्व बाबींमुळे धन्वंतरी महालला केवळ रुग्णालय न म्हणता, एक पूर्व-आधुनिक 'वैद्यकीय संशोधन संस्था' म्हणणे अधिक योग्य ठरेल, जिने संशोधन, विकास आणि उपयोजन यांना एका संरचित पद्धतीने एकत्र आणले.

**2. नेत्ररोगशास्त्र आणि शल्यचिकित्सेतील क्रांतिकारी योगदान:**

सरफोजी राजांचे नेत्ररोगशास्त्रातील योगदान हे केवळ राजाश्रयापुरते मर्यादित नव्हते, तर ते स्वतः एक कुशल शल्यचिकित्सक होते, ज्यामुळे या क्षेत्रातील त्यांचे कार्य अधिक महत्त्वपूर्ण ठरते. सरफोजी राजे डोळयांच्या आजारांवर उपचार करण्यात आणि मोतीबिंदू शस्त्रक्रिया स्वतः करण्यात तज्ञ होते. 'उपचारक - रुग्ण - आश्रयदाता' या त्यांच्या अद्वितीय भूमिकेमुळे त्यांना या क्षेत्राची सखोल माहिती मिळाली. ते इतके समर्पित होते की, काशीच्या यात्रेला जातानाही त्यांनी सोबत शस्त्रक्रियेची उपकरणे नेली होती.

सरफोजी राजांच्या कार्याचा एकमेव पुरावा म्हणजे अत्याधुनिक रुग्ण नोंदी यामध्ये 50 तक्ते आणि हस्तलिखिते आहे, ज्यात 44 नेत्ररुग्णांच्या नोंदी आहेत. या नोंदी म्हणजे इतिहासकारांसाठी एक खजिनाच आहे.

- **रचना:** या नोंदींमध्ये रुग्णाचे वय (5 ते 60 वर्षे), वैयक्तिक तपशील, निदान आणि शस्त्रक्रियेची सविस्तर माहिती समाविष्ट होती.
- **भाषा आणि लिपी:** मोडी लिपी (6 नोंदी) आणि इंग्रजी (38 नोंदी) या दोन्ही भाषांचा वापर दरबारातील द्वैभाषिक बौद्धिक वातावरणाचे प्रतिबिंब दर्शवतो.
- **दृष्य दस्तऐवजीकरण:** सर्वात महत्त्वाचे म्हणजे, 18 रंगीत चित्रांद्वारे मोतीबिंदू, ल्युकोमा आणि टेरिजियम यांसारख्या आजारांमध्ये डोळयाची शस्त्रक्रियेपूर्वी आणि नंतरची स्थिती दर्शवली गेली होती. दृष्य माहिती संकलनाची ही पद्धत अत्यंत नाविन्यपूर्ण आणि अचूक होती.

या अत्यंत तपशीलवार नोंदी केवळ वैद्यकीय तथ्येच नव्हे, तर "रुग्णांचे सूक्ष्म वैयक्तिक तपशील" देखील नोंदवतात. इंग्रजी आणि मोडी लिपीचा वापर, तसेच तपशीलवार चित्र रेखाटन, हे सूचित करते की हा प्रकल्प अनेक प्रकारच्या प्रेक्षकांसाठी होता - युरोपीय-शिक्षित उच्चभ्रू आणि पारंपरिक मराठी प्रशासन. स्वतः शस्त्रक्रिया करून आणि त्याचे बारकाईने दस्तऐवजीकरण करून, सरफोजी राजे केवळ रुग्णांना बरे करत नव्हते, तर ते पाश्चात्य आणि भारतीय दोन्ही ज्ञान प्रणालींवरील आपले प्रभुत्व सिद्ध करत होते. दस्तऐवजीकरणाची ही कृती आधुनिक 'वैद्यकीय दृष्टीकोनाचे एक उदाहरण म्हणून पाहिली जाऊ शकते. शरीराला वैज्ञानिक, वस्तुनिष्ठ

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

पद्धतीने पाहण्याची आणि नोंदवण्याची एक पद्धत. ही त्यांच्या वैज्ञानिक अधिकाराची आणि प्रबुद्ध सार्वभौमत्वाची एक सूक्ष्म अभिव्यक्ती होती, जरी त्यांची राजकीय शक्ती ब्रिटिशांनी कमी केली असली तरी. रुग्णांना दिलेले दोन रुपयांचे बक्षीस हे केवळ दान नव्हते, तर या वैज्ञानिक उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल एक प्रतिकात्मक मानधन होते.

**मोतीबिंदू शस्त्रक्रिया (कॉचिंग पद्धत):**

सरफोजी राजे 'कॉचिंग' पद्धतीने मोतीबिंदू शस्त्रक्रिया करणारे एक प्रणेते होते. या पद्धतीत अपारदर्शक भिंग डोळयाच्या दृष्टिपथातून बाजूला सारले जाते. जरी आज ही प्राचीन पद्धत धोकादायक मानली जात असली, तरी त्या काळात तिचा पद्धतशीर वापर आणि दस्तऐवजीकरण महत्त्वपूर्ण होते. 1827 मधील एका केस-शीटमध्ये शस्त्रक्रियेची प्रक्रिया, शस्त्रक्रियेनंतरच्या वेदनांचे व्यवस्थापन आणि रुग्णाच्या हळूहळू झालेल्या प्रगतीचे तपशीलवार वर्णन आहे. सरफोजी राजांच्या उपचार पद्धतींमध्ये वैद्यकीय बहुलवाद स्पष्टपणे दिसून येतो. त्यांनी भारतीय आणि पाश्चात्य उपचार पद्धतींचा समन्वय साधला. एक इंग्रज नेत्ररोगतज्ञ, डॉ. मॅकबीन, धन्वंतरी महालमध्ये कार्यरत होते. शस्त्रक्रियेनंतर सूज कमी करण्यासाठी जळू लावणे आणि एरंडेल तेल देणे यांसारखे भारतीय उपचार, तसेच सिल्व्हर नायट्रेट, बेलाडोनाचे द्रावण आणि टिंक्चर ऑफ हायोसिन यांसारख्या युरोपीय औषधांचा एकत्रित वापर केला जात असे. सरफोजी राजांच्या नेत्ररोगशास्त्रीय उपचारांमधील भारतीय आणि युरोपीय औषधांची तुलना करायची म्हटल्यास, भारतीय औषध प्रणालीतील जळू या औषधाचा उपयोग सूज आणि रक्त संचय कमी करण्यासाठी केला जात होता, त्याचबरोबर एरंडीचे तेलाचा वापर रेचक म्हणून होत आणि रुबार्ब पावडरचा वापर पाचक आणि रेचकसाठी केला जात होता. युरोपीय औषध प्रणाली मधील सिल्व्हर नायट्रेट हे औषध जंतुनाशक/दाहक म्हणून वापरत होते. बेलाडोना द्रावण हे बाहुली मोठी करण्यासाठी, पेपरमिंट वॉटरचा वापर शामक/सुगंधी म्हणून करीत. खडूची पावडर या औषधी वापर आम्लता कमी करण्यासाठी आणि टिंक्चर ऑफ हायोसिन या औषधाचा वापर वेदनाशामक/शामक म्हणून करीत होते.

**3. सरबेंद्र वैद्य मुरैगल:**

'सरबेंद्र वैद्य मुरैगल' ही ग्रंथमालिका धन्वंतरी महालमधील संशोधनाचा प्रत्यक्ष परिणाम होती. या 18 खंडांच्या ग्रंथमालिकेत विविध प्रकारच्या आजारांवर उपचार दिले होते, ज्यात गर्भवती स्त्रिया आणि मुलांचे आजार (गर्भिणी बाल रोग), डोळयांचे आजार (नयन रोग), मज्जासंस्था आणि सांध्यांचे आजार (वात रोग), पोटाचे विकार (गुन्म रोग), मधुमेह (निरिझिवु) आणि विषबाधा (विष वैद्यम) यांचा समावेश होता. विष आणि कॉलरावरील उपचारांवरील प्रकाशित खंड आजही उपलब्ध आहेत. तिने वैद्यकीय ज्ञानाला एका नवीन उंचीवर नेले. 'सरबेंद्र वैद्य मुरैगल' हा महत्त्वपूर्ण ग्रंथ धन्वंतरी महालमध्ये झालेल्या संशोधनातून सिद्ध झालेल्या आणि प्रभावी ठरलेल्या वैद्यकीय औषध-सूत्रांचा संग्रह होता. सरफोजी राजांच्या आदेशानुसार, दरबारातील तमिळ पंडितांनी ही सूत्रे सहज लक्षात राहतील अशा सोप्या काव्यमय स्वरूपात रचली. या प्रक्रियेमुळे गुंतागुंतीचे वैद्यकीय ज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोहोचण्यास मदत झाली. राजदरबारातील वैद्यकीय ज्ञान अनेकदा गुप्त आणि मर्यादित ठेवले जात असे. तथापि, सरफोजी राजांचा प्रकल्प स्पष्टपणे संकलन आणि प्रसारावर केंद्रित होता. त्यांनी राजवाड्यातील संशोधन केंद्रात (धन्वंतरी महाल) विकसित झालेले ज्ञान संकलित केले. तमिळ काव्य आणि मुद्रणालयाची स्थापना हे ज्ञान दरबाराच्या भिंतींपलीकडे नेण्याचे जाणीवपूर्वक केलेले प्रयत्न होते. हे ज्ञानाला राजेशाही शक्तीचे प्रतीक मानण्याऐवजी ते सार्वजनिक हितासाठी वापरण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल होते, जे प्रबोधनकाळाचे एक मुख्य तत्व होते. ते केवळ ज्ञानाचे संग्राहक नव्हते, तर सक्रिय निर्माते आणि प्रसारक होते.

**औषधी वनस्पतींचे वर्गीकरण:**

ग्रंथांच्या निर्मितीसोबतच, सरफोजी राजांनी महत्त्वाच्या औषधी वनस्पतींची "अत्यंत सुंदर चित्रे" काढण्यासाठी कलाकारांना नियुक्त केले. इंग्रजी आणि तमिळ नावांसह तयार केलेला हा सचित्र संग्रह, वनस्पतींची अचूक ओळख करण्यासाठी एक महत्त्वाचा संदर्भ होता. या संग्रहात वैज्ञानिक वनस्पतीशास्त्र आणि कलात्मक प्रतिनिधित्वाचा सुंदर मिलाफ होता. या चित्रांच्या यादीत *कॅसिया फिस्टुला, नेरियम ओडोरम,* आणि *सोलॅनम ट्रायलोबॅटम* यांसारख्या वनस्पतींचा समावेश आहे.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

**4. पशुवैद्यकीय शास्त्रातील दूरदृष्टी:**

सरफोजी राजांचा आरोग्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन केवळ मानवापुरता मर्यादित नव्हता, तर त्यात प्राण्यांचाही समावेश होता, जो त्यांच्या सर्वांगीण विचारसरणीचे द्योतक आहे. धन्वंतरी महालमध्ये पशुसंवर्धनासाठी एक स्वतंत्र संशोधन विभाग होता. येथे मानव आणि प्राणी या दोघांसाठीही वनौषधी तयार केल्या जात होत्या. त्यांची आवड केवळ संशोधनापुरती मर्यादित नव्हती. सरस्वती महाल ग्रंथालयात हत्ती (गजशास्त्र) आणि घोडे (अश्वशास्त्र) यांच्या काळजी आणि उपचारांवर आधारित सुंदर सचित्र हस्तलिखिते जतन केलेली आहेत. या ग्रंथांमध्ये या प्राण्यांची शरीररचना, शरीरक्रिया आणि रोगांवरील उपचारांची माहिती होती, जे प्राणी समारंभ आणि युद्ध या दोन्हीसाठी महत्त्वाचे होते. या ग्रंथांचे जतन आणि त्यावरील सक्रिय संशोधन, पशुवैद्यकीय शास्त्रासाठी त्यांची एक व्यापक रणनीती दर्शवते.

**5. सार्वजनिक आरोग्य आणि नागरी सुविधा:**

सरफोजी राजांनी हे ओळखले होते की, वैयक्तिक आरोग्याचा संबंध सार्वजनिक स्वच्छतेशी आणि पायाभूत सुविधांशी जोडलेला आहे. त्यांचे या क्षेत्रातील कार्य त्यांच्या काळाच्या खूप पुढे होते. त्यांच्या कार्यकाळात लसीकरणाला प्रोत्साहन देण्यासारखे सार्वजनिक आरोग्य उपक्रम राबवले गेले. हे एक अत्यंत प्रगतीशील पाऊल होते, जे त्या वेळी जागतिक स्तरावर उदयास येत असलेल्या सर्वात प्रगत सार्वजनिक आरोग्य विचारांशी सुसंगत होते. सरफोजी राजांनी संपूर्ण तंजावर शहरासाठी एक व्यापक भूमिगत गटार योजना राबवली, जे 18-19 व्या शतकातील शहरी स्वच्छतेच्या दृष्टीने एक मोठे यश होते. याशिवाय, नागरिकांना सुरक्षित पाणीपुरवठा सुनिश्चित करण्यासाठी त्यांनी दहा पाण्याच्या टाक्या आणि अनेक विहिरी बांधल्या. एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीला, भारतातील सार्वजनिक आरोग्य हे प्रामुख्याने ब्रिटिश सैन्यापुरते मर्यादित होते, ज्याचा उद्देश ब्रिटिश सैनिकांना निरोगी ठेवणे हा होता. नागरिकांच्या स्वच्छतेची जबाबदारी राज्याची आहे, ही कल्पना तेव्हा नवीन होती. सरफोजी राजांचे गटार, स्वच्छ पाणी आणि लसीकरण यांसारखे प्रकल्प कोणत्याही विशिष्ट वर्गासाठी नव्हते, तर ते "संपूर्ण तंजावरसाठी" होते. हे शासनाच्या तत्त्वज्ञानातील एक बदल दर्शवते. ते सामान्य जनतेच्या कल्याणासाठी तर्कशुद्ध, वैज्ञानिक तत्त्वे (स्वच्छतेमुळे रोगराई टाळता येते) लागू करत होते. संपूर्ण समाजासाठी सार्वजनिक आरोग्य पायाभूत सुविधांमध्ये ही सक्रिय, राज्य-प्रणित गुंतवणूक प्रबुद्ध राजेशाहीची एक गहन अभिव्यक्ती होती, जी त्यांच्या काळातील एका संस्थानिकाच्या सामान्य जबाबदाऱ्यांच्या खूप पलीकडे होती आणि ब्रिटिश भारतातील अनेक औपचारिक सार्वजनिक आरोग्य कायद्यांच्या आधीची होती.

**निष्कर्ष:**

या सविस्तर विवेचनावरून हे स्पष्ट होते की, सरफोजी राजे भोसले (द्वितीय) हे केवळ वैद्यकशास्त्राचे आश्रयदाते नव्हते, तर ते एका आधुनिक, बहुलवादी आणि मानवतावादी आरोग्य प्रणालीचे सक्रिय शिल्पकार होते. त्यांचे योगदान अनेक पातळ्यांवर महत्त्वपूर्ण आहे. धन्वंतरी महालची स्थापना करून त्यांनी एक असे संशोधन-केंद्रित मॉडेल तयार केले, जिथे विविध वैद्यकीय प्रणाली एकमेकांना पूरक ठरल्या. नेत्र शस्त्रक्रियेतील त्यांचे वैयक्तिक कौशल्य आणि रुग्णांच्या नोंदी ठेवण्याची वैज्ञानिक पद्धत ही त्यांच्या प्रयोगात्मक आणि पुरावा-आधारित दृष्टिकोनाची साक्ष देते. 'सरबेंद्र वैद्य मुरैगल' या ग्रंथमालिकेच्या माध्यमातून त्यांनी अमूल्य वैद्यकीय ज्ञानाचे संकलन करून ते सार्वजनिक हितासाठी खुले केले. पशुवैद्यकीय शास्त्र आणि सार्वजनिक आरोग्यातील त्यांचे दूरदृष्टीचे कार्य, जसे की भूमिगत गटार योजना, हे त्यांच्या सर्वांगीण आणि प्रजा-केंद्रित शासनाचे प्रतीक आहे. थोडक्यात, सरफोजी राजांचा वारसा हा एक शक्तिशाली ऐतिहासिक आदर्श आहे; जो दर्शवतो की, स्थानिक नेतृत्व जागतिक ज्ञानप्रणालींचा समन्वय साधून सार्वजनिक कल्याणासाठी एक अद्वितीय आणि प्रभावी चौकट कशी तयार करू शकते. त्यांनी तंजावरला प्रबोधनाचे एक केंद्र बनवले आणि एक असा बौद्धिक आणि संस्थात्मक वारसा मागे ठेवला, जो आजही ऐतिहासिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यांच्या मानवतावादी प्रयत्नांना त्या काळात कोणतीही पारितोषिके मिळाली नसली तरी, इतिहासाच्या चष्म्यातून पाहिल्यास त्यांच्या "यशाची भव्यता" दिसून येते.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

**संदर्भ ग्रंथ सूची:**

1. Biswas, J., Badrinath, V., & Badrinath, S. S. - Ophthalmic contributions of Raja Serfoji II (1798-1832), *Indian Journal of Ophthalmology*, 60(4), 297–300, 2012.
2. Nair, S. P., - *Raja Serfoji II: Science, Medicine and Enlightenment in Tanjore*, Routledge India, 2012.
3. Nair, S. P., - Diseases of the Eye: Medical Pluralism at the Tanjore Court in the Early Nineteenth Century, *Social History of Medicine*, 25(3), 573-591, 2012.
4. Narayanaswami, V., - *A bibliography of Indology. Vol.2. Indian botany. Part-II, K-Z.* National Library, Calcutta, 1965.
5. Peterson, I., - Heterogeneous Discourses of Royal Personhood in the Life of Serfoji II of Tanjore, Paper presented at the Annual Meeting of the Association for Asian Studies, Washington D.C., 2008.

**Journal of Research and Development**
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

Original Article

# प्रदुषण नियंत्रण व शाश्वत जीवनशैली

**सहा. प्रा. कोटकर कविता अशोक**
लोकनेते बाळासाहेब थोरात कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय तळेगाव दिघे. ता.संगमनेर जि. आहिल्यानगर
**Email:** kotkarkavita20@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-170833
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 8 (II)
Pp. 154-156
August 2025
**Submitted:** 14 July. 2025
**Revised:** 25 July. 2025
**Accepted:** 10 Aug 2025
**Published:** 30 Aug. 2025

***सारांश***

*मानव आणि निसर्ग यांच्यातील संतुलित नाते प्रदूषणामुळे विस्कळीत होत आहे. औद्योगिकीकरण, नागरीकरण, लोकसंख्यावाढ व तंत्रज्ञानाचा अतिवापर यामुळे वायू, जल, ध्वनी व भू-प्रदूषणाचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. या प्रदूषणामुळे सजीवसृष्टीवर गंभीर परिणाम होऊन कर्करोग, श्वसनाचे आजार, जलजन्य रोग, मानसिक तणाव, मातीची उर्वरता कमी होणे अशा समस्या निर्माण होत आहेत. संशोधनातून दिसून येते की, प्रदूषण नियंत्रणासाठी कायदे, तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर, पर्यावरणपूरक साधनांचा अवलंब, घनकचरा व्यवस्थापन, ऊर्जा निर्मितीचे पर्यायी स्रोत तसेच जनजागृती आवश्यक आहे. शाश्वत जीवनशैली अंगीकारल्याशिवाय पर्यावरण संवर्धन शक्य नाही.*

***मुख्य शब्द-*** *प्रदूषण, पर्यावरणीय ह्रास, शाश्वत जीवनशैली, वायू प्रदूषण, जल प्रदूषण, ध्वनी प्रदूषण, भू-प्रदूषण, जनजागृती, पर्यावरण संवर्धन*

**प्रस्तावना**

पृथ्वीवरील जीवसृष्टी ज्या विशिष्ट परिसरात व नैसर्गिक परीस्थितीत जगते त्या सर्व घटकांचा समावेश पर्यावरण या घटकामध्ये योतो. पर्थ्वीवरील जीवसृष्टीची निर्मीती,वाढ, विकास या सर्व गोष्टी पर्यावरणानुसार होत असतात. जी वसृष्टीमधील प्रत्येक घटकांचे आस्तित्व हे त्या-त्या पर्यावरणानुसार वैशिष्ट्यपूर्ण आहे. सजीवसृष्टीस आवश्यक असलेल्या नैसर्गिक घटक योग्य त्या प्रमाणात मिळाले तर त्यांचे जीवनचक्र सुरळीत चालते परंतु कधी कधी नैसर्गिक घटकांमध्ये बिघाड घडून येतो आणि नैसर्गिक चक्र बिघडते . या नैसर्गिक चक्रामध्ये बिघाड घडवून आणणारा महत्त्वाचा घटक म्हणजे पर्यावरणीय प्रदुषण होय

मानव व निसर्गाचे एक अतूट नाते आहे ते परस्परांवर अवलंबून असतात. मानव पर्यावरणात उपलब्ध असलेला साधनसंपत्तीचा वापर करून आपला विकास घडवून आणत असतो. जेव्हां पर्यावरण व निसर्गाचे नाते हे नैसर्गिक समतोल राखून असते तेव्हा पर्यावरण संतुलित असते. परंतू जेव्हा मानव स्वतःच्या विकासासाठी पर्यावरणातील अतिरिक्त घटकांचा वापर करत असतो तेव्हां पर्यावरणामध्ये प्रदुषण घडून येते गेल्या काही दशकात मानव त्याच्या व्यवसायामुळे नैसर्गिक समतोल मोठया प्रमाणावर असंतुलित करत आहे. वाढती लोकसंख्या व त्याच्या वाढणाऱ्या गरजा यामुळे नैसर्गिक साधन संपत्तीवर ताण पडतो, त्यामुळे आपूऱ्या गरजा भागविण्यासाठी पर्यायी साधनांचा वापर केला जातो या अतिरीक्त घटकांमुळे पर्यावरणीय प्रदुषण घडून येते. औदयोगिक विकास, दळणवळणाच्या साधनांचा विकास, निर्वणीकरण, नागरीकरण यामुळे नैसर्गिक पर्यावरण या ना त्या मार्गाने दुपित होत असते, वायुरूप, घनरूप व द्रवरूप प्रदुषीत घटकांचा शिरकाव पर्यावरणास अत्यंत घातक ठरतो त्यामुळे अनेक समस्या उदयास येतात या सर्व अपायकारक घटकांना प्रदुषक किंवा दुषितके असे म्हणतात. निसर्गाची स्वतःची एक अशी संयंभू प्रणाली असते ज्यामुळे एका मर्यादेपर्यंच यात बदल घडवून आणले तर शक्य होते जर या मर्यादपलिकडे बदल केले तर निसर्गामध्ये बदल दिसून येतात व त्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होतो. पर्यावरणाचा ऱ्हास होणे म्हणजे पर्यावरणामध्ये प्रदुषित घटकांचा शिरकाव होणे आणि हा शिरकाव सजीव सृष्टीस घातक असतो.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*सहा. प्रा. कोटकर कविता अशोक, लोकनेते बाळासाहेब थोरात कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय तळेगाव दिघे. ता.संगमनेर जि. आहिल्यानगर.*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI:10.5281/zenodo.17233420

**How to cite this article:**
*कोटकर, . कविता . अशोक . (2025). प्रदुषण नियंत्रण व शाश्वत जीवनशैली. Journal of Research & Development, 17(8(II)), 154–156. https://doi.org/10.5281/zenodo.17233420*

**संशोधनाची उद्दिष्टे:**

प्रस्तुत संशोधनासाठी पुढील उद्दिष्टे मांडण्यात आलेली आहे प्रदूषण नियंत्रण व शाश्वत जीवनशैलीसाठी वापरण्यात येणाऱ्या विविध उपायोजना

**गृहीतके:**

नवनवीन तंत्रज्ञानामुळे, वापरात येणाऱ्या योजनांमुळे प्रदूषण नियंत्रण करता येऊ शकते व उत्कृष्ट जीवनशैली अनुभवता येते

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी माहिती संकलित करण्यासाठी दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे यासाठी विविध मासिके, संदर्भात पुस्तके ,सांकेतिक स्थळे त्यांचा आधार घेण्यात आला आहे .

**प्रदुषणाच्या प्रकारानुसार नियंत्रण व उपाययोजना**

जीवन जगण्याच्या किंवा सुखाने उपभोग घेण्याच्या प्रक्रियेत अडथळा येणे म्हणजे प्रदूषण होय. ज्या माध्यमातून प्रदूषण होते त्याचा मानवी किंवा सजीव सृष्टीवर विपरीत परिणाम होतो ते घटक पुढील प्रमाणे

**हवा प्रदुषणामुळे सजीव सृष्टीवर निर्माण होणारे परिणाम:**

हवा प्रदुषणाची वायुरूप, कणरूप व दवबिंदुच्या स्वरूपात प्रदूषके आढळतात या प्रदुषकांचा सजीव सृष्टीवर विपरीत परीणाम होतो.

* वायूरूप प्रदुषकांमध्ये प्रामुख्याने गंधक, भस्मे व त्यांची संयुग तसेच कार्बन, नायट्रोजन व हायड्रोजनची संयुगे, क्लोरोफ्युरो कार्बनचा समाविश होतो. गंधक, भस्मे व त्यांची संयुगे मानवाच्या व प्राण्यांच्या शरीरावर दुरगामी परीणाम करतात. कर्करोगासारखे आजार उद्‌भवतात. नायट्रोजन व हायड्रोजनच्या संयोगामुळे डोकेदुखी, चक्कर येणे यासारखी लक्षणे दिसतात कार्बनमोनाऑक्साईड वायुमुळे मज्जासंस्थेवर परिणाम होतो व मानवाची कार्यशक्ती कमी होते. तसेच मानव बेशुध्द पडू शकतो परिणामी प्राण ही जाऊ शकते. अनेक श्वसनाचे आजार मानव उद्‌भवतात. उंच उडणाऱ्या सुपरसोनिक विमानांमुळे व कीटकनाशकांच्या वापरामुळे फ्ल्युरो कार्बनचे उत्सर्जन होते व त्यातून ओझनशी संयोग होऊन ओझोनच्या थराचा क्षय होतो. जर ओझोनच्या स्तराचा क्षय झाला तर अतिनील किरणे भूपृष्ठावर येऊन कर्करोग त्वचारोग ,यासारख्या आजारांना सामोरे जावे लागते.

*कुणयुक्त प्रदुषकांमध्ये धुळ, धुर, सिलिकेट्चे कण, शिसे, जंतु व किटकनाशके यांचा समविश होतो.

कारखाण्यातून उत्सर्जित होणाऱ्या विविध रासायनिक कण धातूच्या वस्तूवर गंज चढवतात. औद्योगिक वसाहत व वाहणाच्या उत्सर्जनातून धूळ निर्माण होते त्यामुळे कपडे, तैलचित्रे, वास्तू मलीन होतात व इमारती काळवंडतात. उदा. आग्राचा ताजमहल.

* दवबिंदुच्या रूपात हवेचे प्रदुषण हे आम्ल प्रर्जन्याच्या स्वरूपात असते. तसेच धुळीच्या ढगांमुळे व स्मॉग मुळे - धुरक्यांन सारखी संयुगे तयार होतात. आम्ल पर्जन्यांत असलेली सल्फरड्राय ऑक्साईड व नायट्रोजन ऑक्साईडमुळे सजीव सृष्टीवर विपरीत परीणाम होतो.

**जलप्रदुषणाचा सजीव सृष्टीवर होणारा परिणाम :**

मानवी संस्कृतीचा उदय व विकास हा पाण्याच्या सनिध्यात झाला आहे. शेती, उद्योगधंदे हे पाण्यावरच अवलंबून असतात. मानवाव्यतिरिक्त इतर जीवसृष्टीसाठी पाणी हा महत्त्वाचा घटक आहे जलस्रोत साठे भूपृष्ठावर मर्यादीत् स्वरूपात आहे. परंतु मर्यादीत जलस्रोत आज वेगाने प्रदुषित होत आहे व या प्रदूषणाच्या मर्यादेने धोक्याची पातळी ओलंडली आहे.

जलप्रदुषणा साठी मुख्य कारणीभूत मानव व त्याचे व्यवसायच असतात. यामध्ये नागरी व ग्रामीण वस्त्यांनमधून निघणारे सांडपाणी व मैला, कारखान्यातील उत्पादन प्रक्रियेतून तयार झालेली प्रदुषके घन व द्रवस्वरूपातील पाण्यात विरघळतात त्यामुळे जलचर प्राण्यांवर विपरीत परिणाम होतो दूषित पाण्यात प्राणवायूचे प्रमाण कमी होते त्यामुळे जलचर मृत्युमुखी पडतात जर पाण्यात पारा शिष्य तांबे असेल तर मानवी शरीरावर परिणाम होऊ शकतो त्यामुळे निरनिराळ्या रोगांना मानवाला सामोरे जावे लागते कावीळ कॉलरा विषमज्वर अतिसार यासारख्या रोगात वाढ होते मानवी आरोग्यावर विपरीत परिणाम होतो शेती व्यवसायात प्रदूषित पाणी जर जलसिंचनासाठी वापरले तर त्या पाण्यातील क्षार व धातू पिकांद्वारे अन्नसाखळीत प्रसारित होतात त्यामुळे अन्नसाखळीतील रचनेत बिघाड घडवून येतो जर पाणी अधिक दूषित असेल तर पिके ही नष्ट होतात काही वेळा जलपर्णीची वाढ झपाट्याने होऊन परिसंस्थेचे संतुलन बिघडते दूषित पाणी जर भूजलात मिसळले तर भूजलही दूषित होते तसेच पाण्यातील अपमार्जकांमुळे सल्फाइट्स ,फ्युराइड्स व आरसेनिक मुळे मृत्यूही येऊ शकतो औष्णिक विद्युत निर्मितीमध्ये निर्माण झालेले गरम पाणी जर जलसाठ्यात सोडले तर त्या पाण्यातील जीव संस्थेवर परिणाम होतो जल वाहतुकीमुळे तेल गळती झाली तर त्याचा परिणाम त्या भागातील परिसंस्थेवर होतो

**ध्वनी प्रदूषणाचा सजीव सृष्टीवर होणारा परिणाम:**

ध्वनीप्रदूषण हे संपूर्णपणे मानवनिर्मित समस्या आहे या प्रश्नाची तीव्रता ही मानवी संस्कृतीवर अवलंबून असते आपल्याला अनेक श्रोतातून निघालेल्या आवाजातून ध्वनी प्रदूषणासारख्या गंभीर समस्येला तोंड द्यावे लागते. ध्वनी प्रदूषण हे प्रामुख्याने करमणुकीच्या विविध

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(II)| August - 2025

उपकरणे, ध्वनी संचके, टेप रेकॉर्डर, सी.डी. टीव्ही संच, नाच गाण्यांचा कार्यक्रम, वाहनांचा आवाज, मोठ्याने वाजणारे भोंगे, कारखान्यातील व लोहमार्गावरील आवाज, घरगुती वापराच्या इलेक्ट्रॉनिक साधने, विमानांचे उड्डाण ,शहरी भागातील रहदारी इत्यादींमुळे होते. ध्वनी प्रदूषणामुळे मानवी व सजीवांवर विपरीत परिणाम होतो. ध्वनी प्रदूषणामुळे श्रवण शक्ती कमी होऊ शकते, मानसिक स्वास्थ्य बिघडते, चिडचिडेपणा वाढतो, निद्रानाश ,अप्रचन कार्यक्षमता मंदावते, कमी किंवा अतिरक्तदाब, हृदयरोग यासारखे आजार उद्भवतात. ध्वनी प्रदूषणामुळे नवजात शिशु व गर्भवती स्त्रियांच्या गर्भावर अनिष्ट परिणाम होतो .प्राण्यांच्या प्रजननावर प्रक्रियेवर परिणाम होतो त्यामुळे ध्वनी प्रदूषणाचे नियंत्रण करणे ही काळाची गरज बनली आहे ध्वनी प्रदूषण नियंत्रण करण्यासाठी ध्वनी प्रदूषकाच्या उगम स्थानांकडे बारकाईने लक्ष ठेवले पाहिजे ध्वनीची मर्यादा राखण्यास अधिक सक्षम कायदे करून त्यांची अंमलबजावणी केली पाहिजे, करमणुकीच्या साधनांचा आवाज कमी ठेवला पाहिजे, तंत्रज्ञानाच्या सहाय्याने ध्वनी प्रदूषण कमी करता येऊ शकते. ध्वनी प्रदूषणा विषयी जनजागृती केली तर ध्वनी प्रदूषण कमी करता येऊ शकते.

**भू-प्रदूषणाचा सजीव सृष्टीवर होणारा परिणाम:**

जमिनीत टाकल्या जाणाऱ्या रासायनिक उर्वरकांमुळे किंवा दूषितकांमुळे भू प्रदूषण घडून येते भू प्रदूषण हे प्रामुख्याने मानवी कृत्यामुळे घडते भू प्रदूषनामध्ये सर्वात वरचे स्थान हे घनकचऱ्याचे असते घरे, रस्ते, कारखाने, कार्यालय, उद्योगधंदे, बाजारपेठा अशा सर्व ठिकाणाहून कुठल्या ना कुठल्या प्रकारचा कचरा तयार होत असतो अशा कचऱ्याची विल्हेवाट लावणे हा मोठा गहन प्रश्न निर्माण झाला आहे. या कचऱ्यामुळे भू प्रदूषण व वायू प्रदूषण मोठ्या प्रमाणात घडून येते. शेतीत वापरल्या जाणाऱ्या रासायनिक खतामुळे व कीटकनाशकांमुळे भू प्रदूषण घडते. त्यामुळे जमिनीची उत्पादकता घटते. कधीकधी जमीन नापीक बनते .कारखान्यातील विषारी रसायने व त्यांचे पदार्थ भूपृष्ठावर टाकून दिली जातात. त्यामुळे जमीन नापीक होते यामध्ये जर पाणी मिश्रित झाले तर भूजल दूषित होते त्यामुळे सजीव सृष्टीस मोठा धोका निर्माण होतो. भू प्रदूषणावर नियंत्रण ठेवायचे असेल तर मानवनिर्मित कचरा टाकाऊ पदार्थ रासायनिक पदार्थांची योग्य विल्हेवाट लावली पाहिजे घन कचऱ्याचे व्यवस्थापन करणे, प्लास्टिक, टीन, काच यासारख्या अविघटीत घटकांचे योग्य विल्हेवाट लावणे, कचऱ्यातून ऊर्जा निर्मिती करणे, गोबर गॅस व कंपोस्ट खत निर्माण केले पाहिजे व लोकांमध्ये जनजागृती घडून आणली पाहिजे.

**समारोप :**

दिवसेंदिवस ढासळत चाललेले पर्यावरणाचे संतुलन पुन्हा साधण्यासाठी वेगवेगळया प्रकारचे कायदे व कानून करून पर्यावरण संरक्षण करता येऊ शकते. जर पर्यावरण प्रदूषित होतच असेल तर मानवाला आपली जीवनशैली बदलून घेणे गरजेचे आहे . जर प्रदूषण आटोक्यात आले नाहीतर पर्यावरण प्रदूषणाविषयी जनजागृती करणे काळाची गरज निर्माण झाली आहे.

**संदर्भ:**

1. पर्यावरण अध्ययन- डॉ.पोपट कुदनर, डॉ. शैलेश निकम
2. पर्यावरणीय भूगोल- डॉ. आर ई. नजन, डॉ. जी. के. चव्हाण
3. आपत्ती व्यवस्थापनाचा भूगोल- डॉ. अर्जुन मुसमाडे, डॉ. ज्योतीराम मोरे
4. Wikipedia
5. Google